न. ग्रं. सं. ठाणे
विषय निबंध
सं. क्र. १२३५

# असे वक्ते! अशी व्याख्याने!

ले. ना. सी. फडके

REFBK-0010858



असे वक्ते!
अशी व्याख्यानं!

# असे वक्ते! अशीं व्याख्यानं!

लेखक
नारायण सीताराम फडके, एम्. ए.

किंमत रु. ३·५०

REFBK-0010858

व्हीनस प्रकाशन : पुणें

आवृत्ति पहिली
मार्च १९६०

सर्व हक्क प्रकाशकाचे स्वाधीन

प्रकाशक :
स. कृ. पाध्ये
व्हीनस प्रकाशन
४१० शनवार : पुणें २

मुद्रक :
वि. ग. माटे
विश्वकर्मा मुद्रणालय
३९५ सदाशिव : पुणें २

# १ : भूमिका

व्याख्यानकलेवर मी एखादा ग्रंथ लिहावा असा अनेक मित्रांचा फार दिवस आग्रह आहे. मी एक चांगल्यापैकी वक्ता आहे आणि प्रभावी वक्तृत्व साध्य करण्यासाठी मी जो कांही अभ्यास आणि प्रयत्न केला त्याच्या अनुरोधानं व्याख्यानकलेंत प्राविण्य मिळविण्या-साठी माणसानं त्या कलेची उपासना पद्धतशीरपणानं कशी करावी याबद्दल मी कांही लिहिलं तर तें फार उपयुक्त आणि मार्गदर्शक ठरेल अशी माझ्या मित्रांची कल्पना आहे. त्यांची ही कल्पना बरोबर आहे. अकारण विनयाचं सोंग करण्याचं मला कारण नाही. वक्ता या नात्यानं मी थोडा फार लौकिक मिळविला आहे हें अगदी खरं आहे. आजपर्यंत जे थोर थोर वक्ते मी ऐकले, त्यांच्या कलेचा, विद्वत्तेचा, आणि देशप्रीतीचा विचार मनांत आला, की माझ्या अल्पत्वाची जाणीव मला होते. त्यांच्या तुलनेनं माझं वक्तृत्व किती सामान्य आहे अशा विचारानं माझं मस्तक नम्र होतं. माझ्या मर्यादा मला पूर्ण ठाऊक आहेत. परंतु त्या मर्यादा लक्षांत घेऊनहि माझ्या ठिकाणीं वक्तृत्वाचे गुण प्रकर्षानं आहेत ही गोष्ट खरीच आहे. या बाबतींत मीं जाणतेपणानं सतत अभ्यास आणि प्रयत्न केला आहे हेंदेखील खरं आहे. मी व्याख्यानकलेवर एखादा ग्रंथ लिहिला तर तो बऱ्यापैकी होईल याची मला खात्री आहे. अशा ग्रंथाचा विचार माझ्या मनांत कित्येक दिवस आहे.

वक्ता जन्मावा लागतो, ही गोष्ट अविवाद्य आहे. तथापि जन्मजात वक्त्याला देखील तपश्चर्या करावीच लागते, आणि जो जन्मजात वक्ता नाही असा मनुष्यदेखील सतत प्रयत्नानं आणि डोळस अभ्यासानं बऱ्यापैकी व्याख्याता होऊं शकतो, या दोन्ही गोष्टी खऱ्याच आहेत. गायनकलेप्रमाणेच

वक्तृत्वकला म्हणजे केवळ पुस्तकावरून शिकण्याची विद्या नव्हे. या कलांच्या बाबतींत पुस्तकी अभ्यासक्रम, शाळा, परीक्षा, पदव्या इत्यादि साधनांचा उपयोग आहे ; परंतु तो फार मर्यादित. मोठमोठे गायक आणि वादक शाळाकॉलेजांतून निर्माण होत नसतात ; आणि वक्त्याचीहि गोष्ट अशीच आहे. परंतु हें सारं मान्य केल्यावरहि संगीतशास्त्रावरच्या पुस्तकांची उपयुक्तता अविवाद्य समजावी लागते, आणि त्याचप्रमाणे वक्तृत्वकलेवरील पुस्तकांचीहि. तेव्हां जिच्यावर वयाच्या विसाव्या वर्षापासून मी प्रेम केलं, जिचा पद्धतशीर अभ्यास केला, जिच्या आविष्कारांत मी अनेक वेळा कांहीं एका अवर्णनीय आनंदाचा उपभोग घेतला, आणि जिच्या बळावर व्याख्यानाला मानधन मिळालंच पाहिजे असा आग्रह यशस्वी करून व्याख्यात्याला एक प्रकारची प्रतिष्ठा मिळवून दिली, त्या वक्तृत्व कलेविषयी एखादा सुंदर ग्रंथ लिहावा असं मला साहजिक वाटतं. असा ग्रंथ लिहिण्याचं माझ्या फार दिवस मनांत आहे; आणि मनांत असूनहि असा ग्रंथ माझ्या हातून अजून लिहून झाला नाही हें माझ्या मनांतलं गुप्त शल्य आहे.

हें शल्य कांहीं अंशानं दूर करण्यासाठी काय करता येईल याचा जेव्हा मी विचार करूं लागलों तेव्हा मनांत एक अशी कल्पना येऊं लागली, की ज्या मोठमोठ्या वक्त्यांचीं व्याख्यानं मीं ऐकलीं त्यांच्याविषयींच्या आठवणी मी सांगितल्या तर ? त्यांचं व्यक्तिदर्शन घडवावं, त्यांच्या कलागुणांची छाननी करावी, त्यांच्या व्याख्यानांत कोणती शक्ति होती तिचं विवरण करावं, श्रोत्यांच्या अंतःकरणाला भिडण्याचं सामर्थ्य त्यांच्या ठिकाणीं कशामुळे आलं होतं तें सांगावं, अशा हेतूनं आणि भूमिकेवरून थोर थोर वक्त्यांच्या आठवणी मी सांगितल्या तर ? ही कल्पना माझ्या मनाला अधिकाधिक पटूं लागली, आणि वाटूं लागलं, हा उपक्रम अवश्य करण्यासारखा आहे.

अलीकडे माझं एक वैयक्तिक खाजगी दुःख असं आहे, की जें व्याख्यान तन्मयतेनं ऐकावं आणि ज्याच्या स्मृतीचा आनंद दीर्घकाल घ्यावा असं व्याख्यान मला सहसा ऐकायला मिळत नाही. आधीं मुळीं आताशा व्याख्यान याचा अर्थ राजकीय प्रश्नावरचं व्याख्यान असा होऊन बसला आहे. इतर विषयांवरच्या व्याख्यानांत लोकांना गोडीच उरलेली नाही ; आणि राजकीय व्याख्यान याचा अर्थ तोंडाला येईल तें बोलणं, नेहरू सरकारवर टीकेची यथेच्छ झोड

उठविणं, आणि हंशा टाळ्या मिळविणं, असा झाला आहे. लोकांना ऐकावयास हव्या असतात शिव्या ; तर्कशुद्ध मुद्देसूद विवेचन नव्हे ! खमंग, खारट, तुरट, तेलकट, तळकट अशा बडबडीची लोकांना भूक आहे. खऱ्या सुदर वक्तृत्वाचा विलास कुणाला कळेनासा, आवडेनासा झाला आहे. राजकीय प्रश्नावरच्या सभांत व्याख्यानबाजीची जी तऱ्हा चालते तिच्यांत कलापूर्ण वक्तृत्वाचा मागमूस देखील नसतो. परंतु या सभांना गर्दी होते. व्याख्यान आटोपल्यावर परत जाणाऱ्या श्रोत्यांचे उद्गार ऐकावे तों "काय झक्क उडविली, नाही ?" अशा प्रकारचे असतात. कोणत्या वक्त्यानं कोणत्या थोर व्यक्तीचं कसं मुंडण केलं त्याची चर्चा करून मिटक्या मारीत लोक घरीं परतलेले दिसतात. एखाद्या खऱ्याखुऱ्या कसबी वक्त्याचं राजकारण-विरहित विषयावर व्याख्यान कुठे असेल तर तिकडे लोकांचे पाय वळत नाहीत. थोड्याच दिवसांपूर्वी येथील शिवाजी मंदिरांत नव्यानं बांधलेल्या सावरकर-सभागृहाचा उद्‌घाटन समारंभ झाला. कुणाच्या हस्तें ? तर सर सी. पी. रामस्वामी यांच्या हस्तें. सर सी. पी. यांच्या तोडीचे वक्ते आज घटकेला भारतांत फार थोडे आहेत. खरं म्हणजे त्यांच्या व्याख्यानाला आम जनता राहूं द्या, परंतु सारं सुशिक्षित पुणें शहर लोटायला हवं होतं. परंतु तसं झालं नाही. सवंग राजकारणानं लोकांची अभिरुचि अशी कांही विकृत करून टाकली आहे. की चांगल्या वक्त्याची आणि श्रवणीय, चिंतनीय वक्तृत्वाची कदरच कुणाला उरलेली नाही. या तऱ्हेचं वक्तृत्व दुर्मिळ होत चाललेलं आहे. निर्मळ साहित्यिक प्रतिपादनाचं व्याख्यान ऐकायला मोठ्या आशेनं जावं तों तोंडाची चव पार बिघडून जाते. रुक्ष, रटाळ, कलाहीन, कंटाळवाणं चऱ्हाट किंवा दळण ऐकावं लागतं.

मग मनांत येतं की आजच्या दुर्दैवी श्रोत्यांना उद्देशून म्हणावं, अरे, खऱ्या अस्सल व्याख्यानकलेशी जरा परिचय करून घ्या ! जी अविस्मरणीय व्याख्यानं मी पूर्वी ऐकलीं त्यांच्या आठवणी आजच्या श्रोत्यांना सांगाव्या. या माझ्या आठवणी म्हणजे असं एक धन आहे, की जें दुसऱ्यांना दिल्यानं कमी होण्याऐवजी वाढेल ! त्या आठवणी मी सांगितल्या तर ऐकणारांना त्या रुचकर वाटतील, आणि शिवाय वक्तृत्वाची जुनी दुनिया किती वेगळी आणि किती मोलाची होती हेंहि त्यांना कळेल. इतकंच नव्हे, तर ज्याला

व्याख्यानकलेची हौस आहे, ती संपादिण्याची इच्छा आहे, त्याला माझ्या या आठवणींचा पुष्कळ उपयोग देखील होईल.

मला ऐकायला मिळालेलीं सुंदर सुंदर व्याख्यानं आठवूं लागलीं, की लोकमान्य टिळक, शिवराम महादेव परांजपे, तात्यासाहेब केळकर, पांगारकर, ॲनी बेझंट, सरोजिनी नायडू, गांधीजी, बिपिनचंद्र पाल, शौकत अलि, अशा व्यक्तींच्या मूर्ती माझ्या डोळ्यांपुढे उभ्या राहतात. त्यांचे धीरगंभीर श्रुति-मधुर आवाज ऐकूं येऊं लागतात, आणि चाळीस पंचेचाळीस वर्षांपूर्वीचं जें पुणं आता काळाच्या पडद्याआड कायमचं गेलं आहे तें मला दिसूं लागतं. त्यावेळच्या त्या पुणें शहराच्या चित्राची पार्श्वभूमि रंगविल्याखेरीज जीं अविस्मरणीय व्याख्यानं मी ऐकलीं त्यांच्या गोष्टी मला सांगतां येणार नाहीत.

किती वेगळं होतं त्या वेळचं पुणं ! त्या काळांत ज्या जागी मोठमोठ्या वक्त्यांचीं गाजलेलीं भाषणं मी ऐकलीं त्या जागा तुम्हांला सांगितल्या तर तुम्ही आश्चर्यानं म्हणाल, " काय, या ठिकाणीं व्याख्यानं होत होतीं ? छॅः ! कांही तरीच सांगतां ! " तुमची शंका रास्त आहे. पण मी काय सांगतों तें ऐका तरी.

* * *



## २ : जयकर आणि सरोजिनी नायडू

डेक्कन जिमखान्याकडून पुण्याच्या शहर विभागांत शिरतांना संभाजी पूल ओलांडल्यावर ज्या मोठ्या चौकांत घागरवाल्या बाईचा छोटासा पुतळा आहे त्या चौकांत क्षणभर थांबा, दक्षिणेकडे तोंड करून तुम्ही उभे राहिलांत तर थोड्या अंतरावर अलका टॉकीजची इमारत तुम्हांला दिसेल.

या इमारतीच्या अलीकडे पुलाच्या कोपऱ्यावर एक मंदिर आहे. त्या मंदिरांत सहसा कुणी जात नाही. परंतु तुम्ही अवश्य जा. कारण पूर्वीच्या काळांत मोठमोठ्या वक्त्यांचीं जाहीर भाषणं ज्या ठिकाणीं मी आणि माझ्या पिढींतल्या लोकांनी ऐकलीं अशी ती एक जागा आहे. ती पहा.

आज पुण्यांत ज्या मोठमोठ्या सभा होतात त्यांच्या जागा निराळ्या आहेत. शनिवारवाड्यापुढला चौक, स. प. कॉलेजचें मैदान, एंजिनिअरिंग कॉलेजचं मैदान, फर्ग्युसन कॉलेजचं मैदान अशा ठिकाणीं आजच्या मोठाल्या सभा होतात. जवाहरलाल नेहरू आले म्हणजे तर हीं ठिकाणं देखील अपुरीं पडतात, आणि त्यांच्या व्याख्यानांची व्यवस्था शर्यतींच्या मैदानावर करावी लागते. व्याख्यानाला जमणाऱ्या गर्दीचं प्रमाण आता हजारांनी

नव्हे तर लाखांनी मोजावं लागतं . . . पंचेचाळीस वर्षांपूर्वी लोकमान्य टिळकां-सारख्या भारतीय कीर्तीच्या पुढाऱ्याच्या व्याख्यानांनादेखील अशी गर्दी कधी लोटली नव्हती. असहकारितेच्या प्रारंभकालांत बेन स्पूर नांवाचा इंग्लंड-मधील मजुर पुढारी पुण्यांत आला तेव्हा फार मोठी सभा झाली ती शनिवार वाड्यापुढे. लोकमान्य टिळकांना पुण्याच्या नागरिकांनी मानपत्र दिलं त्या वेळी सभा झाली ती सध्याच्या फुले मार्केटच्या पटांगणांत. टिळकांच्या निधनानंतर दहाव्या दिवशी लाला लजपतराय यांच्या अध्यक्षतेखाली मोठी शोकसभा झाली तीहि याच पटांगणांत. या सभांना फार तर वीसपंचवीस हजार लोक हजर असावेत. त्या वेळचा हा गर्दीचा उच्चांक समजला गेला होता. गांधीजी दक्षिण आफ्रिकेतून परत आले त्या वेळेस त्यांचं पुण्यास इंग्रजी भाषण झालं तें सध्याच्या वसंत टॉकीजच्या—त्या वेळच्या किर्लोस्कर नाटकगृहाच्या—जागेंत. खिलाफत चळवळीच्या ऐन भराच्या दिवसांत लोकप्रियतेच्या शिखरावर असलेले मुसलमान पुढारी वक्ते शौकत अलि यांचं व्याख्यान झालं तें शिवाजी मंदिरांत. अरविंद घोष, ॲनी बेझंट, यांचीं व्याख्यानं झालीं तीं गायकवाडवाड्याच्या आंगणांत. या व्याख्यानाना फार तर दोन तीन हजार लोक हजर असतील नसतील. परंतु त्या काळांतल्या हिशेबनं तीं गर्दीचीं व्याख्यानं म्हटलीं गेलीं. टिळक स्मारक मंदिर आणि शिवाजी मंदिर या दोन व्याख्यानांच्या जागा टिळकांच्या हयातीनंतर अस्तित्वांत आल्या. त्यापूर्वीच्या पंधरावीस वर्षांच्या काळांत चांगल्या लोकप्रिय वक्त्याच्या व्याख्यानाला चार सहाशें लोक जमले, की उत्तम गर्दी झाली म्हणत असत. अर्थात् त्या गर्दीच्या मानानंच जाहीर व्याख्यानाच्या जागा होत्या.

वर ज्या मंदिराचं वर्णन मी केलं तें विठ्ठलाचं मंदिर, सार्वजनिक सभेचा दिवाणखाना, ओंकारेश्वराच्या मंदिरांतला चौक, अशीं ठिकाणं व्याख्यानांना पुरत असत.

गणपतीच्या उत्सवांत व्याख्यानांची झोड उठत असे, व पुढाऱ्यांच्या व्याख्यानांना गर्दी होत असे. परंतु हीं व्याख्यानंदेखील व्हायचीं गायकवाड-वाड्यांत, एखाद्या उघड्या चौकांत, नेने घाटासारख्या जागीं, किंवा एखाद्या वाड्याच्या आंगणांत ! वसंत व्याख्यानमाला म्हणजे श्रोत्यांच्या दृष्टीनं त्या

काळांतलं मोठं आकर्षण ! या मालेंत पुण्याचे आणि बाहेरगावचे नामवंत वक्ते बोलत असत. माझ्या पिढींतल्या मंडळींचा निवडक वक्त्यांच्या वक्तृत्वाशी परिचय झाला तो वसंत व्याख्यानमालेंतच. परंतु या मालेंतलीं व्याख्यानं व्हायचीं तींदेखील खाजगी वाड्याच्या मोठ्या आंगणांत. आता तो केळकरांचाच वाडा राहिला आहे की नाही माहीत नाही. परंतु आता ज्या ठिकाणीं 'आनंद' कार्यालय आहे तिथल्या चौकांत तो वाडा होता.

वसंत व्याख्यानमालेच्या या वाड्यांतल्या व्याख्यानांना तीन-चारशे लोक जमले, की चांगली गर्दी समजत असत. एखाद्या विशेष लोकप्रिय वक्त्याचं भाषण असलं की श्रोत्यांची संख्या जेमतेम हजारावर पोचत असे. या आंगणांत आंब्याचीं झाड होतीं असं आठवतं. आजूबाजूस फुलवेलीहि असाव्यात. एखाद्या आश्रमाच्याच जागीं व्याख्यानयज्ञ चालल्यासारखं वाटे. व्याख्यानाला योग्य अशी ती रमणीय पार्श्वभूमि होती. शुक्ल पक्ष असला, की आकाशांत रोज कलेकलेनं वाढत जाणारं चंद्रबिंब दिसत असे. आम्रमंजिरींचा सुगंध हवेंत दरवळलेला असे ! मधूनच कोकिळेचा कुहू कुहू शब्द कानीं पडत असे ! वक्तृत्वाचा रसास्वाद घेण्यास मोठं उचित असं तें स्थळ होतं. परंतु या व्याख्यानांच्या श्रोत्यांची संख्या सरासरीनं दोन तीनशेच्या घरांत असायची. चांगले चांगले वक्ते आणि त्यांचीं पहिल्या प्रतीचीं व्याख्यानं मी ऐकलीं तीं या जागीं.

परंतु ज्या व्याख्यानाचा माझ्या मनावर विशेष ठसा उमटला तें पहिलं व्याख्यान कोणतं याची आठवण करूं लागल्यावर ज्या व्यक्तीचा आणि जागेचा निर्देश मला करावासा वाटतो ती जागाहि निराळी आणि ती व्यक्तीहि निराळीच आहे.

१९११ सालीं—म्हणजे एकुणपन्नास वर्षांपूर्वीं—फर्ग्युसन कॉलेजांत पहिल्या वर्षांत मी होतों. त्या वर्षीं कॉलेजच्या वार्षिक संमेलनाचे मुख्य पाहुणे म्हणून बॅरिस्टर एम. आर. जयकर ( त्या वेळेस ते याच किताबतीनं ओळखले जात होते ! ) आले होते. तेव्हा फर्ग्युसन कॉलेजचं ॲम्फी थिएटर बांधलं गेलं नव्हतं. कॉलेजच्या विद्यार्थ्यांची संख्याहि पुरती एक हजार नव्हती. बॅरिस्टर एम. आर. जयकर यांचं व्याख्यान झालं तें ज्या वसतिगृहाला आता सर्वांत जुनं वसतिगृह म्हणावं लागेल—आणि जें एकच त्या वेळेस पुरेसं होतं—त्याच्या

मधल्या खुल्या चौकांत. उत्तम इंग्रजी वक्ते म्हणून जयकरांची कीर्ति आम्हां विद्यार्थ्यांच्या कानी आली होती आणि वार्षिक संमेलनांतील त्यांचं व्याख्यान ऐकण्यास आम्ही उत्सुक होतो.

ज्या वेषांतले डॉ. जयकर आजच्या पिढीनं बघितले आहेत त्याहून अगदी भिन्न असा त्यांचा त्या व्याख्यानाच्या वेळचा पोषाख होता. नेक्टाय, सूट, बूट अशा साहेबी पद्धतीच्या पोषाखाऐवजी धोतर ( तें देखील काचा मारलेलं नव्हे, तर पुढे ओचा सोडलेलं ! ), बंद कॉलरचा लांब ( ज्याला त्या वेळेस पारशी फॅशनचा म्हणत असत तसा ) काळा कोट, मानेभोवतीं लपेटलेलं पांढरं स्वच्छ उपरणं, आणि डोक्याला जरीकाठी पांढरा रुमाल, अशा वेषांत त्यांना मी पाहिलं. प्रथमच पाहिलं. त्या पोषाखांतली त्यांची मूर्ति मला मोठी आकर्षक वाटली. त्यांचा परिचय करून देण्यासाठी प्रिन्सिपल रँग्लर परांजपे थोडा वेळ बोलले, पण तेवढ्यांत त्यांनी आपल्या गावठी इंग्रजीची आणि भिकार वक्तृत्वाची चुणूक दाखविलीच. आम्हां विद्यार्थ्यांना त्यांचं हें असलं अजागळ वक्तृत्व नित्याच्या परिचयाचं झालेलं होतं, आणि एखाद्या पाहुण्याच्या व्याख्यानाच्या आधीचा एक छोटासा करमणुकीचा कार्यक्रम येवढ्याच दृष्टीनं त्याकडे पाहण्याची सवयहि आम्हांला झाली होती.

परांजपे खाली बसले, जयकर उभे राहिले, आणि त्यांच्या तोंडून बाहेर पडलेले पहिले शब्द ऐकल्याबरोबर सारी सभा मंत्रमुग्ध होऊन ऐकूं लागली. जयकर त्या वेळेस चाळिशीच्या सुमाराचे असतील. त्यांच्या आवाजांत तारुण्याची छटा होती. परंतु आवाजाचा धर्म थोडासा रुंद आणि ढिलाच होता, तो त्यांच्या वक्तृत्वाच्या थाटाला शोभून दिसला. त्या दिवसांत राजकारणाला महत्त्व होतं. परंतु उठल्यासुटल्या ज्या त्या वक्त्यानं राजकारणाची सवंग बडबड करून टाळ्या मिळवाव्या अशी रीत नव्हती. विद्यार्थ्यांना मार्गदर्शक होईल असा उपदेशच जयकरांनी आपल्या व्याख्यानांत केला. त्यांतला एक मुद्दा मला विशेष आवडला तो असा की, " कॉलेजांतील अभ्यासक्रम पार पाडतांना तुमचा अनेक परप्रांतीय विद्यार्थ्यांशीं संबंध येईल. या कॉलेजांत सिंध, गुजरात, मद्रास, अशा दूरदूरच्या भागांतले विद्यार्थी शिकण्यासाठी येतात. महाराष्ट्रीय विद्यार्थ्यांनी असा कटाक्ष ठेवावा, की या दूर देशांतील तरुणांशीं मैत्री जोडायची, त्यांचे आचारविचार, धर्मसमजुती, साहित्य,

संगीत यांविषयीं शक्य तितकी माहिती मिळवायची. केवळ महाराष्ट्रीय विद्यार्थ्यांच्या आकुंचित वर्तुळांत वावरूं नका. परप्रांतांतले मित्र मुद्दाम जोडा. असं केल्यानं तुमचा दृष्टिकोन विशाल होईल. आंतरप्रांतीय सलोख्याची आणि सहानुभूतीची आज आपल्याला फार गरज आहे....."

जयकरांच्या या विचारसरणीचा जसा माझ्या मनावर खोल परिणाम झाला तसाच त्यांच्या वक्तृत्वाच्या शैलीचाहि झाला. वाक्यांची सुंदर रचना, वेचक शब्दांची योजना, विचारांचा अखंड मृदु ओघ, आवाजांतला चढउतार, इंग्रजी शब्दांचे शास्त्रशुद्ध ऐटबाज उच्चार, इत्यादि गुणांनी जयकरांचं भाषण नटलेलं होतं. नंतरच्या काळांतहि ज्या ज्या वेळेस मी जयकरांचं भाषण ऐकलं त्या त्या वेळेस या गुणांचा प्रत्यय मला आला. परंतु या सर्व गुणांना विशेष उजळा देणारा जयकरांचा गुण त्या पहिल्या व्याख्यानांत आणि नंतरहि नेहमी मला आढळला तो हा, की जयकरांचं वक्तृत्व ऐकणाराला प्रामुख्यानं असं वाटत रहात असे, की या माणसाचं स्वतःच्या वाणीवर विशेष प्रेम आहे, तोंडांतून बाहेर पडणारा प्रत्येक शब्द गोंजारण्याची याला हौस आहे, या गृहस्थाच्या बोलण्यांत एक विशिष्ट अभिजात नखरा आहे. सुरेलपणा आणि लयबद्धता यामुळे मिठास वाटणारं जयकरांचं भाषण स्वतःच्या वाणीवरील त्यांच्या प्रेमामुळे अधिकच मिठास बनतं आणि श्रोत्यांच्या अंतःकरणाचा कब्जा घेत असे.

त्या वेळी मी फक्त सतरा वर्षांचा होतों. एका नामांकित वक्त्याचं भाषण प्रथमच ऐकत होतों. त्यामुळे जी एक गोष्ट माझ्या ध्यानांत त्या वेळेस आली नाही, परंतु पुढे आली ती अशी, की जयकरांच्या वक्तृत्वांत माधुर्य होतं, मोहकपणा होता, परंतु दिव्य, भव्य असं कांही नव्हतं. इंग्रजी भाषेंत Orator आणि Speaker असे दोन शब्द आहेत. या दोन शब्दांच्या अर्थांत जो महत्त्वाचा श्लेष आहे तो व्यक्त करणारे शब्द मराठींत नाहीत— असले तर मला माहीत नाहीत. डॉ. जयकर कसबी "स्पीकर" होते, परंतु त्यांना "ओरेटर" म्हणता येणार नाही. त्यांचं वक्तृत्व बेभान, झपाटलेलं नव्हतं. त्याची प्रकृति प्रामुख्यानं संथ होतं. ते आवाहन करीत तें श्रोत्यांच्या बुद्धीला, भावनेला नव्हे! त्यांचं भाषण ऐकलं, की चित्त प्रसन्न होई, परंतु अंतःकरणांत अनावर खळबळ उठल्याचा प्रत्यय क्वचित् एखाद्या क्षणीं आला तर येई.



असा अनुभव देणारं वक्तृत्व मला ऐकायला मिळालं तें शिवराम महादेव परांजपे यांच्याकडून, आणि सरोजिनी नायडू यांच्याकडून.

या जातीचं वक्तृत्व आणखी कांही वक्त्यांच्या ठिकाणीं मला आढळलं. त्यांचं वर्णन आणि शिवरामपंत यांचंहि वर्णन पुढे यथावकाश मी करणार आहे. आता सरोजिनी नायडू यांचं इंग्रजी व्याख्यान मी प्रथम ऐकलं त्याची आठवण तेवढी सांगतो.

सरोजिनीदेवींचं व्याख्यान ऐकण्याची पहिली संधि मला मिळाली १९१५ सालीं. जयकरांचं व्याख्यान ऐकल्यानंतर जवळजवळ चार वर्षांनी. मी बी.ए.ची पदवी संपादन केली होती आणि फर्ग्युसन कॉलेजांत एम. ए. चा अभ्यास करीत होतो. त्या वर्षीच्या वार्षिक स्नेहसंमेलनाच्या मुख्य पाहुण्या म्हणून सरोजिनीबाई आल्या होत्या. आता फर्ग्युसन कॉलेजचं नवं ॲम्फी थिएटर तयार झालं होतं. व्याख्यानाच्या वेळेस सबंद थिएटर श्रोत्यांच्या गर्दीनं तुडुंब भरून गेलं होतं. सरोजिनीदेवींचं कवित्व आणि वक्तृत्व या दोहोंची कीर्ति केवळ या देशांतच नव्हे तर परदेशांतदेखील गाजत होती. त्यांच्या त्या व्याख्यानाला निमंत्रित पाहुणे आणि कॉलेजचे विद्यार्थी यांच्या बरोबरीनं निमंत्रणावाचून अडून न बसणारे इतर कॉलेजांतले विद्यार्थी आणि गावांतले लोक बहुसंख्येने लोटले होते यांत नवल नव्हतं.

बाईंचं हें व्याख्यान मला विशेष आठवतं त्याला एक खाजगी कारण आहे. तें असं, की एक चांगला वक्ता म्हणून पुण्यांतले लोक मला ओळखूं लागले ते या व्याख्यानाच्या प्रसंगानं. याच्या आधीं कॉलेजांतल्या चार वर्षांत कॉलेजच्या वादविवाद मंडळाच्या कित्येक सभा मी गाजविल्या होत्या, आणि या सभांनी गर्दीचे उच्चांक मोडले होते. परंतु वादविवाद मंडळाच्या या पराक्रमानं माझा जो कांहीं लौकिक झाला होता तो विद्यार्थी जगापुरताच मर्यादित होता. सरोजिनीदेवींच्या व्याख्यान-प्रसंगानं मात्र माझ्या लौकिकानं एकाच झेपेंत ही मर्यादा ओलांडली. कॉलेजच्या माजी विद्यार्थ्यांचा प्रतिनिधि म्हणून बाईंचं स्वागत करणारं आणि त्यांचा परिचय करून देणारं भाषण करण्याची कामगिरी माझ्याकडे सोपविण्यांत आली. प्रसंगाची जबाबदारी पूर्णपणे ओळखून मी चांगलं भाषण केलं, आणि तें माझं छोटसं इंग्रजी भाषण अतोनात आवडल्याची साक्ष सभेनं टाळ्यांचा प्रचंड कडकडाट करून दिली. खुद्द बाईंची देखील दिलखुलास शाबासकी मला मिळाली. त्या वेळेस मी स्वतः वयानं, ज्ञानानं, अनुभवानं लहान होतों. त्या प्रसंगीं मी काय बोललों असेन देव जाणे! परंतु जें कांहीं बोललों असेन, तें लोकांच्या अंतःकरणाला भिडलं खरं! विशेषतः नामदार गोपाळ कृष्ण गोखले यांच्या शब्दांचा उपयोग करून "सरोजिनीबाईंचं व्याख्यान म्हणजे नाइटिंगेल पक्ष्याचं मधुर गायन आहे" असं जेव्हा मी धिटाईनं बाईंकडे वळून योग्य अभिनयासकट म्हणालों, तेव्हा थिएटर टाळींनं कडाडलं, आणि स्वतः बाईंनी माझ्याकडे हर्षाचा आणि कौतुकाचा जो कटाक्ष टाकला तो अजून मला स्पष्ट आठवतो.

परंतु बाईंच्या त्या व्याख्यानाच्या आठवणींतला माझ्या स्वतःच्या कर्तृत्वाचा हा भाग गौण महत्त्वाचा होता, आगंतुक होता. तो प्रसंग माझ्या आयुष्यां-तला एक अविस्मरणीय प्रसंग ठरला तो बाईंच्या व्याख्यानाच्या श्रवणानं. बाई अर्थात् इंग्रजींत बोलल्या.

अथपासून इतिपर्यंत त्यांचं भाषण म्हणजे एक जादूची फुंकर होती. ते ऐकतांना हजारो श्रोत्यांनी जिवाचे कान केले होते. बाईंच्या तोंडून बाहेर पडणारा एकेक शब्द आम्ही अधाशीपणानं प्राशन करीत होतों. ऐकतांना वाटत होतं, या गोड गोड वाणीच्या प्रवाहांत आपण बुडून गेलों आहोंत,

तसंच बुडलेलं राहावं, डोकं कधी वर निघूंच नये. सचैल स्नान आपल्याला घडत आहे, तसंच तें घडत राहावं.

जयकरांच्या वक्तृत्वाची प्रकृति प्रामुख्यानं संथ, तर उलट सरोजिनी-देवींच्या वक्तृत्वाचा धर्म अगदी वेगळा—एक प्रकारच्या विलक्षण अखंड स्फुरणानं नटलेला. काव्य हा बाईंचा आत्मा. त्यांचं सबंद भाषण म्हणजे थयथयाट करून नाचणारं एक प्रदीर्घ काव्यच ! त्यांचं वक्तृत्व ऐकतांना त्यांचा अलौकिक भाषाविलास तर प्रत्ययाला येईच, परंतु शिवाय असं वाटे, की या बोलण्यांत बिजली खेळते आहे. डॉ. जयकर बोलतांना हाव-भाव, अंगविक्षेप अगदी कमी करायचे. शिष्टपणाची परीटघडी ज्यायोगे मोडणार नाही इतक्याच बेताचे. तर उलट बाईंचे हावभाव एखाद्या नटी-सारखे आणि अंगविक्षेप एखाद्या नर्तिकेसारखे !

हें सारं शोभून दिसावं अशी बाईंची रूपसंपदा होती. त्या वर्णानं काळ्या आणि बांध्यानं ठेंगण्या आणि कांहीशा स्थूल होत्या. परंतु विपुल केशकला-पानं अलंकृत केलेली त्यांची चर्या एकदम चित्त वेधून घेणारी होती. त्यांच्या भुवया अक्षरशः धनुष्याकृति होत्या. डोळे खूप मोठे, तेजस्वी आणि अत्यंत भावपूर्ण होते. त्यांच्या भाषणाच्या वेळेस त्यांच्या वेचक शब्दांचा तर श्रोत्यांवर परिणाम होत असेच, परंतु त्यांच्या नजरेनं फेकलेले विविध भावांचे कटाक्ष लोकांचीं अंतःकरणं घायाळ करीत असत.

अशा या हसऱ्या रूपगर्वितेचं काव्यमय व्याख्यान डॉ. जयकरांच्या व्याख्यानाहून अगदी भिन्न होतं. या कवयित्रीच्या व्याख्यानांत बुद्धीपेक्षा भावनेला आवाहन अधिक होतं, व वाक्प्रवाहाचा विलास असा कांही स्तिमित करणारा होता की वाटे, जणु वक्तृत्वाचीं कारंजीं फुटलेलीं आहेत आणि त्या कारंजांतून काव्याचं अनावर पाणी फुटून उंच उंच उड्या घेत आहे. जणु विद्युल्लतेचा खेळ चालला आहे. ती क्षणांत इथे तर क्षणांत तिथे, क्षणांत क्षितिजावर तर क्षणांत उंच आकाशगर्भात चमकत आहे. डॉ. जयकरांच्या व्याख्यानांत लयबद्धता होती. परंतु एखाद्या बजवय्यानं बोलांची, पर्णांची खटपट न करता साधासीधा ठेका धरावा, त्या प्रकारची ती लय होती. त्यांत लयकारी नव्हती. चमत्कृति नव्हती. उलटलयकारी, चमत्कृति, भरारी हे सरोजिनीदेवींच्या वक्तृत्वाचे गुणविशेष म्हटले पाहिजेत. बाईंचं व्याख्यना

ऐकणाराला सतत असं वाटत राही, की या बाईला एकेक कल्पना सुचतात तरी कशा, आणि त्या कल्पनांना एकाहून एक मनोहर आकृतिबंध देणारे शब्द या बाईच्या जिव्हाग्री सहज लीलेनं नाचतात तरी कसे? ही सारी एखाद्या अवतारी व्यक्तीची करामत चालली आहे असं सतत वाटत राहत असे.

सरोजिनीदेवींचीं अनेक व्याख्यानं पुढे मी ऐकलीं आणि प्रत्येक वेळेस हाच प्रत्यय मला आला. त्यांचा माझा थोडासा परिचयहि झाला आणि त्यांच्या अंगचं संभाषणचातुर्यहि माझ्या अनुभवाला आलं. जिथे जिथे त्या असतील तिथे तिथे हास्यविनोदाची मैफल भरलेली असे. पुढे वृद्धावस्थेंत देखील इकडे तिकडे वावरतांना, बोलतांना त्या नवतारुण्यांतील एखाद्या किशोरीप्रमाणें भासत. काव्य, तारुण्य, चांचल्य, उल्हास या गुणांची सरोजिनीदेवी नायडू म्हणजे एक अजब मूर्ति होती, आणि ही मूर्तिव्याख्यान देण्यासाठी व्यासपीठावर उभी राहिली, की तिच्या ठिकाणीं कांही एक निराळाच आवेश निर्माण होत असे. व्याख्यान सुरू झालं की भाषाविलासाची आणि काव्यकल्पनांची गंगा खळखळून वाहूं लागत असे. कवीप्रमाणेच वक्ता जन्मावा लागतो याचा प्रत्यय देणारीं जीं कांही व्याख्यानं मी माझ्या हयातींत ऐकलीं त्यांत सरोजिनीदेवींच्या व्याख्यानांना फार वरचं स्थान आहे. त्यांचं वक्तृत्व त्यांच्याबरोबरच गेलं! आता तसलं वक्तृत्व पुन्हा ऐकायला मिळणार नाही!

* * *

# ३ : वसंत व्याख्यानमालेंतील गमती जमती

राजकीय घडामोडींच्या निमित्तानं होणारीं व्याख्यानं सोडलीं तर त्या दिवसांत पुण्यांतल्या जाहीर व्याख्यानांचे मुख्य मोसम दोन होते. एक वसंत व्याख्यानमालेचा मे महिना, आणि दुसरा गणपती उत्सव.

या दोन मोसमांत मिळून स्थानिक व परस्थ वक्त्यांची हजेरी पुण्याच्या श्रोत्यांपुढे लागायची. वसंत व्याख्यानमालेंत अनेक नवे वक्ते निमंत्रिले जात. परंतु कांही ठराविक वक्ते असे होते, की त्यांचीं व्याख्यानं दरवर्षी हटकून व्हायचींच. त्यांचे विषयहि ठरलेले.

मुंबईचे एक डॉक्टर होते. त्यांचं नांव मला आता निश्चित आठवत नाही. काळोखे असावं असं वाटतं. ते दरवर्षी आरोग्य या विषयावर कांही तरी बोलायचे, आणि बदललेल्या परिस्थितींत नव्या पिढीला—म्हणजे आजच्या पिढींतल्या माणसांच्या आईबापांना !—किती वाईट आरोग्यविघातक सवयी लागत आहेत त्याचं परोपरीनं वर्णन करून नव्या अकाली राहणीचा कडाडून निषेध करायचे. " हल्लीच्या तरुणांना स्नानसंध्या नकोशी झाली आहे, सूर्यनमस्कार घालता येत नाहीत, नाटकं सिनेमांची चटक लागली आहे, लवकर निजावं, लवकर उठावं हा आरोग्याचा मूलमंत्र यांच्या गावी नाही ! मग आरोग्य झपाट्यानं ढासळणार नाही तर दुसरं काय होणार ? पाणी भरणं, भांडीं घासणं, कपडे धुणं इत्यादि घरकामं खरं म्हणजे स्त्रियांना उत्तम व्यायाम घडविणाऱ्या गोष्टी. परंतु हल्लीच्या तरुण मुलींना तीं नकोशीं झालीं आहेत.

त्यांना फक्त संध्याकाळच्या वेळेस डोक्यांत माळायला मोगऱ्याच्या वेण्या हव्यात, आणि नवऱ्याबरोबर हिंडायला हवं. पूर्वीच्या बायकांची आठ-आठ दहा-दहा बाळंतपणं झालीं तरी त्या ठणठणीत असायच्या. आत्ताच्या मुली दोन मुलं झालीं की चरकांतून काढलेल्या उसाच्या चिपाडासारख्या होतात. अंगावरचं दूध नाही म्हणून यांच्या मुलांना वरच्या दुधाच्या बाटल्या द्याव्या लागतात. नवऱ्याची छाती टीचभर आणि बायकोच्या स्तनांत दूध टिपूसभर ! अरे, तुम्ही कसले संसार करता डोंबलाचे !..."

त्या काळांत 'हशा टाळ्यां'चे कंस वृत्तपत्रं तयार ठेवीत नसत. परंतु डॉ. काळोखे अशा प्रकारे ऐन रंगांत येऊन बोलूं लागले, की श्रोत्यांच्या हशा-टाळ्यांचीं विरामचिन्हं खच्चून पडायचीं. मुंबईच्या हॉटेलांत कोणकोणते गलिच्छ अनाचार चालतात त्याचं वर्णन डॉक्टर मजकूर करायचे. "आपणांला माहीत नसेल म्हणून सांगतो, की हे हॉटेलवाले दिवसाअखेर उरलेली कांद्याबटाट्याची भजी पुन्हा पाण्यांत कालवितात, आणि खुशाल त्या शिळ्या लगद्याचीं भजीं तयार करून दुसऱ्या दिवशीं गिऱ्हाइकासमोर ठेवतात. गिऱ्हाईक असं गाढव, की हें तळण मोठ्या रुचीनं मिटक्या मारीत ते पोटांत रिचवतात. भजीं खावीं तर अमक्या हॉटेलांतलीं अशी इतरांजवळ तारीफ करतात. लोकांना आरोग्य-वर्धक सात्विक अन्न नकोसं झालं आहे. सकाळी उठल्याबरोबर त्यांना हवा लिप्टन चहाचा कप, आणि कांदा-बटाटा भज्यांची किंवा मिसळीची प्लेट. मग पोटदुखी, हगवण, ॲनिमिया, क्षय, अमांश असले रोग समाजांत फैला-वतात. डॉक्टरांचे खिसे गरम होतात. ते मोटारी उडवतात. मृत्युसंख्येचं प्रमाण वाढत जातं. मी तर म्हणतो, हीं सारीं हॉटेलं कायद्याच्या एका फटक्यानं बंद केलीं पाहिजेत. तसं करायचं नसेल तर मग मरा. खा भजीं मिसळ ! धाडा बोलावणं मृत्यूला !"

डॉक्टर तावातावानं बोलत असत. श्रोत्यात हशा-टाळ्या चालू राहत असत. डॉक्टरांच्या अतीव कळकळीमुळेच त्यांच्या व्याख्यानांत अभावितपणे विनोद निर्माण होत असे. डॉक्टरांची मूर्ति या अभावित विनोदाला अनुकूल होती. त्यांचं नांव सार्थ वाटावं इतके ते वर्णानं काळे होते. चांगले स्थूलहि होते. धोतर, पांढरा स्वच्छ लांब कोट, आणि पगडी असा त्यांचा वेष असे. त्यांची विषयाची मांडणी माहितीपूर्ण असे. त्यांचे सिद्धान्त शास्त्रशुद्ध असत,

आणि बोलण्यांत प्रचाराचा आवेश भरमूर असे. दुर्दैव येवढंच, की ते व्याख्यान देत लोकाना शिकविण्याच्या, सुधारण्याच्या हेतूनं; परंतु ज्या राहणीचा ते धिक्कार करीत तिला चटावलेलीं माणसंच त्यांच्यासमोर बसलेलीं असत, आणि घटकाभर करमणूक आणि गंमत येवढ्याच बुद्धीनं ती त्यांच्या आवेशयुक्त वक्तृत्वाकडे बघत !

फर्ग्युसन कॉलेजचे प्रो. गोविंद चिमणाजी भाटे आणि प्रो. वामन गोविंद काळे यांचीं व्याख्यानं दरवर्षी वसंत व्याख्यानमालेंत व्हायचीं.

काळ्यांच्या व्याख्यानाच्या दिवशीं भाटे अध्यक्ष असायचे, आणि भाट्यांच्या व्याख्यानाच्या वेळेस काळे अध्यक्षस्थानीं असायचे. टेनिसच्या डबल्स सामन्यांतल्या जोडीप्रमाणे व्याख्याते—अध्यक्षांची ही जोडी ठरून गेली होती. व्याख्यान कलेचे गुण दोघांच्याहि ठिकाणीं बेताचेच होते. प्रो. काळे कांहीसे गेंगाण्या आवाजात बोलायचे, आणि त्यांच्या उच्चारांतहि बोबडेपणाची छटा होती. प्रो. भाट्यांचा आवाज चिरका आणि बोलण्याची पद्धत कांहीशी चिडल्यासारखी. परंतु त्या दिवसांत फर्ग्युसन कॉलेजचा प्रोफेसर म्हटला, की आजच्या मंत्र्यासारखा तो विद्वान समजला जात असे. फर्ग्युसन कॉलेजांतला त्या वेळचा एकहि प्रोफेसर—वासुदेव बळवंत पटवर्धन यांचा अपवाद सोडला तर—खऱ्या अर्थानं साहित्यिक नव्हता. परंतु त्या वेळच्या 'मासिक मनोरंजनां'त फर्ग्युसनचे सारे प्रोफेसर लेखक म्हणून मिरवितांना दिसत. क्वचित् कथावाङ्मय लिहिण्याचा अत्याचारदेखील ते करीत असत. साहित्यक्षेत्रांतली रीतभात आज इतकी पालटली आहे, की लेखकानं आपल्या नांवामागं 'प्रो.' किंवा नांवापुढें एम. ए. लिहिणं अशिष्टपणाचं समजलं जातं. बापाचं नांवदेखील वेगळ्याच अर्थानं 'काढण्या'कडे आजच्या लेखकांचा कल आहे. परंतु चाळीस वर्षांपूर्वीच्या त्या काळांत साहित्यिक रीतभात निराळी होती. नांवापुढे विश्वविद्यालयाची पदवी व मागे 'प्रो.'ची उपाधि असली, की त्या माणसाला साहित्याच्या क्षेत्रांत संपादक डोळे झाकून परवानगी देत असत. फर्ग्युसन कॉलेजातल्या एखाद्या प्रोफेसराचं काव्य 'मनोरंजन' मासिकांत प्रसिद्ध झाल्याचं मला आठवत नाही. परंतु व्हायला कांही प्रत्यवाय नव्हता. केवळ प्रोफेसर असल्यामुळेच हे सारे लोक साहित्यिक ठरले होते ! आणि जसे साहित्यिक तसेच वक्तेहि !

मात्र प्रो. काळे आणि प्रो. भाटे या दोघांच्याहि व्याख्यानांत वक्तृत्व नसलं

तरी व्यासंग असे. काळे नेहमी एखाद्या अर्थविषयक प्रश्नावर बोलत असत. भाटे हे एक सक्रिय सुधारक होते. कॉलेजांत शिकविण्याचा त्यांचा विषय तर्कशास्त्र आणि तत्त्वज्ञान होता. (मी त्यांचाच विद्यार्थी होतों.) परंतु त्यांचा अधिक लौकिक होता समाजसुधारक म्हणून. या लौकिकाला अनुसरून वसंत व्याख्यानमालेंतील व्याख्यानासाठी ते एखाद्या विषयाची निवड करीत. लोकांना त्यांचीं व्याख्यानं आवडत असत.

वासुदेव लक्ष्मण चिपळूणकर हे अकोल्याचे वकील प्रत्येक वर्षीं एखाद्या धार्मिक आणि वेदान्तपर विषयावर बोलत असत. विष्णुशास्त्री चिपळूणकरांचे हे पुतणे. घराण्याच्या लौकिकाला साजेशी त्यांची विद्वत्ता होती. त्यांची गोरीपान सडसडीत मूर्ति पांढरा स्वच्छ कोट, धोतर, उपरणं, पगडी अशा वेषांत मोठी आकर्षक दिसत असे. त्यांच्या डोळ्यांत मात्र दोष होता. मला वाटतं, एक डोळा गेलेलाच होता. परंतु एकंदरीत त्यांच्या प्रसन्न मुद्रेची छाप सभेवर ताबडतोब पडत असे. त्यांची वाणी सुसंस्कृत आणि आवाज मोहक वाटे. ते थिऑसॉफिस्ट होते व त्यामुळे आपल्या विषयाचं प्रतिपादन ते थिऑसॉफिस्ट दृष्टिकोनांतून करीत. वेदान्तासारखा रुक्ष आणि जड विषय रंगवावा कसा याचं कसब त्यांनी आत्मसात् केलेलं होतं. त्यांच्या वक्तृत्वाची जात निःसंशय श्रेष्ठ होती.

वसंत व्याख्यानमालेच्या एकंदर कार्यक्रमांत ललित साहित्य, कला, संगीत या विषयांना प्रमुख स्थान अर्थातच होतं. एके वर्षीं पंडित विष्णु दिगंबर पलुसकर यांचं व्याख्यान झालेलं मला आठवतं. पंडितजी अखेर अखेर संन्याशाचा वेष करूं लागले होते. परंतु वसंत व्याख्यानमालेंतलं जें व्याख्यान मला आठवतं, त्या वेळेस पायांत पांढरी तंग चुडीदार तुमान, वर अंगांत किमती कापडाचा बंद गळ्याचा काळा कोट, आणि डोक्याला जरीकाठी रेशमी मंदिल, अशा खास उत्तर हिंदुस्थानी थाटबाज पोशाखांत ते आले होते. त्यांचे डोळे अधू होते, आणि म्हणून ते नेहमी काळा चष्मा लावीत असत. त्यांची मूर्ति वक्त्याला साजेशी भव्य होती. अखिल भारतीय कीर्तीचे ते गायक होते; तेव्हा त्यांचा आवाज श्रोत्यांवर एकदम छाप पाडणारा होता हें सांगायला नकोच. परंतु एक गोष्ट सांगायला हवी ती ही, कीं त्यांचा आवाज पल्लेदार होता. अमृतसर जालंदरच्या उघड्या मैदानावरच्या चार चार पांच पांच हजार

श्रोत्यांच्या मैफली ज्यानं गाजविल्या तो विख्यात पुरुष व्याख्यान देत आहे असा प्रत्यय वसंत व्याख्यानमालेच्या श्रोत्यांना भरपूर आला. व्याख्यानांत अर्थातच संगीताची महती त्यांनी वर्णिली, आणि स्वतःच्या अंगीकृत कार्यांची माहिती दिली. त्यांच्या वक्तृत्वानं श्रोते खुष झाले. परंतु व्याख्यानाच्या अखेरीस पंडितजींनी थोडं गायन रुजू करावं अशी फरमाईश केल्यावाचून श्रोते राहिले नाहीत. पंडितजींनी श्रोत्यांची इच्छा मोठ्या तत्परतेनं मान्य केली, आणि 'सुमरन ( स्मरण ) करले मेरे मन' हें आपलं आवडतं भजन म्हटलं.

रात्रीचे आठ वाजले होते. केळकरांच्या वाड्यांतल्या त्या आंगणाची जागा चांदण्यानं न्हाऊन निघाली होती. व्यासपीठामागच्या आम्रवृक्षांचीं पानं चंद्रिकेच्या रुपेरी प्रकाशांत चमचमत होती. अशा रंगमंचावर पंडितजी भजन आळवीत होते. 'पक्षी पंख बिन, हस्ती दंत बिन' (पंखावाचून पक्षी किंवा दांतावाचून हत्ती जसा व्यर्थ त्याप्रमाणे नामस्मरणावाचून मनुष्य व्यर्थ होय !) हा चरण घोळून घोळून म्हणत होते. त्यांच्या कंठांतून निघणाऱ्या स्वरमाला आणि चंद्रबिंबांतून स्रवणाऱ्या शीतल प्रकाशधारा यांचा विलक्षण हृदयस्पर्शी संगम लोकांनी त्या रात्री अनुभविला !

कोणत्या तरी एखाद्या साहित्यिक विषयावर वसंत व्याख्यानमालेंत दरवर्षी व्याख्यान देणारे एक वक्ते श्रीकृष्ण नीलकंठ चाफेकर हे होते. हे पुढे डेक्कन कॉलेजांत प्रोफेसर झाले. परंतु ते त्या काळांत वऱ्हाडांत वकिली करीत असत. 'ललितकलादर्श' नाटक मंडळीमध्ये स्त्री-भूमिका करून प्रसिद्धि पावलेले संगीत नट शंकर चाफेकर यांचे हे थोरले बंधु. 'सरस्वतीकंठाभरण' अशी कांहीशी घवघवीत पदवी ते आपल्या नांवापुढे लावीत असत. वाटोळ्या गोऱ्या चेहऱ्याचे, जरा स्थूल अंगाचे, ठेंगणे ठुसके असे हे गृहस्थ स्त्री-भूमिका करायला लायक वाटत असत. त्यांच्या बोलण्याची धाटणी आणि अंगविक्षेप एखाद्या स्त्रीपार्टी नटासारखे होते खरेच. त्यांच्या व्याख्यानाच्या पद्धतींत शिवरामपंत परांजप्यांची किंचित् झाक दिसे. परंतु तें पाहून मनांत येई, कुणीकडे तो अस्सल माल आणि कुणीकडे ही नक्कल ! मात्र या नकलेला अस्सलाची सर नव्हती तरीसुद्धां तिच्या साहाय्यानं हे गृहस्थ श्रोत्यांवर चांगली छाप पाडीत असत. जाड जाड संस्कृत शब्द वापरण्याचा यांना हव्यास होता. इंग्रजी शब्दांना अन्वर्थक संस्कृत अगर मराठी प्रतिशब्द शोधून काढण्यात

त्यांच चातुर्य प्रत्ययाला येत असे. मुंबई विश्वविद्यालयांत पदवीपरीक्षेसाठी 'पास' आणि 'ऑनर्स' असे दोन अभ्यासक्रम निघाले तेव्हां 'पास कोर्स'चं फार मार्मिक भाषांतर त्यांनी केलं होतं. ते विद्यार्थ्याला विचारीत, "तूं सन्मान पक्ष घेतला आहेस की साधा निर्वाह पक्ष?" साध्या सुती कापडाचा कोट, छातीवर टाकलेली रेशीमकाठी उपरण्याची घडी, डोक्यावर झिरमिळ्यांची नव्हे तर साधी विटकरी रंगाची पगडी, आणि डोळ्यांवर चष्मा, अशा थाटांतले हे वक्ते काहीशा हरदासी पद्धतीनं बोलूं लागले, की आपल्या अस्खलित वाणीनं श्रोत्यांची मनं काबीज करीत. त्यांना प्रत्येक शब्दामागे 'सु' लावण्याची खोड होती. 'स्पष्ट'च्या ऐवजी 'सुस्पष्ट', 'विख्यात'च्या ऐवजी 'सुविख्यात', 'प्रसन्न' च्या ऐवजी 'सुप्रसन्न' असे प्रयोग करण्याच्या त्यांच्या लकबीचा अतिरेक झाला, की 'सुललित' 'सुसाहित्य' 'सुसुंदर' असे शब्द त्यांच्या तोंडून बाहेर पडत. त्यांच्या या लकबीची चेष्टा करण्यासाठीं लोक म्हणत, "आज सुश्रीकृष्ण सुनीलकंठ सुचाफेकर याचं सुव्याख्यान आहे बरं का! सुश्रोत्यांनी सुसंख्येनं येण्याची सुकृपा करावी!"

वसंत व्याख्यानमालेंतील साहित्यविषयक व्याख्यानांत एखादं व्याख्यान काव्यावरहि असे. काव्यगायनाचा फड ही वस्तु त्या काळांत लोकांना माहीत नव्हती. परंतु आजच्याप्रमाणेच तेव्हाहि कवि या प्राण्याविषयीं लोकांना आदर नसला तरी कुतूहल होतंच, आणि तेव्हादेखील कवींचे काव्याचार प्रखर टीकेचे विषय होत असत.

एकदा कुणा तरी एका वक्त्यानं आपल्या व्याख्यानांत कवींचा खरपूस समाचार घेतला. या व्याख्यानाला राम गणेश गडकरी हजर होते. मुख्य वक्त्याच्या भाषणानंतर दोघा तिघा उपवक्त्यांचीं भाषणं झालीं. अध्यक्षांनी सवाल केला, "आणखी कुणाला बोलायचं आहे?" गडकरी मास्तरांनी बसल्या जागेवरून हात वर केला, आणि ते ओरडले, "मला बोलायचं आहे." ते उठले, आणि एखाद्या विंचवासारखे तरातरा चालत व्यासपीठाकडे निघाले. नाटककार म्हणून गडकरी मास्तरांची बरीच कीर्ति त्या वेळेस झाली होती. परंतु कोठल्याहि जाहीर सभेंत त्यांचं बोलणं लोकांनी ऐकलं नव्हतं. स्मशान, कुत्रं, पोलीस इत्यादींची धास्ती बाळगणाऱ्या गडकरी मास्तरांना जाहीर

सभेच्या व्यासपीठाची देखील भलती भीति वाटत असावी असा लोकांचा समज होता. तेव्हा गडकरी मास्तरांना व्यासपीठावर पाहून लोकांना मोठी गंमत वाटली, आणि त्यांनी टाळ्या वाजविल्या. मुख्य व्याख्यात्यावर ते संतापलेले दिसत होते. त्यांच्या अपऱ्या नाकाच्या आधीच फुगीर वाटणाऱ्या नाकपुड्या फुरफुरत होत्या. भुवया दुमडल्या गेल्या होत्या. कपाळाला आठ्या पडल्या होत्या. डाव्या हातांतला टिपणांचा कागद थरथरत होता. उजव्या हातांतली पेन्सिल ते परजीत होते. लोकांना साहजिक वाटलं, आता मुख्य वक्त्याचीं शंभर वर्षे भरलीं ! कवींवर टीकेचा हल्ला करणाऱ्या त्या माणसाला गडकरी मास्तर प्रदीर्घ भाषण करून चारी मुंड्या चीत करणार ! गडकरी मास्तर इतके संतापले होते, की त्यांच्या तोंडून शब्दच फुटेना. त्यांनी एकदोन वेळा धोतर चाचपलं. डोक्यावरची पारशी फॅशनची वाटोळी कडक काळी टोपी पुढे केली, मागे केली, मग पुन्हा पुढे केली. नंतर हातांतली पेन्सिल उगारून ते म्हणाले, "अध्यक्षमहाराज आणि सभ्य स्त्रीपुरुषहो–" ते अडखळले आणि त्यांनी दोनतीनदा तेच शब्द उच्चारले. श्रोत्यांतून कुणी तरी ओरडलं, "अहो, पुढे बोला की !" जाहीर सभेंतल्या धकाधकीचा कधी अनुभव नसल्या-मुळे गडकरी मास्तरांचा तोल सुटला. ते फुस्कारून म्हणाले, "मला येवढंच सांगायचं आहे, की माझ्या आधीच्या वक्त्यांनी आपल्याला जें सांगितलं तें निखालस चूक आहे !" आणि येवढ्या एकाच वाक्याचं ब्रह्मास्त्र सोडून मुख्य वक्त्याकडे भयंकर रागाचा कटाक्ष टाकून ते व्यासपीठाखाली उतरले, आणि पुन्हा विंचवाप्रमाणें तरातरा चालत आपल्या जागेवर जाऊन बसले. प्रचंड हशा आणि टाळ्या अर्थातच झाल्या. विनोदाच्या बादशहानं हा एक विलक्षण विनोद करून लोकांना हसविलं होतं खरं !


वसंत व्याख्यानमालेंत मुख्य वक्त्याइतकंच अध्यक्षाला महत्त्व असे. व्याख्यात्याच्या तोलाचा अध्यक्ष असावा अशी योजना केलेली असे. कित्येक प्रसंगीं मुख्य व्याख्यानापेक्षा समारोपाबद्दल लोकांना अधिक उत्सुकता वाटावी अशा अधिकाराचा आणि दर्जाचा अध्यक्ष मिळालेला असे.

मुख्य वक्त्यानं मांडलेला विषय पूर्वपक्षाप्रमाणे समजून त्यावर अध्यक्षांनी उत्तरपक्ष करावा–शक्य तितक्या कठोर आणि जहाल भाषेंत करावा–अशी प्रथा असे. यामुळे व्याख्यात्याप्रमाणेच अध्यक्ष कोण आहे तेंहि मुद्दाम बघून

श्रोते व्याख्यानाला येत, आणि त्यांच्या अपेक्षेप्रमाणे वादप्रतिवादाची झकाझकी उडाली, की दोन सुंदर व्याख्यानं ऐकल्याच्या आनंदांत लोक घरीं परत जात.

या रंगतींत उपवक्ते भर घालीत असत. मुख्य व्याख्यान, त्यावर चार दोन उपवक्त्यांचीं छोटीं भाषणं, व्याख्यात्याचं प्रत्युत्तर, आणि अध्यक्षांचा समारोप अशी घवघवीत मेजवानी मिळाली कीं श्रोते खूष व्हायचे. काही उपवक्ते ठरून गेल्यासारखे होते. त्यांत म. गो. अभ्यंकर नांवाचे एक स्थानिक वकील प्रमुख होते. साहित्य, संगीत, कला, राजकारण, अर्थकारण, धर्म, वेदान्त, कोठलाहि विषय असो, आणि कितीहि अधिकारी वक्ता असो, म. गो. अभ्यंकर उपवक्ते म्हणून बोलल्याखेरीज कधीं राह्यचे नाहीत. भरपूर उंचीचे, गोरेपान, साधा सदरा आणि डोक्याला टोपी अशा वेषांतले, किंचित् अजागळासारखे भासणारे हे वकीलसाहेब एखाद्या व्याख्यानानंतर लवकर उठले नाहीत तर लोकांनी 'म. गो. बोला, बोला!' अशा आरोळ्या ठोकाव्या, आणि मग टाळ्यांच्या गजरांत या स्वारीनं डुलत डुलत येऊन व्यासपीठावर चढावं, असं कधी कधी होत असे. टिळकांच्या व्याख्यानानंतरदेखील उपवक्त्याच्या नात्यानं एखादी लहानशी शंका बोलून दाखवायला हे 'म. गो.' कमी करीत नसत. एखाद्या व्याख्यानाला हे जर हजर नसले तर श्रोत्यांना चुकल्याचुकल्यासारखं वाटे. त्या काळांतली वसंत व्याख्यानमालेंतलीं व्याख्यानं ज्यांनी ऐकलीं त्यांना इतर कुणाचाहि विसर पडला तरी 'म. गो.' चा विसर पडणार नाही, हें माझ्या स्वतःच्या अनुभवावरून मी सांगूं शकतों!

★ ★ ★



# ४ : हरिभक्तिपरायण पांगारकर

वसंत व्याख्यानमालेंतल्या पंडित पलुसकरांचं व्याख्यान मला जसं आठवतं तसंच संगीतविषयक दुसरं एक व्याख्यान माझ्या स्मरणांत आहे. तें व्याख्यान देणारे गृहस्थ म्हणजे **रावबहादुर देवल.**

सुप्रसिद्ध नाटककार गोविंद बल्लाळ देवल यांचे हे सख्खे बंधु. यांची सबंद हयात गेली होती सरकारी नोकरींत. 'रावबहादुर' हा सरकारी किताब त्यांना मिळाला होता, की सगळेच सरकारी अधिकारी 'रावबहादुर' म्हणून ओळखले जातात म्हणून त्यांना 'रावबहादुर' म्हणत असत की कसं, तें मला माहीत नाही. यांना संगीताचं वेड होतं. भारतीय संगीताच्या बाबतींत विशेष आस्थेनं लक्ष घालणारे आणि हिंदुस्थानी संगीताला पाश्चात्य 'स्टाफ' नोटेशन लावूं पाहणारे क्लेमंट्स नांवाचे एक गोरे कलेक्टर होते. भारतीय संगीतात बाजाच्या पेटींत वाजणारे बारा स्वर नसून बावीस श्रुती आहेत, आणि बाजाच्या पेटींतले स्वर 'टेंपर्ड' असल्यामुळें ते शास्त्रोक्त आणि शुद्धहि नाहीत असा त्यांचा सिद्धान्त होता. त्यांचा हा सिद्धान्त रावबहादुर देवल यांना पटलेला होता. सरकारी नोकरींतून निवृत्त झाल्यावर रावबहादुर

देवल या सिद्धान्ताचा प्रचार करण्यांतच आपला वेळ घालवूं लागले. वसंत व्याख्यानमालेंतलं त्यांचं व्याख्यान मला आठवतं, तें याच विषयावरचं.

रावबहादुर देवल म्हणजे एक विचित्र व्यक्ति होती. नाटककार देवल यांना मी कधी प्रत्यक्ष पाहिलं नाहीं. परंतु त्यांच्या फोटोवरून असं दिसतं, की त्यांचा पोशाख मोठा टाकठिकीचा असला पाहिजे आणि त्यांचं व्यक्तिमत्व मोठं आकर्षक असलं पाहिजे. त्यांच्या विशेष सहवासांत राहिलेल्या माणसांकडून त्यांच्याबद्दलच्या गोष्टी ऐकायला मिळतात त्याहि त्यांच्या चोखंदळ मार्मिक रंगेलपणाच्याच. रावबहादुर देवल हे त्यांचे सख्खे भाऊ हें सांगूनदेखील खरं वाटण्यासारखं नव्हतं. पायांत साधा पुणेरी जोडा, तोहि पेन्शनीला आलेला ! वर मळकट बोंगा लेंगा. त्याची भली मोठी नाडी खुशाल लोंबत सोडलेली ! अंगांत सुती गुंड्यांचा सदरा, त्यावर जुनाट मळकट ढिला कोट. त्याच्या गुंड्या आहेत नाहींत, आणि असतील त्या निरनिराळ्या रंगांच्या ! गळ्याभोवती क्वचित् उपरणं असलं तरी तें अशा थाटाचं की किती दिवसांपूर्वीं तें भट्टीला दिलेलं असावं हा इतिहाससंशोधनाचा प्रश्न ठरावा ! डोक्याला मळकट पांढरा रुमाल, पण तो ‘ बांधला ’ असा शब्दप्रयोग करण्याची सोय नाही. त्याची चुंबळ करून पालथ्या शिप्तरासारखी ती डोक्यावर ठेवल्यासारखी असायची. अशा या ‘ अवतारी ’ रावबहादुरांना बावीस श्रुतींच्या सिद्धान्तानं अक्षरशः पछाडलं होतं. कुणाचीहि नव्यानं ओळख व्हायचा अवकाश, त्याच्या गळ्यांत क्लेमंट्स साहेबाचं संशोधन घालण्याची यांची खटपट सुरू व्हायची. आपण जें कांही सांगतो तें ऐकणाराला समजो न समजो ! नव्हे कधीं समजायचं नाहींच ! पण रावबहादुरांची चर्पटपंजरी थांबायची नाही.

रावबहादुरांना संगीताच्या मर्माचा आणि रसाचा स्पर्श यत्किंचित्‌हि झालेला नव्हता. स्वरज्ञान मुळींच नव्हतं. आणि तरी देखील अष्टौप्रहर ते बोलायचे संगीतावर ! म्हणजे क्लेमंट्स साहेबाबद्दल आणि बावीस श्रुतींबद्दल ! षड्ज, गंधार, पंचम हे स्वर त्यांना ओळखतां येत नव्हते. त्यांतला रस तर मुळींच चाखता येत नव्हता. परंतु कोमल, तीव्र, अतिकोमल, अतितीव्र स्वरांच्या कंपनसंख्या त्यांनी मुखोद्गत केल्या होत्या. त्यांना सुसंगत प्रतिपादन म्हणजे काय चीज आहे तें माहीत नव्हतं. आणि बोलता तर मुळींच येत नव्हतं. ते

पुनः पुन्हां कंपनसंख्यांचे आंकडे सांगत. जो सिद्धान्त मांडायचा त्याचा स्पष्ट समज त्यांना तरी पडला आहे की नाही अशी शंका श्रोत्यांना यावी इतका गोंधळ ते करून टाकीत.

परंतु त्यांचं व्याख्यान असलं की चांगली गर्दी होत असे. कारण गाण्याचं प्रात्यक्षिक करून दाखविण्यासाठी अबदुल करीमखाँसाहेबांना ते बरोबर आणीत असत. खाँसाहेबांची आणि त्यांची दोस्ती कां आणि कशी जमली होती परमेश्वराला ठाऊक !

परंतु ती जमली होती खरी. आणि व्यासपीठावर त्या दोघांची जोडी पाहण्यासारखी असे खरी ! लेंग्याची नाडी खाली लोंबत आहे, कोटाची रंगीबेरंगी बटनं भलत्याच भोकांत घातलेलीं आहेत, कोटाचे खिसे—कसले खिसे, पिशव्याच त्या !—कागदांच्या लठ्ठ लठ्ठ पुडक्यांनी भरल्या आहेत, डोक्यावरची चुंबळ कानापर्यंत ओघळलेली आहे, अशा अवतारांत श्रोत्यांना न समजणारी बडबड करणारे रावबहादुर ! आणि पांढरी शुभ्र तंग चुडीदार तुमान, सोन्याच्या बटनांचा बिन कॉलरचा खमीस, उंची कापडाचा लांडा कोट, आणि डोक्याला भारी किमतीचा जरीकाठी फेटा अशा वेषांतले किडकिडीत बांध्याचे, विलक्षण मिठास आवाजाचे, सरळ कळीदार नाकाचे, मोठमोठ्या तेजस्वी परंतु सदैव स्वरसमाधीनं धुंद झाल्याप्रमाणे भासणाऱ्या डोळ्यांचे कृष्णवर्ण खाँसाहेब ! अशी जोडी व्यासपीठावर दिसली, की श्रोते रावसाहेबांकडे बघताहेत कशाला, आणि त्यांच्या अगम्य बडबडीकडे लक्ष देताहेत कशाला ?

श्रोत्यांचं सारं लक्ष असायचं खाँसाहेब मधून मधून गायन करीत त्याकडे ! खाँसाहेबांनी स्वर लावला की रावबहादुर म्हणायचे, "हा बघितलात गंधार !" "हा आमच्या बावीस श्रुतींतला निषाध." रावबहादुरांच्या तोंडून बाहेर पडणाऱ्या कंपनसंख्यांच्या आकड्यांकडे श्रोत्यांनी काडीमात्र लक्ष देऊं नये. त्यांचं सारं चित्त असे खाँसाहेबांच्या कंठांतून निघणाऱ्या रोमांचकारी स्वराकडे. अखेर श्रोत्यांनी रावबहादुरांना सांगावं, "आता व्याख्यान पुरें झालं. खाँसाहेबांना गाऊं द्या." मग खाँसाहेबांनी गावं.

ज्या व्याख्यानाची आठवण मी सांगत आहे त्या व्याख्यानाच्या वेळेस शेवटी असंच झालं. रावबहादुर बोलण्यांतून निवृत्त झाले. दोन तंबोऱ्यांच्या षड्ज-पंचमनिषाधांच्या तारा झंकारूं लागल्या, आणि खाँसाहेबांनी भैरवीला

प्रारंभ केला, "गोपाला मेरी करुना क्यों नहि आवे !" श्रोते तृप्त झाले !... बावीस श्रुतींचा आपला सिद्धान्त लोकांना पटविल्याच्या समाधानानं (!) रावबहादुरहि खुष झाले ! ...

वसंत व्याख्यानमालेच्या ठराविक वक्त्यांत सांगलीचे छापखाने वकील व नाशिकचे प्रधान वकील यांचा निर्देश करायला हवा. छापखाने दिसायला गोरेपान आणि मोठे देखणे होते. त्यांची वक्तृत्वकलाहि उच्च कोटींतली होती. विषयाचं प्रतिपादन ते मोठ्या आवेशानं करीत असत, आणि त्यांच्या ठसकेबाज उच्चारांना, झोकबाज आवाजाला, आणि निर्मळ वाक्प्रवाहाला तो आवेश फार खुलून दिसत असे. त्या काळांतले सांगलींतले ते अग्रगण्य पुढारी होते. सांगलीच्या सार्वजनिक जीवनाचं पानं छापखान्यांखेरीज हालत नसे. काही टवाळ लोक त्यांना 'सांगलीचे टिळक' म्हणत असत. परंतु या कुत्सित पदवींतहि छापखान्यांच्या अंगच्या दुर्मिळ गुणांची एक प्रकारें कबुली होती. छापखाने वकील वसंत व्याख्यानमालेंतलं आपलं व्याख्यान गाजवून सोडीत.

नाशिकचे प्रधान वकील दरवर्षी इंग्रजींत बोलायचे. त्यांचं व्याख्यान राजकीय असे. परंतु सवंग राजकारणाचं नव्हे, तर राज्यशास्त्रावरचं असे. सूटबूट, उपरणं आणि पांढरा रुमाल असा त्यांच्या पोषाखाचा थाट असे. डोळ्यांना चष्मा लावलेली त्यांची किडकिडीत, काळी, ठेंगणी मूर्ति श्रोत्यांच्या मनांत भरावी अशी नव्हती. परंतु त्यांचं इंग्रजी वक्तृत्व चांगल्यापैकी होतं. त्यांच्या व्याख्यानाला श्रोते आदरून येत असत.

वसंत व्याख्यानमालेंत मवाळ पक्षाच्या पुढाऱ्यांचीं भाषणं फारशीं होत नसत. पण वर्ज्यहि नसत. एखाद्या वर्षी त्या वेळचे फर्ग्युसन कॉलेजचे प्रिन्सिपल रँग्लर परांजपे यांचं भाषण होत असे. 'गुप्त मतदान पद्धति' हा त्यांचा आवडता विषय होता. त्यांचंहि भाषण इंग्रजींत होत असे. वर्गांत शिकविण्याच्या वेळच्या साऱ्या लकबा त्यांच्या व्याख्यानांतहि पाहावयास सापडत. डोळे, भुवया, गलमिशांचे आकडे, यांच्या हालचालींचीं विरामचिन्हं देत देत त्यांच्या वक्तृत्वाचा गाडा रखडत, रेंगाळत पुढें जात असे. कॉलेजांत शिकविण्याच्या वेळेस बूट, पँट, जाकीट, कोट, नेकटाय, जाकिटावर घड्याळाच्या सोनेरी साखळीचा पदर आडवा ठेवलेला, डोक्यावर होडीच्या आकाराची कडक

पुठ्याची काळी रॅंग्लरी टोपी, असा त्यांचा पोषाख असायचा; पण वसंत व्याख्यानमालेंतल्या व्यांख्यानाच्या वेळेस ते दिसायचे कोरा करकरीत लाल पुणेरी जोडा, ओचा पुढे सोडलेलं स्वच्छ धोतर, पांढरा शुभ्र पारशी फॅशनचा लांब कोट, गळ्याभोवती उपरणं, आणि डोक्याला सुंदरशी पगडी, अशा वेषांत ! त्यांची मूर्ति मोठी ऐटबाज वाटायची. परंतु त्यांचं लंगडंपांगळं वक्तृत्व आणि मुद्रेवरचे चित्रविचित्र हावभाव यांच्या योगानं श्रोत्यांना ज्ञानलाभ होण्याऐवजी करमणुकीचाच लाभ जास्त होत असे.

वसंत व्याख्यानमालेंतलं दरवर्षीचं व्याख्यान गाजविणारे एक वक्ते म्हणजे पांगारकर. ' हरिभक्तिपरायण पांगारकर ' अशा नांवानं ते ओळखले जात. पदवीधर असूनहि संतवाङ्मयाचा अभ्यास करणारे, इतकंच नव्हे तर भक्ति-मार्गाचं आचरण करणारे, वारकरी पंथांत समरस होणारे म्हणून पांगारकर लोकांच्या कुतूहलाचा आणि आदराचा विषय झाले होते.

आज घटकेला प्रोफेसर सोनोपंत दांडेकर यांच्याविषयी सामान्य लोकांत जी भावना आहे, तिचा दाखला देता येण्यासारखा आहे. येवढंच की पांगारकरां-विषयींची चाहत्यांची भावना अधिक तीव्र होती. याचं एक कारण असं की कांही दिवस का होईना, पांगारकरांनी राजकीय पुढाऱ्याचीं वस्त्रं अंगावर घालून पाहिलीं. परांजपे, टिळक, भालाकार भोपटकर यांच्यावर खटले झाले, त्यांना घडाधड शिक्षा झाल्या, तेव्हा पुढारीपणाचीं वस्त्रं निराळ्याच अर्थानं आपल्या अंगावर बेतणार असा धूर्त हिशेब वेळीच करून पांगारकरांनी तीं वस्त्रं अंगावरून खाली उतरलीं, आणि ते शुद्ध ' हरिभक्त ' बनले. ही भूमिका करावयास लागणारे सारे गुण मात्र त्यांच्या अंगीं भरपूर होते. त्यामुळे त्यांनी जरी पुढारीपण सोडलं तरी त्यांच्याविषयींची लोकांची भक्ति मुळीच आटली नाही.

संत-पंत वाङ्मयाचा त्यांचा व्यासंग उत्कृष्ट होता. या क्षेत्रांतलं त्यांचं लेखन अव्याहत चालू होतं. ' मुमुक्षु ' नांवाचं त्यांचं नियतकालिक अत्यंत वाचनीय असे; आणि त्यांचं वक्तृत्व खरोखर एकप्रकारें अमोघ होतं.

त्यांची काळीसावळी शरीरयष्टि भव्य होती. वेष, सहज की हेतुपूर्वक कुणास ठाऊक, बावळा, गबाळा असे. पायांत जोडा, कमरेला धोतर, अंगांत जुन्या पेशवाई थाटाचा बंदांचा अंगरखा, छातीवर अडवं टाकलेलं रेशीम-

काठी उपरणं आणि डोक्याला कसाबसा लपटलेला जरीकांठी रंगीत रुमाल अशा वेषांतली, कपाळी गंध, क्वचित् बुक्का लावलेली त्यांची मूर्ति नजरेंत भरण्यासारखी होती खचित.

डावा उजवा खांदा सतत घुसळण्याची त्यांची लकब त्यांच्या वक्तृत्वाच्या शैलीला एकप्रकारें शोभाच आणीत असे. संतमाहात्म्य किंवा कविमाहात्म्य ते वर्णू लागले की विषयाशी ते तद्रूप होत असत. बोलता बोलता परमार्थात शिरून परमेश्वराच्या कृपाशीलत्वाची महती सांगतांना तर त्यांची तल्लीनता अगदी कळस गाठी. उसासे, हुंदके, अश्रुपात हीं तंत्रेंहि त्यांनी आत्मसात् केलीं होतीं. त्यांचं पाठांतर विलक्षण होतं. आपल्या विषयाच्या पुष्टीसाठी वामनाचा एखादा श्लोक, तुकारामाचा अभंग, ज्ञानेश्वरांची ओवी, मोरोपंतांची आर्या ते म्हणून दाखवीत तेव्हा आपल्या प्रासादिक वाणीनं ते श्रोत्यांना सद्गदित करून टाकीत. " नित्य तुम्ही प्रभुपाशी, पेढे, बरफी, नवा खवा खावा; परि म्यां एके दिवशी रेवडिचा स्वाद का न चाखावा ?" ही मोरोपंतांची आर्या त्यांनी व्याख्यानांत एकदा म्हणून दाखविली तेव्हा एखाद्या गवयाला वाहवा द्यावी त्याप्रमाणे लोकांनी वाहवा देऊन माना डोलावून टाळ्या दिल्याचं मला आठवतं.

कीर्तनकार, पुराणिक, आणि व्याख्याते अशा तिन्ही भूमिकांचं जें मिश्रण पांगारकरांच्या शैलींत होतं त्यांत अपूर्वाई होती. कीर्तनाचा पूर्वरंग व उत्तररंग या दोहोंचाहि विलास त्यांच्या संतचरित्रावरील व्याख्यानांत दिसे. मधूनच ते प्रवचनकाराच्या थाटांत बोलत. मधूनच त्यांचं भाषण आधुनिक व्याख्यात्याच्या शैलींत होऊं लागे. आणि या सर्वांत अनुस्यूत झालेला असा त्यांचा वाक्प्रवाह आणि कमालीची मधुर वाणी ! त्यांचं व्याख्यान भक्तिरसानं ओथंबलेलं असे. संस्कृत आणि मराठी अभिजात काव्यांतल्या प्रसंगोचित पंक्ती त्यांना अगदी सहज स्फुरत असत, व या अवतरणांची आतषबाजी ते अशी कांही करून दाखवीत, की ऐकणारे श्रोते त्यांच्याशीं तल्लीन होत. त्यांचे उसासे, हुंदके, आणि प्रसंगी अश्रुपात कितीसे खरेखुरे असत तें पांडुरंग जाणे ! परंतु या यथोचित अभिनयामुळे त्यांच्या वक्तृत्वाची परिणामकारकता शतपटींनी वाढत असे हें निःसंशय. व्याख्यानांत सर्वथा रंगून जाणारा व श्रोत्यांना रंगवून सोडणारा, कमाल मधुरवाणीचा असा मराठी वक्ता दुसरा कुणी झाला

नाहीं, असं म्हणण्यांत अतिशयोक्ति घडण्यासारखी नाही. इंग्रजींत 'Sweeping the audience off their feet' असं ज्याला म्हणतात तें 'श्रोत्यांना जमिनीवरून उचलून आपल्याबरोबर ओढीत नेण्याचं' सामर्थ्य हरिभक्तिपरायण पांगारकर यांच्या ठिकाणीं प्रकर्षानं होतं. व्याख्यानाच्या ऐन रंगांत मधेच त्यांना भजन करायची लहर येई, आणि तशी आली की, केवळ स्वतः टाळ्या वाजवून 'जय जय विठ्ठल जय हरि विठ्ठल' असं म्हणण्यावर त्यांचं समाधान होत नसे. या गोष्टी करण्याबद्दल ते श्रोत्यांना आवाहन करीत असत, आणि त्यांनी तें केल्यावर सुशिक्षित लोकांची ती सभा इंग्रजी शिक्षणाचे सारे संस्कार मनावेगळे करून, आणि परीटघडी प्रतिष्ठा विसरून दोन-दोन, तीन-तीन मिनिटं टाळ्यांचा आणि नामस्मरणाचा गजर करीत असे. पांगारकरांचं व्याख्यान आटोपल्यावर सारे श्रोते संसार सोडून परमार्थाला लागण्याच्या निश्चयानं जात असत असं नव्हे. ते घरीं जात असत याचाच अर्थ असा की ते आपापल्या संसाराला लागत असत. परंतु प्रत्येक श्रोता रंगदार वक्तृत्वाचा कलात्मक अनुभव घेऊन घराच्या वाटेला लागत असे यात संशय नाही. पांगारकर एकच होऊन गेले! दुसरे पांगारकर झाले नाहीत. होतील असं वाटत नाही!

* * *



# ५ : दादासाहेब खापर्डे, हॉर्निमन, शौकत अलि

वसंत व्याख्यानमालेचा मोसम सोडला तर नामांकित वक्ते आणि श्रोते यांच्या गाठी-भेटीचा पुण्यांतला दुसरा महत्त्वाचा मोसम म्हणजे गणेशोत्सव.

या उत्सवाच्या भरीला शिवजयंति, शिवराज्याभिषेक, नाना फडणीस यांची जयंती यांसारखे छोटे उत्सव, आणि साहित्य संमेलन, नाट्यसंमेलन, राजकीय चळवळींतील एखादी प्रक्षोभक घटना असे प्रसंग असायचे. अशा विविध निमित्तांनी, विविध ठिकाणीं, ज्या नामांकित व्यक्तींचीं व्याख्यानं मला ऐकायला मिळालीं त्याबद्दल लिहितांना अमुक एक विशिष्ट क्रम न ठेवता केवळ आठवणींच्या लहरी क्रमावर विसंबून लिहिण्याचं मी ठरवीत आहे.

त्या काळांत लोकमान्य टिळकांच्या प्रभावळींत गावोगावची पुढारी मंडळी होती. त्यांत कित्येक चांगले वक्ते होते. बापूजी अणे होते, सातान्याचे दादासाहेब करंदीकर होते, बेळगावचे बेळवी, गंगाधरराव देशपांडे होते. या सर्वांच्या ठिकाणीं वक्तृत्वगुण चांगला होता. त्यांचीं व्याख्यानं प्रसंगोपात्त पुण्यांत

झालीं की श्रोत्यांची गर्दी होत असे. टिळकांभोवतालच्या या प्रभावळींत सगळ्यांत चित्ताकर्षक आणि कुतूहलजनक अशी व्यक्ति कोणती होती, या प्रश्नाचं उत्तर दादासाहेब खापर्डे असं निःसंशयपणे देतां येईल. ‘ वऱ्हाडचे नबाब ’ असा लोक त्यांचा आदरयुक्त उल्लेख करीत असत ; आणि या गौरवाच्या किताबतीला साजेसाच त्यांचा रुबाब आणि वेष असे. उंचीनं उणपुरे, कांहीशा लांबट चेहऱ्याचे, झुबकेदार मिशांचे, रेखीव नाकाडोळ्यांचे दादासाहेब खापर्डे धोतर, कोट, उपरणं असा साधाच पण उंची वेष करीत असत, आणि त्यांच्या डोक्यावरचा भारी किमतीचा सैलसर बांधलेला, एखाद्या मुकुटाप्रमाणे शोभणारा जरीकाठी मंदिल म्हणजे त्यांच्या रुबाबदार भव्यपणावरचा अक्षरशः कळसच वाटे. एखादा ‘ वासुदेव ’ मोरपिसांची सैलसर टोपी घालतो त्याप्रमाणे त्यांनी जरीकाठी मंदिल ‘ बांधला ’ नव्हे तर डोक्यावर ठेवला आहे असं वाटे. या वैभवनिदर्शक शिरस्त्राणानं त्यांचीं दोन्ही कानशिलं झाकलीं जात असत, आणि तरी देखील या कांहीशा बोंग्या शिरोभूषणांतून त्यांचा उग्र परंतु रंगेल, भव्य परंतु मिष्किल असा चेहरा ठसठशीतपणे दिसत असेच. उण्यापुऱ्या देहयष्टीची देणगी शिवरामपंत परांजपे व दादासाहेब खापर्डे या दोघांनाहि होती. परंतु दोघांच्या पोषाखाची रीत अगदी भिन्न ! आणि त्याप्रमाणेच दोघांची व्याख्यानशैली देखील वेगवेगळी !

शिवरामपंत परांजपे जसे रसिक तसेच दादासाहेबहि मोठे रसिक होते. काव्यशास्त्रविनोदाचे भोक्ते होते. व्युत्पन्न होते. जिभेचे मजबूत होते. दोघांनाहि उपरोध आणि उपहास यांची आवड होती; परंतु दोघांच्या वक्तृत्वाच्या रीती किती निराळ्या ! दादासाहेबांचं भाषण ‘भाषण’ नसायचं. एक प्रकारें श्रोत्यांशीं केलेलं ‘ संभाषण ’ असायचं. आपण स्वतः किनखापाच्या गुडगाभर उंच गादीवर लोडाला टेकून बसलों आहोंत, जवळ ठेवलेल्या हुक्क्याच्या भांड्यावरचे निखारे सेवक पंख्यानं फुलवीत आहे, आपण हुक्क्याची नळी मधेच लहरीप्रमाणे तोंडांत अलगद धरीत आहोंत, हुक्क्याच्या पोटांतून ‘ गुद् गुद् गुद् ’ असा आवाज निघत आहे, सुगंधी धूम्रवलयं बैठकींत तरंगत आहेत, आपला एकप्रकारे खासगी दरबार भरला आहे, चाहते लोक समोर बसलेले आहेत, अशा अस्सल नबाबी थाटांत दादासाहेब खापर्ड्यांचं भाषण होत असे.

सलगीनं चार गोष्टी सांगाव्या अशा आविर्भावानं, गप्पा ठोकल्यासारखं ते बोलत. गमतीजमती सांगत. विपुल विनोद करीत. उच्च काव्यशास्त्र-विनोदाची पातळी न सोडता कोट्या करीत. श्रोत्यांच्या हशा-टाळ्यांची खैरात नजराणा म्हणून घेत. सरकारची किंवा मवाळपक्षाची टर उडवितांना भयंकर खवचट बोलत. शिवरामपंत परांजप्यांच्यासारखीं मोठमोठीं लांबलचक वाक्यं त्यांच्या भाषणांत सहसा येत नसत. परंतु उपमा—उत्प्रेक्षांच्या अलंकारांनी भाषा नटलेली असे. परांजप्यांचं व्याख्यान म्हणजे एक प्रदीर्घ उत्स्फूर्त काव्य असे, तर खापर्ड्यांचं व्याख्यान चुरचुरीत गप्पांच्या स्वरूपाचं असें. दोघेहि पक्वान्नाचं ताट श्रोत्यांपुढे ठेवीत. परंतु खापर्ड्यांनी पुढे ठेवलेल्या ताटांत पक्वान्नापेक्षा खमंग टमंग मसालेदार पदार्थ अधिक असायचे. शिवरामपंतांचं व्याख्यान सामान्य अशिक्षितांच्या डोक्यावरून जाण्याचं भय असे. उलट खापर्ड्यांच्या व्याख्यानाची मौज सर्वांना लुटण्यासारखी असे. त्यांचं व्याख्यान म्हणजे जिची चव दीर्घकाल तोंडांत राहावी अशी अप्रतिम मेजवानीच असे !

राजकीय चळवळींतील एखाद्या विवक्षित प्रक्षोभाची लाट उठली की, तिच्यावर आरूढ होऊन कांही नवीन व्यक्ती लोकांपुढे येतात, अंगी वक्तृत्व असेल तर गाजवितात, कीर्ति भोगतात. पण तात्कालिक लाट ओसरली की या व्यक्तींचीं नांवंहि विसरलीं जातात.

भरतीच्या वेळेस उसळी घेऊन येणारी एकेक लाट जलगर्भांतील वस्तू किनाऱ्याच्या मऊ रेतीवर आणते, पण पुन्हा मोहरा फिरवून परततांना ती लाट त्या वस्तू घेऊन जाते, आणि दृष्टीआड करते. असाच कांहीसा प्रकार मी ऐकलेल्या कित्येक वक्त्यांच्या बाबतींत झालेला मला आठवतो. या व्यक्ती वक्तृत्वकुशल होत्या. त्या कौशल्याच्या बळावर मोठी लोकप्रीतिहि त्यांनी संपादिली. परंतु त्यांची कारकीर्द प्रासंगिक आणि अल्पकालिक ठरली. राजकीय चळवळींतील नैमित्तिक प्रसंगानं या व्यक्ती पुढे आल्या ; प्रसंग संपला तेव्हा त्या अंतर्धान पावल्या.

१९१७ सालीं—म्हणजे पहिल्या महायुद्धाचं तिसरं वर्ष चालू असतांना—लष्करभरतीच्या उद्योगाला चालना देण्यासाठी आणि हिंदी लोकांचं वाढतं द्रव्यसाहाय्य मिळविण्यासाठी सरकारनं दिल्लीच्या राजधानींत एक मोठी

आणि प्रांताप्रांताच्या राजधान्यांतून छोट्या छोट्या ' युद्धपरिषदा ' भरविल्या. या योजनेनुसार त्या वेळचे मुंबईचे गव्हर्नर लॉर्ड विलिंग्डन यांच्या अध्यक्षतेखाली जी परिषद् भरली तिला टिळक, बॅरिस्टर जीना, केळकर इत्यादि पुढाऱ्यांना आमंत्रिलं होतं. या परिषदेंत भाषण करतांना टिळक म्हणाले, " लोकांचं म्हणणं काय आहे तें सरकारला सांगण्यासाठी मी येथें आलों आहे. हिंदुस्थानवर आज नाही उद्या स्वारी झाली तर आम्ही हिंदी लोक देहहि खर्ची घालूं. परंतु स्वराज्य आणि स्वदेशसंरक्षण यांची साखळी आम्हांला तोडता येत नाही. " टिळकांनी हें वाक्य उच्चारल्याबरोबर लॉर्ड विलिंग्डननं त्यांना अडथळा करून सांगितलं, की " या सभेंत राजकारणाची चर्चा मी करूं देणार नाही. " यावर टिळक म्हणाले, " अशा परिस्थितींत परिषद् सोडून जाण्याशिवाय कोणत्याहि स्वाभिमानी माणसाला दुसरा मार्ग नाही म्हणून मी निघून जातो " ... पुढाऱ्यांचं सहकार्य मिळविण्यासाठी बोलाविलेल्या या सभेचा हेतु तर सफल झाला नाहीच, पण विलिंग्डनसाहेबाविषयी लोकमत मात्र खवळलं ; आणि लवकरच लॉर्डसाहेब मुदत संपून विलायतेस परत जायला निघाले, आणि त्यांच्या स्मारकाचा बूट कांही लोकांनी काढला त्या वेळेस या खवळलेल्या लोकमतानं चांगलंच उग्र स्वरूप धारण केलं. स्मारकाच्या योजनेची सभा मुंबईच्या शेरिफांनी बोलाविली तेव्हां बॅरिस्टर जीना यांनी दोन हजार विरोधकांच्या सह्या गोळा केल्या आणि स्मारक होता कामा नये असा विनंती-अर्ज शेरिफाला सादर केला. ही योजनेची सभा तर बारगळलीच ; परंतु विलिंग्डनच्या एकंदर प्रतिगामी कारकीर्दीचा निषेध करणाऱ्या सभा मुंबईत गाजल्या.

या निमित्तानं दोन वक्ते लोकांपुढे आले. एक जमनादास द्वारकादास. पुढे गांधीजींच्या असहकारितेची पहिली तडाखेबंद लाट ओसरल्यावर फेरनाफेर वाद निघाला, कायदे कौन्सिलांत शिरावं असं म्हणणारा पक्ष केळकरांच्या नेतृत्वाखाली निघाला, त्या वेळेस जे मुंबईचे जमनादास प्रसिद्धीला आले ते निराळे, हे जमनादास द्वारकादास निराळे. विलिंग्डनसाहेबांविरुद्ध प्रक्षुब्ध लोकमताची जी वावटळ उठली त्या वावटळीचं नेतृत्व यांनी मोठ्या धडाडीनं केलं. श्रीमंत गुजराती उद्योगपती, जहाल राष्ट्रवादी, टिळकांचा अनुयायी, सरकारशीं दोन हात करणारा झुंझार, रूपानं मोठा आकर्षक आणि देखणा,

अनुक्रमांक ........ वि: ........ नों: दि: ........

आणि शिवाय चांगला इंग्रजी वक्ता—या संयोगांत लोकांना साहजिकच अपूर्वाई वाटली. या गृहस्थांच्या ठिकाणीं जसं दुर्मिळ व्यक्तिमत्व होतं तसंच आवेशयुक्त इंग्रजी वक्तृत्वहि होतं. आपल्या भाषणानं ते लोकांना भारून टाकीत.



विलिंग्डन विरोधाच्या चळवळीच्या लाटेनं जनतेसमोर प्रामुख्यानं आलेले दुसरे वक्ते म्हणजे हॉर्निमन.

यांचं सबंध नांव बेंजामिन हॉर्निमन; पण बी. जे. हॉर्निमन या नांवानंच ते जास्त ओळखले जात. निकटवर्ती स्नेही त्यांना फक्त बी. जे. म्हणत. सरकार-धार्जिण्या ‘ टाइम्स टॉफ इंडिया ’ पत्राला तोंड देण्यासाठी मुंबईस प्रसिद्ध होणारं राष्ट्रीय बाण्याचं इंग्रजी दैनिक पाहिजे असा विचार बळावल्यामुळे १९१४ च्या सुमारास ( सनाबद्दल माझी निश्चित खात्री नाही ) ‘ क्रॉनिकल ’ नांवाचं पत्र निघालं. त्याचं संपादकत्व बी. जे. हॉर्निमन यांना देण्यांत आलं. सरकारला शिव्या देणारा गोरा माणूस म्हणून या गृहस्थावर लोकांची साहजिक चटकन् प्रीति बसली. त्यांच्या अंगीं गुणहि तसेच होते. त्यांच्या संपादकत्वामुळे

' क्रॉनिकल ' तर अल्प काळांत लोकप्रिय झालंच; परंतु बी. जे. हॉर्निमन या व्यक्तीवरहि लोक प्रेम करूं लागले.

या गृहस्थांच्या अंगीं वक्तृत्वकला खरोखरच फार मोठ्या प्रतीची होती. इंग्रजी भाषेवर विलक्षण प्रभुत्व, उच्चार मोठे झोकदार, भाषणाची शैली नखरेदार, आवेश मोठा मोहक, धारदार तिखट शब्दांची रेलचेल, असे अनेक गुण हॉर्निमनच्या भाषणांत प्रकर्षानं प्रत्ययाला येत असत. यांची लेखणी जशी प्रभावी होती तशीच वाणीदेखील. असा सव्यसाची इंग्रज संपादक मुंबईच्या जाहीर व्यासपीठावर त्यांच्यानंतर दिसलेला नाही.... विलिंग्डन स्मारकाच्या योजनेचा पार धुव्वा उडवून देण्याचं मुख्य श्रेय हॉर्निमनच्या तुफानी वक्तृत्वालाच होतं ! ....

ह्यांचं अखेरचं भाषण मी ऐकलं तें कांहीशा चमत्कारिक परिस्थितींतलं होतं. ' क्रॉनिकल ' च्या सूत्रचालकांचा आणि यांचा अंशतः मतभेदाच्या मुद्यांवर व अंशतः खाजगी मुद्यांवर बेबनाव झाला होता. यांना संपादकाच्या कामावरून दूर करण्यांत आलं होतं. अशा परिस्थितींत स्वतःची बाजू जनतेपुढे मांडण्यासाठी हॉर्निमननी जाहीर सभा घेतली होती. बोरीबंदरच्या स्टेशनासमोर आज एक चित्रपटगृह दिसतं. त्या वेळेस तें ' गेअटी थिएटर ' नांवानं ओळखलं जात होतं. या थिएटरांत हॉर्निमनची ती सभा झाली. मी कांहीं कामानिमित्त मुंबईस गेलों होतों. सभेस मुद्दाम हजर राहिलों होतों. या सभेंतलं हॉर्निमनचं त्या दिवशींचं भाषण कैफियतीच्या स्वरूपाचं होतं. परंतु तें तसं असूनहि वक्तृत्वाच्या अनेक गुणांनी नटलेलं होतं. आपल्यावर मोठा अन्याय होत आहे अशा खात्रीमुळे त्यांचं अंतःकरण उचंबळून आल्यासारखं उघड उघड दिसलं. त्यांची बाजू खरी की खोटी आणि लंगडी देव जाणे, परंतु गेअटी थिएटरांतलं त्यांचं तें भाषण माफक शालीनता, आवश्यक करारी उद्दामपणा, न्यायबुद्धीला आवाहन, हिंदुस्थान देशाच्या सेवेची तळमळ, संपादक आणि पुढारी म्हणून जें जें कार्य केलं त्याचा उच्चार, आणखी कार्य करण्याची प्रतिज्ञा, अशा विविध भावांनी सजविलेलं होतं. सुंदर इंग्रजी वक्तृत्वाचा तो विलक्षण नमुना मला कधीं विसरता येणार नाहीं !



१९१८ च्या नोव्हेंबरमध्ये पहिलं महायुद्ध संपलं. युद्ध-काळांत सरकारला अमर्याद हक्क देणारा ‘ भारत रक्षण कायदा ’ जारी होता.

युद्ध संपलं तेव्हा या कायद्याची मुदतहि संपणार होती. देशांतील राजकीय जागृतीला भ्यालेल्या सरकारला तर ही जागृति दडपण्यासाठी अमर्याद सत्ता हवी होती. सत्ता हवीशी वाटल्यावर ती निर्माण करायला काय उशीर ? एक नवा कायदा घडविला की झालं काम ! सरकारनं ‘ रौलॅट ’ कायदा नांवाचा कायदा विधिमंडळांत पास करून घेतला. गांधीजींनी या कायद्याविरुद्ध देशव्यापी सत्याग्रह पुकारला. देशांत अनेक ठिकाणीं दंगेधोपे झाले. अमृतसरला निरपराधी नागरिकांची जी अमानुष कत्तल आणि छळ झाला तो ‘ जालियनवाला बाग प्रकरण ’ म्हणून गाजला. साऱ्या देशभर संतप्त असंतोषाची प्रचंड लाट उठली, आणि त्यांतूनच असहकारितेची अभूतपूर्व चळवळ जन्माला आली. याच सुमारास ‘ खिलाफत चळवळ ’ हिंदुस्थानांत सुरू झाली. युद्धसमाप्तीनंतर तुर्की साम्राज्याचे तुकडे करून ब्रिटन आणि फ्रान्स यांनी वाटून घेतले, आणि ‘ खलिफा ’ जवळ जवळ कैदी बनला. या अन्यायाबद्दल जी चळवळ झाली तिला ‘ खिलाफत चळवळ ’ असं नांव

मिळालं. वास्तविक ही चळवळ म्हणजे मुसलमानांची धार्मिक चळवळ होती. परंतु हिंदुस्थानांतल्या हिंदू-मुसलमानांचं ऐक्य घडवून आणण्याच्या हेतूनं गांधींनी ही चळवळ उचलून धरली; आणि त्यांच्या पुण्याईनं तिचा वणवा देशभर पसरला.

मुसलमानांना हिंदूंचं इतकं प्रेम त्या वेळेस आलं, की कांही विचारूं नका. गणेशोत्सवांत मुसलमानांचे मेळे गणपतीपुढे नाचले. हिंदूंच्या मोहब्बती-खातर गोहत्या बंद करण्याच्या गोष्टी मुसलमान पुढारी बोलूं लागले. 'हिंदी चिनी भाई भाई,' 'हिंदी रूसी भाई भाई' यांसारख्या घोषणा म्हणजे आजच्या घटकेचं जसं चालू नाणं आहे, त्याप्रमाणेच 'हिंदू मुस्लिम भाई भाई' अशा घोषणेनं देशाचं वातावरण त्या काळांत दुमदुमलं होतं. मुसलमानांची ही बंधुभावना कधी ओसरेल अशी शंकादेखील त्या वेळेस आली नसती. अवघ्या पंचवीस वर्षांनतर भारताची फाळणी होणार आहे, आणि मुसलमानांचं स्वतंत्र राष्ट्र म्हणून पाकिस्तान अस्तित्वांत येणार आहे, असं भविष्य कुणी वर्तविलं असतं तर लोकांनी त्यांची रवानगी वेड्याच्या इस्पितळांत खचित केली असती. स्वराज्य आणि खिलाफत या दोन्ही चळवळी त्या काळांत एकरूप झाल्या होत्या, आणि हिंदू-मुसलमानांतलं बंधु-प्रेम आता वज्रचूर्ण ओतल्या-प्रमाणे कायमचं भक्कम होणार असा भास निर्माण झाला होता.

खिलाफत चळवळीचे अग्रगण्य मुसलमान पुढारी म्हणजे अलि बंधु. गांधीजींनी जाहीरपणे सांगितलं, की या दोघा अलींना मी माझे सख्खे भाऊ मानतों. मग काय विचारता? लोकांनी महंमद अलि व शौकत अलि या दोघांना डोक्यावर घेऊन नाचण्यास आरंभ केला. खिलाफत चळवळीच्या आंदोलनावर आरूढ होऊन प्रकट झालेले हे दोघे अलि एका रात्रींत अखिल भारतीय पुढारी बनले.

हिंदुविद्वेषाचं एक महत्त्वाचं मुसलमानी केंद्र म्हणून अलीगढच्या मुस्लिम युनिव्हर्सिटीची ख्याती होती. अलि बंधू अलीगढचेच. परंतु एका रात्रींत नागाचे विषारी दांत पडावेत त्याप्रमाणें या अलिबंधूंच्या ठिकाणचा हिंदु-द्वेषाचा विखार नाहीसा झाला; आणि गांधींच्या स्वराज्य चळवळीचा प्रचार ते करूं लागले. दोघेहि अलि बंधू उत्तम वक्ते होते. महंमद अलि थोरले, आणि शौकत अलि धाकटे. परंतु दोघांना एकत्र पाहिल्यावर मात्र धाकटा

भाऊ मोठा वाटायचा ! महंमद अलि ठेंगणेठुसके दिसायचे, आणि त्यांच्या वागण्यांत बोलण्यांत शिक्षणाचे अभिजात संस्कार आढळून यायचे. उलट धाकट्या शौकत अलीची तऱ्हा सर्वस्वी वेगळी ! शरीराची उंची व जाडी एखाद्या राक्षसालाच शोभेल अशी ! पाहणाराला वाटावं, या प्रचंड पुरुषाच्या सकाळच्या नाश्त्यालाच दीड-दोन डझन रोट्या आणि दोन-चार कोंबड्या लागत असाव्यात. कोल्हापूरचे छत्रपति शाहूमहाराज सोडले तर शौकत अलिसारखा दुसरा धिप्पाड, अवाढव्य पुरुष मी पाहिला नाही. अच्युत बळवंत कोल्हटकर म्हणजे कांही लहानसहान असामी नव्हती. परंतु एका सभेंत अच्युतरावांनी केलेल्या भाषणांतील टिळकांची निंदा ऐकून लोक भडकले, आणि अच्युतरावांना मार देण्यासाठी त्यांच्याभोवती गोळा झाले तेव्हा शौकत अलींनी अच्युतरावांना एखाद्या कोकरासारखं काखोटींत मारलं, आणि सुरक्षित बाहेर काढलं, हा प्रसंग मी माझ्या डोळ्यांनी पाहिला होता.

असहकार, सत्य, अहिंसा यांची महती गाणाऱ्या शौकत अलींना व्यास-पीठावर बघितलं की मनांत येई, सर्कशींतला रिंगमास्तर ज्याप्रमाणे नरमांस-भक्षक पटाईत वाघाकडून कामं करून घेतो, त्याप्रमाणें या माणसाला गांधीजींनी सत्य, अहिंसेच्या रिंगणांत उड्या मारायला लावलंय, हा गांधीजींच्या पुण्याईचा केवढा महिमा म्हणायचा !

शौकत अलींचा देह जसा प्रचंड तसंच त्यांचं वक्तृत्वहि ! आवाज सिंहगर्जनेसारखा, वक्तृत्वाचा ओघ धबधब्यासारखा, बोलण्यांत सुशिक्षित संस्कृतपणाऐवजी सारा रांगडी धसमुसळेपणा ! एकंदर भाषणाचा सारांश इतकाच, की " शूर असाल तर गांधीजींचे शिपाई बना. विचार कसला करतां ? समरांगणांत उडी ठोका. हें तुम्ही केलं नाही तर तुमच्यांत आणि बांगड्याभरू रांडांत फरक तो काय उरला ? "....एकदा ते पुण्यास आले असतांना सकाळीं त्यांचं जाहीर व्याख्यान झालं तें मला आठवतं....

व्याख्यानाला मनस्वी गर्दी लोटली होती. शौकत अलि त्या वेळीं लोक-प्रियतेच्या शिखरावर होते. हातसुताच्या खादीची सैल पठाणी विजार, मुंडेछाट पायघोळ पैरण, डोक्याला खादीचीच टोपी, आणि छातीवर खिलाफतीचं हिरव्या झंड्याचं चिन्ह, अशा वेषांतले शौकत अलि सुमारे पाऊण तास बोलले. बोलले कसले ? तोफेचा गडगडाटच होत राहिला. वाक्यावाक्याला टाळ्या

पडत होत्या. एखादा सेनापति सैनिकांना शत्रूवर चाल करून रणकंदन करण्यासाठी आवाहन देत आहे असं वाटत होतं. इंग्रजी वक्तृत्वाचा खळबळाट सुरू होता. जे लोक असहकारितेच्या चळवळीपासून अलिप्त राहूं पाहतील, विचार करतो म्हणतील, त्यांना उद्देशून अस्सल इंग्रजी गावठी शिव्यांचा पाऊस पडत होता. 'भ्याड', 'शेपूट घालणारे कुत्रे', 'साहेबाचे जोडे उचलणारे शिपुर्डे' 'हजाम', 'नपुंसक'– जी शिवी तोंडाला येईल ती शौकत अलि खुशाल उच्चारीत होते, आणि शिवीगणिक श्रोत्यांची टाळी घेत होते. ज्यांचा अर्थ घरीं आल्यावर मला डिक्शनरींत पाहावा लागला अशा कितीतरी इंग्रजी शिव्या त्यांच्या पाऊण तासाच्या व्याख्यानांत माझ्या कानीं पडल्या. शौकतअलींच्या त्या वक्तृत्वांत सुसंस्कृत अभिरुचि किंवा अभिजात कलागुण काडीमात्र नव्हता. परंतु जें वाटेत सांपडेल त्याला झोडीत, भुई-सपाट करीत जाणारं रांगडं वादळी इंग्रजी वक्तृत्व कशा प्रकारचं असूं शकेल त्याचा प्रत्यय देणारं त्या दिवशींचं शौकत अलींचं व्याख्यान होतं येवढं खास !

* * *



# ६ : बेझंट बाई !
# सर सी. पी. रामस्वामी !

चालू घटकेला हिंदुस्थानांतील थिऑसॉफिस्ट पंथ राजकारणांतून संपूर्णतः निवृत्त झाल्यासारखा दिसतो. पण चाळीस वर्षांपूर्वी परिस्थिति वेगळी होती. वास्तविक थिऑसॉफीचा पंथ राजकीय पंथ नव्हे, तर धार्मिक पंथ.

अध्यात्म, परमार्थ, मोक्षसाधन हेच त्या पंथाचे खरे विषय. अध्यात्म-ज्ञानाचा प्रसार हेंच त्या पंथाचं खरं कार्य. परंतु १९१५ च्या सुमारास हिंदुस्थानांतील या पंथाला चांगलंच राजकीय स्वरूप आलं होतं. याचं कारण एकच. तें हें, की या पंथाच्या सूत्रचालिका ॲनी बेझंट नांवाच्या बाई राजकीय कीर्ति मिळविण्याच्या महत्त्वाकांक्षेनं पछाडल्या होत्या.

भारतीय लोकांचं अध्यात्मिक कल्याण साधण्याचं कंकण तर त्यांच्या पंथानंच त्यांच्या हातीं बांधलं होतं. भारतांत एक अतिश्रेष्ठ कोटींतल्या धर्म-गुरूचा-महात्म्याचा अवतार होणार आहे, आणि त्या अवताराकडून कोट्यवधि भारतीयांचा उद्धार होणार आहे, अशी एक कंडी बेझंट बाई आणि त्यांचे उजवे हात लेडबीटरसाहेब यांनी उठविली होती, आणि हा " महात्मा " उबवून

तयार करण्यासाठी दक्षिण हिंदुस्थानांतील एका कुटुंबांतील कृष्णमूर्ति नांवाच्या अल्पवयी मुलाला त्यांनीं ताब्यांत घेतलं होतं. या प्रकरणांतून मोठा खटला निर्माण झाला होता, आणि त्या वेळेस तो गाजला होता. या संबंधांत बाईंचा खरपूस समाचार घेतांना खापडर्यांनी त्यांना 'पूतनामावशी' ही पदवी बहाल केली होती. बेझंट या नांवाचा अधिक्षेप करण्यासाठी लोक बाईंना 'बिझांट बाई'च म्हणूं लागले होते.

या बाईंच्या मनानं घेतलं, की भारतीयांचं अध्यात्मिक कल्याण साधण्यासाठी त्यांना एक धर्मगुरु गाठून देणं हें जसं आपल्या आयुष्याचं कार्य आहे, त्याचप्रमाणे ब्रिटिश सत्तेविरुद्ध स्वातंत्र्याचा जो लढा हिंदुस्थानांत चालू आहे त्यांत भारतीयांचा हिरीरीनं कैवार घेणं हेंहि आपलं काम आहे. त्यामुळे अध्यात्माच्या कामाबरोबरच त्या हिंदी राजकारणांतहि धडाडीनं शिरल्या. टिळकांच्या वरकडी लोकप्रियता मिळवावी अशी आकांक्षा त्यांनी धरली. भारताच्या स्वातंत्र्य-यज्ञांत बलिदान करणारी एक गौरकाय अवतारी स्त्री म्हणून हुतात्मेपणाची अजरामर कीर्ति आपल्या वाट्याला येईल अशीं स्वप्नं बाईंना पडूं लागलीं.

धार्मिक क्षेत्रांतल्या बाईंच्या खटपटी लटपटींवर टिळकांनी कडाडून हल्ला चढविला होता. परंतु जहाल राष्ट्रवादी चळवळीला बाईंचा पाठिंबा मिळूं लागला, तेव्हा टिळकांनी त्यांचं निर्मळ मनानं स्वागत केलं.

मात्र टिळक आणि बेझंट बाई यांची युति फार दिवस टिकण्यासारखी नव्हती. टिळकांना मिळवायचं होतं स्वराज्य; बाईंना मिळवायची होती कीर्ति ! शक्य तर टिळकांहून अधिक कीर्ति ! टिळकांच्या चळवळींत बाई खोडा घालूं लागल्या तेव्हां टिळकांनी बाईंचं सत्य स्वरूप उघडं नागडं करून लोकांपुढे मांडायला कमी केलं नाही. टिळकांच्या लिहिण्याचा नमुना पाहा—

"....बाई बुद्धिमान आहेत, विदुषी आहेत, बहुश्रुत आहेत, आपल्या दीर्घ व सतत उद्योगपरायणतेनं उत्साही तरुणालाहि लाजविणाऱ्या आहेत, कर्त्या आहेत, वृद्ध आहेत, पोक्त आहेत, विश्वविख्यात आहेत, आपल्या वक्तृत्वानं अनेकांना मारून टाकणाऱ्या आहेत, आणि आम्हांला अनुभव

नसला तरी त्यांच्या शिष्यवर्गाच्या मतें थिऑसॉफिस्ट महात्म्याशीं तादात्म्य पावलेल्या व परोक्षज्ञानी आहेत, याबद्दल आमचा वाद नाही. परंतु आजचा प्रश्न धार्मिक नसून राजकीय आहे.

.... एका पक्षीं बाई आणि दुसऱ्या पक्षीं राष्ट्रीय सभा यांचे मार्ग आता भिन्न झालेले आहेत ... बाईंना हिंदुस्थानाबद्दल जितकी कळकळ आहे तितकी हिंदुस्थानहि त्यांच्या साहाय्याची अपेक्षा ठेवीत आहे ... बाईंसारख्या व्यक्तीच्या साहाय्याची राज्यप्राप्त्यर्थ उद्योग करणारा कोण गृहस्थ अपेक्षा ठेवणार नाही ... ? ”

बाई मध्यम उंचीच्या होत्या. गोऱ्यापान अर्थातच होत्या. वयस्क झाल्या होत्या, परंतु अंगकांति पाहणाराच्या लक्षांत भरण्यासारखी होती.

त्यांच्या डोळ्यांवर चष्मा असे. पोषाख उंची रेशमी. कफनीसारखी पायघोळ पैरण, आणि मानेवरून घेतलेल्या उपरण्याचे दोन पदर पुढे सोडलेले अशा पुरुषी थाटाचा.

त्यांचे सारे केस पांढरे शुभ्र झाले होते, आणि एखाद्या पुरुषाप्रमाणें त्या अगदी लांडा क्रॉप ठेवीत असत. किंबहुना पाहणाराला त्यांच्या स्त्रीत्वाची जाणीव होतच नसे. सरोजिनी नायडू यांच्या ठिकाणीं स्त्रीसुलभ सारीं लाघवें होतीं. उलट ॲनी बेझंट लिंगभेदाच्या पलीकडे गेल्यासारख्या होत्या. त्यांचा चेहरा किंचित् उभट होता, भालप्रदेश रुंद होता, नीलवर्ण डोळे घारी-सारखे भेदक आणि अत्यंत तेजस्वी होते. मात्र सरोजिनी नायडूंच्या टपोऱ्या डोळ्यांचा कटाक्ष-विलास बाईंच्या नजरेंत किंचित्देखील नव्हता. सरोजिनींची नजर कवयित्रीची होती. बेझंट बाईंची नजर ज्ञान्याची आणि धूर्त मुत्सद्याची होती. वक्तृत्वाच्या दृष्टीनं या दोन्ही स्त्रिया असामान्य कोटींतल्या होत्या खऱ्या, परंतु दोघींच्या शैलींत केवढा फरक ! एक काव्याचीं कारंजीं फुलविणारी, तर दुसरी प्रमाणामागून प्रमाणं पुढे ठेवून स्वमतांचं प्रतिपादन करणारी !

बेझंटबाईंच्या वक्तृत्वावर जुन्या थाटाची छाप पुष्कळच होती. त्यांच्या वाणींत खणखणीतपणा आणि गांभीर्य हे दोन गुण होते, भाषेचा हृदयस्पर्शी विलास होता, वक्तृत्वाचा ओघ श्रोत्यांना गुदमरून सोडणारा होता. परंतु

एकंदरीत वक्तृत्वाचा थाट जुनाच. छोटी छोटी खुसखुशीत वाक्यरचना क्वचित् व्हायची. जाड जाड बोजड शब्द, आणि आधुनिक थाटाचा वक्ता जे शब्दप्रयोग टाळील असे जुन्या कोशांत सापडणारे शब्दप्रयोग यांचा वापर फार, आणि हावभावदेखील वाजवीपेक्षा अधिक. दोन्ही हात उंच उभारणं, उजव्या हाताची तर्जनी उभी धरणं किंवा हालविणं, हातांच्या मुठी वळणं, टेबलावर आपटणं, सबंद अंग पुनःपुन्हा गदगदल्यासारखं घुसळणं, आवाज टिपेला नेणं अशा तऱ्हेच्या नाटकीपणाचा विलास बेझंट बाईच्या भाषणांत मोठ्या प्रमाणांत दिसे. परंतु तो काळच असा होता, की इंग्रजी वक्तृत्वाचा जुना जमाना अजूनहि रेंगाळत होता. आज घटकेला बाईचं तें नाट्य श्रोत्यांना आवडायचं नाही. परंतु तेवढं वजा केलं तर पांडित्य, प्रतिपादनाची रंगत, आणि वाणीचा अप्रतिहत प्रवाह इत्यादि गुणांनी नटलेलं बाईचं व्याख्यान आजदेखील एखाद्या विराट सभेला मारून टाकील !

अलौकिक वक्तृत्वाच्या जोडीला बेझंट बाईच्या अंगीं कित्येक दुर्मिळ गुण होते. व्यक्तिमत्त्वाचं आकर्षण ज्याला म्हणतात तें या बुद्धिमान, चतुर, संघटनाकुशल आणि उद्योगी स्त्रीच्या ठिकाणीं फार प्रकर्षानं होतं. यामुळे हिच्या प्रभावळींत भारताच्या सर्व प्रांतांतील माणसं गोळा झालीं होतीं. त्यांत नामांकित डॉक्टर, वकील, प्राध्यापक, उद्योगपती, एंजिनिअर, कलावंत होते. मोठमोठ्या धनिकांकडून कित्येक लाखांच्या मापानं देणग्या अगदी सहजासहजी काढण्याच्या कुशलतेचा जो उच्चांक बनारस हिंदु युनिव्हर्सिटी स्थापणाऱ्या मालवीयजींनी गाठला, त्या उच्चांकापर्यंत बेझंट बाई कदाचित् पोचल्या नसतील. तथापि त्यांच्याभोवतीं संपन्न कुबेरांचा परिवार हातांच्या ओंजळींत दातृत्व घेऊन मोठ्या संख्येनं उभा होताच ! आणि विशेष गोष्ट अशी, की मातृभाषा आणि इंग्रजी भाषा दोहोंतहि वक्तृत्व गाजविणारी किती तरी पहिल्या प्रतीचीं थोर सव्यसाची विद्वान माणसं थिऑसॉफीच्या पंथांत होतीं. या बाबतींत बेझंट बाईंनी खचित लोकमान्य टिळकांवर मात केली होती.



बेझंट बाईंच्या प्रभावळींतील नामांकित वक्त्यांच्या आठवणी मी करूं लागलों, की प्रथम नांव डोळ्यांपुढे येतं तें सर सी. पी. रामस्वामी अय्यर यांचं. सर सी. पी. म्हणजे एके काळीं हिंदुस्थानांतील सार्वजनिक घडामोडींच्या क्षेत्रांत गाजलेली व्यक्ति होती.

चमकदार बुद्धीचीं, जबर कर्तृत्वाचीं, जनतेंत आणि सरकारदरबारांतहि वजनदार समजलीं जाणारीं जीं हिंदी माणसं ह्या काळांत वावरत होतीं त्यांत सी. पी. रामस्वामी प्रमुख होते. वकील या नात्यानं त्यांचा लौकिक असामान्य होता. कृष्णमूर्ति प्रकरणांत आपल्या मुलाचा ताबा मिळावा म्हणून त्याच्या बापानं बेझंट बाईवर जेव्हां फिर्याद गुदरली तेव्हा बाईंच्या बाजूनं सर सी. पी. नी वकीलपत्र घेतलं होतं. या खटल्याचा निकाल हायकोर्टांत झाला तो बेझंट बाईंच्या विरुद्ध; पण बाईंनी ही केस पुढे प्रीव्हि कौन्सिलपर्यंत लढविली आणि तिथे मात्र त्यांच्या बाजूचा निकाल होऊन जागतिक महात्मा पदावर बसविण्यासाठी बाईंनी निवडलेला हा अवतारी मुलगा त्यांच्या ताब्यांत मिळाला. या एकंदर खटल्यांत सर सी. पी. यांचा लौकिक वाढला की घटला या प्रश्नावर मतभेद होण्यासारखे आहेत; परंतु सर सी. पी. यांच्या ठिकाणीं वकिलीचं जें अपूर्व कौशल्य होतं तें या प्रकरणीं प्रकट झालं येवढं खास!

नामांकित वकील उत्तम वक्ता असतोच असं नाही. महंमदअली जीना वकिलीच्या धंद्यांत इतके निष्णात होते, की मोठमोठे न्यायाधीश त्यांना मनांतून भीत असत; आणि जीनांच्या स्वभावांतला सारा उद्दामपणा एखादी केस चालवितांना प्रगट होत असे. एकदा जीनांच्या बहिरेपणाचा उल्लेख एका न्यायाधिशानं केला तेव्हा जीनांनी अत्यंत उर्मट स्वरांत उत्तर दिलं, की " न्यायमूर्तींचं बोलणं ऐकण्यासाठी मी इथे उभा राहिलों नाही. माझं बोलणं ऐकण्यासाठी आपण या खुर्चींत बसलां आहांत; तेव्हा आपण बहिरे नसलांत म्हणजे झालं ! " परंतु मोठमोठ्या न्यायाधिशांना अशा प्रकारें ठणकावणारे आणि हायकोर्टांत अक्षरशः एखाद्या वाघाप्रमाणे ज्याच्या त्याच्यावर गुरकावणारे बॅ. जीना व्यासपीठावर चढून जाहीर व्याख्यान देऊं लागले, की त्यांच्या बोलण्याचा कांही प्रभाव पडत नसे. न्यायालयांतलं वक्तृत्व निराळं, व्यासपीठावरील वक्तृत्व निराळं ! या दोन्ही वक्तृत्वांत नैपुण्य दाखविणारीं माणसं विरळा. सर सी. पी. अशा दुर्मिळ वक्त्यांपैकी एक होते. न्यायालयांत जसं त्यांचं तेज पडे त्याप्रमाणेच जाहीर व्याख्यानांतहि त्यांची छाप श्रोत्यांवर अगदी सहज पडे.

सर सी. पी. दिसायला भव्य आहेत असं मुळींच नाही. त्यांची उंची मध्यमच म्हणावी लागेल. बांध्यानं ते मजबूत आहेत येवढंच, धिप्पाड मुळींच नाहीत. जन्मानं दाक्षिणात्य असूनहि ते कृष्णवर्ण नाहीत. कांहीसे उजळ आहेत इतकंच. परंतु त्यांना गोऱ्या माणसांच्या सदरांत घालतां यायचं नाही. परंतु त्यांच्या पोषाखाची टापटीप चटकन् नजरेंत भरण्यासारखी असते. विलायती सूटबुटाच्या पोषाखांत ते जसे शोभतात तसेच अस्सल दाक्षिणात्य पोषाखांतहि रुबाबदार दिसतात. त्यांचे डोळे वाजवी-पेक्षा जास्त मोठे, बटबटीत आहेत. त्यामुळें त्यांची नजर तेजस्वी वाटत नाही. परंतु भालप्रदेशाचा रुंदपणा, नासिकेचा तरतरीत सरळपणा, आणि तोंडाच्या आणि हनुवटीच्या ठेवणींत स्पष्टपणे प्रगट होणारा करारीपणा, यांच्या योगानं त्यांची मुद्रा एकदम प्रभावी भासते; आणि पाहणाराच्या मनाला त्यांचं व्यक्तिमत्त्व भारून टाकल्याखेरीज राहत नाही.

मी असं पाहिलं आहे, की पटाईत वक्त्याच्या वक्तृत्वाची खरी रंगत दिसून येते ती त्याचं कुणाशीं तरी वाग्युद्ध जुंपतं तेव्हां. कोणत्याहि कलेचा खरा आत्मा

'झुंज'च आहे की काय कुणास ठाऊक ? कथा-कादंबरीसारख्या ललित साहित्यांत झुंज असली तर मौज वाटते. गाण्याबजावण्यांतदेखील गायक किंवा तंतकार आणि तबल्याची साथसंगत करणारा बजवय्या यांच्या जुगलबंदीची हातघाई सुरू झाली, की श्रोत्यांचं चित्त थरारून जातं. व्याख्यानालादेखील हा न्याय लागू आहेसं वाटतं. निष्णात वक्ता एखादा सिद्धान्त मांडण्यासाठी जेव्हा बोलतो तेव्हाहि त्याचं व्याख्यान श्रवणीय होतंच, परंतु ज्या वेळेस एखाद्या सिद्धान्तावर तो तुटून पडतो त्या वेळेस त्याच्या वक्तृत्व-गुणांना जी भरती येते तिची शोभा कांही वेगळीच. सर सी. पी. अय्यर यांच्या वक्तृत्वाची ही शोभा एका प्रसंगीं मला बघायला मिळाली.

१९४५ सालीं भारतीय तत्त्वज्ञान परिषदेचं अधिवेशन त्रिवंद्रम् शहरीं झालं. या अधिवेशनांत मुख्य कार्यक्रमाच्या भरीला कांही व्याख्यानं झालीं. त्यांत प्रो. ए. आर. वाडिया यांचं बुद्धधर्मावर व्याख्यान झालं; त्या वेळेस सर सी. पी. अध्यक्ष होते. प्रो. वाडियांनी असा सिद्धान्त मांडला, की " बुद्धाचा अवतार झाला हिंदुस्थानांत. बुद्धधर्माची संस्थापना झाली याच देशांत. आज घटकेला बुद्ध-संप्रदाय हिंदुस्थानच्या बाहेरच्या देशांत जिवंत आहे. परंतु जिथे भगवान् बुद्ध जन्मला त्या या भारतांत मात्र त्याचा संप्रदाय नामशेष झालेला आहे ! मी जेव्हा जेव्हा गयेला जातों तेव्हा तेव्हा बुद्धाच्या मूर्तीवर वटवाघळं धिरट्या घालतांना दिसतात, आणि माझं अंतःकरण शतशः विदीर्ण होतं. आम्ही भारतीयांनी बुद्धधर्मावर मोठा अन्याय केला आहे !"

मोठ्या कौशल्यानं आणि आवश्यक त्या आवेशानं प्रो. वाडियांनी आपला सिद्धान्त श्रोत्यांपुढे मांडला. श्रोत्यांना तो पटलाहि. पण अध्यक्ष म्हणून बोलण्यासाठी सर सी. पी. उभे राहिले तेव्हा प्रारंभींच्याच वाक्यांनी त्यांनी श्रोत्यांच्या समाधानाला धक्का दिला, आणि उत्कंठतेचं वातावरण निर्माण केलं. ते म्हणाले, " प्रोफेसरसाहेबांच्या पांडित्यपूर्ण भाषणावर टीका करण्याचा मला अधिकार नाही. परंतु त्यांच्या भाषणांतील कांही विधानं ठार चुकीचीं आहेत. वाडियांनी आपल्यापुढे एक दुष्ट अपसिद्धान्त मांडला आहे. तो आपण स्वीकारलेला मला सहन होणार नाही. जवळ जवळ पन्नास वर्षं हिंदुधर्माचा चिकित्सापूर्ण अभ्यास मी केलेला आहे. हिंदु धर्मावर माझं विलक्षण प्रेम आहे. तेव्हा हिंदु धर्माला उगाच कुणी दूषणं दिलीं तर तीं

मी कशीं सहन करूं ?" ... सर सी. पींच्या तोंडचीं हीं वाक्यं ऐकल्याबरोबर साऱ्या सभेनं कान टवकारले. सर सी. पीं.च्या झुंजार इंग्रजी वक्तृत्वाचा ओघ सुरू झाला.

त्यांच्या प्रतिपादनाचा मुख्य आशय असा होता, की "बुद्ध धर्माचा बडेजाव हिंदुस्थानांत दीर्घ काल राहूं शकला नाहीं याचं मुख्य कारण असं, की तो धर्म म्हणजे सनातनी हिंदु धर्माविरुद्ध पुकारलेलं एक बंड होतं, आणि हिंदु धर्माच्या विशाल उदरांत इतर बंडं ज्याप्रमाणे गडप झालीं त्याप्रमाणेच बुद्धाचा सुधारकी पंथहि गडप झाला ! बुद्धाच्या विचारसरणींत ज्या ज्या स्वीकारणीय अशा गोष्टी होत्या त्या त्या वैदिक हिंदु धर्मानं आत्मसात् केल्या. त्यामुळे एक मोठा स्वतंत्र धर्म या नात्यानं हिंदुस्थानांत बुद्ध धर्माला कायमचं स्थान मिळणं अशक्य झालं. यांत बुद्धाचा मोठेपणा भारतीयांना कळला नाही असं सिद्ध होत नसून, हिंदु धर्माची विशालता आणि सर्वसंग्राहकताच सिद्ध होते. यांत विषाद मानण्यासारखं काय आहे ? बुद्ध सुधारक होता. अनेक सुधारक होऊन गेले, त्यांतला एक होता. 'धर्मसंस्थापक' अशी किताबत वाडियासाहेब त्याला देतात ती कशाच्या आधारावर ? ..."

आपल्या एकेका विधानाच्या समर्थनार्थ सर सी. पी. गीता-उपनिषदांतले श्लोक आणि वाक्यं धडाधड म्हणून दाखवीत होते. एकेक प्रमाण पुढे मांडतांना त्यांच्या वक्तृत्वाची कमान चढत होती. इंग्रजी शब्दांच्या उच्चारांची ऐटबाज सफाई आणि वाक्यरचनेचं कौशल्य श्रोत्यांच्या अंतःकरणाला भिडत होतं. समयसूचकता, स्वतःच्या मताबद्दलची दृढ श्रद्धा, आणि प्रतिपक्षाला चारी मुंड्या चीत करण्याचं वकिली कसब, हे सारे गुण ठायीं ठायीं लकाकत होते. आणि या सर्वांवर कळस करणारा लढाऊ आवेश त्यांच्या बोलण्यांत भरलेला होता.. सर सी. पी. यांच्या इंग्रजी वक्तृत्वाचा अपूर्व विलास या प्रसंगीं मला बघायला सापडला !

* * *



# ७ : बंगालचे ' पाल ' व पंजाबचे ' लाल '

ज्या आठवणी मी सांगत आहे त्या अर्थातच ज्या मोठमोठ्या वक्त्यांचीं व्याख्यानं मी ऐकलीं त्यांच्या आहेत. त्या काळांतले असे कित्येक नामवंत वक्ते होऊन गेले, की ज्यांचं वक्तृत्व ऐकण्याची माझी संधि कांही ना कांही कारणानं चुकतच गेली.

म्हणून ज्यांचा निर्देश माझ्या लिहिण्यांत येणार नाही त्यांचा मोठेपणा मला मान्य नाही असं कुणी समजू नये. त्यांच्या वक्तृत्वाचा लाभ माझ्या दुर्दैवानं मला मिळाला नाही इतकंच समजायचं. त्याचप्रमाणे कांही बडेबडे गाजलेले वक्ते मी ऐकले आणि पाहिले ते फक्त एकदाच. अशा वक्त्यांच्या शैलीबद्दल थोडक्यांतच लिहिणं मला भाग आहे. लोकमान्य टिळक, शिवरामपंत परांजपे, तात्यासाहेब केळकर, सावरकर अशा ज्या वक्त्यांचीं भाषणं मी पुष्कळ ऐकलीं त्यांच्याबद्दल मी खूप विस्तारानं लिहिणार आहे. त्यांची बोलण्याची पद्धति, हावभाव, विचारसरणीचीं वैशिष्ट्यं, भाषेचा झोक इत्यादींचं सविस्तर विवेचन उदाहरणं देऊन करण्याचं मी योजिलं आहे. त्यांपैकी प्रत्येकाची मूर्ति विचारांच्या आणि लकबींच्या तपशिलासकट शब्दरूपांत उभी करण्याचा प्रयत्न मी करणार आहे. परंतु माझ्या लिहिण्यांत

मधूनच अशा एखाद्या वक्त्याचं वर्णन येईल, की ज्याचं एखादंच भाषण मी ऐकलं; आणि हें वर्णन अर्थातच त्रोटक असेल.

त्या काळांत लोकमान्य टिळक हे जरी हिंदी जहाल राजकारणाचे अनभिषिक्त राजे होते तरी त्यांच्या नांवाबरोबरच लोकांच्या तोंडांत भिजणारीं आणखी दोन नांवं होतीं. लाला लजपतराय हे पंजाबचे पुढारी होते, आणि बिपिनचंद्र पाल हे वंगभंगाच्या चळवळीमुळे प्रसिद्धीस आलेले एक बंगाली पुढारी होते. या दोघांची योग्यता टिळकांच्या बरोबरीची होती किंवा नव्हती याचा काटेकोर विचार न करता, 'लाल, बाल, पाल' या तीन नांवांत सहजासहजीं प्रास साधत होता म्हणून सामान्य जनता या तीन देशभक्तांचा एकत्र उल्लेख करीत असे. या तिघांपैकी टिळकांचीं भाषणं तर मी खूपच ऐकलीं. लाला लजपतराय यांच्याबद्दलहि मी यथावकाश लिहिणार आहे. बिपिनचंद्र पाल यांना मात्र मी एकदाच पाहिलं, आणि त्यांचं एकच इंग्रजी भाषण मी ऐकलं.

त्यांचं हें व्याख्यान त्या वेळच्या किर्लोस्कर थिएटरमध्ये झालं. गर्दी खूप होती. वंगभंग चळवळीच्या ऐन धामधुमींत बिपिनचंद्र पाल या नांवाभोवती लोकप्रियतेचं जें वलय होतं तें मधल्या कालांत विरून गेलं होतं, तरीदेखील एके काळीं देशाच्या कानाकोपऱ्यांत गाजलेले बिपिनचंद्र पाल कसे दिसतात तें पाहण्यासाठी आणि कसे बोलतात तें ऐकण्यासाठी पुण्याच्या नागरिकांनी थिएटरांत चांगली गर्दी केली होती.

बिपिनचंद्र पाल यांचं व्यक्तिमत्व अगदीच सामान्य वाटलं. त्यांची मूर्ति ठेंगणी, कपड्यांची तऱ्हा अगदीच साधी, वर्ण काळा, नीटस रेखीव नाकडोळ्यांच्या अभावीं मुद्रादेखील मामुली. व्याख्यान देण्यासाठी ते उभे राहिले तेव्हा त्यांना पाहिल्याबरोबर प्रेक्षक त्यांच्याकडे आकर्षित झाले असं मुळीच म्हणतां येणार नाही. राजकारणाच्या चळवळींत पडणारीं पुष्कळ माणसं मूळ शिक्षकाचा पेशा करणारीं आढळतात, आणि आपणहि मूळचे शिक्षकच होतों, असा उल्लेख त्यांनी प्रस्तावनेंत केला. या उल्लेखाला साजेसंच त्यांचं भाषण झालं. त्यांच्या व्याख्यानांत कल्पनेची भरारी कोठे दिसली नाही, उपमा-उत्प्रेक्षा अशा अलंकारांचा विलासहि त्यांच्या बोलण्यांत आढळला नाही. किंबहुना कित्येक हजारांच्या प्रचंड सभेला हेलावून सोडणारं जें तुफानी वक्तृत्व असतं त्याचा प्रत्यय पालबाबूंच्या भाषणांत त्या दिवशीं तरी

आला नाही. त्यांची विचारसरणी प्रभावी वाटली. वाक्यरचना ठाकठिकीची दिसली. इंग्रजी शब्दांचे उच्चार कित्येक ठिकाणीं कर्णकटु परंतु एकंदरीत परिणामकारी भासले. परंतु यापलीकडे वक्तृत्वाचा दीर्घकाळ लक्षांत राहण्यासारखा विलास दिसला नाही. एका वैशिष्ट्याचा मात्र उल्लेख जरूर करावयास हवा. तें वैशिष्ट्य म्हणजे पालबाबूंचा आवाज! त्यांची मूर्ति लहानखुरी असूनहि खालच्या पट्टींतल्या त्यांच्या ढाल्या आवाजाचा पल्ला खरोखरच श्रोत्यांना चकित करणारा होता.



'लाल बाल पाल' या त्रयीपैकीं 'पाल' यांचं जसं एकच व्याख्यान मी ऐकलं त्याप्रमाणेच 'लाल' म्हणजे लाला लजपतराय यांचंहि दर्शन मला एकदाच झालं, आणि त्यांचं व्याख्यान ऐकण्याचा योग एकदाच आला.

या थोर पुरुषाविषयी माझ्या मनांत गाढ आदराच्या भावना होत्या. हिंदी राजकारणाच्या क्षेत्रांतील बिपिनचंद्र पाल यांच्या कर्तृत्वाचे तपशील मला फारसे माहीत नव्हते. लाला लजपतराय यांच्याविषयी मात्र बरीच

माहिती मला होती. सरकारनं त्यांना तडकाफडकी हद्दपार केलं, तेव्हां त्यांच्या त्या हद्दपारीचं प्रकरण हिंदी वृत्तपत्रांत खूपच गाजलं होतं. गावोगाव निषेधाच्या सभा झाल्या होत्या. सरकारच्या दडपशाहीचा निषेध करणारीं भाषणं झालीं होतीं. लाला लजपतराय यांच्यावरील हद्दपारीचा हुकूम मागे घेण्यांत यावा अशी जोराची मागणी सर्व राजकीय पक्षांकडून झाली होती. सरकारनं अर्थातच लोकमताच्या या प्रक्षोभाला कांहीं किंमत दिली नव्हती. जहाल राष्ट्रीय चळवळीचा बीमोड करण्याचं सरकारनं ठरवलं होतं. हद्दपारीच्या या अन्याय्य शिक्षेमुळे लालाजींची लोकप्रियता मात्र एकदम वाढली होती. जनतेच्या हृदयसिंहासनावर त्यांच्या मूर्तीची स्थापना झाली होती.

हें सारं मला वाचून ऐकून माहित होतं. पुढें हद्दपारींतून सुटल्यावर लालाजी अमेरिकेंत गेले होते. तिकडील वास्तव्यांत हिंदी स्वातंत्र्याचा प्रचार त्यांनीं केला होता. देशसेवेचं व्रत आचरण्यांत त्यांनी खंड पडूं दिला नव्हता. याहि गोष्टी ऐकून व वाचून मला माहीत होत्या.

लालाजींचं दर्शन मला झालं तें या माहितीच्या, आणि या माहितीमुळे माझ्या मनांत उत्पन्न झालेल्या आदराच्या पार्श्वभूमीवर. आणि अशा परिस्थितींत, की सारा देश त्या वेळी दुःखांत बुडाला होता. आणि स्वतः लाला लजपतरायहि दुःखानं व्याकुळ झालेले होते.

अवघ्या दहाच दिवसांपूर्वीं लोकमान्य टिळकांचं निर्वाण घडलं होतं. साऱ्या भारतावर सुतकाची अवकळा पसरली होती. पुणें शहर तर शोकसागरांत बुडालं होतं. लालाजींचं आगमन पुण्यांत झालं तें कोणत्या कारणानं अगर निमित्तानं तें मला निश्चित आठवत नाही. परंतु त्या वेळची परिस्थिति अशी होती. दुःखाची, विचित्र निराशेची, खिन्न आणि गंभीर.

लालाजी उतरले होते गायकवाडवाड्यांतच सन्मान्य पाहुणे म्हणून. त्यांच्याशीं खाजगी विचारविनिमय करण्यासाठी स्थानिक कार्यकर्त्यांची एक छोटीशी सभा बोलावण्यांत आली होती ती माडीवरच्या त्या वेळच्या ग्रंथसंग्रहाच्या छोट्याशा हॉलमध्ये. या जागेंत बसल्यावर मला स्वतःला पूर्वीच्या कांही आठवणी होणं अपरिहार्य होतं. टिळकांच्या हयातींतच त्यांचं चरित्र लिहिण्याच्या माझ्या संकल्पाला टिळकांनी मान्यता दिली आणि " तुम्हांला

माझं चरित्र लिहायचं असेल तर आधी चिरोलसाहेब आणि माझे इतर शत्रू माझ्याविषयीं काय म्हणतात तें सर्व वाचून काढा " अशी सूचना देऊन त्यांनी मला टिपणं काढायला परवानगी दिली, तेव्हा याच हॉलमध्ये रोज येऊन मी 'केसरी' च्या जुन्या फायली आणि पुस्तकं वाचीत बसत असे. एखादे वेळेस टिळकांची फेरी इकडे होत असे. त्यांच्या अंगांत फक्त एक सदरा असे. सदऱ्याची गुंडी कधी लावलेली असे. बहुधा मोकळीच असे. डोक्यावरची शेंडी भुरुभुरु उडत असे. तोंडांत सुपारीचं खांड असे. त्यांची चाहूल लागली, की मी गोंधळून जात असे. आपण होऊन त्यांच्याशीं कांही बोलण्याची छातीच नसे. आपण वाचन करण्यांत अगदी गढून गेलों आहोंत असं नाटक करता करता माझी तारांबळ उडत असे. ते विचारीत असत, " काय, ठीक चाललंय का तुमचं काम ? " मी हो म्हणत असे. क्वचित् कांही शंका विचारीत असे. आणि त्या शंकेचं निरसन करण्यासाठी ते बोलूं लागत असत. इतक्या मोठ्या आवाजांत, की खालच्या रस्त्यानं जाणाऱ्या माणसांना वाटावं, माडीवर टिळकांचं व्याख्यान चाललं आहे. टिळक निघून गेले की माझा जीव भांड्यांत पडत असे.

आजदेखील गायकवाड वाड्यावरून जातांना त्या माडीकडे सहज नजर गेली, की डोकं उघडं, शेंडीचे केस हालताहेत, तोंडांत सुपारी, अंगांत फक्त एक साधा पातळ सदरा, अशा वेषांतली लोकमान्यांची मूर्ति मला दिसते . . . लाला लजपतराय यांच्याशीं विचारविनिमय करण्याकरिता बोलाविण्यांत आलेल्या सभेस मी जाऊन बसलों तेव्हा तर त्या जागेंत कितीकदा बघितलेले टिळक मला स्पष्ट दिसूं लागले. माझ्याप्रमाणे इतर माणसांच्याहि मनांत टिळकांच्या आठवणी जाग्या झाल्या असतील. लोकमान्य टिळक काळाच्या पडद्याआड कायमचे गेले, आता ते आपल्यांत कधी असणार नाहीत, आपल्याला कधी दिसणार नाहीत अशी मनाची समजूत घालणं फार कठीण होतं. लालाजींनादेखील तें कठीण वाटत होतं असं त्यांची चर्या स्पष्ट सांगत होती. चर्चेसाठी आलेली मंडळी प्रश्न विचारीत होती. लालाजी उत्तर देत होते. कधी थोडक्यांत, कधी विस्तारानं. टिळक गेले, आता पुढे कसं करायचं, हाच विषय मुख्यतः चालला होता. गांधींनी आपल्या असहकारितेच्या चळवळीचं शिंग फुंकलं होतं. देशांतील मवाळ पक्ष त्या चळवळीपासून अलिप्त राहणार हें

उघड होतं. पण राष्ट्रीय जहाल पक्षांतील एकूणएक पुढाऱ्यांनी साऱ्या शंकाकुशंका दूर ठेवून गांधींना पाठिंबा द्यायचा की काय करायचं याबद्दल मोठंच प्रश्नचिन्ह साऱ्यांच्यापुढे उभं होतं. याबद्दलचे लालाजींचे विचार लोकांना हवे होते, आणि लालाजी ते सांगत होते. मी त्यांच्याकडे पोटभर पाहून घेत होतों ... त्यांच्या वक्तृत्वाची तऱ्हा कशी असेल याचा अदमास करीत होतों ... कारण त्या दिवशीं संध्याकाळीं त्यांचं जाहीर व्याख्यान मला ऐकायला मिळणार होतं.

टिळकांच्या दहाव्या दिवसानिमित्त भरलेली पुण्याच्या नागरिकांची ती प्रचंड शोकसभा सध्या ज्याला फुले मार्केट म्हणतात, आणि त्या काळांत जें ' रे मार्केट ' म्हणून ओळखलं जात असे, त्याच्या मागच्या आवारांत भरली होती. लाला लजपतराय सभेचे अध्यक्ष होते. ते भाषण करायला उभे राहिले तेव्हां आधीच स्तब्ध असलेली ती सभा आणखीच स्तब्ध झाली. हजारो माणसांचे डोळे लालाजींकडे लागले. हजारोंचे कान त्यांच्या तोंडांतून बाहेर पडणाऱ्या पहिल्या शब्दासाठी उत्सुक झाले. लाला लजपतरायांची देहयष्टि कांही धिप्पाड नव्हती. परंतु कांही झालं तरी ते पंजाबी होते. त्यांची मूर्ति एकदम डोळ्यांत भरावी अशी उंच आणि मजबूत होती. पोटऱ्यांवर तंग बसणारी सुरवार, खमीस, कोट, आणि डोक्याला पंजाबी थाटाचा फेटा अशा पांढऱ्या शुभ्र पोषाखांतील लालाजी किंचित् थकल्यासारखे त्या घटकेला भासले. सकाळच्या चर्चासभेंत त्यांची मुद्रा बघतांना जें साम्य मला भासलं होतं त्याची आठवण मला तीव्रपणें झाली. नटवर्य गणपतराव जोशी आणि लालाजी यांच्यातलं साम्य मला कांही केल्या मनावेगळं करतां येईना. मी पाहत होतो लालाजींकडे, आणि वाटत होतं गणपतराव जोशीच मला दिसताहेत. तीच ती उभं राहण्याची तऱ्हा ! तोच तो मुद्रेवरील आविर्भाव ! तेच ते मोठे टपोरे डोळे ! आणि त्या डोळ्यांची तीच किंचित् अंतर्मुख आणि धुंद नजर !

आधीच लालाजी जन्मसिद्ध वक्ते, आणि त्यांतून टिळकांच्या दहाव्या दिवसानिमित्त भरलेल्या शोकसभेचा प्रसंग. उत्कृष्ट भावपूर्ण वाणी, विचारांचा ओघ, श्रोत्यांच्या अंतःकरणाचा ठाव घेणारीं वेचक, वेधक वाक्यं, आवाजांतील चढउतार, मधेच एकेका वाक्यापुढे उठणारा प्रश्नोद्गार, असं

सर्व वक्तृत्वगुणांनी नटलेलं लालाजींचं तें व्याख्यान ज्यांनी ऐकलं त्यांच्या स्मरणांतून तें कदापि जाणार नाही. ते पुण्याच्या लोकांना उद्देशून म्हणाले, “ तुमचं सांत्वन प्रत्यक्ष परमेश्वरालाहि करता येणार नाही. ” ज्या वेळीं देशाला टिळकांची अत्यंत गरज होती अशा वेळेस ते स्वर्गवासी झाले. या घटनेचं इतकं दुःख लालाजींना झालं होतं, की त्या भरांत ते म्हणाले, “ माझा हा मायदेश अत्यंत अभागी आहे ! माझी सारी उमर चळवळींत गेली. पण या देशांत इतके धर्म, इतके पंथ, इतक्या जाती, इतके पक्ष आहेत, की आपल्याला कधी सुखाचे दिवस येतील की नाही अशा शंकेनं माझं अंतःकरण अनेकदा विदीर्ण होतं ! ”

* * *



# ८ : भालाकार ! आणि संदेशकार !

दादासाहेब खापर्ड्यांच्या व्याख्यानांत विनोद, उपहास, रेशमी चिमटे, संस्कृत सुभाषितं अशा मसाल्याची रेलचेल असल्यामुळे त्यांच्या वक्तृत्वांत एक अपूर्व खमंगपणा असे.

पण तरीसुद्धा श्रोत्यांना खदखदून हंसायला लावणारा त्या काळांतला पट्टीचा वक्ता कोणता, या प्रश्नाचं उत्तर म्हणून दादासाहेबांचं नांव प्रथम घ्यावंसं वाटणार नाही. दुसरींच दोन नांवं सुचतील. एक भालाकार भोपटकर यांचं, आणि दुसरं अच्युतराव कोल्हटकरांचं. टिळकांच्या जहाल राष्ट्रीय चळवळीच्या प्रारंभीच्या दिवसांत त्यांच्याभोवती जमलेल्या तरुण मंडळींत दोन भोपटकर होते. अण्णासाहेब धाकटे बंधु, आणि भास्कर बळवंत थोरले. दोघेहि चांगल्यापैकी वक्ते. वक्तृत्वाची शैली मात्र दोघांची वेगवेगळी, आणि दोघांच्या प्रवृत्तीहि भिन्न भिन्न. अण्णासाहेब तरुणपणी निष्णात क्रिकेटर होते. पी. वाय. सी. च्या क्रिकेट टीमचे ते एक आधारस्तंभ होते. विकेट-कीपरचं काम ते मोठ्या पटाईतपणानं करीत. कितीक मोठ्या सामन्यांत खेळतांना त्यांना ज्यांनी पाहिलं अशीं कांही माणसं अजून आढळतील. राजकारणाच्या चळवळीच दुय्यम दर्जाचं का होईना पुढारीपण त्यांच्याकडे आल्यावर त्यांनी क्रिकेटचा छंद सोडला. परंतु तो सोडीपर्यंत पी. वाय. सी.

जिमखान्यावर त्यांची रोज हजेरी लागायची. भास्कर बळवंत हेहि रोज यायचे, परंतु ते खेळायसाठी नव्हे, तर गप्पा ठोकायसाठी. त्यांच्या गप्पा म्हणजे दिवाकरांची एकेक नाट्यछटाच असे. 'हल्लीची कॉलेजांतली तरुण पोरं खेळत नाहीत, व्यायाम घेत नाहीत, पोहत नाहीत, कुस्ती करीत नाहीत, क्लबावर येऊन नुसता चहा ढोसतात, पाव खातात'—अशा मजकुराच जंगी व्याख्यान ते झोडायचे, आणि समारोपादाखल जिमखान्याचा नोकर भागू याला हाक मारून म्हणायचे, "अरे भागू! चहा दे ना मला! आणि चहा-बरोबर मस्का लावलेला छानपैकी टोस्टहि हवा बरं का!" भास्कर बळवंतांचं व्याख्यान ऐकत भागू व्हरांड्याच्या खांबाला इतका वेळ टेकून उभा असायचा. "होय साहेब" म्हणून तो धावायचा आणि थोड्या वेळानं भास्कर बळवंतांचा रोजचा आवडता रतीब त्यांच्यापुढे आणून ठेवायचा. मग लोणी लावलेल्या टोस्टचे घास आणि चहाचे घोट घेता घेता भास्कर बळवंतांचं दुसऱ्या एखाद्या विषयावर असंच खमंग व्याख्यान सुरू व्हायचं...बैठक आटोपण्याची लहर आली, की भास्कर बळवंत उठायचे. त्यांनी एक मोठा 'हरिकेन लॅंटर्न' बरोबर आणलेला असायचा. म्युनिसिपॅलिटीच्या दिवाबत्तीवर त्यांचा विश्वास नव्हता. एखाद्या नाटकाला ते गेले तरी हा कदील ते बरोबर घेऊन जायचे!

'भाला' या नांवाचं वृत्तपत्र ते चालवीत असत म्हणून त्यांना 'भालाकार भोपटकर' या नांवानं लोक ओळखीत असत. अण्णासाहेबांना जसं पुढारीपण मिळालं, तसं 'भालाकारां'ना मिळालं नाही. लोकसंग्रह करणं आणि तो टिकविणं यासाठी लागणारे गुण त्यांच्या ठिकाणीं नव्हतेच. कोणत्याहि पक्षाचा मिंधेपणा पतकरण्याचा त्यांचा स्वभाव नव्हता. त्यांच्या विचारसरणींत नेहमी तिरकसपणा असे; आणि फटकळ शिवराळपणाच्या हद्दीवर घोटाळणारा स्पष्टवक्तेपणा म्हणजे तर त्यांच्या रक्तांत भिनलेला प्रमुख गुण होता. मग त्यांच्याकडे पुढारीपण यायचं कसं? त्यांच्या पक्षाचे तेच एकमेव पुढारी होते, आणि तेच एकमेव अनुयायी होते!

'भालाकारां' ना अनुयायी नव्हते, परंतु त्यांच्या लिहिण्या-बोलण्याच्या चाहत्यांची संख्या फार मोठी होती. सार्वजनिक क्षेत्रांत त्यांना पुढारी म्हणून कोणीच मानलं नाही. परंतु एक विचित्र व्यक्ति म्हणून लोकांत त्यांच्याविषयी कुतूहल फार मोठं होतं. 'भाला' पत्रांत व्यक्त होणारे त्यांचे

विचार मोठ्या तोलाचे कुणीच समजत नसत. परंतु 'भाला' पत्र आवडीनं आणि उत्सुकतेनं वाचणाऱ्या लोकांची संख्या मोठी होती. वकिलीचा खाजगी वर्ग ते चालवीत असत, आणि उत्कृष्ट अध्यापक म्हणून त्यांची ख्याति होती. वकिली आणि क्लास या दोन उद्योगांवर त्यांचा योगक्षेम उत्तम चालत असे. आणि त्यामुळे तोट्यांत चालणाऱ्या वृत्तपत्राची हौस ते भागवूं शकत असत. कुणाच्या चार दिडक्या त्यांना नको होत्या. निस्पृहपणा त्यांना परवडत होता. एकांडेपणा त्यांना मानवत होता. ते कुणाचे मिंधे नव्हते. त्यांची लेखणी आणि वाणी जबरदस्त होती. सैलसर बोंगा कोट, रेशीमकाठी उपरण्याची घडी खांद्यावरून आडवी टाकलेली, डोक्यावर तिरपागडी टोपी घट्ट बसविलेली, डाव्या काखेंत छत्री संभाळलेली, अशा थाटांतले, किंचित् पोक काढून, पायांतला पुणेरी जोडा चरचर वाजवीत, रस्त्याच्या कडेनं जाणारे भालाकार भोपटकर म्हणजे लोकांच्या कुतूहलाचा एक विषय होता.

त्यांच्याविषयीच्या या कुतूहलामुळेच त्यांच्या व्याख्यानाला गर्दी होत असे, आणि गर्दी करणाऱ्या श्रोत्यांच्या अपेक्षा ते अगदी शिगोशीग पुऱ्या करीत असत. आचार्य अत्र्यांचे जे अनेक बढाईखोर दावे आहेत त्यांतला एक असा आहे, की त्यांनी महाराष्ट्राला हसायला शिकवलं. महाराष्ट्र मूळचा लांबट आंबट तोंडाचा, गंभीर वृत्तीचा आणि हास्यदरिद्री होता. त्याला कसं हसावं तें कळूं लागलं तें अत्र्यांचीं तमाशेवजा प्रहसनं बघून. शाळेंतल्या पोरासोरांना हा दावा कदाचित् खरा वाटेलहि ; परंतु जुने जाणते लोक अत्र्यांना हटकतील आणि म्हणतील, 'माफ करा महाराज, तुमची मुंजहि झाली नव्हती तेव्हापासून—नव्हे, त्यापूर्वीपासूनहि—महाराष्ट्राला पोट धरधरून हसविणारे वक्ते झालेले आहेत. व्याख्यानाच्या रिपोर्टांत 'हशा—टाळ्यां' चे कंस छापण्याची टूम भालाकार भोपटकरांच्या काळांत नव्हती. परंतु त्यांच्या व्याख्यानांत हशा-टाळ्यांचं पीक रगड येत असे.'

व्याख्यानासाठी उभं राहून, खांदे झटकून, खालचा जबडा व जाड ओठ पुढे करून, एखाद्या मारक्या म्हशीप्रमाणे भालाकार चष्म्यांतून श्रोत्यांकडे बघूं लागल्याबरोबरच श्रोत्यांना हसण्याची उकळी फुटूं लागत असे. मग जाड्या-भरड्या आवाजांत, खांदे हिसकीत, हातांचे विचित्र विक्षेप करीत, स्वमत-प्रतिपादनासाठी आणि प्रतिपक्षाच्या खंडणासाठी विनोदाच्या आणि उपहासाच्या

फैरी भालाकार झाडूं लागले, की श्रोत्यांना हसून हसून पुरेवाट होत असे.

नवे नवे अर्थपूर्ण शब्द बनविण्यांत भालाकारांचा हातखंडा होता. भक्तिमार्गी आणि कर्ममार्गी, निवृत्तिपर आणि प्रवृत्तिपर अशा दोन पंथांतील भेद आणि विरोध व्यक्त करण्यासाठी 'वारकरी' आणि 'धारकरी' अशीं दोन नवीन नांवं त्यांनी काढलीं, तीं अत्यंत लोकप्रिय झालीं. कितीदा तरी व्याख्यानाच्या ओघांत भालाकारांना असे नवे नवे रोचक चटकदार शब्द सुचत असत, आणि त्यामुळें वक्तृत्वाची खुलावट वाढत असे. गांधींच्या अनुयायांचा उल्लेख 'गांधाळ' या शब्दानं ते करीत असत. अगदी पहिल्यापासून गांधींना कडक विरोध करणारा, गांधींच्या मतांची आणि पंथाची टर उडविणारा, लोकमान्य टिळकांच्या प्रतियोग सहकारितेचा पाठपुरावा करणारा हा एकच गृहस्थ होता. ज्या काळांत बाकीचे छोटेमोठे महाराष्ट्रीय पुढारी–कुणी प्रामाणिकपणानं, कुणी लोकमताच्या भयानं, कुणी 'पाहूं गांधींचा प्रयोग कांही दिवस करून' अशा धूर्त हिशेबानं–कोट, उपरणं, पगडी टाकून गांधी टोपी घालूं लागले होते, त्या काळांत हा एकटाच गृहस्थ गांधींच्या राजकारणाची यथेच्छ हजेरी घेत होता ! चालू लोकमताला न भिता, लोकांनी केलेल्या टवाळीची पर्वा न करता, ठणकावून बजावीत होता, की " गांधी बनिया आहे ! त्याला राजकारणांतलं कांही कळत नाही ! आज त्याच्या नादी लागतांना तुम्हांला बरं वाटतंय, पण उद्या पस्तावण्याची वेळ येईल. गांधाळ राजकारणाचा बोऱ्या वाजेल ! हा भालाकार भोपटकर तुम्हांला सांगतो आहे, लक्षांत घ्या. त्याचं भविष्य खोटं होणार नाही ! " अण्णासाहेब भोपटकर असहकारितेच्या चळवळींत सामील झाले होते. त्यांचीदेखील रेवडी उडवायला भालाकार कमी करीत नसत, आणि " आमचा हा अण्णा ! गेलाय गांधीच्या पक्षांत ! हुरळली मेंढी, चालली खाटकाच्या मागे ! " असा प्रारंभ त्यांनी केला, की लोक हशा टाळ्यांची जंगी सलामी देऊन कान टवकावरून ऐकूं लागत.

गांधींची अहिंसा जशी भालाकारांना नामंजूर होती त्याप्रमाणेच हिंदु-मुसलमानांची एकी घडवून आणण्याची गांधींची भाषा त्यांना खुळेपणाची वाटत असे. याबद्दल ते बोलूं लागले, की त्यांच्या रसवंतीचा विलास अगदी ऐन भरांत येत असे. ते म्हणत, " अरे, हिंदु आणि मुसलमान हे भाऊ भाऊ होणं कधी तरी शक्य आहे का ? आम्ही राखणार डोक्याला शेंडी, मुसलमान राखणार

हनुवटीला दाढी ! आम्हांला पवित्र गाय, यांना पवित्र डुक्कर ! आम्ही मूर्तिपूजक, हे मूर्तिभंजक ! आम्ही लिहिणार डावीकडून उजवीकडे, हे लिहिणार उजवीकडून डावीकडे ! आमचा परमेश्वर राम, तर यांचा बिसमिल्ला ! आम्ही करणार मुंज, तर हे करणार सुंता ! आमचं पक्वान्न श्रीखंडपुरी, यांना पाहिजे बिर्याणी ! अरे, यांचं आणि आमचं जमायचं कसं ? ब्रह्मदेवानं बेकी लिहिली, तिथे एकी व्हायची कशी ? गांधी नव्हे ब्रह्मदेव अवतरला तरी हिंदु-मुसलमानांचं ऐक्य होणं अशक्य आहे. गांधी थापा मारतो, आणि तुम्हांला त्या खऱ्या वाटतात. पण हा भालाकार भोपटकर काय सांगतोय तें लक्षांत ठेवा ! ”

अशा थाटांत त्यांचं व्याख्यान व्हायचं. त्यांच्या लिहिण्याप्रमाणेच बोलण्याचाहि गंभीर विचार कुणीच करीत नसे. पोटभर हसावं एवढ्याच इच्छेनं लोक त्यांच्या व्याख्यानाला गर्दी करीत असत. त्यांची इच्छा शंभर टक्के पुरी होत असे.



अच्युत बळवंत कोल्हटकर कांहीसे याच जातीचे, परंतु थोडेसे वेगळे वक्ते होते. विनोद आणि उपहास हीच त्यांच्याहि लिहिण्याबोलण्याचीं मुख्य शस्त्रं होतीं. परंतु कोल्हटकर आणि भोपटकर यांच्यांतलं साम्य इथेच सपत होतं. कोल्हटकरांची भाषाशैली वेगळी, विचारांचा आविर्भाव वेगळा, आणि शिवाय राजकारणांतली त्यांची तपश्चर्या

नुसती निराळीच नव्हे तर श्रेष्ठ कोटींतली होती. मालाकार बासुंदीपुरी खाऊन राजकारण बोलणारे होते. कोल्हटकरांनी देशभक्तीची जबर किंमत खडतर तुरुंगवासाच्या रूपानं दिली होती. मालाकारांना पक्ष नव्हता, अच्युतराव कोल्हटकर टिळकपक्षाचे प्रभावी प्रचारक होते. टिळकांच्या मतांचा आणि त्यांच्या राजकारणाचा जोराचा प्रचार हा अच्युतरावांच्या ‘ संदेश ’ पत्राचा स्थायी भाव होता. आयुष्याच्या अखेरीस अच्युतराव बदलले. त्यांचा ‘संदेश’हि अस्तंगत झाला. परंतु १९१६ च्या सुमाराचा दहा वर्षांचा काळ म्हणजे अच्युतरावांच्या कमाल लोकप्रियतेचा काळ होता. साऱ्या महाराष्ट्रांत घरोघर ‘ संदेश ’ वाचला जात होता. आणि महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यांत अच्युतरावांचे भक्त पसरले होते. ज्याला इंग्रजींत Picturesque म्हणतात तसं रंगीबेरंगी व्यक्तिमत्त्व अच्युतरावांच्या ठिकाणीं होतं. खो खो खो करून मोठ्यांदा खिदळल्याप्रमाणे हसणारा त्यांच्यासारखा दुसरा साहित्यिक, संपादक, अगर पुढारी मी पाहिलेला नाही. त्यांच्या राहत्या जागेंत सतत माणसांची बैठक पडलेली असायची, आणि आवेशयुक्त बोलणीं व सातसात मजली हसणीं यांनी ती बैठक रंगलेली असायची. जेवणाच्या वेळेस जेवढीं माणसं गाठीभेटीसाठी आलीं असतील तेवढीं सगळीं पंगतीला बसायचीं, आणि जेवण व्हायचं तें देखील उंच स्वरांतलीं बोलणीं आणि खिदळून हसणीं यांत खंड न पडता ! खरोखर मराठी वृत्तपत्रीय लेखनाला नवंच वळण देणारा एक कर्तबगार लेखक आणि संपादक म्हणून कांही वर्षे अ. ब. कोल्हटकरांनी लोकप्रियतेचा झगझगीत मुकुट धारण केला होता !

या काळांत एक जबरदस्त वक्ते म्हणूनहि ते गाजले. अच्युतरावाच्या लेखणीप्रमाणेच त्यांच्या वाणीवरहि लोक फिदा होते. पायांत स्लिपर आणि पायमोजे, बंगाली पद्धतीचं वाटावं अशा तऱ्हेचं घोळदार धोतर, काळ्या पांढऱ्या केसांनी तुरळक झाकलेलं शिरस्त्राणावाचून उघडं डोकं, मिशा बोडलेल्या, अशा थाटांतले, उण्यापुऱ्या उंचीचे, धिप्पाड बांध्याचे अच्युतराव व्यासपीठावर उभे राहिल्यावर श्रोत्यांचं लक्ष त्यांच्याकडे वेधलं जात असे. त्यांच्या आवाजांत गोडव्याची धार बिलकुल नव्हती. परंतु आवाज मोठा आणि पल्लेदार होता. एखाद्या नटाप्रमाणे हातांतल्या रुमालानं तोंड टिपीत टिपीत मिष्किलपणानं हसत हसत बोलण्याची त्यांची लकब होती. त्यांचा

वाक्प्रवाह मोठासा ओघदार नसे. किंचित् अडखळतचत ते बोलत असत. परंतु शब्दयोजना मार्मिक असे, मधूनच डौलदार वाक्यांची रचना होत असे, आणि विनोदाची व उपहासाची झालर सारखीच चमचमत असे. कधी कधी व्याख्यानाचा थाट वरकरणी दिसायला विनोदी परंतु गंभीर विचारांत नटलेला असे, एकदा नूतन आर्यभूषण थिएटरांत भरलेल्या नाट्यसंमेलनांत भाषण करतांना "नमन नटवरा, विस्मयकारा" या खाडिलकरांच्या एका पदाच्या पहिल्या चरणाचा मोठा अभिनयपूर्ण उच्चार अच्युतरावांनी प्रारंभींच केला; आणि नंतर नटाच्या ठिकाणी कोणकोणते आश्चर्यकारक गुण ( आणि अवगुणहि ! ) असतात त्याचं अत्यंत मार्मिक वर्णन करून, आणि अखेर "नमन नटवरा विस्मयकारा" असं पुन्हा एकदा म्हणून त्यांनी आपलं भाषण संपविलं, तेव्हा टाळ्यांचा प्रचंड कडकडाट झाला.

दुसऱ्या एका प्रसंगीं गणपति उत्सवांतल्या त्यांच्या एका व्याख्यानाला नाट्याचार्य खाडिलकर अध्यक्ष होते. अच्युतरावांनी व्याख्यानाच्या आरंभीं खाडिलकरांच्या किलकिल्या डोळ्यांपासून सुरुवात करून त्यांची मूर्ति प्रत्यक्ष गजाननासारखी कशी आहे त्याचं इतकं कांही सुंदर रसभरित वर्णन केलं, की लोकांची तर हसून हसून मुरकुंडी वळलीच, परंतु हसण्याच्या बाबतींत कृपणपणा करणाऱ्या नाट्याचार्यांनादेखील उपरण्याच्या टोकानं तोंड झाकणं भाग पडलं ! अच्युतरावांची अशीं किती तरी खमंग चटकदार भाषणं माझ्या स्मरणांत अजून आहेत.

* * *



# ९ : नाट्याचार्य खाडिलकर

खाडिलकर आणि केळकर म्हणजे टिळकांचे उजवे हातच ! दोघांचीहि साहित्याच्या क्षेत्रांतली कामगिरी फार मोठ्या योग्यतेची म्हणायला हवी.

परंतु या दोघांच्या वृत्ती आणि मनोरचना इतक्या भिन्न होत्या, की या दोन शक्ती लोकमान्यांनीं संभाळल्या, आणि 'केसरी'च्या व राष्ट्रीय चळवळीच्या कामीं त्यांचा उपयोग करून घेतला, हा टिळकांच्या लोकसंग्रह-चातुर्याचा एक चमत्कारच म्हणावा लागेल. केळकर अधिक मोठे की खाडिलकर अधिक मोठे, या वादाचा निकाल लावणं कठिण आहे. लोकमान्यांचा विश्वास केळकरांवर अधिक होता की खाडिलकरांवर या प्रश्नाचं निर्णायक उत्तर देणंहि कठिण जाईल. खाडिलकरांना 'केसरी' सोडून जावं लागलं, आणि केळकरांना मात्र, त्यांच्या स्वतःच्याच शब्दांत सांगायचं झालं तर— 'अधिकारयोग' लाभला, या एकाच पुराव्यावरून टिळकांना खाडिलकरांपेक्षा केळकरांविषयी अधिक ममत्व वाटत होतं असा निष्कर्ष काढणं चुकीचं ठरेल.

खाडिलकर आणि केळकर यांची तुलना करून श्रेष्ठ कोण, कनिष्ठ कोण हें

ठरवीत बसण्यापेक्षां त्यांची भिन्न भिन्न वैशिष्ट्यं पाहणं अधिक मनोरंजक आणि उपयुक्त ठरेल. केळकरांच्याइतकं चौफेर वाचन खाडिलकरांनी केलं असेल असं वाटत नाही. उलट स्वतंत्र चिकित्सक चिंतनाची खाडिलकरांची हौस व शक्ति केळकरांच्या ठिकाणीं होती असं म्हणता येणार नाही. केळकर प्रचंड वाचक होते, खाडिलकर गाढ चिंतनाचे भोक्ते होते. केळकरांच्या बुद्धीचा संचार आडव्या रेषेंतला होता. ग्रंथांच्या संख्येवर त्यांची झेप होती. उलट खाडिलकरांच्या बुद्धीचा संचार उभ्या रेषेंतला होता. वाचायचं थोडंच, परंतु जें वाचायचं त्याचा खोल ठाव घेण्याकडे त्यांचा कल होता. केळकरांइतकं सपाटेबंद ग्रंथवाचन खाडिलकरांना जमण्यासारखं नव्हतं. उलट खाडिलकरांची चिंतनशीलता केळकरांना झेपण्यासारखी नव्हती. या दोघांनाहि मला थोडं फार जवळून पाहायला मिळालं. आणि माझ्या मनाला पटलेली भिन्नता एवढ्याचसाठीं सांगितली, कीं दोघांतल्या या फरकाचा प्रत्यय दोघांच्या वक्तृत्वाच्या तऱ्हेंत आल्यावाचून राहत नसे.

१९०८ नंतरच्या आठ दहा वर्षांपुरतं बोलायचं झालं तर त्या काळांत केळकरांची वक्ता म्हणून प्रसिद्धि नव्हती. केळकरांचं व्याख्यान कुठे झालं आणि “ चला केळकरांचं व्याख्यान आहे ” असं म्हणून लोक धावले, असा प्रकार घडलेला मला आठवत नाही. केळकरांनी स्वतःच प्रांजल कबुली दिलेली आहे, की “ प्रारंभीं मला लिहितांहि येत नव्हतं, बोलतांहि येत नव्हतं. दोन्ही गोष्टी मी प्रयत्नानं शिकलों. ” वक्तृत्वाची कला मूळची अंगीं नसतांना प्रयत्नानं कशी साध्य करता येते याचं उदाहरण म्हणून केळकरांचा दाखला उपयुक्त ठरण्यासारखा आहे. कारण केळकरांनी स्वतःची म्हणून एक स्वतंत्र व्याख्यानशैली निर्माण केली, व या शैलींत उत्तरोत्तर अधिकाधिक पारंगतता त्यांनी संपादन केली. शेवटी शेवटी ते हमखास चांगलं बोलूं लागले. विशेष जमलेलीं अशीं त्यांचीं कांही व्याख्यानं मला आठवतात. परंतु या आठवणी १९२० च्या सुमाराच्या किंवा त्यानंतरच्या. त्याअगोदरच्या दहा वर्षांत ‘ वक्ते केळकर ’ लोकांना माहीत नव्हते. त्यांच्या लेखनाची मोहिनी ‘ केसरी ’ च्या वाचकांना वाटूं लागली होती. परंतु त्यांना कंठ फुटला नव्हता !

खाडिलकर मात्र नाणावलेल्या वक्त्याच्या भूमिकेंत केव्हापासून तरी

वावरूं लागले होते. गणपति उत्सवांत गाजणाऱ्या व्याख्यानांत खाडिलकरांच्या व्याख्यानांची गणना अवश्य होत असे. त्यांच्या व्याख्यानांचे विषय गंभीर असत. राजकारणावर तर ते बोलत असतच, परंतु शिवाय धार्मिक आणि वेदान्तपर विषयांची रुचि त्यांना अधिक होती. हलकाफुलका विषय घ्यावा, विनोदी कोटयांनी तो सजवावा, सभेंत हशाटाळ्या माजवाव्या, अशा इच्छेच्या पातळीवरून त्यांचं व्याख्यान झालेलं मी तरी ऐकलं नाही.

त्यांना विनोदाचं, हास्याचं, रंगेलपणाचं वावडं होतं असं कसं म्हणता येईल ? या गोष्टींच्या त्यांच्या आवडीचे हवे तेवढे पुरावे त्यांच्या नाट्यकृतींतून काढून दाखविता येतील. शालू नेसून " आता मी कशी दिसते ? " असं विचाणाऱ्या भामिनीला " तो नेसतांनाच तूं अधिक चांगली दिसत होतीस ! " असं उत्तर धैर्यधराच्या तोंडीं लिहिणारे खाडिलकर रंगेल नव्हते असं कसं म्हणता येईल ? ' चंद्रिका ही जणूं ठेवि या स्नेहे कमलांगाणि ' हें अतिमनोहर पद्य लिहिणाऱ्या खाडिलकरांच्या कवित्वाची व कल्पनाशक्तीची शंका कोण घेऊं शकेल ? परंतु नाट्यकृतींत वैपुल्यानं दिसणारे रंगेल खाडिलकर एरवीं सहसा दृष्टीस पडत नसत. समवयस्क मित्रमंडळींत त्यांच्या स्वभावांतली ही मिष्किल रंगेल बाजू प्रकट होत असेलहि. किंवा नाटकाच्या तालमी त्यांच्याजवळून ज्यांनी घेतल्या असतील त्यांना त्यांची ही बाजू दिसली असेलहि. जे खाडिलकर व्यासपीठावर दिसत ते वेगळे होते.

त्यांच्या स्वभावाला तापटपणाचा जसा पदर होता तसाच मार्दवाचाहि होता. पण संतापानं बोलतांना त्यांच्या आवाजाची पट्टी चढत असे, आणि मृदु बोलतांनासुद्धा हळू आवाजांत गुलगुलित बोलणं त्यांना माहीत नसावं. लोकमान्य टिळकांच्या एकंदर संप्रदायालाच हळू बोलणं माहीत नव्हतं की काय कुणास ठाऊक ? कुणाशीं तरी भांडल्याप्रमाणे बोलण्याच्या टिळकांच्या तऱ्हेची एक आठवण सांगतात ती अशी, की जहाल पक्षांतल्या छोट्या मोठ्या पुढाऱ्यांनी मिळून एक नाट्यप्रयोग करावा अशी कल्पना उगाच शिळोप्याच्या गप्पा म्हणून एकदा निघाली, आणि कुणी कोणकोणती भूमिका करावी याची यादी होऊं लागली. तेव्हा टिळकांनी विचारलं, " मला कोणता पार्ट द्याल ? " यावर कुणी तरी उत्तर दिलं, " तुम्हांला पार्ट देण्याची सोयच नाही. कारण तुमचं आत्मगत भाषणसुद्धां थिएटराच्या बाहेर उभं राहून लोकांना ऐकायला

मिळणार. मग पैसे देऊन तिकीट काढून आंत कोण येणार ?" खाडिलकरांच्या खासगी बोलण्याचीसुद्धा तऱ्हा हीच होती. आणि शिवाय साध्या संभाषणांतसुद्धा एकेक मुद्दा पिंजून सांगण्याची त्यांना हौस ! 'अल्ला हो अकबर' ही माझी पहिली कादंबरी त्यांना वाचून दाखविण्याचं धाडस मी केलं, त्या वेळीं माझ्या कादंबरीलेखनांतले गुणदोष सांगताना त्यांच्या लिहिण्याच्या माडींत येरझारा घालीत उंच आवाजांत ते इतका वेळ बोलले, की जणुं एखाद्या सभेपुढे त्यांचं जाहीर व्याख्यानच चाललं होतं. कित्येक वेळा असं होतं असे, की नाट्याचार्यांचा पुतण्या दादा आणि मी त्यांच्या राहत्या घराच्या खालच्या माजघरांत अभ्यास करीत किंवा गप्पा मारीत बसलों असतांना वर बालगंधर्व काकासाहेबांकडे आलेले असायचे, आणि नाटक कंपनीच्या मालकानं कोणतीं धोरणं कशीं संभाळावींत याबद्दलचा उपदेश बालगंधर्वांना करण्यासाठी काकासाहेब इतक्या उंच आवाजांत बोलत असायचे, की आम्हांला नाटक कंपनी काढायची असती तर आम्हांला तो उपदेश उपयोगी पडला असता.

मग जाहीर व्याख्यानांत खाडिलकर कोणत्या पद्धतीं बोलत असतील याची कल्पना करा. त्यांच्या नाटकांतल्या पात्रांना ओरडून, शिरा ताणून बोलण्याची सक्त तालीम घ्यावी लागल्यामुळें—एक बालगंधर्वांचा अपवाद सोडून—सगळ्यांचे बिचाऱ्यांचे आवाज फुटले ते उगीच नव्हे ! ऐतिहासिक नाटकांतल्या त्यांच्या पात्रांप्रमाणे खाडिलकर जाहीर व्याख्यानांत तणतणून बोलायचे. त्यांच्या आवाजाला रुंदी नव्हती, बोजा नव्हता, गोलपणा मुळीसुद्धा नव्हता. कितीदा तरी त्यांचा आवाज फाटायचा. परंतु आवाज फाटतो, चिरतो याची किंचित्‌देखील फिकीर न करता त्यांचं कर्कश ओरडणं चालू राह्यचं. साधं धोतर, वर साधा पांढरा लांब कोट, गळ्याभोवतीं उपरणं, डोक्याला पांढरा सफेद रुमाल, (गांधींचा पंथ स्वीकारल्यानंतर पांढरी चुरगळलेली टोपी !) अशा बावळ्या वेषांतले, देवीच्या वणांमुळे खडबडीत झालेल्या चेहऱ्याचे, बारीक किलकिल्या डोळ्यांचे खाडिलकर व्यासपीठावर उभे राहिले, की ते दिसायलाहि प्रसन्न दिसत नसत, आणि त्यांच्या बोलण्याच्या पद्धतींतहि प्रसन्नता नसे. हल्लींचे कांही नवकवी कविता म्हणून दाखवूं लागले, की ज्याप्रमाणे ते काव्यसुंदरीला लाथाबुक्क्या घालून बुकलून काढीत आहेत असा भास होतो, त्याप्रमाणेच खाडिलकरांचं व्याख्यान ऐकणाऱ्या श्रोत्यांना

वाटत असे. श्रुतिमनोहर असं विशेषण खाडिलकरांच्या वक्तृत्वाला लावण्याची कुणाची छाती नव्हती.

परंतु त्यांचं व्याख्यान अत्यंत श्रवणीय खचितच असे. आणि जितकं श्रवणीय तितकंच मननीय! ज्यांत तात्विक चिंतनाला वाव असेल अशाच विषयांची निवड ते व्याख्यानासाठी करीत असत, आणि मग कोळ्याच्या अंगांतून धाग्यावर धागे निघावेत आणि त्याचं सुंदर जाळं विणून तयार झालेलं दिसूं लागावं तद्वत् विषयाचा विस्तार त्यांनी केलेला श्रोत्यांच्या दृष्टीस पडे. तात्कालिक राजकीय प्रश्नावर ते बोलत असले तर मवाळ राजकारणाचा उपहास करतांना ते चिडीनं कडाडून बोलूं लागत. प्रतिपक्षाचा मर्मघात करणारे शब्द त्यांना टिळकांपेक्षाहि अधिक आठवत असत, आणि दया-माया न दाखविता प्रतिपक्षाला टोले हाणलेच पाहिजेत हें टिळकांचं आचार-सूत्र त्यांनी आत्मसात् केलं होतं. प्रतिपादनाच्या ओघांत एखादा मार्मिक चटकदार दाखला किंवा दृष्टान्त त्यांना सुचला, की तो घोळून घोळून सांगण्यांत ते रंगून जात. एखादी प्रसंगोचित कोटी किंवा उपमा मनांत स्फुरली, की ती श्रोत्यांच्या अंगावर सहज फेकण्याचं कित्येक नामांकित वक्ते कसब दाखवितात. पण खाडिलकरांचं एवढ्यानं समाधान होत नसे. ती उपमा आपल्या प्रतिपादनांत कशी चपखल बसते तें विस्तारानं दाखविण्याचा हव्यास ते करीत.

दारूबंदीची चळवळ पुण्यांत विशेष जोरानं सुरू झाली तेव्हा जहाल पक्ष आणि सरकार यांच्यांतील एका चकमकीचं स्वरूप चळवळीला आलं होतं. चिरोलकेसमध्ये टिळकांनी ब्रिटिशांच्या न्यायबुद्धीवर भलता विश्वास व्यर्थ ठेवला आणि स्वतःच्या आयुष्याचा व पैशाचा अपव्यय केला, त्यापेक्षा त्यांनी सत्याग्रहाचा मार्ग पत्करला असता तर बरं झालं असतं, असे उद्गार गांधीजींनी काढले. त्यांना उद्देशून मुंबईस शांतारामाच्या चाळींतील एका व्याख्यानांत शिवरामपंत परांजपे यांनी गांधींना रेशमी चिमटा घेतला होता, की " सत्याग्रहाची कल्पना १९१९ सालींच जन्माला आली असं नसून राजा हरिश्चंद्राच्या काळापासून आम्हां भारतीयांना ती माहीत आहे." शिवराम-पंतांचा हा टोला नंतरच्या काळांतला आहे. पण एवढं खरं, की गांधीजींचा

अवतार होण्यापूर्वीं सत्याग्रहाची कल्पना अज्ञात नव्हती. १९०८ ची दारू-बंदीची चळवळ म्हणजे सविनय कायदेभंगाचाच प्रकार होता.

त्या चळवळीच्या दिवसांत खाडिलकरांचं एक भाषण झालं, त्याची आठवण सांगावीशी वाटते ती अशासाठी, की एखादा दृष्टान्त सुचल्यावर त्याचा पाठलाग करण्याची हौस त्यांना कशी होती ते त्या व्याख्यानांत दिसून आलं. दारूबंदीच्या चळवळीविरुद्ध सरकारचा युक्तिवाद असा होता, की आम्ही काय लोकांना दारू पिण्याची सक्ति थोडीच करतो ? दारूचीं दुकानं आहेत एवढंच. दारू ज्याला प्यायची असेल तो दुकानांत शिरेल, ज्याला प्यायची नसेल तो त्या वाटेला जाणार नाही. या बाबतींत आम्ही संपूर्ण मतस्वातंत्र्य आणि आचारस्वातंत्र्य ठेवलंय. कायद्यानं दारूचीं दुकानं उठविणं म्हणजे लोकांच्या स्वातंत्र्यावर घाला घालणं होय. तें आम्ही कदापि करणार नाही, आणि तें करणं आम्हांला भाग पडावं अशी चळवळ कोणी केली तर तिचा बंदोबस्त करणं आमचं कर्तव्य आहे. खाडिलकरांनी आपल्या त्या व्याख्यानांत सरकारच्या या कोटिक्रमाचे वाभाडे तर काढलेच, परंतु ते काढतांना त्यांना एक मोठा समर्पक दृष्टान्त सुचला तेव्हा तो मांडण्यांतच ते किती वेळ तरी रंगून गेले.

मद्य, मांस, आणि मैथुन या तीन गोष्टींकडे माणसाचं मन स्वभावतःच ओढलं जातं हें भागवतांतलं प्रसिद्ध वचन सांगून ते म्हणाले, की या व्यसनास आळा घालणं हेंच कायद्याचं खरं कर्तव्य आहे. शुक्राचार्यानं मद्यपानापायीं स्वतःचा आणि आपल्या संप्रदायाचा केवढा घात करून घेतला त्याचं मोठं रसभरित वर्णन त्यांनी केलं. तें करता करता त्यांना शुक्राचार्यांची आठवण झाली, आणि शुक्राचार्याला मोहित करण्यासाठी इंद्रानं त्याच्याकडे पाठविलेल्या रंभेची उपमा लोकांपुढे सरकारनं मांडलेल्या दारूच्या दुकानांना त्यांनी दिली. ही उपमा सापडल्याबरोबर त्यांचं वक्तृत्व असं कांही भरघोसपणानं सुरू झालं, की विचारूं नका. दारूचं दुकान म्हणजे रंभा, सरकार म्हणजे इंद्र, आणि सामान्य लोक म्हणजे शुक्र या कल्पनेचा विस्तार ते परोपरीनं करीत राहिले. एखाद्या श्रेष्ठ गायकाला गाण्याच्या भरांत रिखभ, धैवत असा एखादा स्वर मोह घालतो, आणि मग त्या स्वरावर घर बांधल्यासारखं करून तो तानांच्या तऱ्हेतऱ्हेच्या रचना करून त्या स्वराला पुनःपुन्हा स्पर्श करून

एक विलक्षणच चमत्कृतिमय आल्हादकारक वातावरण निर्माण करतो. व्याख्यानाच्या ओघांत खाडिलकरांना एखादा दृष्टान्त सुचला आणि विशेष आवडला, की त्यांच्या वक्तृत्वाला याच जातीचा रंग चढत असे. त्यांच्या चिरक्या फाटक्या आवाजाकडे श्रोत्यांचं लक्ष राहत नसे. एका विशिष्ट कल्पनेचे धागे धागे काढून त्यांचं जाळं विणण्याचं कसब आणि प्रतिपादनाचा आवेश यांतच श्रोते गुगून जात असत. ज्या व्याख्यानाची आठवण मी सांगत आहे त्याच्या अखेरी अखेरीस खाडिलकर म्हणाले,

"दारूचीं दुकानं भर वस्तींत मांडून लोकांनी पाहिजे तर दारू पिऊं नये असं त्यांना सांगणं म्हणजे सुंदर तरुण बायकांच्या कळपांत एखाद्या माणसाला ठेवून ब्रह्मचर्यपालन करण्याचं तुझं स्वातंत्र्य आम्ही हिरावून घेतलेलं नाही असं म्हणण्यासारखंच आहे. ही गोष्ट दारूबाज सरकाराखेरीज दुसऱ्या कुणाच्याहि लक्षांत आल्यावाचून राहणार नाही. आज या पुणें शहरांत दरसाल सात लक्ष रुपयांची दारू खपते आहे ! दारू पिऊन दंगामस्ती केल्या-बद्दल दीड हजार इसमांना दरवर्षीं दंड किंवा शिक्षा होत आहेत. या शहरांतल्या हरएक पेठेंत दारूदुकानरूपी रंभा लोकांपुढे उभी आहे तोंपर्यंत हें असंच व्हायचं ! हें बंद होण्यासाठी जनतेनंच अशी चळवळ केली पाहिजे, की जिचं उग्र स्वरूप पाहून दारूदुकानरूपी रंभा घाबरून लाजून उठून जातील. वास्तविक गरिबांस दारू कशी मिळेल या चिंतेपेक्षा गरिबांस अन्न कसं मिळेल याची चिंता सरकारनं करायला हवी. ती न करता दारू पिऊन रस्त्यांत दंगा करणाऱ्याला जेवढा दंड तेवढाच दारू पिऊं नका म्हणून प्रार्थना करण्याकरता गुत्त्यापुढे उभं राहणाऱ्या सभ्य, सज्जन शांतताप्रिय स्वयंसेवकालाहि दंड, अशा अपूर्व न्यायाचं माप सरकार आमच्या पदरांत टाकीत आहे ! आणि तें का ? तर लोकांचं पानस्वातंत्र्य अबाधित राहावं म्हणून ! धिःकार असो असल्या स्वातंत्र्याला ! धिःकार असो असल्या नीतीला ! धिःकार असो असल्या राजधर्माला ! "

एकाहून एक चढत गेलेलीं खाडिलकरांची हीं तीन वाक्यं, त्या वेळचा त्यांचा टिपेवर पोचलेला आवाज, आणि त्यांची आवेशयुक्त उग्र मुद्रा—या साऱ्यांची आठवण मला अजूनहि स्पष्ट आहे.

* * *



# १० : तात्यासाहेब केळकर

व्यक्ती तितक्या प्रकृती या नियमाची प्रतीति व्याख्यान-कलेच्या बाबतींतदेखील येते. ' जसा माणूस तशी त्याची शैली ' असं एका फ्रेंच पंडितानं म्हटलेलं आहे. या विधानाची सत्यता लेखनाच्या शैलींत जशी प्रत्ययाला येते तशीच वक्तृत्वाच्या शैलींतदेखील येतेच.

किंबहुना जो माणूस लेखक व वक्ता दोन्ही असतो, त्याचं लेखन त्याच्या भाषणाच्या पद्धतीचंच असतं, आणि त्याच्या वक्तृत्वांत त्याच्या लेखनाचे गुण आढळतात. खाडिलकरांचं लेखन आणि केळकरांचं लेखन यांत जो मूलभूत फरक होता तोच दोघांच्या वक्तृत्वाच्या तऱ्हांतहि होता. संतप्त आवेश, उग्रता, कठोरपणा, प्रतिपक्षाला पार चिरडून टाकण्याची इच्छा, हे खाडिलकरांच्या स्वभावांतले प्रमुख गुण होत. केळकरांच्या स्वभावाचे विशेष याहून अगदी निराळे होते. कोणत्याहि तऱ्हेचा अतिरेक त्यांना अप्रिय. भाषेनं किंवा कृतीनं अखेरच्या टोकावर जाऊन उभं राहण्याच्या वृत्तीचा त्यांच्या ठिकाणीं अभाव. कोणत्याहि वादाच्या दोन्ही बाजूंचं सत्य पाहण्याची त्यांची वृत्ति. जें सत्य दिसलं त्याकडे डोळेझाक करण्याचा त्यांना कधी धीर झाला नाही. अतिरेकाची

परस्परविरुद्ध टोकं टाळून सुवर्णमध्य गाठण्याची त्यांच्या मनाची नेहमी धडपड आणि तयारी. यामुळे सौम्यता हाच त्यांच्या लेखनाचा आणि वक्तृत्वाचाहि स्थायी भाव बनला होता.

वक्तृत्वाच्या बाबतींत शरीरधर्माची जी प्रतिकूलता निसर्गाच्या अवकृपेमुळे केळकरांच्या वाट्याला आली होती तिच्यावर त्यांनी प्रयत्न करून विजय मिळविला. त्यांनी बोलायसाठी मोठा आवाज काढून तोंड उघडलं, की आवाजापेक्षा खोकलाच अधिक फुटावा, असा प्रकार प्रारंभीं होत असे. या शरीरधर्मावर विजय मिळविण्यासाठी तात्यासाहेबांनी कोणत्या युक्त्या केल्या तें त्यांचं त्यांना माहीत. परंतु खोकल्याची खोड त्यांनी जिंकली खरी ! पुरती जिंकली असं नाही ! व्याख्यान देतांना खोकणं, खाकरणं, खांदे उडविणं, ते उडविल्यामुळें ढळणारं उपरणं वरचेवर सावरणं, इत्यादि त्यांच्या लकबा कधी सुटल्या नाहीत. ऑल इंडिया रेडिओवर बोलणाऱ्या वक्त्यांपैकी आदर्श वक्ता कोण याची सहज खेळीमेळीची चर्चा चालू असतांना केळकरांचं नांव निघालं तेव्हा बा. सी. मर्ढेकर म्हणाले, " आम्ही तात्यासाहेबांच्यापुढे हातच टेकले आहेत. रेडिओवर भाषण करतांना खोकूं नये, ठसकूं नये, शिंकूं नये असा अलिखित दंडक आहे. परंतु या दंडकाला तात्यासाहेबांच्या पुढे साष्टांग दंडवत घालावा लागतो. " मी म्हटलं, " चुकतां तुम्ही मर्ढेकर, रेडिओच्या दृष्टीनं तात्यासाहेबांचं भाषण आदर्श ठरण्यासारखं नसलं तरी नमुनेदार ठरायला हरकत नाही !" मर्ढेकरांनी विचारलं, " तें कसं काय ?" मी म्हटलं, " अहो, रेडिओवरच्या श्रुतिकेंत निरनिराळे साऊंड इफेक्ट घालायचा प्रयत्न तुम्ही करतांच की नाही ? तात्यासाहेबांच्या भाषणांत नाना प्रकारचे साऊंड इफेक्टस् सहजगत्या निर्माण होतात ! मग यांत बिघडलं कुठें ?"

जाहीर सभेंत केळकर बोलूं लागले, की त्यांचं खोकणं, ठसकणं, खाकरणं सुरू असेच ; परंतु त्यांच्या स्वतःच्या किंवा श्रोत्यांच्या अवधानांत त्यामुळे व्यत्यय येत नसे. उलट त्यांच्या त्या खाकरण्याला, खोकण्याला, आणि प्रत्येक वेळीं उजव्या हाताची मूठ तोंडापुढे धरण्याच्या त्यांच्या तऱ्हेला वाक्यांतल्या विरामचिन्हांचं स्वरूप आल्यासारखं वाटे. राणा भीमदेवाच्या आवेशानं ओरडून गर्जून बोलण्याची त्यांची तऱ्हा असती तर ज्या गोष्टी विशोभित दिसल्या असत्या त्याच त्यांच्या वक्तृत्वाच्या तऱ्हेला एक प्रकारें शोभाच देत

असत. कारण त्यांचं वक्तृत्व सौम्य, संथ, संभाषणाच्या स्वरूपाचं होतं. प्रतिपादनांतील एखादा मुद्दा मांडल्यावर ते क्षणभर थांबले तरी खोकण्यासाठी थांबले असं वाटत नसे, तर श्रोत्यांना विचार करायसाठी अवसर देण्यासाठी थांबले असं वाटत असे. घसा साफ करण्यासाठी त्यांनी घेतलेले स्वल्पविराम, अर्धविराम, पूर्णविराम त्यांना स्वतःलाहि उपयुक्त ठरत. कारण या क्षणभरांत त्यांना एखादी उपमा किंवा चमत्कृतिमय कोटीक्रम सुचत असे ! या नवीन सुचलेल्या कल्पनेचा आनंद त्यांच्या चेहऱ्यावर दिसूं लागे, आणि मग घसा साफ करण्यासाठी नव्हे तर या आनंदासाठी ते कांही एका निराळ्याच आवेशानं खाकरत, आणि खांद्यावरून ढळलेलं उपरणं सावरीत पुढे बोलूं लागत.

त्यांच्या वक्तृत्वामागची बैठक सामान्यतः वर्गांत शिकविणाऱ्या शिक्षकाची होती. कोणता तरी एखादा विषय त्याच्या सर्व अंगोपांगांसकट सोपा करून सभेपुढे मांडण्याचा त्यांचा हेतु असे. " लेखकाची महत्त्वाकांक्षा अशी असावी, कीं कल्पना सुचली कीं मी ती कागदावर मांडीन, नंतर तो लेख स्वतः वाचीन तेव्हा त्याचा आनंद स्वतः घेईन , लेख छापल्यावर लोक तो वाचतील, आणि त्याचा आनंद घेतील, आणि आनंदाचे किरण परत माझ्याकडे येतील. अशा प्रकारें विद्युन्मंडल ( इलेक्ट्रिक सर्किट ) पूर्ण झालं म्हणजे लेखनाचा हेतु साध्य झाला. " तात्यासाहेबांचे हे उद्‌गार त्यांच्या स्वतःच्या लेखनाला जसे लागू होते तसेच त्यांच्या व्याख्यानालाहि.

कधी कधीं व्याख्यान देतांना आपल्या बोलण्याची सुगमता आणि साहित्यिक शोभा यावर खुष होऊन ते स्वतः रंगून जात. परंतु समोर बसलेले श्रोते आपल्याप्रमाणेच रंगून गेले आहेत की नाहीत, आणि आनंदाचं ' विद्युन्मंडल ' पुरं होत आहे की नाही याचा ते सारखा अदमास घेत असत. आपल्या भाषणाचा श्रोत्यांवर हवा तो परिणाम होत आहे की नाही, हें वाक्यावाक्यागणिक पाहणारा केळकरांसारखा दुसरा वक्ता मला आठवत नाही !

सामाजिक, धार्मिक, राजकीय अशा कोणत्याहि वादग्रस्त प्रश्नावर भाषण करतांना श्रोत्यांच्या गळीं कोणता तरी सिद्धान्त उतरविण्याची त्यांची मनोमन प्रतिज्ञा असे. परंतु तो सिद्धान्त ते बराच वेळ लपवून ठेवीत. त्या सिद्धान्ताच्या विरुद्ध बाजूचं म्हणणं ते श्रोत्यांपुढे साक्षेपानं मांडीत, आणि प्रतिपक्षाच्या एकेका मुद्याचा छेद करता करता असं कसबी प्रदिपादन करीत, की

प्रतिपाद्य सिद्धान्ताला आपोआपच आकार येत जावा. स्वसंरक्षणाचा सगळ्यांत उत्तम मार्ग म्हणजे प्रतिपक्षावर हल्ला करणं, हा जो युद्धनीतींतला मोठा नियम त्याला अनुसरून केळकर आपलं भाषण सजवीत असत असं म्हणायला हरकत नाही. सजावटीच्या या पद्धतीमुळे त्यांच्या बोलण्याला वादाचं स्वरूप येत असे, आणि प्रतिपक्ष समोर उभा असल्याप्रमाणे त्यांच्या तोंडून प्रश्नोद्गार बाहेर पडत. " असं म्हणायला आधार कुठे राहिला ? " " असं विधान करणाराला शहाणं कोण म्हणेल ? " " अशी प्रमाणांची धूळ चार मूर्ख लोकांच्या डोळ्यांत फेकता येईल, परंतु जे विचारी आहेत त्यांची नजरबंदी तुम्ही कशी करणार ? "—अशा प्रकारचे प्रश्नोद्गार म्हणजे त्यांच्या विवेचनांतले ठळक टप्पे असत. अशा प्रत्येक टप्प्यावर थांबतांना उजवा तळहात तर्पण करावयाच्या वेळेस दुमडल्याप्रमाणे ते दुमडीत आणि हवेंत नाचतीत. असा एखादा क्षण साधून कुणी कसबी फोटोग्राफरनं घेतलेला त्यांचा फोटो उपलब्ध असता तर तो छापून त्याकडे बोट दाखवून मी म्हटलं असतं, केळकरांच्या वक्तृत्वाची शैली कशी होती तें तुम्हांला समजायला हवं असेल तर त्या चित्राकडे बघा !

अशा प्रकारचा प्रतिपक्षाची कोंडी करणारा प्रश्न विचारतांना केळकरांच्या मुद्रेवर आणि स्वरांतहि आवेश प्रकट होत असे. मात्र तो आवेश असला तरी सौम्य असे, उग्र नसे. केळकरांच्या भाषणांत खळखळाट किंवा क्षोभ नसे. याचा अर्थ इतकाच घ्यायचा, की क्षोभाकडे त्यांचा स्वाभाविक कल नव्हता. परंतु प्रक्षुब्ध होऊन ते कधीं बोलतच नसत असं म्हणणं चुकीचं ठरेल. सहनशलिता हा त्यांच्या अंगचा एक ठळक गुण होय. त्यामुळे प्रतिपक्षाचे शंभर अपराध ते पोटांत घालीत. परंतु सहनशीलतेची मर्यादा संपण्यासारखं कांही घडलं, तर मग मात्र ते युद्ध पुकारीत आणि कोटिक्रमानं, युक्तिवादानं, पुराव्यानं आणि विशिष्ट पद्धतीच्या उपहासानं ते टीकाकाराचे राइराईएवढे तुकडे करीत. कुणी त्यांना विनाकारण डवचलेलं असलं किंवा त्यांची कुचेष्टा केली असली तर त्यांच्या शांत वृत्तीच्या म्यानांतून एकदम संतापाची समशेर बाहेर पडून तळपूं लागे, आणि मग त्यांच्या वक्तृत्वांत नुसता प्रक्षुब्ध आवेशच नव्हे तर मर्मघातक शब्दांचे स्फोटगोलहि उडत.

त्यांनी लिहिलेल्या टिळक चरित्रावर अभिप्राय देतांना न. र. फाटकांनी

असं लिहिलं, कीं "चरित्रांत अनेक दोष राहून गेलेले आहेत अशी विनयाची कबुली चरित्रकारानं स्वतःच प्रस्तावनेंत दिलेली असल्यामुळे टीकाकारांना त्यांनी निःशस्त्र करून टाकलं आहे." मात्र अशी प्रस्तावना करूनहि फाटकांनी त्यांच्या ठराविक स्वभावधर्माप्रमाणे केळकरांच्या चरित्रावर आणि चरित्रनायक जे टिळक त्यांच्यावर मन मानेल तसं तोंडसुख घेतलं होतं. कुणाचीहि सहनशीलता संपावी अशी फाटकांची ती टीका होती. आणि सहनशीलता संपल्यावर केळकर कशी नांगी मारीत आणि किती जहरी बोलत त्याचा मासला चाखायची पाळी फाटकांवर आल्यावाचून राहिली नाही. केळकर म्हणाले, " टिळक चरित्राच्या बाबतींत मी विनय दाखविला नसता तर उर्मटपणाचा गुण माझ्या अंगीं चिटकवून मला झोडपण्याची फाटकांची सोय झाली असती. ती त्यांची सोय मी हिरावून घेतली म्हणून आता माझ्या विनयाबद्दल त्यांचा माझ्यावर राग. त्यांची तक्रार अशी, की मी विनय दाखविल्यामुळे हवी तशी टीका करण्याच्या सवलतीचा लोण्याचा गोळाच मी त्यांच्या हातून काढून घेतला ! परंतु सवलत हातची गेली तरी फाटकांनी अद्वातद्वा खोटंनाटं लिहिण्याची हौस काय कमी भागवून घेतली आहे काय ? तशांतली गोष्ट मुळींच नाहीं. फाटकांच्या मडक्यांतला लोण्याचा गोळा मी हिरावून घेतला खरा, परतु टीकेच्या मडक्याची कडा ते चाटीत बसलेच ! "

असहकारितेच्या काळात गंगाधरराव देशपांडे, शिवरामपंत परांजपे, खाडिलकर असे टिळकांचे अनुयायी गांधीपंथांत सामील झाले. केळकर अशा प्रकारे सामील झाले नाहीत म्हणून त्यांच्यावर टीका होऊं लागली. या टीकेला चिडून एका व्याख्यानांत ते म्हणाले, " असहकारितेच्या चळवळींत सामील होणारीं सारींच माणसं देशभक्तीच्या निर्मळ हेतूनं सामील झालीं आहेत असं थोडंच आहे ? पांडुरंगाच्या दर्शनासाठी आषाढांत आणि कार्तिकांत खूप मोठी यात्रा लोटते. पण त्या यात्रेंत हौशे, नवशे, गवशे अशीं तीन तऱ्हांचीं माणसं असतात. परमार्थाची खरी हौस बाळगून जाणारे ते ' हौशे. ' यांची संख्या फार थोडी. दुसरे कांही असतात ते परमेश्वराजवळ कांहीतरी मागण्यासाठी नवस करणारे असतात. यांना म्हणायचं ' नवशे ' ! पण याहूनहि जास्त मोठ्या संख्येनं कोण जातात ? तर, कुणाचा खिसा कापता येईल, कुणाचं

कांही उचलता येईल, कांही तरी गवसेल अशा हिशोबांत जाणारे ! यांना म्हणायचं 'गवशे'! आता स्वराज्यरूपी विठ्ठलदर्शनासाठी गांधींनी जी असहकारितेची दिंडी काढली आहे तिच्यांत ध्वजपताका खांद्यावर टाकून, टाळ बडवीत, सत्य-अहिंसेचा गजर करीत जी मोठी मोठी मंडळी सामील झालेली तुम्हांला दिसतात आणि ज्यांचं आज घटकेला माझ्यापेक्षा अधिक कौतुक तुम्हांला वाटतं त्यांपैकीं हौशे कोण, नवशे कोण, आणि गौशे कोण तें सांगून मी कशाला माझी जीभ विटाळूं ? थोडा शांत विचार केलात तर तुम्हांला साऱ्या गोष्टी कळतील ! "

अशाच जहरी टीकेचा आणखी एक नमुना पाहा. "हिंसेच्या प्रतिपादनाकरता ज्यांचं सर्व वाङ्मय जप्त झालं तेच परांजपे आता जाहीर सभांतून अहिंसेची स्तुतिस्तोत्रं गात असल्यामुळे वक्तृत्वांत फिके आणि जाणत्या लोकांत हास्यास्पद होऊन राहिले आहेत. अवतारसमाप्तीनंतरच्या कृष्ण तशी शिवरामपंत परांजप्यांची अवस्था झाली आहे. अहिंसात्मक असहकारितेच्या पिंजऱ्यांत ठेवलेल्या चिरउपोषित सर्पाप्रमाणे ते निरुपद्रवी बनले आहेत. मी त्यांच्यासारखा कमरेचं सोडून गांधींच्या मागे धावलों नाही हा त्यांच्या दृष्टीनं माझा मोठा अपराध ! माझ्यावर हवं तसं तोंड टाकण्यास ते कमी करीत नाहीत. पण सरकारला बाधणारं असं त्यांचं जहाल विष त्यांच्या दांतांतून गांधींनी पिळून टाकलं असल्यामुळे या सापाचे दांत आणि एखाद्या पांढऱ्या हस्तिदंती कंगव्याचे दात दोन्ही सारखेच वाटूं लागले आहेत ! " याच संदर्भात गंगाधरराव देशपांडे, शिवरामपंत परांजपे, आणि खाडिलकर या सर्वांचा मिळून एकत्र निर्देश करून त्यांनी असे उद्गार काढले, "हिंसेची तोंडानं उघड निंदा करणारे, १९०८ च्या सुमारास हिंसा आणि अत्याचार यांचा छुपा प्रचार करण्याचं जें पाप केलं त्याबद्दल प्रायश्चित म्हणूनच की काय, आज हिंसेच्या निंदेची शिक्षा भोगणारे हे तीन तापसी राष्ट्रीय व्याघ्र गांधींनी निर्माण केलेल्या, अहिंसेचं लेबल लावलेल्या पिंजऱ्यांत अडकून पडलेले पाहून १९०८-१९०९ सालची आठवण असलेलं ब्रिटिश सरकार मनांत काय म्हणत असेल तें काय मी विस्तारानं सांगायला हवं ? "

परंतु असली मर्मघातक प्रक्षुब्ध भाषा, आणि ती भाषा बोलण्याच्या वेळचा चिडखोर आवेश म्हणजे केळकरांचं खरं स्वरूप नव्हे. वक्ता या

तात्याचं त्याचं खरं स्वरूप सौम्य आणि प्रसन्न होतं. त्यांची खरी हौस होती एखादा महत्त्वपूर्ण विषय सोपा करून श्रोत्यांपुढे ठेवण्याची. ते खरे खुलत असत अशा प्रकारच्या वक्तृत्वांत. यामुळेच वरिष्ठ कायदे कौन्सिलांतलीं भाषणं इंग्रजींत करावीं लागलीं तरीदेखील त्याबद्दल त्यांनी इंग्लिश अधिकाऱ्यांची-सुद्धा वाहवा मिळविली. त्या वेळचे फॉरेन सेक्रेटरी सर डेनिस ब्रे यांनी एकदा आपल्या भाषणांत असे उद्‌गार काढले, की " माझे सन्मान्य मित्र केळकर जेव्हा जेव्हा बोलायला उठतात तेव्हा तेव्हा आता अर्धी घटका फार आनंदांत जाणार अशा खात्रीनं मी माझ्या खुर्चीत सरसावून बसतों. त्यांची सुसंस्कृत भाषणशैली, त्यांच्या प्रतिपादनांतील साहित्यिक लज्जत, श्रोत्याला गुदगुल्या करणारा विनोद, चटकदार चुटके, विचारांचा समतोलपणा इत्यादि गुणांचा रोचक आस्वाद घेण्यांत मला मोठा आनंद होतो. "

तात्यासाहेब केळकरांचीं भाषणं खूप नटलेलीं असत. परंतु वक्तृत्वाच्या अलं-कारांनी नव्हे, तर साहित्यिक सौंदर्यानं. त्यांचं बोलणं नटलेलं नसे तर विचार नटलेले असत. केळकरांची ' भाषणशैली ' हा शब्दप्रयोगच चुकीचा ठरेल. ' विचारशैली ' असं म्हणणं अधिक यथार्थ ठरेल. कोणत्याहि वक्त्याच्या व्याख्यानाचा जो परिणाम होतो त्यांत कांही गुण त्याच्या बोलण्याच्या तऱ्हेचे असतात, कांही त्याच्या विचारसरणीचे असतात. कांही वक्ते असे असतात, की त्यांचं भाषण ऐकतांना तें परिणामकारक वाटतं, परंतु दुसऱ्या दिवशीं तें वृत्तपत्रांत छापून आलेलं वाचलं कीं, तें फुळकवणी पाण्यासारखं वाटतं.

आवाजाचा डौल, उच्चारांची कसबी फेक, लयीचा कुशल बदल, इत्यादि खास वक्तृत्वाचे गुण केळकरांनी कमावलेच नसल्यामुळे त्यांचीं व्याख्यानं ऐकण्यासारखीं होत तीं त्या गुणांवाचून ! आणि नंतर तीं छापून आल्यावरहि तितकींच वाचावीशीं वाटत तीं विचारांच्या गाभ्यामुळे, आणि त्या गाभ्यावर चतुराईनं घातलेल्या साहित्यिक अलंकारांमुळे ! त्यांचीं व्याख्यानं कापरासारखीं उडून जात नसत. चंदनाच्या खोडाप्रमाणे त्यांचा सुवास नंतरहि दीर्घकाळ टिकत असे.

तसा तो टिकावा म्हणून केळकर जाणतेपणानं उघड उघड प्रयत्न करीत असत. त्यांच्या या प्रयत्नांतला एक भाग असा सांगता येईल, की " आज केळकर असं असं बोलले " असं म्हणत श्रोत्यांनी सभास्थानांतून घरीं जावं

अशी त्यांची इच्छा असे, आणि यासाठी प्रतिपादनाची चिरेबंदी रचना ते जशी तयार करीत त्याचप्रमाणे असा एखादा दृष्टान्त योजून ठेवीत, की श्रोत्यांच्या मनांत तो घोळत राहावा. श्री. बापूजी अणे साहित्य संमेलनाचे अध्यक्ष झाले. तेव्हा सूचनेला दुजोरा देतांना केळकरांनी लहानसंच पण अत्यंत प्रसंगोचित आणि ठसठशीत भाषण केलं. त्यांत त्यांनी अखेर कोटी केली, की " अणे यांची अध्यक्षस्थानी निवड व्हावी हें अगदी सोळा आणे योग्य आहे ! " लोक घरोघर गेले ते केळकरांच्या या कोटीची तारीफ करीतच !

मॉंटेग्यू-चेम्सफर्ड सुधारणांचा खर्डा प्रसिद्ध झाला तेव्हा त्याचे गुणदोष केळकरांनी सांगावे म्हणून आमच्या न्यू पूना कॉलेजांत (म्हणजे आताच्या एस्. पी. कॉलेजांत) त्यांचं व्याख्यान मी ठेवलं. त्या वेळीं सुमारे तासाभराच्या भाषणांत त्यांनी विषय तर उत्तम प्रकारे मांडलाच, पण तो मांडतांना परोपरीचे किती सुंदर दाखले त्यांनी दिले. सरकारशीं भलतीच झुंज केली तर सुधारणांचं जें फळ पदरांत पडायचं तेंहि आपण गमावून बसूं, या मुद्याचं विवेचन करतांना ते म्हणाले, " ब्रिटिश सरकार म्हणजे एक साऱ्या मुलुखाची खाष्ट अवदसा खरी, परंतु या अवदसेशी दंगामस्ती, झोंबाझोंबी करण्याची सध्या सोय नाही. कारण चालू घटकेला हिच्या पोटांत सुधारणांचा गर्भ आहे ! त्या गर्भाचा नाश होऊं देणं आपल्या हिताचं नाही. हिंदी चळवळरूपी पुरुषाशीं समागम घडल्यामुळे ब्रिटिश सरकाररूपी बयेला नवसासायासानं सुधारणांचा गर्भ राहिला आहे ! अशा वेळीं भ्रूणहत्या होऊं देण्यांत आपला काय फायदा ? उलट जुळीं मुलं झालीं तर आपल्याला हवीं आहेत. पण तशी व्यवस्था करणं आता आपल्या हातचं नाही ! कारण, गर्भावस्था फार पुढे गेली आहे. परंतु एकच अपत्य का होईना, तें शक्य तितकं बाळसेदार व्हावं यासाठी गर्भारशीचे डोहाळे चालरीत म्हणून का होईना पुरविणं शहाणपणाचं नाही का ? "

याच व्याख्यानांत 'साम्राज्यांतर्गत' स्वराज्यावर हिंदी लोकांचं समाधान होणं शक्य नाही, या मुद्याचं विवेचन करतांना केळकरांनी एक फार सुंदर दाखला दिला. ते म्हणाले, " आजच्या स्थितींत हिंदुस्थानच्या दृष्टीनं साम्राज्यसत्तेचा कांही उपयोग नाही. दक्षिण आफ्रिकेंतल्या गोऱ्या सरकारनं काळ्या लोकांवर जे जुलूम चालविले आहेत त्यांविरुद्ध आम्ही हिंदी लोक काय

थोडे ओरडत आहोंत ? परंतु आमच्या गाऱ्हाण्यांची काय दाद लागत आहे ? साम्राज्यसत्ता दक्षिण आफ्रिकेच्या सरकारला थोडी तरी जरब दाखवूं शकत आहे काय ? मुळीच नाही ! तेव्हा आज घटलेला 'साम्राज्यसत्ता' 'साम्राज्य-सत्ता' जिला म्हणतात तिला उपमा द्यायची झाली तर ती शेळीच्या शेपटीचीच दिली पाहिजे. शेळीची शेपटी अंगावरच्या माशा मारील इतकी लांबहि नसते, किंवा लाज झाकील इतकी रुंदहि नसते ! ब्रिटिश साम्राज्य हिंदी लोकांचं रक्षणहि करूं शकत नाही, आणि लाजहि राखूं शकत नाही ! मग फंदी कवीचं अनुकरण करून 'नाकरि रक्षण, ना दे भूषण, ऐसें साम्राज्य कशाला ?' असं आम्ही कां विचारूं नये ?"

हा प्रश्नोद्गार काढून, स्वतःच्या कोटिक्रमावर खूष होऊन, ढळलेलं उपरणं सावरून, समाधानानं खाकरून केळकरांनी दुमडलेला पंजा जेव्हा हवेंत नाचविला तेव्हा श्रोत्यांनी टाळ्यांचा गजर केला यांत काय नवल ? श्रोत्यांना विषयाची समजूत तर उत्तम पटली होतीच, परंतु 'शेळीच्या शेपटी' वर ते बेहद्द खूष झाले होते ! केळकरांची विशेष रंगलेलीं भाषणं मी जेव्हां जेव्हां आठवतों तेव्हां तेव्हां एकच निष्कर्ष मला काढावासा वाटतो तो हा, की केळकर सभा जिंकीत ती वक्तृत्वानं नव्हे, तर विवेचनानं आणि विनोदानं !

* * *



# ११ : राधाकृष्णन्, रमण आणि शास्त्री

"केवळ शरीर आणि मन या दोहोंची बेरीज म्हणजे मनुष्य नव्हे. या बेरजेपलीकडे आणि अधिक उंच असं कांहीं तरी मनुष्याच्या ठिकाणीं आहे. त्यालाच आत्मा म्हणतात. हा आत्मा अविनाशी आहे, आणि तो ब्रह्मस्वरूप आहे. पंचेंद्रियांना समजणारं जग म्हणजे संपूर्ण सत्य नव्हे.

जें दिसत नाही, जें स्पर्शाला, रुचीला समजत नाही, जें श्रवणेंद्रियांना ऐकूं येत नाही, असं एक विश्व या जगापलीकडे आहे, आणि तें विश्व अधिक सत्य आणि चिरंतन आहे. आमच्या जुन्या ऋषींनी पंचेंद्रियांच्या झेपे-पलीकडच्या या अतींद्रिय विश्वाचा आणि आत्म्याचा खोल विचार केला होता. मुमुक्षूला होणाऱ्या साक्षात्काराची अवस्था अशी असते, की त्याला शब्दरूप देता येत नाही. त्याचं वर्णन करता येत नाही. कारण वर्णन करणारा व ज्याचं वर्णन करायचं तो विषय भिन्न म्हटलं की द्वैत आलं. या द्वैताच्या साहाय्यानं अद्वैताचं– म्हणजे जिथे सारे भेद संपलेच–त्याचं वर्णन कसं होणार? धर्माचं अंतिम ध्येय अनंतांत विलीन होण्याचं आहे. हें विलीन होणं म्हणजे एक विवक्षित अत्युच्च अनुभूति आहे. आमच्या हिंदु धर्माची थोरवी हीच आहे. या थोरवीमुळे तो धर्म शतकानुशतकं कोट्यवधि लोकांना स्फूर्ति आणि

श्रद्धा देत राहिला आहे ! अनेक हल्ले झाले, अनेक संकटं आलीं तरी...."

व्याख्यान ऐकता ऐकता माझं लक्ष सभागृहाकडे, व्यासपीठाकडे, आणि व्याख्यान देणाऱ्या व्यक्तीकडेच अधिक आहे. अध्यात्माकडे माझी श्रद्धा झुकत नाही. त्यामुळे एखादा व्याख्याता ब्रह्म, माया, सायुज्यता, मोक्ष इत्यादि शब्द उच्चारून भारतीय संस्कृतीची किंवा धर्माची थोरवी वर्णन करून सांगू लागला, की माझं चित्त व्याख्यानावरून उडतं. आणि त्यांतून ज्या प्रसंगीं हें व्याख्यान मी ऐकतो आहे त्या प्रसंगाशीं अध्यात्मचर्चेचा अर्थाअर्थी कांही संबंध नाही. कुणाच्याहि व्याख्यानांत अप्रासंगिकपणा आला, की त्यांत मला रुचि वाटेनाशी होते. मग व्याख्यान ऐकण्याऐवजी मी सभागृहाकडे आणि व्यासपीठावरच्या वक्त्याकडे बघूं लागतो... तसंच आता घडत आहे. मी व्याख्यान ऐकतों आहे खरा, परंतु माझं चित्त अधिक आहे समोर आणि सभोवार पाहण्याकडे.

सभागृह श्रोत्यांनी खच्चून भरलं आहे. कारण वक्त्याची कीर्ति आंतरराष्ट्रीय आहे. मी स्वतःदेखील ती कीर्ति ऐकूनच मुद्दाम आलों आहे. व्याख्यात्याचे इंग्रजी उच्चार मला आवडत नाहीत. इंग्लंडमधील युनिव्हर्सिटींत अध्ययन केलेल्या माणसाला शोभण्यासारखे हे उच्चार नाहीत. त्यांत मद्रासी छटा स्पष्ट आहे. वाक्यरचनादेखील फारशी ऐटबाज नाही. भाषेची शैली आधुनिक खुमासदार नसून जुन्या थाटाची, केवळ शाब्दिक अवडंबराकडे झुकणारी वाटते. वक्त्याचा आवाज मात्र फारसा लांब पल्ल्याचा नसला तरी कांहीसा खर्जातला, बोजेदार आणि मधुर आहे. वक्त्याचं दर्शन तर प्रसन्नच आहे. उण्या पुऱ्या उंचीची सडपातळ देहयष्टि, धोतर, बंद गळ्याचा पायघोळ शुभ्र कोट, डोक्याला पांढरा शुभ्र मद्रासी थाटाचा रुमाल, डोळ्यांवर चष्मा, कृष्ण वर्ण, उमट चेहरा, मान जराशी उंचच, नाक गोबरं, खालचा ओठ बराचसा जाड आणि पुढे आलेला, अशा थाटाची ही मूर्ति परिणामकारक आहे खचित् ! माफक हातवारे करीत, ढाल्या गोड आवाजांत, संथपणानं परंतु सतत ओघ ठेवून बोलणाऱ्या त्या वक्त्याकडे बघत राहावंसं मला वाटतं.

या वक्त्याचं नांव सर्वपल्ली राधाकृष्णन् !

या नामांकित वक्त्याचीं कित्येक व्याख्यानं मी ऐकलीं. परंतु मला कांही त्यांच्या वक्तृत्वशैलीनं मोह घातला नाही. ते एक आंतरराष्ट्रीय कीर्तीचे गृहस्थ आहेत, या दबदब्याचा परिणाम माझ्या मनावर होऊं शकला नाही. भारताचे आधुनिक

तत्वज्ञ अशी किताबत त्यांना मिळालेली आहे तीदेखील मला मान्य नाही. त्यांना फार तर एक 'भाष्यकार' म्हणतां येईल. 'दर्शनकार' या पदवीवर त्यांचा कांही हक्क नाही. आणि त्याचप्रमाणे आंतरराष्ट्रीय कीर्तीचे इंग्रजी वक्ते अशा वर्णनाला तर ते मुळीच पात्र नाहीत. अस्सल इंग्रज माणसासारखेच हुबेहूब हिंदी वक्त्यानेंदेखील आपले इंग्रजी उच्चार ठेवले पाहिजेतच काय, हा कदाचित् वादाचा आणि मतभेदाचा प्रश्न होऊं शकेल. परंतु या वादांतसुद्धा दोन गोष्टी मान्य कराव्या लागतील. एक ही की, इंग्रजी शब्दांच्या उच्चारांचा मद्रासी थाट रसभंग करणारा आहे. आणि दुसरी अशी, की शब्दोच्चारांच्या अस्सल इंग्रजी उच्चारांत एक विशिष्ट माधुर्य आहे. हें माधुर्य कायम ठेवून इंग्रजी बोलणारे भारतीय वक्ते विरळाच! शास्त्री, रमण, गांधीजी, नेहरू या मंडळींच्या इंग्रजी वक्तृत्वांतदेखील हें माधुर्य आढळत नाही. श्रीमती अमृत कौर यांचं व्याख्यान मी ऐकलेलं नाही. परंतु त्यांची रेडिओ-वरील भाषणं ऐकून मला असं खचित म्हणता येईल की, इंग्रजी उच्चारांतलं अस्सल माधुर्य त्यांच्या बोलण्यांत आढळतं. फार थोड्या अंशानं का होईना, जयप्रकाश नारायण यांच्या बोलण्यांतहि तें दिसतं. सर राधाकृष्णन् यांच्या वक्तृत्वांत त्या माधुर्याचा पत्तादेखील नसतो; आणि त्यांच्या व्याख्यानाचा आशयदेखील उगीचच्या उगीच अध्यात्मिक दृष्टिकोनाची झिलई दिलेला आणि भोंगळ असतो. वक्तृत्वाबद्दल त्यांची मोठी ख्याति आहे. परंतु लठ्ठ लठ्ठ शब्दांच्या नादानं ज्यांना झापड येते व त्या शब्दांतून कांही अर्थ निष्पन्न होतो की नाही याची चिकित्सा जे करीत नाहीत अशा लोकांनी सरसाहेबांच्या कीर्तीचा डोलारा उभा केलेला आहे!

सुमारे बारा वर्षांपूर्वी बनारस येथें भरलेल्या अखिल भारतीय तत्त्वज्ञान परिषदेच्या अधिवेशनाला गेलों असतांना सरसाहेबांचं जें भाषण ऐकायला मिळालं त्या भाषणाचीदेखील तऱ्हा अशीच होती. निरर्थक शब्दांचा फापट-पसारा, अस्सल हृदयंगम वक्तृत्वाची झुळूक क्वचित् उठली न उठली इतकीच, आणि विचारांचा भोंगळपणा! त्या व्याख्यानांत राधाकृष्णन् म्हणाले, "आम्हांला स्वातंत्र्य मिळालं आहे, परंतु त्याचा कांही उपयोग झालेला नाही. कारण आमच्या अंतःकरणांतच अजून उणीव (Inadequacy) आहे. आज जगांत जिकडे तिकडे लोक भौतिक सुखाच्या मागं लागलेले आहेत आणि

स्वार्थासाठी युद्ध करीत आहेत. अशा काळांत जगाला सन्मार्गावर आणून इतर सर्व राष्ट्रांचा गुरु होण्याचं काम भारतानं केलं पाहिजे. आजच्यासारख्या परिस्थितींत तत्त्वज्ञान्यांवर फार मोठी जबाबदारी असते. तत्त्वज्ञान्यांचं खरं काम हें, की त्यांनीं बाह्य जगाकडे बिलकुल लक्ष देता कामा नये. त्याकडे पाठ फिरविली पाहिजे. आणि इतर कोणत्याहि सत्याला किंमत न देता आपल्या अंतरंगांतल्या सत्याचाच तेवढा शोध केला पाहिजे. हें अंतरंगांतलं सत्य इतर सर्व सत्यांहून निराळं व म्हणून श्रेष्ठ असतं. इत्यादि इत्यादि ”

या भोंगळ बडबडीला कांही अर्थ आहे का ? आज वास्तविक तत्त्वज्ञानी लोकांना असा उपदेश कुणी तरी करायला हवा आहे, की इतके दिवस जगाकडे पाठ फिरविलीत तेवढं पुरें झालं. जगाकडे जरा पहा, आणि तुम्ही ज्या अंतिम तत्त्वाच्या शोधांत आहांत तें या विश्वाच्या जगड्व्याळ व्यापाराशीं असंबद्ध असूं शकत नाही हें ओळखा. तुम्ही असं केलंत तरच तुमच्या तत्त्वज्ञानानं मानवतेचा कांही फायदा होईल. हा मोलाचा उपदेश करण्याऐवजी सर राधाकृष्णन्नी काय सांगितलं ? तर म्हणे, “ Withdraw from the outer world, and seek the inner truth within you, which truth is different from and higher than all other truths ! ” अंतरंगांतलं सत्य इतर सर्व सत्यांहून निराळं आणि म्हणूनच श्रेष्ठ होय या विधानाचा अर्थ काय देव जाणे ! आणि हें सत्य शोधायचं म्हणजे नक्की काय करायचं, आणि तें सापडल्यावर त्याचा कोणता उपयोग करायचा तें एक सर्वपल्ली राधाकृष्णन् जाणे !

असली अर्थशून्य बडबड हाच राधाकृष्णन् यांच्या वक्तृत्वाचा स्थायी भाव आहे अशी माझी समजूत झालेली आहे. भारताचा पहिला प्रजासत्ताक दिन साजरा करण्याचा जो सुंदर समारंभ राजधानींत झाला त्या वेळची नेहरू, राजेंद्रप्रसाद, राधाकृष्णन् इत्यादींचीं भाषणं रेडिओवरून ऐकतांना असाच प्रत्यय मला आला, की इतर थोर थोर माणसं जमिनीवर चालणारीं आहेत, आणि सर राधाकृष्णन् मात्र ढगांत चालणारे आहेत. कारण त्या समारंभांतील भाषणांतदेखील त्यांनीं परमार्थाच्या खलबत्त्यांत तयार केलेल्या अध्यात्माचाच डोज पाजला !

रेडिओवरून ऐकलेल्या त्यांच्या एका भाषणानं मला जो विशेष आनंद झाला तो मी नमूद केला नाही तर मात्र त्यांना अन्याय केल्यासारखं होईल.

कारण प्रशंसेच्या बाबतींत कृपणपणा करण्याचा माझा स्वभाव नाही, आणि जें भाषण मी म्हणतों तें सरळ आणि निस्पृह विचारसरणीनं भरलेलं होतं. १९५६ सालच्या जून महिन्यांत मॉस्को येथील विश्वविद्यालयानं सर राधाकृष्णन् यांची सन्माननीय प्राध्यापक म्हणून नेमणूक केली त्या प्रसंगीं उत्तरादाखल त्यांनी जें भाषण केलं त्याचा उल्लेख मी करीत आहे. शब्दोच्चार, वाक्यरचना, भाषाशैली, आवाज इत्यादि बाबतींतील राधाकृष्णन् यांचे नेहमीचे ठरलेले गुणदोष या व्याख्यानांतहि अर्थातच आढळले. परंतु अर्थशून्य, भोंगळ, पारमार्थिक चर्पटपंजरीचा डाग या व्याख्यानाला लागला नव्हता. इतकंच नव्हे तर रशियन राजवटीला रुचण्यासारख्या नसलेल्या चार गोष्टी सभेंत सुनावण्याचं त्यांनी जें धैर्य दाखविलं तें भारताची उंची वाढविण्याजोगं आणि म्हणून वाखाणण्यासारखं खचित होतं !

त्यांनी स्पष्ट सांगितलं, की " नुसत्या भव्य इमारतींनी विश्वविद्यालयाची भव्यता सिद्ध होत नाही. विश्वविद्यालय म्हणजे विश्वांतील ज्ञानाचं मंदिर आहे, आणि व्यक्तीचं स्वातंत्र्य हा ज्ञानाचा पाया आहे. या स्वातंत्र्याचा घात करून बौद्धिक दृष्ट्या राष्ट्रांतील साऱ्या स्त्रीपुरुषांना सरकारमान्य विचारसरणीच्या एका ठरीव साच्यांत घालून तयार करूं पाहणं यासारखी दुसरी भयप्रद गोष्ट नाही. इंग्लडमध्ये, नंतर फ्रान्समध्ये, अमेरिकेंत, आणि नंतर तुमच्या रशियामध्ये ज्या क्रांत्या झाल्या त्यांच्या मुळाशीं थोर महात्म्यांचं विचारस्वातंत्र्य होतं. त्या क्रांत्यांमुळेंच मानवजातीचीं अंतःकरणं ढवळून निघालीं, आणि मानवाच्या कल्याणांत भर पडली. मानवी आयुष्य सदा बदलत असतं. संक्रमण हाच मानवी जीविताचा धर्म आहे. एक क्रांति झाली, की स्थिरतेचा कालखंड येतो, परंतु नंतर पुन्हा क्रांति व्हावीच लागते. ती अडविण्याचा वेडेपणा कुणी करूं नये. ज्या तुमच्या देशानं एक मोठी क्रांति केली त्यानं तर मुळींच करू नये. विचारस्वातंत्र्य, उच्चारस्वातंत्र्य आणि धर्मस्वातंत्र्य या सर्वोच्च मोलाच्या गोष्टी आहेत. त्यांचं रक्षण इतर कुठे होवो अगर न होवो, तुमच्या या विश्वविद्यालयांत तर झालंच पाहिजे . . . विद्यार्थी जें मागतो तें त्याला देणं हें गुरूचं कर्तव्य नसून जें विद्यार्थ्याला देण्याची आपली इच्छा आहे तें त्याला मागायला लावणं हेंच खऱ्या गुरूचं काम आहे. तुम्ही चुकीच्या मार्गानं जात आहांत असं मला वाटलं तर

गुरूचा अधिकार वापरून मी तुमची कानउघाडणी करीन. आपल्या हातून कांही चूक कधी घडणारच नाही, स्खलनाच्या पलीकडे आपण गेलों आहोंत, अशी विपरीत भावना तुमच्या ठिकाणीं नसेल अशी मी आशा करतो ! ”

राधाकृष्णन् यांच्याविषयी लिहितांना मला साहजिकच इतर कांही प्रसिद्ध दाक्षिणात्य वक्त्यांची आठवण होते. इंग्रजी वक्तृत्वाबद्दल ख्याती असलेल्या कित्येक बंगाली आणि मद्रासी वक्त्यांचीं भाषणं मी ऐकलीं नाहीत. ऐकलेल्या व्याख्यानांच्या आठवणी सांगतांना माझ्या मनांत वारंवार असा विचार येतो, की मी पुष्कळ वक्ते ऐकले खरे, परंतु किती तरी ऐकायचे राहिले. उदाहरणार्थ, चित्तरंजनदास यांचं विख्यात वक्तृत्व ऐकण्याची संधि मला मिळाली नाही. सुप्रसिद्ध मद्रासी वक्त्यांपैकीं कस्तुरीरंग अय्यंगार यांचं व्याख्यान मी ऐकलं नाही. परंतु राधाकृष्णन् यांच्याबद्दल लिहिल्यावर मी ऐकलेल्या दोन दाक्षिणात्य वक्त्यांची आठवण मला होते. एक नोबेल पारितोषिक मिळविणारे सर सी. व्ही. रमण यांची, आणि दुसरी श्रीनिवास शास्त्री यांची.



१९३५ सालीं फर्ग्युसन कॉलेजच्या सुवर्णमहोत्सवांत सर रमण यांचं मुख्य भाषण ऐकायला मी गेलों तेव्हा एक मोठी जगप्रसिद्ध व्यक्ति बघायला मिळेल येवढीच अपेक्षा मी ठेवली होती.

वक्तृत्व ऐकण्याच्या लोभानं मी गेलों नव्हतों. राधाकृष्णन् यांच्यासारखा तत्त्वज्ञ वक्ताहि असण्याचा संभव बराच असतो. शास्त्रज्ञ सुंदर व्याख्यान देईल अशी अपेक्षा फारशी नसते. परंतु सर रमण यांचं व्याख्यान ऐकल्यावर माझी खात्री झाली, की त्यांच्या अंगीं वक्तृत्वकलेचे कांही गुण आहेत.

सर रमण यांची भाषाशैली मला फार सामान्य वाटली. त्यांच्या उच्चारांत मद्रासी छटा होतीच. परंतु असं असूनहि त्यांचं तें व्याख्यान माझ्या आठवणींत अजून आहे. कारण प्रभावी व्यक्तिमत्व, बोलण्यांतला साधा परंतु प्रत्ययकारी आवेश, उच्चार गावठीच असले तरी श्रोत्यांचं चित्त पकडणारा आवाज, आणि मुख्य म्हणजे श्रोत्यांच्या बुद्धीला आवाहन देणारी विचारसरणी, हे गुण त्यांच्या व्याख्यानांत ठळकपणे दिसले. उंचानिंच भरदार देहयष्टि, अंगांत बंद गळ्याचा काळा कोट, डोक्याला मद्रासी थाटाचा पगडीसारखा बांधून तयार केलेला जरीकाठी पांढरा शुभ्र रुमाल, अशा पोशाखांतले सर रमण रुंद भालप्रदेशामुळे आणि मोठ्या तेजस्वी डोळ्यांमुळे, त्यांच्या मुद्रेवरचा कायमचा भाव चिंतनशीलतेचा, सौम्य आणि शांत असूनहि, श्रोत्यांच्या मनाची एकदम पकड घेतात. व्यासपीठावर उभ्या राहिलेल्या त्यांच्या रुबाबदार मूर्तीकडे पाहताच त्यांच्या थोरपणाची साक्ष पटते, आणि श्रोते व्याख्यानासाठी उत्सुक होतात. त्यांच्या उच्चारांत जसं अस्सल इंग्रजीचं माधुर्य नाही, भाषाशैलींत ज्याप्रमाणे कलापूर्ण डौल नाही, त्याप्रमाणेंच त्यांच्या विचारांच्या मांडणींतहि रचनाकौशल्य व ठाकठीकपणा यांचा अभावच मला दिसला. त्यांच्या व्याख्यानाचा ओघ चांगल्या वक्त्याला साजेसा होता. परंतु एकंदर विचारसरणी अव्यवस्थित आणि विस्कळीत होती. विचारांचे दुवे नीट जोडलेले नव्हते. पण तरीसुद्धा एकेक विचार ते बोलून दाखवीत तेव्हा त्या विचारांची चमक झोकदार असे.

उदाहरणार्थ, ते म्हणाले, "आपल्या हिंदु तत्त्वज्ञानानं आपणां सर्वांना दैववादी बनविलेलं आहे, आणि या कारणानं आपण आपल्या राष्ट्राचा अभ्युदय घडवून आणण्यास नालायक झालों आहोंत. माझे मित्र डॉ. राधाकृष्णन् या

व्यासपीठावर नाहीत हें बरं आहे. माणसाला दैववादी बनविणारं तत्त्वज्ञान आज आपल्याला नको आहे. फलाची आसक्ति न ठेवता कर्म करीत राहण्याचा गीतेचा उपदेशदेखील मला रुचत नाही. माणसानं जें कर्म करायचं तें यश मिळविण्याच्या जिद्दीनंच केलं पाहिजे. यशप्राप्ति झाली, की जी आनंदाची धुंदी अंगावर येते तिचा आस्वाद माणसानं जरूर घेतला पाहिजे. यासाठी तरुण पिढीला मी असाच उपदेश करीन, की यशाच्या आनंदानं धुंद होण्यासाठीच सतत कर्म करीत राहा ."

त्यांच्या व्याख्यानांतील दुसरा एक सुंदर विचार आठवतो तो हा, की " गुरूच्या पायांना स्पर्श करून विभूति कपाळीं लावणारा आणि गुरूची वैयक्तिक सेवा करणारा शिष्य आता इतिहासजमा झालेला आहे. आजच्या कालांत शिष्य हवेत ते असे, की जे आपल्या अमर्याद जिज्ञासेनं गुरूला अधिकाधिक कार्यप्रवण करतील ! ज्यांना ज्ञानाचं शिखर गाठण्यासाठी उंच उंच चढण्याची धमक आहे आणि जे पाऊल निसटलं, तोल गेला की गुरूच्या हाताचा आधार हक्कानं मागतील ! "

व्याख्यानाच्या अखेरीस तर सर रमण यांच्या बोलण्यांत काव्याचा मोठा मनोज्ञ विलास दिसला. ते म्हणाले, " ज्यांनी या संस्थेचा पाया घातला त्यांचं मोठेपण आपण मान्य करूं. संस्थेनं गेल्या पन्नास वर्षांत जें कार्य केलं तेंहि बहुमोल म्हणूं. परंतु आपली नजर भविष्यकाळांतल्या पराक्रमाकडे असायला हवी. या महाराष्ट्रानं एके काळीं भारतांत साम्राज्य गाजविलेलं आहे. आपल्याला अधिकाधिक उज्ज्वल कार्यांचीं अशीं अत्युंग शिखरं निर्माण करायचीं आहेत, की कित्येक पिढ्यांच्या अंतरावरूनहि तीं शिखरं दिसतील. हिमालय पर्वताचा तळ विस्तीर्ण आणि भव्य खरा, परंतु कित्येक मैलांवरून दिसतात तीं त्या नगाधिराजाचीं बर्फाच्छादित, उन्हांत चमचम करणारीं, गगनचुंबी शिखरं ! "



श्रीनिवास शास्त्री यांचं वक्तृत्व फार वरच्या दर्जाचं होतं. राधाकृष्णन् तत्त्वज्ञ आहेत, सर रमण शास्त्रज्ञ आहेत, तर नामदार शास्त्री राजकीय पुढारी होते. चळवळ्ये होते असं मी मुद्दामच म्हटलं नाही. कारण ज्या अर्थानं 'चळवळ' हा शब्द सामान्यतः वापरला जातो, त्या अर्थानं कोणत्याहि राजकीय चळवळीचा नेतेपणा शास्त्रींनी कधी केला नाही. ज्या, सर्व्हंट्स ऑफ् इंडिया सोसायटी' चं सूत्रचालकत्व नामदार गोखल्यांच्या पश्चात् शास्त्रींकडे आलं होतं ती संस्थाच प्रायः धकाधकीच्या चळवळीपासून दूर राहिली होती. मात्र असं असलं तरी-देखील हिंदी राजकारणाच्या क्षेत्रांत नामदार श्रीनिवास शास्त्री या नांवाला फार महत्त्व होतं. देशांत घडणाऱ्या प्रत्येक लहान मोठ्या घटनेबद्दल शास्त्री काय म्हणतात त्याकडे राजकारणी पुरुषांचं, सरकारचं आणि कांही अंशीं सामान्य जनतेचंहि लक्ष असे. या अर्थानं शास्त्रींची गणना त्यांच्या काळां-तील प्रमुख पुढाऱ्यांत केली पाहिजे. त्यांच्या पांडित्याची आणि वक्तृत्वाची कीर्ति तर फारच मोठी होती.

त्यांची मूर्ति धिप्पाड नव्हती, परंतु मजबूत होती. आणि दर्शन विशेष प्रसन्न होतं. ते प्रसंगविशेषीं किमती कापडाचा काळा कोट घालीत. परंतु

बहुधा त्यांचा पोषाख शुभ्र असे. मात्र तो अगदी परीटघडीचा आणि देखणा असे. त्यांच्या हातांत बहुधा काठी असे, आणि व्याख्यानाच्या वेळेस ती त्यांच्यापुढे टेबलावर आडवी पडलेली असे. दाक्षिणात्य रीतीप्रमाणे मिशा बोडलेल्या असत, आणि त्यांच्या ओठांची करारी ठेवण विशेषच स्पष्टपणानं दिसत असे. त्यांचे डोळे फार मोठे होते असं म्हणता येणार नाही. परंतु नासिकेचा सरळपणा आणि भालप्रदेशाचा रुंदपणा यांमुळे त्यांचा चेहरा सौम्य असला तरी बुद्धिमत्तेच्या तेजानं खुललेला दिसे. त्यांच्या डोक्यावरच्या मद्रासी पद्धतीच्या पागोट्यांत जरीची काडी कधी दिसली नाही. त्यांचे हात-वारे अगदीच माफक असत. सर सी. व्ही. रमण यांच्याप्रमाणेच शास्त्रींचा जन्महि तंजावर प्रांतांतलाच, आणि शास्त्रींची वाणी वेदघोष करणाऱ्या ब्राह्मण कुलोत्पन्नाला शोभेल अशी अत्यंत शुद्ध आणि खणखणीत होती. नेमस्त पक्षाचा नेता म्हटला, की त्याच्या वक्तृत्वाचा आवेशहि नेमस्त असला पाहिजे असं कांही नाही. त्या काळांत वक्तृत्वाची जी तऱ्हा ‘ चालू नाणं ’ होती तिच्यांत नाटकी आवेशाला प्राधान्य होतं. उंच आवाजांत ओरडून, दोन्ही हातांच्या करवतींनी हवा कापीत बोलण्याची प्रथा रूढ होती. सुरेंद्र-नाथ बानर्जी हे तर व्याख्यान देतांना व्यासपीठावर एखाद्या वन्य पशूसारखे येरझारा घालीत असत, आणि त्यांच्या आवाजाचा पल्ला असा कांही अद्वि-तीय होता, की ज्या ठिकाणीं ते बोलत असतील तेथून दोन तीन फर्लांगांच्या अंतरावरच्या माणसानं ( त्या काळांत दूरध्वनिक्षेपक नव्हते ! ) तें ऐकावं, आणि त्यांतला शब्द न् शब्द टिपून घ्यावा.

या तुलनेनं पाहिलं तर शास्त्रींची वक्तृत्वशैली सौम्य, शांत होती. मात्र त्या शांतपणांत एक प्रकारच्या धीरोदात्तपणाचाहि प्रत्यय स्पष्टपणे येत असे. त्यांच्या इंग्रजी भाषणाची मोहिनी नक्की कशांत होती याचं उत्तर द्यायचं म्हटलं, तर दोन गुणांचा उल्लेख करावा लागेल. एक अस्खलित शुद्ध वाणीचा नादगुण; आणि दुसरा अत्यंत निर्मळ, साध्या आणि व्याकरण-दृष्ट्या बिनचूक भाषाशैलीचा गुण. पेलायला कठिण अशीं अवजड प्रदीर्घ वाक्यं चुकूनदेखील ते वापरीत नसत; आणि मुख्य म्हणजे साध्या सुटसुटीत वाक्यांची रचना इतकी शुद्ध असे, की इंग्रज माणसालादेखील त्यांत चूक काढता येऊं नये. शास्त्री एकदा शाळामास्तर होते, आणि ‘ जन्मभरचा

शाळामास्तर ' असा ते स्वतःचा कित्येक व्याख्यानांत अभिमानानं उल्लेख करीत असत. गांधीजी येवढे उत्तम इंग्रजी लिहिणारे, परंतु एकदा त्यांच्या ' यंग इंडियां ' तला त्यांचा एक लेख तपासून दुरुस्त करून शास्त्रींनी त्यांच्याकडे धाडला होता, त्या वेळेस त्या दोन मित्रांत जो खेळीमेळीचा विनोदी पत्रव्यवहार झाला तो पुष्कळांना आठवत असेल. लेखनांतील चुकांवर इतक्या कडक रीतीनं नजर ठेवणाऱ्या शास्त्रींच्या व्याख्यानाची भाषा म्हणजे इंग्रजी गद्याचा एक सुंदर नमुना वाटत असे यांत आश्चर्य नाही.

शास्त्री नेमस्त राजकारणाचे सूत्रधार होते. याचा अर्थ भारताच्या स्वातंत्र्याची त्यांची कळकळ तीव्र नव्हती असा करता येणार नाही. प्रसंगविशेषीं ही त्यांची कळकळ डिवचली जाई, आणि मग टिळकांना किंवा गांधींना शोभेल अशा तेजस्वी निस्पृहपणानं त्यांचं व्याख्यान उजळून निघे. १९२१ सालीं लंडन शहराच्या कॉर्पोरेशनकडून शास्त्रींना ' फ्रीडम ऑफ् दि सिटी ' चं सन्मानपत्र अर्पण करण्यांत आलं तेव्हा उत्तरादाखल भाषण करतांना ते म्हणाले :

" हें सन्मानपत्र आपण मला देत आहांत याचा अर्थ मी असा करतो, की हिंदुस्थानला लवकरच स्वातंत्र्य देऊन राष्ट्रकुलांतील एक बरोबरीचा घटक म्हणून त्याचा सन्मान आपण करणार आहांत, त्याची ही प्रस्तावना आहे. ब्रिटिश राष्ट्रकुलांत वर्ण, धर्म, जात इत्यादि भेद असता कामा नयेत. माझ्या देशांत जगन्नाथाचं मंदिर प्रसिद्ध आहे. त्या ठिकाणीं पूजा करण्याचं स्वातंत्र्य ब्राह्मणांना, अस्पृश्यांना सगळ्यांना आहे. ब्रिटिश राष्ट्रकुल म्हणजे स्वातंत्र्याचं मंदिर आहे. या मंदिरांत कुणी कुणाच्या स्वातंत्र्याच्या आड येता कामा नये. तुम्ही ब्रिटिश लोक जर असं म्हणूं लागलात, की ज्या आमच्या वैभवाचा इतिहास आमच्या पूर्वजांनी व आम्ही घडविला आहे, त्यांत आम्ही कुणाला वाटा देणार नाही—तो वाटा वाटल्यास हिसकून घ्यावा, परंतु सुखासुखी मिळणार नाही— तर ती अत्यंत विपरीत आणि नामुष्कीची गोष्ट म्हणावी लागेल. खऱ्या आरोग्याचा उपभोग घ्यायचा म्हटला तर केवळ स्वतःचं घर स्वच्छ ठेवून भागत नाही, तर शेजाऱ्यापाजाऱ्यांचीं घरंहि स्वच्छ राहतील असं केलं पाहिजे. स्वातंत्र्याची गोष्टहि अशीच आहे. दुसऱ्याला पारतंत्र्यांत ठेवल्यानं कोणत्याहि देशाला खऱ्या स्वातंत्र्याचा उपभोग घेता येत नाही. सभ्य स्त्रीपुरुषहो, लोकशाहीच्या आदर्श संस्था तुम्ही निर्माण केल्या आहेत

खऱ्या, परंतु संचित धनाकडे केवळ एखाद्या रखवालदाराच्या वृत्तीनं बघणाऱ्या कृपणाची दृष्टि ठेवूं नका. या धनांत इतर देशांना वाटेकरी करा. भावी इतिहासकारानं तुमच्याबद्दल असं लिहूं नये, की तुम्ही स्वातंत्र्याचा उपभोग एकट्यानं घेतला. उलट त्या इतिहासकारानं असं लिहावं, की वर्णानं, जातीनं, संस्कृतीनं भिन्न अशा हिंदी लोकांवर इंग्लंडनं प्रभुत्व मिळविलं, त्या लोकांना साम्राज्यांत सहभागी होण्याचं शिक्षण दिलं, आणि जेव्हा योग्य काळ प्राप्त झाला आणि हिंदी लोक राज्यकारभाराला लायक झाले तेव्हा इंग्लंडनं स्वतःची साम्राज्यतृष्णा सोडून दिली, आणि ब्रिटिश साम्राज्यांत भारतीयांनी मांडीला मांडी लावून बसावं अशी सन्मानाची जागा त्यांनीं आनंदानं व तत्परतेनं दिली ! ”

* * *



# १२ : पंडित जवाहरलाल नेहरू

भारतभूमीच्या रंगमंचावर स्वातंत्र्यसंग्रामाचं जें प्रदीर्घ महान् नाट्य झालं त्यांत चित्त थरारून सोडणारे अनेक प्रसंग झाले. परंतु सर्वांत संस्मरणीय आणि स्फूर्तिप्रद प्रसंग माझ्या मतानं कोणता म्हणाल तर १९२९ सालीं लाहोर येथील काँग्रेसच्या अधिवेशनांत रावी नदीच्या तीरावर तारीख ३१ डिसेंबर रोजीं रात्री बरोबर बाराच्या ठोक्याला अधिवेशनाचे अध्यक्ष श्री. जवाहरलाल नेहरू यांनी स्वतंत्र भारताचा झंडा उभारला तेव्हाचा प्रसंग !

"स्वातंत्र हा आमचा जन्मसिद्ध हक्क असून चालू राजसत्तेखालीं आमच्या राष्ट्राचा विकास योग्य प्रकारे होत नसेल तर ती सत्ता बदलण्याचा किंवा नष्ट करण्याचाहि आम्हांला स्वयंभू हक्क आहे असं आम्ही मानतों. या घटके-पासून आम्ही स्वतंत्र झालों आहोंत असं आम्ही समजतों, आणि आमच्या देशाचं स्वातंत्र्य असंदिग्ध शब्दांत जाहीर करतों !" अशी गंभीर प्रतिज्ञा एखाद्या पवित्र मंत्रघोषाप्रमाणे जवाहरलाल नेहरूंनी तीस हजार लोकांकडून म्हणवून घेतली ! पुढे १९४७ सालीं भारताचं स्वातंत्र्य प्रत्यक्षांत आलं, परंतु त्याच्या आधीच अठरा वर्षं हिंदी स्वातंत्र्याचा झंडा फडकाविला जाऊन हिंदी

जनतेच्या मुखांतून 'आम्ही या क्षणापासून स्वतंत्र झालों असेंच आम्ही मनानं समजतों !' अशी घोषणा बाहेर पडली होती. आणि लोकांकडून हा महामंत्र वदवून घेणारा पुरोहित दुसरा कुणी नव्हता, तर चाळीस वर्षांचे, मध्य वयाच्या उंबरठ्याजवळ उभे असलेले, जवाहरलाल नेहरू होते. ज्या घटकेला रावी नदीच्या तीरावर नेहरूंनी तीस हजार हिंदी लोकांकडून स्वातंत्र्याच्या प्रखर प्रतिज्ञेचा जयघोष करवून घेतला त्या घटकेला अखिल भारतीय पुढारी आणि गांधींच्या पराक्रमाच्या आणि लोकप्रियतेच्या गादीचे वारस म्हणून जवाहरलाल नेहरू यांचा जन्म झाला. एक इंग्रजी चारित्रकार म्हणतो : "Politically Jawaharlal had arrived !"

या प्रसंगाला तीस वर्षे होऊन गेली आहेत, आणि या अवधींत जवाहरलाल नेहरू यांचा कीर्तिचंद्र एकेका कलेनं वाढतच गेलेला आहे. या वाढत्या लौकिकाचीं कारण उघड आहेत. ज्यांचा वारसा नेहरूंकडे आला त्या गांधींचं वर्णन एका इंग्रज लेखकानं एकदा असं केलं, कीं "Mahatma Gandhi is an enigma, and the sooner the world comes to terms with him the better !" म्हणजे महात्मा गांधी हा एक रहस्यमय कूटप्रश्न असून या गृहस्थाविषयीं जगानं सम्यक् ज्ञान शक्य तितक्या लवकर करून घ्यावं हें बरं. कूटप्रश्न अशा शब्दांनी नेहरूंचं वर्णन करावं लागेल असं वाटत नाही. गांधीजी केव्हा काय करतील आणि केव्हा काय बोलतील याचा निकटवर्तीयांनादेखील निश्चित अंदाज करता येत नसे. ज्यांच्या संकल्पाची आणि कृत्यांची कुंडली कुणालाच मांडता येत नव्हती असे ते गृहस्थ होते. नेहरूंची गोष्ट या कोटींतली नाही. त्यांच्या कीर्तीचीं कारण उघड आहेत. देशाच्या प्रतिष्ठेबद्दलची जिद्द, देशबांधवांच्या सहृदयतेबद्दलची आणि सामर्थ्या-बद्दलची खात्री, देशसेवेची तळमळ, त्याग, निर्भयता, कठोरता आणि मृदुताहि, हे त्यांचे गुण उघड उघड आहेत. त्यांचा व्यासंग, मौलिक विचारांची झेप, आणि लेखणीचं सामर्थ्य या गोष्टीहि जगमान्य झालेल्या आहेत. या विविध गुणांच्या जोडीला त्यांच्या ठिकाणीं वक्तृत्वाची दुर्मिळ शक्ति आहे, आणि या सर्व गुणांना ज्यामुळे अपूर्व उजळा मिळावा असं सुस्वरूप निसर्गानं त्यांना दिलेलं आहे. एका अमेरिकन लेखकानं 'जगांतला सर्वांत सुंदर वक्ता' असं त्यांचं वर्णन करून पुढे लिहिलं आहे, की "जवाहरलाल

नेहरू इतके देखणे नसते तर त्यांच्या वक्तृत्वाची अशी मोहिनी लाख लाख, अर्धा अर्धा लाख लोकांच्या विराट सभांवर पडली असती की नाही, हा एक मोठा मनोरंजक मानसशास्त्रीय प्रश्न म्हणावा लागेल. मात्र कित्येकदा मला वाटतं, की नेहरूंचं वक्तृत्व ज्या वेळेस कानांवर पडत असतं त्या वेळेस त्यांच्या आंतरिक आवेशानं ते अधिकच नयनमनोहर भासूं लागतात!"

नेहरूंना मी अगदीं जवळून पाहिलं, आणि त्यांचं भाषण ऐकलं, त्याला किती तरी वर्षं झालीं. नक्की प्रसंग कोणता होता तें आता मला आठवत नाही. परंतु भुलाभाई देसाई यांच्या बंगल्यावर सारे थोर थोर कॉंग्रेसचे पुढारी जमले होते. गांधीजी यायचे होते, आणि त्यांचीच वाट बघत ही मंडळी कुणी आंतल्या हॉलमध्ये, कुणी बाहेरच्या पायऱ्यांवर हास्यविनोद करीत होती. श्री. स. का. पाटील यांच्याबरोबर मी गेलों होतों. करवीर नगर-वाचन मंदिराचा मोठा उत्सव आम्ही करणार होतों, आणि व्याख्यानासाठीं मोटमोठे वक्ते–जमल्यास नेहरूदेखील–पकडण्याची कामगिरी मी पत्करली होती. श्री. पाटील यांनी मला एकदम नेहरूंपुढे नेऊन उभं केलं, आणि त्यांना माझा परिचय करून देऊन माझा हेतु त्यांच्या कानांवर घातला. 'महाराष्ट्राचे एक नामवंत लेखक व कादंबरीकार, व अत्यंत यशस्वी प्राध्यापक' असे श्री. पाटील यांच्या तोंडचे शब्द ऐकून मी मान खाली घातली. मनाच्या विलक्षण गोंधळामुळे मान वर करून नेहरूंकडे बघायला मला किती तरी वेळ लागला. परंतु जेव्हा पाहिलं तेव्हा नेहरू हसत होते. अलीकडच्या लोकांच्या परिचयाच्या नेहरूंहून त्या वेळी मला दिसलेले नेहरू किती तरी वेगळे होते! त्यांच्या पायांत चप्पल होती. खादीचं धोतर नेसण्याची तऱ्हा कांहीशी छाकटी आणि ऐटबाज होती. अंगांत लांबलचक घोळदार बाह्यांचा नेहरूशर्ट होता. शर्टवर पिंगट रंगाचं गरम खादीचं जाकीट होतं. अलीकडेच एका अमेरिकन वृत्तपत्रकारानं असं वर्णन केलेलं आहे, की "गांधी टोपीला राजभूषणाचं सौंदर्य येत असेल तर तें नेहरूंच्या डोक्यावर!" नेहरूंच्या मस्तकाकडे पाहतां असंच कांहीसं वाटलं. टोपींतून बाहेर डोकावणारा त्यांचा केशकलाप त्या वेळेस दाट होता; आणि त्यांत चंदेरी रंग तुरळकच होता. दंतपंक्ति मला अत्यंत रेखीव वाटली, आणि त्यांच्या तोंडावरचं हास्य आणि त्यांची विलोभनीय अंगकांति बघतच राहावंसं मला वाटलं.

त्याच दिवशीं त्यांचं व्याख्यान मी प्रथम ऐकलं. तें जाहीर व्याख्यान नव्हतं. काँग्रेसच्या कार्यकारी मंडळाच्या बैठकींत ते बोलत होते, परंतु मी नंतर ऐकलेल्या त्यांच्या जाहीर भाषणांत जे गुण मला दिसले तेच त्या दिवशींदेखील दिसले. तें ऐकतांना मी मनाशीं विचार करीत होतों, नेहरू मैदानी वक्ते आहेत काय ? नाहीत. नेहरूंचा आवाज मोठ्या पल्ल्याचा आहे काय ? नाही. श्रुतिमनोहर आहे काय ? नाही. त्यांच्या आवाजांत एक चमत्कारिक अनुनासिकत्व आहे, आणि एखाद्या लाकडी खोक्यांतून आल्यासारखा तो भासतो. भाषणांत ओघ आहे काय ? आहे. परंतु खडकाळ जागेंतून वाहणारा जलौघ मधेच वेगानं वाहतो, मधेच आडकाठी आली की थांबतो, तुंबतो, आणि तुंबल्यामुळेच पुन्हा वाहूं लागतो, तशांतलाच तो ओघ आहे. जणु त्यांच्या मनांत येणारे विचार मधेच द्रुतगतीनं येतात, एखाद्या कल्पनेशीं कुंठित होतात, आणि विचारसरणीला पडलेली निरगाठ सुटली की पुन्हा वेगानं धावूं लागतात; आणि विचारांच्या त्या त्या अवस्थेला अनुसरून त्यांच्या भाषेचा वेग दुणावतो किंवा उणावतो. मात्र त्यांच्या बोलण्याची मोहिनी अशी, की त्यांचं तें अडखळणंदेखील अलंकारासारखं वाटतं. नेहरूंचे उच्चार अगदी अस्सल इंग्रजी आहेत काय ? नाहींत. परंतु त्या उच्चारांत झोक आणि नाट्य मात्र आहे. मधूनच एखाद्या इंग्रजी शब्दाचा उच्चार शब्दकोशांतल्या काटेकोर उच्चाराप्रमाणे करण्याऐवजी कांहीशा निराळ्या लकबीनं करून ते नखरेबाजपणा आणतात. ‘Towards’ चा उच्चार ‘टोअर्ड्‌स’ असा न करता ‘टूअर्ड्‌स’ असा ते करतील. किंवा ‘Curious’ चा उच्चार ‘क्यूरिअस’ असा करण्याऐवजी किंचित् ‘ओ’कार घालून ‘क्योरिअस’ असा करतील. मी असं बघितलेलं आहे, की शब्दकोशांतल्या शास्त्रोक्त उच्चारांत फरक करण्याचं स्वातंत्र्य घेऊन नटवेपणा आणण्याची चांगल्या चांगल्या इंग्रजी वक्त्यांची रीतच आहे. एखादी रागिणी गातांना मधेच वर्ज्य स्वर लावून रंजकता वाढविण्याची गायकांची जशी युक्ति आहे तशीच इंग्रजी वक्तृत्वांतली ही युक्ति म्हणावी लागेल.

नेहरूंची इंग्रजी भाषा नामदार शास्त्रींच्या किंवा गांधींच्या भाषेइतकी निर्मळ किंवा बिनचुक नसते. परंतु तिच्यांत जुनेपणा नसतो. बिलकुल आधुनिक खुसखुशीतपणा विपुल असतो; आणि मुख्य म्हणजे ती एका कलावंताची भाषा

आहे याचा प्रत्यय वारंवार येतो. ते मुळी कधी कधी भाषणाची सुरुवातच अशा थाटाची करतात, की हा वक्ता केवळ जनतेचा नेता, राजकारणी मुत्सद्दी नसून हाडाचा कलावंत आहे ही गोष्ट श्रोत्यांना तात्रडतोब पटते. कांहीं वर्षांपूर्वीं भांडारकर रीसर्च इन्स्टिटयूटच्या उत्सवाचे मुख्य पाहुणे म्हणून ते आले होते, तेव्हाच्या भाषणांतलं त्यांचं पाहिलं वाक्य मला अजून आठवतं. ते असं होतं. " I accepted your invitation most readily and gladly because it gave me an apportunity to ccme to a place far away from the dust and tumult of politics !" ( आपल्या आमंत्रणाचा स्वीकार मी मोठ्या आनंदानं आणि तत्परतेनं केला तो अशासाठी, की राजकारणाच्या धुळवडीपासून आणि धकाधकीपासून दूर असलेल्या या स्थळीं येण्याची संधि आपण मला दिलीत ! ) याच व्याख्यानांत नेहरूंनी असा एक विचार मांडला, की " मला महाभारताची थोरवी वाटते ती त्यांत वीरांच्या पराक्रमांचीं, मुत्सद्यांच्या राजकीय झटापटींचीं, युद्धांचीं, यज्ञांचीं, द्यूतांचीं वर्णनं आहेत त्यासाठी नव्हे ; तर भारतीय लोकांच्या थोर विचारांचा ठेवा या महाकाव्यांत आहे यासाठी ! " या प्रसंगीचं त्यांचं भाषण लहानच परंतु हृद्य आणि नमुनेदार झालं ! त्या भाषणांत कवि हृदयाचे कलावंत नेहरू मला दिसले.

व्याख्यानाच्या वेळेस नेहरूंचे हातवारे संयमित असतात असं म्हणता येणार नाही. वृत्तीचा चेव हा त्यांचा स्थायी धर्म आहे, आणि त्यांनी तो आवरूं म्हटलं तरी त्यांना तो आवरता येणार नाही. लांब लांब टांगा टाकीत सभास्थानीं येणं, एखाद्या चित्त्यासारखी उंच व्यासपीठावर झेप घेणं, मायक्रोफोन पकडणं आणि हातांतच ठेवणं, अशा अनावर उत्साहाच्या आणि उतावळीच्या क्रिया त्यांना टाळताच येणार नाहीत. आणि तीच गोष्ट त्यांच्या हातवाऱ्यांची ! बोलता बोलता मधेच उजव्या कानामागची जागा खाजविण्याची खोड त्यांना पूर्वीं होती असं मला आठवत नाही. मोठमोठे अमेरिकन वक्ते अशा प्रकारें कानामागे खाजवितात असं सिनेमांतल्या त्यांच्या दर्शनावरून दिसतं, आणि अमेरिकेंतल्या दौऱ्यांत ही लकब नेहरूंनी उचलली की काय अशी शंका येते. व्याख्यान देतांना ते अडखळले, की त्यांचा हात

कानामागे जातोच ! आणि अडखळण्याची निरगाठ सुटली, की ते वेगानं बोलूं लागतात, आणि मग त्यांचे हातवारेहि वाढतात.

नेहरूंच्या वक्तृत्वाचं खरं सामर्थ्य त्यांच्या विचारसरणीच्या स्वच्छपणांत आणि आधुनिकतेंत तर आहेच, परंतु त्यांची वाक्यरचना, त्यांचे उच्चार, आणि त्यांची कलात्मकता या गुणांनी तें सामर्थ्य द्विगुणित होतं. त्यांच्या अत्यंत प्रसन्न सुंदर दर्शनाबद्दल लिहिण्याचं कारणच नाही. कांही वर्षांपूर्वी कॉंग्रेसच्या अधिवेशनाच्या निमित्तानं ते नाशिक शहरीं गेले होते. तिथले कांही मित्र मला नंतर थट्टेनं सांगत होते, की 'नेहरूंच्या व्याख्यानाला जास्त गर्दी बायकांची ! खरोखर, नेहरू ज्या गावाला जातील तेथील पुरुषांनी आपापल्या बायका जरा संभाळायला हव्यात !' यांतला विनोदाचा भाग सोडून देऊं, परंतु येवढं खचित की नेहरूंच्या ठिकाणीं जें प्रसन्न व्यक्तिमत्व आहे तें लाखांतून एखाद्याच वक्त्याला लाभतं.

नेहरूंच्या नित्याच्या वागण्यांत जसा रागीटपणा कधी एकदम प्रकट होईल त्याचा नियम नाही, त्याचप्रमाणे त्यांच्या व्याख्यानांतहि तो कधी-कधी डोकं वर काढतो. या रागीटपणाचा प्रसाद त्यांच्या टीकाकारांना लोकसभेंत-देखील चाखावा लागतो. परंतु मला वाटतं, हा रागीटपणा म्हणजे त्यांच्या एका गुणाची अतिरंजित अवस्था आहे. तो गुण म्हणजे निष्कपटी सडेतोडपणा. त्यांच्या व्याख्यानांत कधी कधी या गुणाचा अनिर्बंध संचार सुरू होतो, आणि मग त्यांच्या वक्तृत्वशैलीला कांही एक निराळीच धार येते. १९५२ सालीं सप्टेंबरच्या १७ तारखेस अखिल भारतीय संपादक परिषद भरली होती. या परिषदेंत भाषण करतांना नेहरू म्हणाले,

" वृत्तपत्रांच्या स्वातंत्र्याबद्दल तुम्ही लोक नेहमी बोलतां. परंतु मला तुम्ही सांगा, स्वातंत्र्याच्या ऐसपैस नांवाखाली मन मानेल तें लिहून प्रसिद्ध करण्याची मोकळीक असावी काय ? वृत्तपत्र कोण काढतो आणि चालवितो ? ज्याच्याजवळ ज्ञान आणि शहाणपणा आहे तो ? की ज्याच्याजवळ पैसा आहे तो ? वृत्तपत्र म्हणजे अखेरीस सारा भांडवलाचा खेळ आहे. वृत्तपत्रांत पगारी नोकर म्हणून राहून लेखन करणारीं माणसं सरकारशीं भांडतांना स्वातंत्र्याचा मोठा बकवा करतात. परंतु ज्यांची नोकरी ते करतात ते मालक त्यांना विचार-स्वातंत्र्य अगर लेखनस्वातंत्र्य कितीसं देतात हें मला कुणी सांगेल काय ? ज्याच्या

जवळ भरपूर पैसा आहे त्याच्याजवळ सखोल शहाणपण, ज्ञान अगर, उच्च नीतीची चाड या गुणांचा बहुधा अभावच असतो. पत्राचा खप कसा वाढेल, आणि धंद्यांत घातलेल्या भांडवलाची दामदुप्पट कशी होईल येवढी एकच चिंता वृत्तपत्राच्या मालकांना असते. अशा व्यापारी धोरणानं चाललेल्या वृत्तपत्रांत— आणि बहुतेक मोठींमोठीं वृत्तपत्रं अशींच चाललेलीं आहेत हें तुम्हीदेखील कबूल कराल !—जनतेला कांही शिकविण्याच्या प्रयत्नापेक्षा चिथावणी देण्याचाच प्रयत्न अधिक असतो. सनसनाटी खोट्यानाट्या बातम्या आणि राजकीय घडामोडींवरील मूर्ख विकृत भाष्य यांनीच वृत्तपत्रं भरलेलीं असतात. यामुळे वृत्तपत्रांच्या स्वातंत्र्याचा अखेर अर्थ काय होतो ? तर असंतोष, वैमनस्य, शिवीगाळी, बीभत्सता, असत्य प्रचार यांचा निंद्य व्यापार करण्याऱ्या पोट-भरूचं आणि गल्लाभरूचं स्वातंत्र्य ! हें स्वातंत्र्य म्हणजे मोठी मोलाची गोष्ट समजतां येईल काय ? सारींच वृत्तपत्रं वाईट असतात असं माझं म्हणणं नाही. परंतु अपवाद फार थोडे आहेत. वृत्तपत्रांच्या टीकेला मी किंवा माझं सरकार भीत नाही. योग्य टीकेची इष्टतादेखील मला मान्यच आहे. परंतु एकंदर समाजाची अभिरुचि आणि नैतिक मूल्यांची आवड भलत्याच खालच्या पातळीवर नेण्याचा जो उद्योग वृत्तपत्रांनी चालविला आहे तो पाहून मी अस्वस्थ होतों. माझ्या मनांत येतं, या आरोग्यविघातक खमंग बौद्धिक खुराकावरच का देशांतील स्त्रीपुरुषांचीं मनं पुष्ट होणार आहेत ? सुंदर सुंदर ग्रंथ वाचण्याची लोकांची हौस कमी होत आहे. जे सखोल नाही पण चटकदार आहे, ज्यांत शहाणपण नाही पण चमत्कृति आहे, ज्यांत सहिष्णुता नाही, फक्त आक्रस्ताळेपणा आहे, ज्यांत संयम नाही, सत्य नाही, फक्त अतिरेक आणि असत्य आहे, असल्या लिखाणानं भरलेलीं वृत्तपत्रं रोज सकाळीं वाचण्याची आवड देशांत झपाट्यानं पसरत आहे हें अंतीं कल्याणकारक आहे काय ? देशाचा पंतप्रधान म्हणून हा विचार मी करीत नाही. एक सामान्य नागरिक या नात्यानचं करतों. नव्यानं येणारी तरुण पिढी बुद्धीनं आणि अंतःकरणानं सुदृढ व्हावी अशी मला कळकळ वाटते म्हणून करतो. वृत्तपत्रांचे मोठमोठे संपादक या सभेत बसलेले आहेत. त्यांनी हा विचार करावयास नको काय ? का नेहरू आता म्हातारे झाले असा शेरा मारून तुम्ही माझे विचार डावलणार आहांत ? स्वातंत्र्य हें साध्य

नसून साधन असतं. स्वातंत्र्याचा उपयोग कोणती गोष्ट साधण्यासाठी करणार आहांत हा प्रश्न अधिक महत्त्वाचा आहे. नुसतंच स्वातंत्र्य मागूं नका. त्याचा दुरुपयोग न करण्याची प्रतिज्ञा करा... ''

नेहरूंच्या जाहीर व्याख्यानांत किंवा लोकसभेंतील भाषणांत कित्येकदा असा सडेतोडपणा व तिखटपणा प्रकट होतो, याचं माझ्या मतें एक कारण आहे. टिळक आणि गांधीजी यांची सारी हयात गेली परकी सरकारशीं भांडण्यांत. स्वकीयांना छेडण्याची सवडच त्यांना मिळाली नाही. गांधीजी क्वचित् प्रसंगीं आपल्या अनुयायांचे दोष उघडपणें चव्हाट्यावर मांडीत असत, आणि त्यांना फैलावर घेतांना कमालीची कठोर भाषा वापरीत असत. परंतु हे प्रसंग सोडल्यास टिळकांप्रमाणेच त्यांनी मुख्य भूमिका केली ती सरकारच्या टीकाकाराचीच. स्वदेशाचा राज्यकारभार हाकण्याची भूमिका त्यांच्याकडे आलीच नाही. नेहरूंकडे मात्र ती भूमिका आलेली आहे, आणि त्यामुळे स्वकीयांचे दोष जिथे जिथे दिसतील तिथे तिथे जहाल भाषेच्या साहाय्यानं ज्यांचं चुकतं असेल त्यांच्यावर प्रहार करण्यावाचून त्यांना गत्यंतर उरत नाही.

पाकिस्तानशीं वागण्यांत भारत सरकारनं अधिक खंबीर धोरण ठेवावं या आक्षेपाला शांत सरळ उत्तर कितीदाहि दिलं तरी टीकाकार पुनः पुन्हा तोच आक्षेप काढतात हें पाहिल्यावर टीकाकारांच्या सद्धेतूची त्यांना शंका येते, आणि मग लोकसभेंत बोलतांना ते चिडून विचारतात, '' अहो, खंबीर धोरण खंबीर धोरण म्हणजे नक्की काय? सैन्य घेऊन पाकिस्तानवर चाल करून जावं असं का तुमचं म्हणणं आहे ? खरखरमुंड्या हटवादी प्रतिपक्षाशीं कसं वागावं ते आम्हांला कळत नाही, आम्ही बेअक्कल आहोंत अशी का सन्मान्य सभासदांची कल्पना आहे ? मुत्सद्दीपणाच्या गोष्टी आम्हांलाहि कळतात. त्याचे धडे आम्हांला कुणी द्यावे अशी गरज खचित नाही. पाकिस्तानविषयीचं आमचं धोरण दुबळेपणाचं, भित्रेपणाचं नाही. खंबीरपणाचंच आहे. परंतु प्रतिपक्षापुढेदेखील शक्यतों मैत्रीचा हातच पुढे केलेला असावा अशी माझ्या गुरूची—महात्माजींची—शिकवण आहे. तीव्र मतभेद निकालांत काढण्याचं साधन विचारविनिमय हेंच आहे, समशेर नाही. आणि मीं हजारदा सांगितलं तेंच पुन्हा सांगतों, की एकमेकाचे कायमचे वैरी म्हणून पाकिस्तान व भारत या दोन देशांनी वागून भागायचं नाही. माझं हें म्हणणं आज तुम्हांला पटायचं नाही,

परंतु काळाची साक्ष माझ्या बाजूची पडेल हें लक्षांत ठेवा... ” कश्मीरच्या प्रश्नावर बोलतांनादेखील त्यांच्या वक्तृत्वांत दूरदर्शीपणावरची श्रद्धा, आशावादित्व आणि उगाच कुचाळकी करण्याकरता टीकास्त्र उपसणाऱ्या विरोधकांविषयीची असहिष्णुता, अशा अनेक वृत्तींचं मिश्रण आढळून येतं.

तीस कोटि भारतीय जनतेच्या मूलभूत सत्प्रवृत्तींवर आणि सामर्थ्यावर नेहरूंचा अढळ विश्वास आहे, तो भाषणांत वारंवार प्रकट होत असतो. जनतेला आवाहन करतांना क्वचित् प्रसंगीं ते भावविवश झालेले दिसतात. ज्या दिवशीं भारताचं स्वातंत्र्य साकार झालं, आणि पंतप्रधानकीचीं वस्त्रं जवाहरलाल नेहरूंनी अंगावर चढविलीं त्या दिवशींच्या त्यांच्या भाषणांत भावविवशता साहजिकच दिसली. त्यांचं हें भाषण ऐकण्यासाठी लक्ष लक्ष घरांतलीं माणसं रेडिओपुढे बसलीं होतीं. १९४७ सालच्या ऑगस्ट महिन्याच्या चवदा तारखेची रात्र सरत आली होती. देशाच्या कानाकोपऱ्यांतल्या दूर-दूरच्या खेड्यापाड्यांतदेखील रोषणाई झाली होती. नवस्वातंत्र्याचं स्वागत करणारे स्त्रीपुरुष आनंदोत्सवांत मग्न होते. दिल्लीची राजधानी तर विलक्षण नटली होती. विद्युद्दीपांच्या झगझगाटानं उजळलेल्या रस्त्यारस्त्यांतून नटलेल्या थटलेल्या स्त्रीपुरुषांचे थवे हिंडत होते. लोकसभेच्या वर्तुळाकृति इमारतीभोवतीं तर गर्दीचा समुद्र हेलावत होता. आंतल्या सुसज्ज भव्य सभागृहांत खादीच्या शुभ्र वेषांतल्या लोकांची दाटी दिसत होती. वरच्या गॅलरींत स्त्रियांच्या रंगीबेरंगी पोषाखांचीं इंद्रधनुष्यं पसरलीं होतीं. घड्याळाचे दोन्ही काटे बाराच्या आकड्याकडे सरकत होते ... अखेर घटका भरली. पंधरा ऑगस्टच्या पहिल्या प्रहराचा पहिला क्षण आला ... सभागृहांत एकदम गंभीर स्तब्धता झाली ... कांहीशी सडपातळ, कांहीशी उंच, फिकट पण चमचमणाऱ्या मलायी रंगाची अचकन आणि शुभ्र गांधी टोपी अशा वेषांतली एक मूर्ति उभी राहिली. ते नेहरू होते. ते थकलेले दिसत होते. त्यांच्या भावपूर्ण मोठाल्या डोळयांखालच्या जागेवर काजळी दिसत होती. त्यांच्या कातीव चेहऱ्यावर शीण दिसत होता. त्यांच्या अचकनवरचं तांबड्या गुलाबाचं फूलदेखील कांहीसं सुकलेलं भासत होतं ... नेहरू बोलूं लागले; आणि त्यांची वाणी केवळ देशांतल्याच नव्हे तर दूरदूरच्या

परदेशांतल्या श्रोत्यांच्या कानांवर पडूं लागली. त्यांच्या तोंडचं पहिलंच वाक्य अत्यंत परिणामकारक होतं.

" किती तरी वर्षांपूर्वीं आमच्या दैवाशीं या भेटीचं हें स्थळ आणि ही घटका आम्ही ठरविली होती. आज ती भेट घडत आहे. आणि ज्या स्वातंत्र्याची प्रतिज्ञा आम्ही केली तें स्वातंत्र्य साकार होत आहे. बाहेरचं सारं जग निद्रेच्या आधीन झालेलं आहे. भारत जागृत आणि स्वतंत्र होत आहे. इतिहासांत असा एखादा क्षण मधूनच येतो, की ज्या क्षणीं एक युग संपतं, आणि दुसरं सुरू होतं ! ज्या क्षणीं वर्षानुवर्षं मुकेपणांत आणि गुलामगिरींत राहिलेलं राष्ट्र स्वतंत्र आणि बोलकं होतं. अशा या गंभीर आणि पवित्र क्षणीं भारतीय जनतेच्या, इतकंच नव्हे तर मानवजातीच्या सेवेची प्रतिज्ञा आम्ही करावयास हवी ! " ...नेहरूंच्या उत्कृष्ट भाषणांपैकी त्यांचं हें भाषण खचित होतं.

त्यांचं दुसरं एक भाषण मला अविस्मरणीय वाटतं तें गांधींच्या हत्येनंतर त्याच रात्रीं ते रेडिओवरून बोलले त्या वेळचं. याहि भाषणांत विचारांची उंची, तत्त्वज्ञानाचा स्पर्श, आशावादित्व, सहृदयता हे नेहरूंचे सर्व विशिष्ट गुण प्रकट झालेले आढळले. याहि भाषणांतलं पहिलंच वाक्य असं होतं, की जें कानीं पडतांच ऐकणाराच्या अंगावर रोमांच उभे राहावेत. नेहरू म्हणाले,

" आपल्या सर्वांच्या जीवनांतील प्रकाश गेला आहे ! चहूकडे अंधार दाटला आहे ! काय बोलावं, आणि कसं बोलावं तें मला समजत नाही. आपला परमप्रिय नेता, राष्ट्रपिता, ज्यांना ' बापू ' या नांवानं आम्ही संबोधीत होतों ते गांधी आपल्याला सोडून गेले आहेत. आपल्या दृष्टीला ते आता दिसणार नाहीत. दुःखाच्या घटकेला सांत्वनासाठी आणि संकटकाळीं मसलतीसाठी त्यांच्याकडे आम्ही धाव घेत असूं, पण ती आता घेता येणार नाही. दुर्दैवाचा हा प्रहार कठिण आहे, आणि हा प्रहार माझ्या एकट्याच्याच मस्तकावर झालेला नाही तर कोट्यवधि लोकांवर झालेला आहे. ज्यायोगें हा प्रहार सुसह्य वाटेल असं या जगांत कांही असणं शक्य नाही. प्रकाश गेला असं मीं म्हटलं, परंतु तसं म्हणणंहि चूक आहे. कारण या देशाला चैतन्य देणारा तो प्रकाश सामान्य नव्हता. यापुढेहि हजारों वर्षं तो प्रकाश भारतालाच नव्हे तर जगालादेखील दिसत राहील .... बापूंबद्दलचा शोक कितीहि आवरला तरी होणारच. कारण आपण सामान्य माणसं आहोंत. परंतु आपला शोक

बापूंना आवडणार नाही. त्यांनी एका महान् कार्याला स्वतःला वाहून घेतलं होतं, आणि अत्यंत प्रीतींतल्या व्यक्तीच्या मृत्यूच्या प्रसंगींदेखील त्यांनी आपल्या डोळ्यांत अश्रू उभे राहूं दिले नव्हते. त्यांनी दाखवून दिलेल्या मार्गानं जाण्याचा आपण निश्चय केला तर तेंच त्यांना अधिक आवडेल... त्यांच्या मृत्यूंतदेखील दिव्यत्व होतं, कलाकृतीचं सौंदर्य होतं. काळानं त्यांचा देह आपल्यांतून उचलून नेला आहे, परंतु त्यांचं कार्य अमर केलं आहे. ज्या पिढीनं गांधींना प्रत्यक्ष पाहिलं ती जाईल, परंतु भावी काळांतल्या कित्येक पिढ्यांवर गांधींच्या चरित्राचा परिणाम झालेला असेल. त्यांनी जें सामर्थ्य देशाला दिलेलं आहे तें एक दिवस किंवा एक वर्ष टिकणारं नव्हतं, तर हिंदी राष्ट्राच्या रक्तांतच तें भिनलेलं आहे. आणि म्हणून त्या सामर्थ्याला— आणि त्या सामर्थ्याच्या रूपानं स्वतः गांधींना !—काळाचा स्पर्श होऊं शकत नाही. बापू आणि बापूंचं कार्य अविनाशी आहेत !"

* * *



# १३ : शिवराम महादेव परांजपे

स्वदेशी, बहिष्कार आणि राष्ट्रीय शिक्षण या तीन सूत्रांचा उच्चार आणि आचार म्हणजे नेमस्त आणि जहाल या दोन पक्षांतील भेद दर्शविणारी जहाल पक्षाची विशिष्ट निशाणी होती. विसाव्या शतकाच्या पहिल्या दशकांत राष्ट्रीय सभेची सूत्रं आपल्या हातांत राहावीत म्हणून नेमस्त पक्ष आणि त्यांच्या हातून ती हिसकावून घेण्यासाठी जहाल पक्ष यांच्यांत रस्सीखेच चालली होती.

दोन्ही पक्षांना मिळवायचं होतं स्वराज्यच, पण नेमस्तांची विचारसरणी अशी होती, की अर्ज, विनंत्या, सामोपचार अशा मार्गांनी आपल्याला जें मिळायचं तें मिळेल, आणि आपण मिळवूं. जहाल पक्षाचं म्हणणं होतं, की हा मार्ग पुरे झाला. आता ज्यायोगें सरकारला कांही तरी चिमटा बसेल अशी प्रत्यक्ष कृति केली पाहिजे. स्वदेशी, बहिष्कार आणि राष्ट्रीय शिक्षण असा तिहेरी कार्यक्रम जहाल पक्षानं आखला. यांपैकी स्वदेशी आणि राष्ट्रीय शिक्षण हे दोन्ही कार्यक्रम शांततेचे आणि सात्विक होते. बहिष्काराची गोष्ट मात्र निराळी होती. त्यांत तामसीपणा होता, चढाई होती. सामान्य लोकांना चेतविण्याचा आणि संतोषविण्याचा नाट्यगुण होता. स्वदेशांत बनलेल्या

ग्रं. क्र. १०८५०

कापडाचे कपडे घालण्यापेक्षा विलायती कापडावर बहिष्कार घातल्यानं आपण थेट मँचेस्टरच्या लँकेशायरच्या गोऱ्या गिरणीवाल्यांवर एकप्रकारें हल्ला करीत आहोंत अशा जाणीवेचा आनंद मिळण्यासारखा होता! यांतूनच ज्या एका कल्पनेचा फाटा फुटला ती कल्पना अशी, की लोकांनीं नव्यानं विलायती कापड खरेदी करूं नये हें तर झालंच, पण विलायती कापडाचे कपडे आधीच केलेले आहेत त्यांचं काय करायचं?

विनायक दामोदर सावरकर यांच्या नेतृत्वाखाली कार्य करणाऱ्या राष्ट्रीय विचारांच्या विद्यार्थ्यांचा फर्ग्युसन कॉलेजमध्ये एक गट होता. सावरकरांनी कल्पना काढली, की जुन्या विलायती कपड्यांचा शांतपणानं त्याग करायचा यांत कांही अर्थ नाही, त्यांची जाहीर होळी करावी. शिवरामपंत परांजप्यांना ही कल्पना पसंत पडली. टिळकांनाहि ती कल्पना पटली. परंतु त्यांनी पुस्ती जोडली, की पांच दहा कपड्यांची होळी करण्यांत काय अर्थ आहे? शहरांत हिंडून गाडीभर कपडे जमवा. टिळकांची अशी आज्ञा होताच मग काय पाहिजे? सावरकर आणि त्यांचे सहकारी यांनी दारोदार फिरून गाडीभर विलायती कपडे जमविले. त्यांची शहरांतून मिरवणूक काढण्यांत आली, आणि अखेर गावाबाहेर होळी करण्यांत आली. होळी पेटल्यावर सावरकरांच्या कल्पनाशक्तीनं आणखी पुढे धाव घेतली, आणि त्यांनी असा बूट काढला, की या धगधगत्या हुताशनीच्या साक्षीनं भाषणं व्हावींत. टिळकांना ही गोष्ट फारशी पसंत नव्हती, परंतु त्यांनी सावरकरांच्या उत्साहावर पाणी घातलं नाही. त्यांचं भाषण चागलं झालं. परंतु या प्रसंगीं अविस्मरणीय भाषण केलं तें शिवरामपंत परांजपे यांनी.

व्याख्यान देता देता त्यांनीं अर्धवट जळलेला एक कोट होळींतून बाहेर काढला, हवेंत उंच धरला, आणि ते म्हणाले, “ या असल्या किती कोटांच्या किती खिशांतून गरीब हिंदुस्थानचा किती पैसा गोऱ्या गिरणीवाल्यांच्या खिशांत गेला असेल त्याला कांही सुमार! ” . . . रंगभूमीवरील एखाद्या नटाला शोभेल अशा आविर्भावानं उच्चारलेल्या त्या वाक्यांतून परोपरीच्या कविकल्पना, उपमा, दृष्टान्त, उपहास, उपरोध अशांचा आपला विशिष्ट मालमसाला परांजप्यांनी काढला. त्यांच्या जिभेवर सरस्वती नाचूं लागली. श्रोत्यांच्या भावना समोरच्या होळीप्रमाणेच त्यांनी चेतविल्या. अखेरीस ते

म्हणाले, “परक्यांना श्रीमंत आणि स्वकीयांना रंक करणारा असा हा कोट !”... त्यांनी पुन्हा कोट हवेंत उंच धरून त्याकडे बघितलं, आणि म्हटलं, “जा ! भस्म हो !” आणि पुन्हा नाटकी अभिनय करून तो कोट समोरच्या पेटलेल्या होळींत फेकून दिला !

शिवरामपंत परांजपे यांचं त्या प्रसंगींचं तें भाषण म्हणजे त्यांच्या वक्तृत्व-शैलीचा एक सुंदर नमुना म्हणावा लागेल. या प्रसंगीं त्यांनीं जें नाट्य केलं तें करण्याची संधि त्यांना नेहमीच मिळत असे असं नव्हे. परंतु अशा प्रकारचं नाट्य वजा केलं तरी नाट्याच्या इतर काय थोड्या तऱ्हा त्यांना अवगत होत्या ? आणि त्या तऱ्हा वापरून व्याख्यान सजविण्याचं त्यांचं कसब काय थोडं होतं ?

आधी मुळी शिवरामपंत परांजप्यांचं दर्शनच श्रोत्यांवर एकदम छाप टाकणारं होतं. त्यांच्याइतका सुदर्शनी वक्ता फार विरळा ! १९२० सालच्या गांधींच्या असहकारितेच्या चळवळीची दीक्षा त्यांनी घेतली, आणि तेव्हा-पासून जाडंभरडं खादीचं धोतर, अंगांत खादीचा सदरा, सदऱ्यावरच आडवी खांद्यावर घेतलेली जाड्याभरड्या उपरण्याची घडी आणि डोक्यावर खादीची टोपी अशा वेषांत ते व्यासपीठावर दिसूं लागले. त्यांच्या दर्शनांतला मूळचा भव्य रुबाब नाहींसा झाला. प्रत्येक नवीन नाटकांत भारी किमतीचे शालू, पैठणी किंवा उंची तलम रेशमी अगर मलमलीच्या साड्या नेसण्याचा षोक करणाऱ्या नटवर्य बालगंधर्वांना उद्देशून नाटककार गडकरी मास्तर म्हणाले होते, “मी तुमच्यासाठीं असं नाटक लिहीन, की तुमचा हा सारा विलासी षोक तुम्हांला झुगारून द्यावा लागेल, आणि जाडंभरडं लुगडं नेसून तुम्हांला जात्यावर दळत बसावं लागेल.” आपली ही प्रतिज्ञा मास्तरांनी आपल्या ‘एकच प्याला’ नाटकांत खरी करून दाखविली. गांधीजींनी शिवरामपंतांच्या बाबतींत असाच कांहींसा चमत्कार करून दाखविला. हात-सुताच्या जाड्याभरड्या खादीच्या पोषाखांतच फक्त ज्यांनीं शिवरामपंतांना पाहिलं त्यांनी खरे शिवरामपंत पाहिले नाहीत असंच मी म्हणेन. कुणीकडे १९२० सालानंतरचं परांजप्यांचं गबाळ्या पोषाखांतलं बेंगरूळ, बावळट दर्शन, आणि कुणीकडे त्यापूर्वींच्या काळांतलं त्यांचं राजबिंडं तेजस्वी दर्शन ! तें असं तसं दर्शन नव्हतं, तर श्रोत्यांच्या गर्दीला पहिल्या क्षणींच जिंकणारं,

व्याख्यानाचं अर्धं यश मिळविणारं भगवान श्रीकृष्णाच्या हातांतल्या चक्रासारखं ‘ सुदर्शन ’ होतं !

शिवरामपंत उंचीनं उणेपुरे होते, त्यांची देहयष्टि भरदार होती, खांदे आणि छाती रुंद होती, वर्ण काळासावळा होता, परंतु किंचित् लांबट असलेला चेहरा नाकीडोळी रेखीव आणि रुंद भालप्रदेशामुळे बुद्धिमत्तेची साक्ष देणारा आणि रुबाबदार होता. भालप्रदेशाची रुंदी दाखविण्यासाठीच जणुं लावलेलं उभं गंध, पेशवाईथाटाचा शानदार बंदाचा शुभ्र अंगरखा, पायांत लाल पुणेरी जोडा, खांद्यावर रुईफुली काठाचं उपरणं, डोक्याला मोतिया रंगाची अस्सल पुणेरी पगडी असा त्यांचा वेष असे. कानांतली घवघवीत भिकबाळी म्हणजे त्यांच्या ऐटबाज गुलछबू दर्शनावरचा पूर्णविरामच होता.

असे केवळ दर्शनानंच मोठी छाप पाडणारे शिवरामपंत व्याख्यान देऊं लागले, की त्यांची विशिष्ट वक्तृत्वशैली अनेक अंगांनी प्रकट होत असे. त्यांचा आवाज पहाडी नव्हता, परंतु मोठा होता ; आणि उच्चार अत्यंत स्पष्ट असून प्रसंगोचित रस निर्माण करण्याचं सामर्थ्य त्या उच्चारांत होतं. आवाजाचा वापर अत्यंत कसबीपणानं करणारा शिवरामपंतांइतका चतुर दुसरा मराठी वक्ता मी ऐकलेला नाही. आवाजाचा चढउतार ते अशा कांही चातुर्यानं करीत, की श्रोत्यांच्या वृत्ती त्यांच्या आवाजाबरोबर हेलकावे खात असत. त्यांच्या व्याख्यानांत वर्णनात्मक आणि काव्यात्मक अशा प्रकारचे प्रदीर्घ खंड येत असत, आणि अशा वेळीं ते उंच आवाजांत बोलत. परंतु मधेच त्यांना उपरोधात्मक छद्मी भाषण करण्याची लहर येई, आणि मग ते खालच्या पट्टींत आवाज लावीत. कितीकदा तर श्रोत्यांच्या कानांत कुजबुजल्याप्रमाणे ते बोलणं करीत. उजव्या हाताची तर्जनी उंच करून बोलत राहण्याची त्यांची लकब होती. मधून मधून डावा तळहात ते वर धरीत, आणि त्यावर तर्जनीचं टोक टेकण्याचा चाळा करीत. त्यांचं उंच आवाजांतलं बोलणंहि श्रुतिमनोहर असे. परंतु ते हळू आवाजांत बोलूं लागले म्हणजे त्यांच्या कांहीशा पातळ ओठांतून बाहेर पडणाऱ्या शब्दांना भलतंच माधुर्य प्राप्त होत असे. त्यांचे हातवारे अत्यंत माफक असत, परंतु वीर, करुण, हास्य, क्वचित् रुद्र अशा विविध रसांचा आविष्कार कांही अंशीं मुद्रेवरील अभिनयानं, परंतु बहुतांशीं

बोलण्याच्या ठसकेबाज तन्हेनं ते अगदी सहज करीत असत. अशा वेळीं त्यांचं वक्तृत्व ऐकतांना श्रोत्यांना भास होत असे, की आपण व्याख्यान ऐकत नसून रंगमंचावरील नाट्यच बघत आहोंत.

या गुणांच्या जोडीला भाषेवरील विलक्षण प्रभुत्व, आणि पहिल्या दर्जाच्या कवीनं ज्याचा हेवा करावा असा कल्पनाविलास शिवरामपंतांच्या ठिकाणीं होता. त्यांचं व्याख्यानं म्हणजे कमीत कमी दीड तासाची मेजवानी असायची. व्याख्यानाच्या विषयांत ते विशेष रंगले, की मग पुरेपूर दोन तास कसे निघून गेले त्याचं भान श्रोत्यांना राह्यचं नाही. कधी कधी त्यांनी जाहीर केलेला विषय वाचला की वाटे, या विषयावर परांजपे बोलणार आहेत तरी काय ? आणि किती वेळ ? फार तर अर्धा तास होईल त्यांचं व्याख्यान. एकदा शिवराज्याभिषेकोत्सवांत त्यांनी विषय जाहीर केला होता, 'श्रीशिवाजीमहाराजांनी केलेली भवानीची प्रार्थना.' हल्लीं ज्या ठिकाणीं पुण्यांत 'अलका टॉकीज' नांवाचं चित्रपटगृह आहे, ज्या ठिकाणीं संभाजी पुलाचं शहराकडलं टोक आहे, ज्या चौकांतला जुना विस्तीर्ण वटवृक्ष थोड्याच वर्षांपूर्वीं पाडून टाकला गेला, त्या चौकांतल्या विठ्ठलमंदिरांत शिवरामपंतांचं हें व्याख्यान झालं. ते व्याख्यानासाठी उभे राहिले. शिवाजीमहाराज व अफझुलखान यांची मुलाखांत प्रतापगडाच्या पायथ्याशीं होण्याचं कसं ठरलं त्याचं वर्णन त्यांनी केलं. त्या मुलाखतीची ऐतिहासिक व राजकीय पार्श्वभूमि आपल्या अमोघ वाणीनं उभी केली. ठरल्याप्रमाणे अफझुलखानाच्या भेटीसाठी जावयास निघण्यापूर्वीं शिवाजीमहाराजांनी भवानी मातेपुढे गुडघे टेकले असतील, नेत्र मिटले असतील, आणि चित्ताची एकाग्रता करून तिची प्रार्थना त्यांनी केली असेल, असं रसभरित वर्णन करून मग शिवाजीमहाराजांच्या मुखावाटे प्रार्थनेचे जे शब्द निघाले ते शिवरामपंत बोलूं लागले. व्याख्यानाचा मुख्य विषय अशा प्रकारें सुरू झाला. आणि मग दीड तासपर्यंत शिवाजीची ती प्रार्थना आम्ही ऐकत होतों. शिवाजीमहाराज त्यांचं कुलदैवत जी भवानीमाता तिच्यापुढे आपलं सारं हृद्गत सांगत होते. हिंदु समाजावर आणि स्वराज्यावर आलेल्या यवनांच्या संकटाचं वर्णन करीत होते, धर्मरक्षणासाठी सुरू केलेल्या आपल्या उद्योगाची हकीकत सांगत होते, आणि या उद्योगांत यश देण्याचं भवानी मातेला वरचेवर

आवाहन करीत होते ! शिवरामपंतांच्या त्या दिवशींच्या त्या व्याख्यानाचं वर्णन करण्यासाठी माझ्याजवळ खरोखर पुरेसे शब्द नाहीत. भाषेचा अपूर्व विलास, देशभक्तीचा आवेश काव्यकल्पनांची गर्दी, भावनोत्कटता इत्यादि त्यांच्या अंगचे सारे गुण त्या प्रसंगींच्या वक्तृत्वांत अगदी उचंबळून आले होते.

व्याख्यानाचा विषय श्रोत्यांच्या बुद्धीला पटवून देण्यापेक्षा त्या विषयाला अनुलक्षून उत्कट काव्याची भरारी घेण्याकडे त्यांच्या प्रतिभेचा कल अधिक असे. अशी एखादी भरारी त्यांना सुचली, की मग आपल्या भाषाविलासानं ते श्रोत्यांना घटका न् घटका गुंग करून सोडीत. ही काव्यक्रीडा त्यांना अधिक प्रिय होती, की व्याख्यानाच्या ओघांत सरकारला किंवा नेमस्तांना किंवा अँग्लो-इंडियन वृत्तपत्रकारांना श्रोत्यांच्या दृष्टीनं सर्वस्वी हास्यास्पद करून सोडण्याचा खेळ त्यांना अधिक आवडत होता हें सांगणं कठिण आहे. कारण हा खेळ ते खेळूं लागले म्हणजेदेखील त्यांच्या व्याख्यानाला विशेष रंग भरत असे. छद्मी भाषण म्हणजे वक्तृत्वाच्या शस्त्रागारांतील त्यांचं फार आवडतं आयुध होतं. हें आयुध हातांत घेऊन ते फिरवूं लागले, की लक्षणार्थानं विरोधकांचीं डोकीं धडापासून वेगळीं केल्याखेरीज त्यांना चैन पडत नसे. अन्योक्ति, वक्रोक्ति असे अलंकार वापरून विरोधकांचा विलक्षण मर्मभेदक उपहास ते करीत असत. हा करतांना त्यांच्या पातळ ओठांची जिव्हणी किंचित् विकसित होई तेवढीच, बाकी त्यांच्या तोंडावर हसूं कधी दिसायचं नाही. श्रोत्यांच्या मात्र हसता हसता मुरकुंड्या वळायच्या. पुण्यांत नाना फडणिसांचा उत्सव झाला. अर्थात् जहाल पक्षाच्या मंडळींनी तो केला. मवाळ पक्षाच्या वृत्तपत्रांनी टवाळी केली, की असल्या उत्सवांनी काय व्हायचं आहे ? या उत्सवांत शिवरामपंतांचं जें व्याख्यान झालं त्यांत मवाळांच्या या टीकेचा त्यांनी असा कांही समाचार घेतला, की पुसता सोय नाही. उत्सवाचं महत्त्व, तो करणारांची देशभक्ति, उत्सवांनी साध्य होणारी जागृति इत्यादींचं प्रतिपादन शिवरामपंतांनी केलं म्हणता काय ? मुळीच नाही. त्यांनी उलट असंच वेड पांघरलं, की असल्या उत्सवांत काही अर्थ नाही, यापासून कोणतीहि मोठी गोष्ट साध्य होणार नाही. अर्थात् सरकारनं भिण्याचं कांही कारण नाही, आणि ते बोलत गेले अशा थाटानं, की श्रोत्यांच्या मनावर नेमके विरुद्ध विचार ठसावे, आणि उत्सवाची टिंगल करणारे विरोधक महामूर्ख वाटावे. ते म्हणाले,

"असल्या उत्सवांनी लोकांत असंतोष वाढतो असं समजणारं सरकार खरोखर वेडं आहे. सरकारच्या मनांत आमच्याबद्दल कांही पाप येत असेल, परंतु आमच्या मनांत खरोखर सरकारबद्दल कांही पाप नाही. अशा उत्सवांना लोक येतात ते दोन्ही कान उघडे ठेवून. त्यामुळे एका कानांतून जें कांही आंत शिरतं तें दुसऱ्या कानानं पार बाहेर निघून जातं. त्यांतील एक थेंब-देखील हृदयाच्या बाजूला उतरत नाही. कारण दोन्ही कान एकमेकांच्या समोरासमोर असल्यामुळे जवळची वाट टाकून हृदयाच्या आडवाटेला कोण कशाला जाईल बरं? तेव्हा सरकारनं मवाळांचं म्हणणं प्रमाण धरावं, आणि या उत्सववाल्या लोकांवर पोलिसांचा, डिटेक्टिव्हांचा पहारा ठेवण्याचं बंद करावं. चार लोक एकत्र जमून हौसमौज करतात, खेळ खेळतात, बाजाच्या पेट्या वाजवितात. ते वाजविनात बापडे? त्यांच्या काळजीनं सरकारची झोप-मोड होण्याचं काय कारण आहे? लहान मुली भातुकली खेळतात, शाळेंतली मुलं पंतोजींचं सोंग आणून शाळेचं सोंग खेळतात, त्याप्रमाणे आम्ही जहाल पक्षांतील लोक राष्ट्रीय सभा, शिवाजी उत्सव, नानांची पुण्यतिथि असले खेळ खेळतों. आमच्या या खेळांच्यामुळे सरकार आपली झोपमोड करून घेऊं लागलं तर तें जाग्रणानं अगदी कृश होऊन जाईल. आमच्या या उत्सवांत देशाभिमान म्हणून जो दिसतो तो खरा देशाभिमान नव्हे, त्याची सावली मात्र आहे. सावलीला लहान मुलं भितात. आमच्या सरकारनं असल्या साव-लीला भिऊन दचकूं नये. हां! आमच्या सुधारकवीर नेमस्त बंधूंनी असा कांही उत्सव काढला, आणि सरकारच्या मर्जीचा कल पाहून केलेल्या भाष-णांनी तो गाजविला तर त्याबद्दल मात्र सरकारनं संभाळून असावं अशी आम्ही राजनिष्ठापूर्वक सूचना करतों!"

अशा प्रकारें विलक्षण छद्मी भाषणाची मौज श्रोत्यांकडून यथास्थित लुटविल्यावर मग मात्र शिवरामपंतांनी आपल्या व्याख्यानाला पुन्हा गांभीर्याची डूब कशी दिली, आणि अखेरी कशी केली तें पाहण्यासारखं होतं.

"शके १५७१ सालीं फाल्गुन वद्य द्वितीयेस तुकारामबुवा सदेह विमानांत बसून स्वर्गस्थ झाले. त्यानंतर दुसऱ्या वर्षीं तुकारामबुवांची भक्तमंडळी एकत्र जमून त्यांनी प्रतिवर्षीं फाल्गुन वद्य द्वितीयेला त्यांची पुण्यतिथि करण्याचा प्रघात सुरू केला. तेव्हा देवांना कांही वर्षं मोठी भीति पडली, की आता

या पुण्यतिथीच्या दिवशीं टाळ कुटून हे सगळे लोक आपल्या घाणेरड्या देहांसह स्वर्गांत येऊन गर्दी करतात की काय? पण अनुभवानं देवांची ही भीति निराधार ठरली! लक्षावधि टाळकुटे लोक साडेतीनशे वर्षे टाळांचा कीस पाडताहेत, आणि वीणांच्या तारा छेडताहेत, पण त्यांतून सदेह विमानांत बसून स्वर्गस्थ झालेला एक तरी आहे काय? या गोष्टीपासून आमच्या सरकारनंहि धडा शिकावा. त्यांनी राजकीय टाळकुट्यांना खुशाल टाळ कुटूं द्यावं. शिवाजीचा उत्सव करून शिवाजी उत्पन्न होणार नाही, किंवा नानांचा उत्सव करून नाना उत्पन्न होणार नाहीत. शिवाजी उत्पन्न झाला, त्यानं कोणत्या शिवाजीचा उत्सव केला? किंवा नानांनी आपल्या पूर्वी कोणत्या नानांची पुण्यतिथि साजरी केली होती? उत्सवांनी शिवाजी आणि नाना उत्पन्न होणार नाहीत. आणि ते उत्पन्न व्हायचेच असले तर सरकारचे गुप्त पोलीसच काय, सशस्त्र फौजादेखील त्यांना प्रतिबंध करूं शकणार नाहीत!"

एकदा एका व्याख्यानांत इंग्रजांच्या अंगीं शौर्यापेक्षा खोटं बोलून फसविण्याची कपटनीतीच अधिक आहे असा विषय निघाला, तेव्हा शिवरामपंतांनी छद्मी भाषणाची मोठी मौज केली. ते म्हणाले, "आजपर्यंत सर्व इंग्रजी मुत्सद्यांची भिस्त बंदुकीपेक्षा लबाडीवरच जास्त होती. नेटिव्ह लोकांना मारण्यापेक्षा फसविण्यामध्येच ते जास्त भूषण मानीत असत. मारण्यांत काय मोठेपणा आहे? पशुदेखील एकमेकांना मारतात. देवानं मनुष्याला बुद्धि दिली आहे ती कशाला? त्या बुद्धीनं मनुष्यानं मनुष्याला फसविलं नाही, आणि पशूप्रमाणे तो मारीतच सुटला, तर देवानं एवढी जी देणगी दिली तिचं काय चीज झालं बरं? असे सारे विचार मनांत आणून इंग्रज मुत्सद्यांनी मारणं आणि फसविणं यांपैकी फसविणंच जास्त पसंत केलं. शिवाय फसविण्यांत फायदा असा, की मारता फक्त एकदाच येतं, परंतु मनुष्य जिवंत असला, आणि ईश्वरी कृपेनं त्याच्या डोक्यांत त्याचा मूर्खपणा कायम असला म्हणजे त्याला वाटेल तितक्या वेळां फसवितां येतं. धर्मग्रंथांतून मनुष्यानं मनुष्याला मारूं नये अशी आज्ञा सांगितलेली आहे, फसवूं नये असा उल्लेख कुठेहि नाही. तेव्हा धर्मशास्त्राच्या दृष्टीनंसुद्धा मारण्यापेक्षा फसविणंच अधिक पुण्यकारक आहे. सारांश, १९५८ सालीं तुम्ही

हिंदुस्थानांतल्या लोकांना अमुक वचन दिलं होतं तें खरं करा असं आमच्या राज्यकर्त्यांना कुणीं म्हणूं नये. शब्दाला न जागण्याची, वेळोवेळीं खोटं बोलण्याची, आणि लोकांना सतत फसविण्याची नीति परोपकारी इंग्रजांनी ठरविली आहे तीच बरोबर आहे. ती ते कधी सोडणार नाहीत हें ध्यानांत घेऊनच त्यांच्याशीं स्वराज्यासाठी जो कांही मुकाबला करायचा असेल तो करणाऱ्यांनी करावा."

खरोखर असल्या उपहासगर्भ छद्मी वक्तृत्वाचे शिवरामपंत एकमेव बादशाह होऊन गेले!

मात्र गमतीखातर शिवरामपंतांना देवत्व देऊन त्यांची चतुर्भुज आकृति एखाद्या कल्पक चित्रकारानं काढली, व शंख-चक्र-गदा-पद्मांनी त्यांचे चार हात विभूषित केले तर त्यांच्या वक्तृत्वांतील कोणत्या चार गुणांचं हें चित्रण म्हणावं लागेल? मला वाटतं, अत्यंत स्वच्छ वाणीचं माधुर्य, निर्मळ रचनेच्या दीर्घ प्रदीर्घ वाक्यांचा मनोहर विलास, विरोधकाला घायाळ आणि हास्यास्पद करणारा व श्रोत्यांना खदखदून हसायला लावणारा विनोद, आणि सभेला मंत्रमुग्ध करून काव्यकल्पनांची आतषबाजी, हेच ते चार गुण म्हणावे लागतील! यांपैकी अखेरचा जो गुण सांगितला त्याचा प्रत्यय देणारं त्यांचं भाषण सुरू झालं, की त्यांच्या वाणीची भरारी मोठ्या लीलेनं संचार करूं लागे. अशा वेळेस त्यांचं व्याख्यान अगदी सामान्य श्रोत्यांच्या डोक्यावरून जात असेलहि. परंतु असा श्रोतादेखील केवळ त्यांच्या बोलण्यांतल्या नादमाधुर्यानं डोलूं लागत असेच! आणि वरच्या पातळीवरचे जे श्रोते असत त्यांना तर वाटूं लागे, की शिवरामपंतांचं हें भाषण कधी संपूंच नये.

एकदा श्रीरामदासनवमीच्या दिवशीं दिलेल्या व्याख्यानांत शिवरामपंतांनी असा विषय मांडला, की त्यांच्या दासबोधांतील कांही श्लोकांत त्यांच्या मनांतली निराशा व्यक्त झालेली आढळते, आणि अशा निराशेच्या वेळेस त्यांनी परमेश्वराची प्रार्थना केलेली दिसते. ते म्हणाले,

"स्वराज्यप्राप्तीसाठी स्वतः पुष्कळ प्रयत्न करून आणि लोकांना पुष्कळ उपदेश करूनहि कांही एक होत नाही असं पाहून अत्यंत निराश आणि उदासीन झालेले श्रीरामदासस्वामी कोठे तरी एकांतांत जाऊन बसले असतील, किंवा एखाद्या टेकडीच्या शिखरावर जाऊन उभे राहिले असतील, किंवा

एखाद्या प्रशान्त आणि गंभीर अशा नदीच्या काठीं अंग टाकून ते पडले असतील. ते दीर्घ श्वास टाकीत असतील, देशाच्या स्वतंत्रतेच्या दुष्प्राप्यतेकडे पाहून त्यांच्या डोळ्यांतून खळखळ अश्रू वाहूं लागले असतील. त्या वेळी त्यांना दिशा उदास दिसूं लागल्या असतील, सूर्य प्रकाशमान असताहि त्यांना जिकडे तिकडे अंधःकार पसरलेला दिसला असेल, 'हा स्वदेशा !' 'हा स्वतंत्रते !' असे उद्गार त्यांच्या बाष्पनिरुद्ध कंठामधून अडखळत अडखळत अनेक वेळा बाहेर निघाले असतील, आणि अखेरीस आता परमेश्वरावाचून कोठे कांही आधार नाही, त्याच्याच कृपेनं आपल्याला स्वतंत्रता मिळाली तर मिळेल असं वाटून त्यांच्या तोंडून श्लोक बाहेर पडला असेल–'जनीं भक्ति नाही, मनीं भाव नाही ! मला युक्ति ना बुद्धि कांहीच नाही । कृपाळूपणे राज्य रंकासि द्यावें ।। समर्था तुझें काय उत्तीर्ण व्हावें ।।"

अशा भावनोत्कट काव्याच्या वाक्गंगेंत श्रोत्यांना सचैल स्नान घडविणारा शिवरामपंत परांजप्यांसारखा वक्ता शतक अर्ध शतकांत एखादाच होऊन जातो. शिवरामपंतांचीं भाषणं ज्यांनी ऐकलीं त्यांनी स्वतःच्या भाग्याचा अभिमान मिरविला, आणि वर्णून सांगितला तर तो अगदी योग्यच म्हणावा लागेल.

* * *



# १४ : स्वातंत्र्यवीर सावरकर

'सावरकर सुटले!' या बातमीचे जाड अक्षरांतले मथळे साऱ्या वृत्तपत्रांत फडकले. आनंदाची आणि नवचैतन्याची लाट अखिल भारतांत चहूकडे पसरलेल्या सावरकरभक्तांच्या अंतःकरणांत उठली. हिंदुराष्ट्रवादाचा आणि हिंदुधर्म संघटनेचा अव्याहत निर्भय घोष करणारा जो महान नेता देशाच्या एका कोपऱ्यांत रत्नागिरीस स्थानबद्ध होऊनच वर्षानुवर्षे पडला होता तो आता मुक्त झाला होता! नेत्याची आणि अनुयायांची भरतभेट आता होणार होती! हिंदुत्वाचा प्रखर कैवार घेणारा पुरुष मार्गदर्शन करण्याकरिता मिळेल काय म्हणून कोट्यवधि भारतीय हिंदु जनता वाटच पाहत होती. देशांत राजकारणाच्या वातावरणाला विकृत स्वरूप येऊं लागलं होतं. जीनांच्या नेतृत्वाखाली मुसलमानांचा हटवाद दिवसेंदिवस वाढत होता. त्या हटवादाच्या आहारी जाण्याचा अधिकाधिक दुबळेपणा काँग्रेस करीत होती. हिंदूंचं एक राष्ट्र आणि मुसलमानांचं एक राष्ट्र अशीं दोन राष्ट्रं हिंदुस्थानांत आहेत या भूमिकेवरून मुसलमानांच्या हक्कासाठी भांडणाऱ्या जीनांचा शिरजोरपणा ब्रिटिश राज्यकर्त्यांच्या प्रोत्साहनानं वाढत होता. राष्ट्रीय सभा ही फक्त हिंदु जमातीची प्रतिनिधि आहे, मुसलमानांतर्फे

बोलण्याचा तिला कांही हक्क नाही, ही जीनांची मतलबी विचारसरणी फोफावत होती. जीनांचे अनुयायी संख्येनं वाढत होते. काँग्रेसच्या भिंतीला पडलेलं हें भेकीचं भगदाड बुजविण्यासाठी जीनांची आणि मुसलमानांची मनधरणी गांधीजींनी चालविली होती, आणि काँग्रेसकडून सवलतीमागून सवलती उपटण्याचा जीनांचा धूर्त डाव अधिकाधिक यशस्वी होत होता. या विचित्र घटना बघून देशांतील बहुसंख्य हिंदू चिंतातुर झाले होते. हिंदुस्थानांत हिंदु राष्ट्र आहे, आणि मुसलमान म्हणजे फक्त एक जमात आहे असं ठणठणीतपणे सरकारला, काँग्रेसला, आणि मुसलमानांना बजावणारा, हिंदूंना आधार देणारा, मुसलमानांच्या डोळ्यावरची धुंदी उतरविणारा तेजस्वी नेता मिळेल काय म्हणून देशांतील हिंदु जनता केविलवाण्या अधीर नजरेनं शोधीत होती ... अशा परिस्थितींत 'सावरकर सुटले!' ही बातमी फडकली, आणि ती समजल्याबरोबर देशाच्या कानाकोपऱ्यांतील लोकसुद्धा सावरकरांचं स्वागत करायला उत्सुक झाले. आता सावरकर मुक्त झाले होते. वर्षानुवर्षे अस्तास गेलेला आणि जनतेला दुरावलेला तेजस्वी तारा उदयाचलावर आलेला दिसत होता. हिंदुराष्ट्राचा कैवारी बंधमुक्त झाला होता. आता चिंता सरणार होती. भीति लोपणार होती. हिंदु राष्ट्राची प्रतिष्ठा सुरक्षित राहणार होती. आता सावरकरांचं मार्गदर्शकत्व लाभणार होतं! त्यांचं अमोघ वक्तृत्व कानीं पडणार होतं!

सावरकर रत्नागिरीहून सुटले ते प्रथम कोल्हापुरास आले. करवीर नगरीच्या जनतेनं त्यांचं थाटाचं स्वागत केलं. त्यांच्या सत्काराची सभा पॅलेस थिएटरमध्ये झाली. अलोट गर्दी लोटली. बंधमुक्ततेनंतर सावरकरांचं पहिलं भाषण ऐकण्याचा मान कोल्हापूरच्या लोकांना मिळाला. मीं स्वतः सावरकरांचं वक्तृत्व प्रथम ऐकलं तें या सभेंतलंच.

किती साधं, सामान्य दर्शन होतं सावरकरांचं! दहशतवादी अत्याचारी चळवळीचे नेते म्हणून सावरकरांनी केलेल्या अद्भुत रोमांचकारी पराक्रमाची वर्णनं लक्षांत घेऊन त्यांच्याकडे बघणाऱ्या प्रेक्षकांची संपूर्ण निराशाच करणारं सावरकरांचं दर्शन म्हणावं लागेल. ते उणेपुरे उंच नाहीत, दांडगे धिप्पाड नाहीत, संतप्त चर्येचे नाहीत, पहाडी आवाजाचे नाहीत. त्यांची मूर्ति ठेंगणी आणि कृश आहे. कॉलेजांत अभ्यास करण्याच्या काळांत ते उणेपुरे उंच

धिप्पाड नसले तरी दिसायला चांगले मजबूत असावे, असं त्यांच्या त्या वेळच्या छायाचित्रावरून वाटतं. परंतु काळ्या पाण्याच्या भयंकर शिक्षेनं त्यांच्या देहयष्टीचा तो मजबूतपणा पोखरून टाकला असावा. शिक्षेपूर्वींदेखील सावर-करांचं दर्शन भव्य नव्हतंच. त्यांच्या ठिकाणची सर्व भव्यता, तेजस्विता आणि तीक्ष्णता त्यांच्या विचारांत, वाणींत आणि लेखणींत आहे. त्यांना बघितल्या-बरोबर हा माणूस क्रांति-युद्धाचा पुरस्कर्ता आणि सूत्रधार असेल असं वाट-ण्याचा संभव नाही. त्यांच्यांतील झुंजारवृत्तीचा प्रत्यय येतो तो त्यांचे विचार समजल्यावर, त्यांची वाणी ऐकल्यावर ! " रक्तक्षय झालेल्या एखाद्या किशोरी-सारखे नाजूक, गिरिप्रपातासारखे उसळणारे, गर्जणारे, आणि समशेरीच्या पात्यासारखे धारदार" ( " Fragile as an anaemic girl, restless as a mountain torrent, and keen as the edge of a blade ) अशा शब्दांनी बॅ. असफअलींनी सावरकरांचं वर्णन केलेलं मला आठवतं.

देशभक्तीची आणि वक्तृत्वाची स्फूर्ति सावरकरांनी घेतली ती शिवराम महादेव परांजपे यांजकडून. वक्तृत्वाच्या बाबतींत परांजपे आणि सावरकर यांचे संबंध एकाप्रकारें गुरुशिष्याचे. परंतु प्रत्यक्ष वक्तृत्वाच्या शैलींत दोघांत फार थोडं साम्य आढळतं. आणि दर्शनाच्या बाबतींत तर दोघांचीं दोन टोकं म्हणावीं लागतील. शिवरामपंत व्यासपीठावर उभे राहिलेले दिसले, की त्यांच्या राजबिंड्या दर्शनाची श्रोत्यांवर विलक्षण छाप साहजिकच पडत असे. या तुलनेनं सावरकरांचं दर्शन किती साधं आणि सौम्य ! अगदीच सामान्य वाटणारं ! धोतर, पांढरा लांडा कोट, डोक्यावर काळी वाटोळी– घडीची नव्हे !– टोपी, डोळ्यांवर चष्मा, अशा मामुली वेषांतले सावरकर ज्या छत्रीला एखाद्या सहधर्मचारिणीप्रमाणे ते वागवितात ती छत्री टेबलावर आडवी ठेवून वक्तृत्वासाठीं सज्ज झाले, की श्रोत्यांचं चित्त ताबडतोब पकडलं जाण्याचा संभव फारच कमी.

त्या दिवशीं पॅलेस थिएटरमधील सभेंत ते भाषणासाठी उभे राहिले तेव्हा ते कांहींसे शिणलेले, थकलेले भासले. रत्नागिरीच्या वास्तव्यांत ते बंदी नव्हते, परंतु संपूर्णतः स्वतंत्रहि नव्हते. आता त्यांना संपूर्ण स्वातंत्र्य मिळालं होतं. परंतु आकाशांत भरारी घेण्याचा ज्यान्चा स्वभाव अशा गरुडाला पाय बांधून कोंबड्यांच्या खुराड्यांत दीर्घकाल ठेवल्यावर, आणि मग एके दिवशीं

मोकळं सोडल्यावर त्या मुक्ततेनंच तो जसा भांबावून जाईल तशी सावरकरांची अवस्था कदाचित् झालेली असावी. भाषणासाठी ते उभे राहिले ते विशेष प्रसन्न दिसले नाहीत. परंतु त्यांच्या मुद्रेवरची ही शिणलेली अप्रसन्नता विरायलाहि वेळ लागला नाही! सुरुवातीचीं एक दोन् वाक्यं श्रोत्यांनी अत्यत स्तब्धतेनं आणि उत्सुकतेनं स्वीकारलेलीं दिसल्याबरोबर सावरकरांच्या ठिकाणचा प्रसन्न तेजस्वी वक्ता प्रकट झाला.

त्या काळांतली कोल्हापूरची विशिष्ट परिस्थिति अशी होती, की बहुसंख्य जनतेंत नवी जागृति झाली होती. छत्रपतींच्या राजघराण्याविषयींच्या लोकांच्या निष्ठेला तडे जाऊं लागले होते. संस्थानांचं फेडरेशन व्हावं अशी विचार-सरणी आणि प्रयत्न वातावरणांत हालत होते. छत्रपतींच्या शिकारीच्या षोकासाठी विस्तीर्ण राखीव कुरणं असावीं, शेंकडों एकरांच्या जमिनी महाराजांच्या मालकीच्या असाव्या, याविषयींचा असंतोष प्रकट होऊं लागला होता. शेतकऱ्यांचे मोर्चे निघूं लागले होते. सावरकरांसारखा स्वातंत्र्यवादी देशभक्त बोलेल तो जनतेच्या असंतोषाला वाचा फोडूनच बोलेल आणि जनतेचा कैवार घेऊन छत्रपतींना चार उपदेशाच्या गोष्टी निर्भयपणानं सांगेल अशी थिएटरांत गर्दीनं जमलेल्या लोकांची साहजिक अपेक्षा होती. परंतु सावरकरांनी छत्रपतींच्या सिंहासनाची थोरवीच सांगितली, आणि त्यांना आदराचा मुजरा केला!... यामुळे श्रोत्यांची निराशा झाली. या भाषणांत सावरकरांनी हिंदुत्वाचा कैवारहि प्रकट केला. पुष्कळ श्रोते सभेंतून बाहेर पडले ते असं म्हणतच, की असं प्रतिगामी भाषण सावरकरांनी करायला नको होतं. निदान मुक्ततेनंतरच्या पहिल्याच जाहीर भाषणांत राजनिष्ठेची आणि जातीयतेची भूमिका घेण्याची घाई करायला नको होती. देशांत काय चाललं आहे, आणि सावरकर हें काय बोलले?

मला वाटतं, सावरकरांचा राष्ट्रवाद कितीहि जळजळीत असला तरी हिंदूंच्या एके काळच्या अखिल भारतीय साम्राज्याबद्दलचा त्यांचा अभिमान अनावर आहे. पूर्वींच्या त्या साम्राज्याचे अवशेष या दृष्टीनंच ते हिंदु संस्थानांकडे बघतात, आणि यामुळे हिंदु राजेरजवाड्यांबद्दल त्यांच्या हृदयांत एक 'मृदु कोपरा' आहे. कोल्हापूरच्या या जाहीर भाषणानंतर थोड्याच दिवसांनी अखिल भारतीय हिंदु महासभेच्या अहमदाबाद येथील

एकोणिसाव्या अधिवेशनाच्या अध्यक्षस्थानावरून भाषण करतांना त्यांनी नेपाळच्या हिंदु राजाला प्रथम आदरानं आणि नम्रतापूर्वक अभिवादन केलं. ते म्हणाले, "केवळ नेपाळच्या राजांनीच आपल्या इतिहासाच्या या परा-काष्ठेच्या अवनतीच्या काळांतहि एक हिंदु राज्यसत्ता म्हणून टिकाव धरून राहण्यांत आणि हिंदु स्वातंत्र्याचा ध्वज हिमराजाच्या प्रोत्तुंग शिखरावर निष्कलंकपणे फडकत ठेवण्यांत महनीय यश संपादिलं आहे. नेपाळचं राज्य हें एकच एक राज्य आज असं पृथ्वीच्या पाठीवर विद्यमान आहे, की ज्याचं स्वातंत्र्य इंग्लंड, फ्रान्स, इटली नि अशींच इतर बलाढ्य राष्ट्रं यांच्याकडून मान्यता पावलं आहे. प्रस्तुत पिढींतील आपणां सुमारें पंचवीस कोटि हिंदूंमध्यें नेपाळचे परमपूज्य राजे हेच आज सर्वांत अग्रणी, केवळ एकले एकच राजे असे आहेत, की ज्यांना जगांतील स्वतंत्र राष्ट्रांचे राजे नि सम्राट नि अध्यक्ष यांच्या मेळाव्यांत आपलं शीर्ष ताठ नि उन्नत ठेवून समसमानतेच्या नात्यानं प्रवेशितां येतं . . ." हिंदु राजे महाराजे यांच्याबद्दलची ही कांहीशी जीर्ण मध्ययुगीन भूमिका सावरकरांच्या स्वातंत्र्यवादांतील शुद्ध लोकशाहीच्या पुरस्काराला झाकळून टाकणारी आहे. परंतु ती त्यांच्या ठिकाणीं आहे खरी. हिंदु राजांचा आणि संस्थानिकांचा विचार करतांना त्यांना पूर्वींच्या हिंदु साम्राज्याची आठवण होते, आणि हा विषय एखाद्या व्याख्यानांत निघाला, की त्यांची विचारसरणी जरी पटण्यासारखी नसली तरी त्यांच्या वक्तृत्वाला बहर येतो हें कबूल केलंच पाहिजे.

त्यांच्या हिंदुत्वाच्या निकराच्या कैवाराचीदेखील हीच गोष्ट आहे. रत्नागिरीहून मुक्त होऊन सावरकर सुटल्यावर ते कोणत्या राजकीय पक्षाला मिळणार याविषयीं लोकांत निरनिराळे तर्क चालू होते. या बाबतींत पुण्याच्या शिवाजी मंदिरांतल्या तारीख ४-७-३७ च्या सभेंत सावरकरांनी जाहीर-पणानं मौन सोडलं. आपलं राजकीय धोरण जाहीर करतांना त्यांनी केलेल्या भाषणांत स्पष्टता होती, आणि त्याचप्रमाणे रिकामटेकड्या टीकाकारांना कोपरखळ्याहि होत्या. ते म्हणाले, "मी सुटल्यानंतर आता काय करणार, प्रतिगामी होणार की पुरोगामी होणार, याविषयी अहोरात्र चिंता बाळग-णारांना मला सांगायचं आहे, की तुम्ही काय देशकार्य करता त्याची तरी एकदा यादी द्या. मी काय कार्य करणार याविषयी कुणी चिंता बाळगावी, की

ज्यांनी माझ्यापेक्षा जास्त किंवा निदान माझ्याइतक्या तरी हालअपेष्टा सहन केल्या आहेत त्यांनी. या वेळी मी खोटा विनय सोडून बोलत आहे. इतर कांही त्यागाप्रमाणे या वेळी मला विनयाचाहि त्याग करावा लागत आहे. तसा खोटा विनय सोडून मी बोललों, की श्रीशिवाजीमहाराज किंवा त्यांच्यानंतर त्यांच्यासारखे जे थोर देशभक्त झाले त्यांनाच माझा कान धरण्याचा अधिकार आहे. तसे थोर देशभक्त जितके जास्त निघतील तितका जास्त आनंद मला होईल. मी काय करणार याविषयी सध्या येवढंच सांगतों, की जीव गेला तरी मी हिंदूंचा पक्ष सोडणार नाही !"

या प्रतिज्ञेस अनुसरूनच सावरकरांचं नंतरचं सर्व कार्य झालं, आणि त्यांनी अखिल हिंदुस्थान पायाखाली घालून ठिकठिकाणीं कित्येक सहस्र श्रोत्यांच्या प्रचंड सभांतून जें लोकविलक्षण मैदानी वक्तृत्व गाजविलं, तेंदेखील या प्रतिज्ञेच्या पूर्ततेसाठीच !

सावरकरांची ही प्रतिज्ञा आणि त्या वेळची देशांतील परिस्थिति यांच्या संयोगानं सावरकरांच्या वक्तृत्वांतील प्रतिपादनाचा साचा ठरून गेला. प्रसंगानुसार आलटून पालटून स्वतःच्या राजकीय मतप्रणालींतले तेच तेच मुद्दे सावरकर लोकांपुढे मांडीत राहिले. पंचवीस कोट हिंदु लोकांचा समाज निजलेला, सुस्तावलेला, गांगरलेला, भ्यालेला, हताश झालेला त्यांना दिसत होता. अशा या समाजाला जागृत आणि निर्भय करण्याचं कंकण त्यांनी बांधलं होतं. यासाठी त्या समाजाच्या डोक्यावर त्याच त्याच विचारांचे घण मारण्यावाचून गत्यंतर नव्हतं. सावरकर कंटाळा न करतां तेंच तेंच बोलत होते. या कारणानं त्यांच्या वक्तृत्वाच्या शैलीला नव्हे परंतु त्याच्या विषयाला मर्यादा पडलेल्या दिसल्या. परंतु या मर्यादा सावरकरांच्या बुद्धीच्या अगर भावनांच्या सीमा होत्या असं समजणं वेडगळपणाचं ठरेल. त्यांची मूळची प्रतिभा सर्वसंचारी आहे. त्यांच्या आवडीचे विषय अनेक आहेत. परंतु आपल्या वाणीचा— आणि लेखणीचाहि—विनियोग ' उद्धरणी रणीं ' करावयाचा ठरविल्यावर हिंदु राष्ट्राचा अभ्युदय या एका विषयाखेरीज बाकीचे सर्व विषय सावरकरांनी जणुं सोडूनच दिले. आपण तेंच तेंच बोलत आहोंत हें सावरकरांना कळत नसेल काय? परंतु त्यांचा निश्चयच मुळी तेंच तेंच बोलण्याचाच होता ! तीच

तींच आग जिथे जिथे ते जातील तिथे तिथे भडकविण्याचाच होता ! आपल्या वक्तृत्वाचं सारं सामर्थ्य एकाच विषयावर केंद्रित करण्याचाच होता !

हिंदूंचं राष्ट्र आहे, या राष्ट्राला पांच हजार वर्षांची परंपरा आहे, परकीयांच्या अनेक स्वाऱ्यांना टक्कर देऊन या राष्ट्रानं स्वत्व टिकविलेलं आहे, म्हणून हिंदूंचा भविष्यकाल उज्ज्वलच असला पाहिजे. या देशांतील मुसलमान म्हणजे एक जमात आहे. हे मुसलमान लोक भारताला आपली पितृभूमि आणि पुण्यभूमि मानायला कधींच तयार व्हायचे नाहीत, यांची नजर नेहमी बाहेरच्या मुस्लीम राष्ट्रांकडे राहणार, राजकीय सवलतींच्या यांच्या मागण्या सर्वस्वी तर्कदुष्ट आहेत, मुसलमानांची आणि हिंदूंची एकी घडवून आणण्याच्या भ्रामक आशेनं कॉंग्रेस मुसलमानांच्या पदरांत सवलतींवर सवलती टाकीत चालली आहे, आणि मुसलमान अधिकाधिक शिरजोर मात्र होत चालले आहेत. हा प्रकार हिंदूंच्या हिताचा विनाश करणारा आहे, म्हणून तो थांबलाच पाहिजे. सावरकरांच्या व्याख्यानांतले हे मुद्दे ठरून गेले. त्यांचं एक मोठं व्याख्यान ऐकलं, की नंतर त्यांचीं व्याख्यानं ऐकलीं नाहींत तरी चालण्यासारखं होतं. एखाद्या मातब्बर गवयाचे चढलेले राग ठरून गेले, की त्याच्या गाण्यांत त्यांची पुनरुक्ति होते, तसाच कांहीसा प्रकार सावरकारांच्या वक्तृत्वाचा झाला. परंतु याच दाखल्याचा उपयोग करून असंहि म्हटलंच पाहिजे, की ठरीव चढलेले राग गाणाऱ्या गवयाच्या प्रत्येक मैफलींत समयस्फूर्त कलाविष्कार आणि सौंदर्य म्हणून कांही तरी आढळतंच, त्याचप्रमाणे सावरकर जरी तेंच तेंच बोलले तरी एकेका व्याख्यानांत एकेका विशिष्ट विचाराच्या प्रतिपादनांत ते समयस्फूर्तीनं रंगून जातात. आणि मग त्यांच्या वक्तृत्वाला अपूर्व खुलावट चढते. वक्तृत्वकलेचा षौक करणाऱ्या श्रोत्याला त्यांच्या प्रत्येक व्याख्यानांत त्यांच्या वक्तृत्वाचा नवीनच नेत्रदीपक उन्मेष आढळतो. अशा उन्मेषाची शोभा पाहण्याची ज्याच्या अंगीं पात्रता आहे अशा श्रोत्याला सावरकरांचं वक्तृत्व कितीहि ऐकलं तरी अतृप्त ठेवणारं आहे.

असा नेता आणि असा वक्ता बंधमुक्त होऊन १९३७ सालीं हिंदु समाजाला लाभल्यावर मग काय विचारता ? सावरकरांना डोक्यावर घेऊन हिंदु समाज नाचायलाच लागला. हिंदु महासभेंत नवचैतन्याचा संचार

झाला. सूर्योदय झाल्याबरोबर तारे अदृश्य व्हावे त्याप्रमाणे जुने पुढारी मागे पडले. सारा हिंदु समाज सावरकरांच्या मुखानं बोलूं लागला. महासभेचीं अधिवेशनं कॉंग्रेसच्या अधिवेशनांच्या बरोबरीनं गाजूं लागलीं. अहमदाबाद, नागपूर, कलकत्ता, मदुरा, भागलपूर, कानपूर अशा सहा ठिकाणीं सहा वर्षांत महासभेचीं जीं अधिवेशनं झालीं, तीं सर्व सावरकरांच्याच अध्यक्षतेखाली! अधिवेशनाचं आमंत्रण देणारे कार्यकर्तेच मुळी अशी अट घालीत, की सावरकर अध्यक्ष होणार असतील तरच आमंत्रण देण्याची आमची इच्छा आहे. या अधिवेशनाव्यतिरिक्त व्याख्यानांचा झंझावाती प्रचार सावरकरांनी चालू ठेवला. सीमा प्रांत आणि ओरिसा हे दोन प्रांत वगळले तर सर्व प्रांतांत, आणि त्रावणकोर, कश्मीर अशा दूरदूरच्या संस्थानांसकट सर्व हिंदु संस्थानांत त्यांनी संचार केला. त्यांच्या अमोघ वक्तृत्वाचे ध्वनि भारताच्या दशदिशांत घुमले! सशस्त्र क्रांतिकारकांचीं वस्त्रं सावरकरांनी आता अंगावरून उतरून ठेवलीं होतीं! सनदशीर चळवळीचीं वस्त्रं अंगावर चढविलीं होतीं. परंतु त्यांना अजूनहि करायची होती क्रांतीच! हिंदु समाजाच्या अंतरंगाची क्रांति! हिंदूंचा भेकडपणा त्यांना नष्ट करायचा होता! त्यांच्या न्याय्य हक्कांची जाणीव त्यांना करून द्यायची होती! त्यांच्यांत आत्मविश्वास आणि सामर्थ्य निर्माण करायचं होतं! या कार्यांत तीन शत्रूंशीं त्यांना लढायचं होतं! ब्रिटिश सत्ता, मुसलमानांचा भलताच अनुनय करणारी गांधीजींच्या नेतृत्वा-खालची कॉंग्रेस, आणि पाकिस्तानाचीं स्वप्नं रंगविण्याइतके शिरजोर झालेले मुसलमान. अशा प्रकारें परकीयांशीं आणि स्वकीयांशींदेखील त्यांना झुंज द्यायची होती. म्हणजे सावरकरांना एका नव्हे, दोन नव्हे, तर तीन आघाड्यांवर लढायचं होतं! या युद्धांत त्यांची रणगर्जना—केवळ मुसल-मानांनाच उद्देशून नव्हे, तर स्वकीय कॉंग्रेसलादेखील उद्देशून—अशी होती, की "याल तर तुमच्यासह, न याल तर तुमच्यावाचून, विरोधाल तर तुमच्या विरुद्धहि हिंदु राष्ट्र आपलं भवितव्य बनेल तसं घडवील!" आणि तीन आघाड्यांवरील संग्राम करतांना सावरकरांच्या हातीं एकच तळपती तरवार होती, ती म्हणजे त्यांची वाणी! वक्तृत्वाच्या बळावर विरोधकांच्या मनांत त्यांनी जो थरकाप उठविला तो ध्यानांत घेऊन त्यांचं वक्तृत्व ऐकलं, की त्यांच्या ठेंगण्या, कृश मूर्तीकडे पाहून बलिराजाला अवघ्या तीन

पावलांत पाताळांत दडपणाऱ्या वामनावताराची आठवण झाल्यावाचून राहत नाही !

स्वमतप्रचार हा सावरकरांच्या लेखनाचा आणि वक्तृत्वाचाहि आत्मा म्हणावा लागेल. ज्या परिस्थितींत त्यांचं चरित्र झालं ती निराळ्या प्रकारची असती तर त्यांनी महाकाव्य रचलं असतं, इतकी त्यांची कवित्वशक्ति तरल आणि प्रखर होती.

तसं घडलं नाही याचं कारण एवढंच, की प्रचाराच्या हेतूवाचून लेखणीचा विलास त्यांनी कधी केला नाही. १९३८ सालीं साहित्य संमेलनाच्या अध्यक्षपदावरून भाषण करताना ' लेखण्या मोडा, आणि बंदुका हातीं घ्या ! ' असा उपदेश त्यांनी साहित्यिकांना केला होता. हा उपदेश वरवर पाहतां इतका एकांगी आणि न पटण्याजोगा होता, की तो सावरकरांसारख्या मातब्बर व्यक्तीच्या तोंडून बाहेर पडला होता तरी कुणाहि साहित्यिकानं आचरणांत आणला नाही. सावरकरांचा तो संदेश परमार्थानं घेण्यासाठी नव्हताच ! त्यांतला ग्राह्य अभिप्राय इतकाच होता, की ' आजच्या विवाक्षित परिस्थितींत तरुणांनी कथा-कादंबऱ्या लिहिल्या नाहीत तरी चालतील, पण देशाच्या स्वातंत्र्यासाठी आणि रक्षणासाठी हातीं शस्त्र घ्यायला हवं. स्वतः सावरकरांनीदेखील लेखणी मोडली नाही, सतत चालूच ठेवली. मात्र ती चालू ठेवली ती कलात्मक आनंदासाठी नव्हे, तर स्वबांधवांना जागृत व संघटित करण्यासाठी ! उपयुक्तता आणि उपदेश या दुहेरी ध्येयानं ! त्यांच्या वक्तृत्वांतहि हाच दुहेरी हेतु होता !

मात्र असं असूनहि त्यांचं व्याख्यान म्हणजे एक कलाकृति असते. ते भाषण करतात नजरेपुढे उपयुक्तता ठेवून. परंतु त्यांच्या ठिकाणचा कवि आणि कलावंत इतका जबरदस्त आहे, की उपयुक्ततेखाली तो दडपून जात नाही. त्यांच्या वक्तृत्वांत काव्य आणि कलाकुसर या दोहोंचाहि भरपूर वावर होतो. टिळक आणि गांधी या दोघांचंहि वक्तृत्व लोकजागृतीसाठीच होतं. सावरकरांचंहि त्यासाठीच. परंतु टिळकांनी आणि गांधींनी व्याख्यान सजविण्याचा प्रयत्न कधी केला नाही. सावरकरांनीहि जाणूनबुजून तसा प्रयत्न केला नाहीं, आणि तरीदेखील त्यांचं प्रत्येक व्याख्यान काव्याचा आणि कलाकुसरीचा साजशृंगार अंगावर चढवूनच उभं राहतं. जवाहरलाल

नेहरू कवि नाहीत परंतु वृत्तीनें कलावंत आहेत; आणि या गोष्टीचा प्रत्यय त्यांच्या वक्तृत्वांत कधी कधी येतोहि. परंतु त्यांच्या व्याख्यानांत विस्कळितपणा फार असतो, आणि किती तरी प्रसंगीं सुंदर अखेरी साधण्याचं ते विसरूनच जातात, आणि व्याख्यान मधेच तुटल्यासारखं अपुरं वाटतं. सावरकरांच्या कोणत्याहि व्याख्यानांत हा दोष आढळत नाही. त्यांच्या प्रत्येक व्याख्यानाला प्रारंभ, मध्य, कळस असून सबंद व्याख्यानाची मनोज्ञ आकृति बनलेली आढळते. ही गोष्ट ते हेतुपूर्वक करीत नसतीलहि. त्यांचं सारं लक्ष उपयुक्ततेवर केंद्रित झालेलं असेलहि. परंतु गवयाचं पोर रडलं तरी तें सुरांतच रडणार या न्यायानं, अजाणता का होईना, सावरकरांच्या व्याख्यानाला कलाकृतींचं स्वरूप येतंच येतं येवढं खरं! "हिंदु बंधुहो!" हे त्यांच्या तोंडचे पहिले शब्द ऐकतांच कित्येक हजार श्रोत्यांचीं अंतःकरणं आकर्षिलीं जावींत याचं श्रेय त्यांच्या त्यागाला, व्यक्तिमत्वाला आणि त्यांच्यावरील लोकांच्या निष्ठेला द्यावं लागेल. परंतु व्याख्यानाला एकदम रंग भरणारं असं पहिलंच वाक्य त्यांच्या तोंडून बाहेर पडतं त्याचं श्रेय त्यांच्या ठिकाणच्या जन्मसिद्ध कलावंतालाच द्यावं लागेल. व्याख्यानाच्या अगदी सुरुवातीसच असं कांही एखादं वाक्य ते उच्चारतात, की जें कानीं पडल्याबरोबर रसिकांनी एकदम कबुली द्यावी, हा कलावंत आहे!

चारपांच वर्षांपूर्वींचीच गोष्ट असेल.

रमण बागेच्या मैदानांत सावरकरांचं व्याख्यान एकदां रात्रीं झालं. गर्दी अशी बेसुमार झाली होती, की मैदान तर माणसांनी वाहून गेलंच होतं, परंतु शिवाय दक्षिणेकडील आणि उत्तरेकडील दोन्ही रस्ते श्रोत्यांनी तुडुंब भरून गेले होते. त्या रात्रीच्या व्याख्यानांत सावरकरांनी प्रतिपादन केला नेहमीचाच विषय. मुसलमान, ख्रिस्ती, फ्रेंच, पोर्तुगीज अशा परधर्मी आणि परदेशी मतलबी लोकांचं स्वतंत्र भारतावर किती प्रकारें आक्रमण चाललेलं आहे आणि या भारताचे खरे धनी जे हिंदु, त्यांच्या न्याय्य हितसंबंधांना भावी कालांत कोणकोणता दगाफटका आहे त्याचं साधार विवेचन त्यांनी केलं. नव्या परिस्थितीचा उद्बोधक शोध व्याख्यानांत होता, नवे दाखले भरपूर होते, तर्कशुद्धता होती, परंतु मुख्य प्रतिपादनाचा गाभा ठरीव

ठशाचा आणि शिळाच वाटण्यासारखा होता. तथापि, या व्याख्यानाची सुरुवात सावरकरांनी केली ती विलक्षण होती. ते म्हणाले,

"मी जें कांही बोलणार आहें तें तुम्हां हिंदूंच्या हितासाठी. तुमच्या पितृभूमींत आणि पुण्यभूमींत तुम्ही सन्मानानं राहावं यासाठी. तुमच्या हक्कांची भूमि मिळविण्यासाठी तुम्ही जागरूक रहावं म्हणून.- माझ्या स्वतः-साठी मला भांडायचं नाही, कांही मागायचं नाही. माझं चरित्र संपत आलेलं आहे. मला स्वतःला अखेर किती भूमि लागणार आहे ? तर फक्त या साडेतीन हात देहापुरती !—"

व्याख्यानाचा हा प्रारंभ जितका भावनोत्कट होता तितकाच कलापूर्ण होता. सावरकरांचे ते प्रारंभींचे उद्‌गार ऐकल्याबरोबर ज्याच्या अंतःकरणांत झर्ररदिशी विद्युत्प्रवाहाची लहर उठली नसेल असा एक तरी श्रोता त्या प्रचंड जनसमूहांत असेल काय ?

अशा प्रकारच्या सुंदर प्रारंभानं सावरकरांचं वक्तृत्व सुरू होतं तें अखेर-पर्यंत वक्तृत्वकलेचा एकेक आविष्कार दाखवीत राहतं. वास्तविक सावर-करांची भाषा मोठी मोहक आहे असं नव्हे. उलट भाषेचा मोहकपणा बिघडविणारे अनेक दोष त्यांच्या शैलींत आहेत. 'आणि' च्या ऐवजी ते 'नि' असा शब्द वापरतात. 'एतावता', 'वैश्विक', 'सन्नद्ध', 'दाढर्य', 'दायित्व' असल्या शब्दांच्या कर्णकटुत्वाची ते बिलकुल फिकीर करीत नाहीत. 'संमतिणे', 'प्रवेशिणे', 'उपदेशिणे, 'समाधानिणे' असल्या क्रियापदांचा वापर ते हेतुपूर्वक करतात. 'चंद्रगुप्त उठला, आणि त्यानं ग्रीकांना पुरेपूर पराभव देऊन हाकून लावलं', किंवा, 'इंग्रजांच्या विजयाकरिता आम्ही त्यांच्यावर कुरकुरत नाही' अशा प्रकारचे उघड उघड इंग्रजी छटेचे वाक्प्रयोगहि त्यांच्या तोंडून बाहेर पडतात. 'कोणतेहि लोक त्यांच्या आपापसांतील विसंवादी भेदांच्या अभावामुळे राष्ट्र या संज्ञेला तितकेसे कधींच पात्र होत नाहीत, की जितके आपापसांतील भेदांपेक्षाहि इतर लोकांशीं अधिक ठळक स्वरूपांत असणाऱ्या त्यांच्या भिन्नतेच्या योगें ते पात्र ठरतात.' अशी अत्यंत वेडयावाकडया क्लिष्ट रचनेचीं वाक्यं त्यांच्या वक्तृत्वाच्या ओघांत, पुराच्या पाण्याबरोबर पालापाचोळा कांटेकुटे आणि

घाण वाहत यावी त्याप्रमाणे गिरकी खात खात येतात, आणि श्रोत्यांच्या कानाला इजा करून पुढे जातात.

सावरकरांची भाषा निर्मळ किंवा प्रसन्न वाटण्याजोगी मुळीच नाही. भाषाशुद्धीचा आग्रह त्यांनी धरला खरा, परंतु त्या आग्रहामुळेच की काय कुणास ठाऊक, त्यांची लिहिण्याची आणि बोलण्याची भाषा खडबडीत, आणि कांहीशी दुर्बोध झाली.

परंतु हा भाषादोष ज्यायोगे झाकून जाईल, आणि लक्षांतदेखील येणार नाही असे वक्तृत्वाचे किती तरी गुण सावरकरांच्या ठिकाणीं प्रकर्षानं आढळतात. त्यांचा आवाज पहाडी किंवा पल्लेदार नसला तरी खणखणीत असून 'माईक'-पुढे बोलण्याचं विशिष्ट तंत्र त्यांना उत्तम अवगत असल्यामुळे विराट सभेच्या दूरदूरच्या कानाकोपऱ्यांतल्या श्रोत्यालादेखील त्यांचं बोलणं स्पष्ट ऐकूं येतं. त्यांची बोलण्याची धाटणी थोडीशी कृत्रिम आणि नाटकी भासते. वाक्यं पेलतांना जे हेल काढून ते बोलतात ते कांहीसे सौंदर्यविघातकच असतात. परंतु त्यांच्या शब्दोच्चाराला कमालीचा रेखीवपणा आहे, आणि एकंदर बोलण्यांत ठसकेदार टाशीवपणा आहे. वाक्यांतील कर्ता किंवा कर्म मधेच लोंबकळत ठेवून त्याविषयी विशेषणात्मक निक्षिप्त वाक्यं उपवाक्यं योजून मग क्रियापदाचा निर्देश करण्याची एक चमत्कारिक खोड त्यांना आहे. अशा निक्षिप्त वाक्यांनी भरलेलं संपूर्ण विधान कित्येकदा भलतंच लांबत जातं. परंतु अशा प्रकारे वाक्याची लांबी कितीहि वाढली तरी त्याचा प्रत्येक भाग सावरकरांनी मोठ्या डौलानं पेललेला असतो. वाक्यांतील कर्त्याचं किंवा कर्माचं वर्णन करतांना जीं जीं सुचतील तीं तीं विशेषणं सांगण्यासाठी ते खुशाल निक्षिप्त वाक्यांचा वापर करीत जातात, परंतु अखेरीवर त्यांचं लक्ष बरोबर असतं, आणि लांबलांब पल्ल्याच्या ताना मारून शेवटी समेवर येणाऱ्या गवयाप्रमाणे त्यांच्या प्रदीर्घ वाक्याचादेखील शेवट टीपबंद होतो. यामुळे सावरकरांची भाषा जरी खडबडीत असली, तिची मोडणी जरी सुगम आणि निर्मळ नसली, तरी त्यांच्या वक्तृत्वाच्या ओघाच्या अखंडपणाला सहसा बाध येत नाही. येवढंच की, त्यांचं व्याख्यान ऐकतांना आपण संथ पाण्यांत तरंगत आहोंत अशा प्रत्ययाऐवजी जिथे ठिकठिकाणीं भोवरे आहेत, लहानमोठ्या

लाटा उसळत आहेत, मधून मधून वाकडी धार आहे, अशा पुराच्या पाण्यांत पोहत असल्याचा अनुभव श्रोत्याला येतो.

उन्मत्त खळखळाट हाच सावरकरांच्या वक्तृत्वाचा मुख्य धर्म आहे. प्रतिपादनाची तर्कशुद्धता ते कधी बिघडूं देत नाहीत. परंतु आपल्या विधानाच्या पुष्टीसाठी हिंदूंचा उज्ज्वल इतिहास ते सांगूं लागले, की दाखल्यांची भाऊगर्दी उसळते. एकेक दाखला अधिकाधिक स्फुरणदायी असतो, आणि श्रोत्यांच्या अंतःकरणांत कल्लोळ उठल्यावाचून राहत नाही.

हिंदु महासभा म्हणजे एक जातीयवादाचं राजकारण करणारी संस्था असल्याच्या आरोपाचं संगोपन गांधींनी आणि काँग्रेसनं व्यवस्थितपणे केलं होतं. या आरोपाचा प्रहार परतविण्यासाठी सावरकरांनी आपली वक्तृत्व-शक्ति किती खर्च केली त्याला खरोखर गणती नाही. जवळ जवळ प्रत्येक महत्त्वाच्या व्याख्यानांत त्यांनी या आरोपाचा समाचार घेतलेला आहे. " हिंदु महासभा ही कांही प्रामुख्यानं हिंदु धर्मसभा नाही तर ती प्राधान्येकरून हिंदु राष्ट्रसभा आहे. सामाजिक, राजकीय नि सांस्कृतिक अशा सर्वच अंगानी हिंदु राष्ट्राच्या भवितव्याला आकार देणारी ती एक विश्व हिंदु-यंत्रणाच आहे. जे कोणी हिंदु महासभेला केवळ एक जातीय किंवा धार्मिक संस्था म्हणून लेखण्याची भयंकर चूक करीत असतील किंवा करीत आहेत त्यांनी हा भेद नीट ध्यानांत धरावा ! "—सावरकरांच्या वक्तृत्वाचं हें पालुपद आहे. हें पालुपद घोळवितांना त्यांच्या व्याख्यानशैलीला बहर येतो.

आणि या बहाराची शोभा अधिकच केव्हा खुलते ? तर, ' अरे तुम्ही पांच हजार वर्षांच्या अभिमानास्पद परंपरेचं राष्ट्र आहांत ' असं श्रोत्यांना बजावून सांगतांना, किंवा मुसलमानांच्या संधिसाधु राजकारणाच्या चिंध्या उडवितांना, किंवा काँग्रेसवाल्यांचा 'सोंगाडा राष्ट्रीयवाद' अशा शब्दांत ज्या शरणागतीच्या धोरणाचं वर्णन सावरकर करतात त्याची चिरफाड करतांना ! हिंदूंचे पराक्रम ते वर्णूं लागले, की त्यांच्या तोंडून पंचवीस पंचवीस ओळींची वाक्यं लीलेनं बाहेर पडतात. विशेषणात्मक किंवा क्रियाविशेषणात्मक पूरक वाक्यांनी जडविलेल्या लांबच लांब पल्लेदार दीर्घ वाक्यांची योजना शिवरामपंत परांजप्यांना विशेष प्रिय होती. अशीं प्रदीर्घ वाक्यं सावरकरांनाहि फार

आवडतात. अशा वाक्यांच्या योजनेंत ते स्वतः रंगून जातात, आणि श्रोत्यांनाहि रंगवून सोडतात.

सावरकरांच्या वक्तृत्वांत विनोद डोकावतो तो शाब्दिक कोट्यांच्या रूपानं नव्हे, तर जळजळीत उपरोधाच्या किंवा उपहासाच्या रूपानं. हिंदु राष्ट्राचा अभ्युदय हा त्यांचा सर्वांत अधिक आवडीचा विषय. क्षात्रवृत्तीचा पुरस्कार आणि विज्ञानाचा पुरस्कार हे त्या विषयाचेच अविभाज्य घटक होत. हिंदूंच्या ऐतिहासिक पराक्रमाबद्दल त्यांना अमर्याद अभिमान आहे, परंतु विज्ञानाकडे पाठ फिरविणारा धर्मभोळेपणा त्यांना बिलकुल मान्य नाही. जुन्या संस्कृतीचा पोकळ अभिमान धरणाऱ्या सनातनी विचारसरणीवर ते कडाडून हल्ला करतात, आणि तो करतांना उपहासाचं हत्यार निर्दयपणानं चालवितात. ते म्हणतात,

" मनूनं राजधर्मात युद्धनीतीचा सनातन धर्म म्हणून जो सांगितला त्यांत चतुरंग दळाचा सविस्तर उल्लेख आहे. परंतु तोफखान्याचा वा वैमानिक दळाचा नामनिर्देशहि नाही. आणि सैन्याच्या अग्रभागीं शौरसेनी लोक असावेत असं जें सांगितलं तें मनूच्या काळीं हितावह होतं म्हणूनच सांगितलं असलं तरीहि, या नियमास अपरिवर्तनीय सनातन धर्म समजून जर आमचे सनातन धर्मसंघ आजहि केवळ धनुर्धरांना पुढे घालून आणि आठ घोडी रथ सजवून एखाद्या युरोपच्या अर्वाचीन महाभारतांत शत्रूस थराराविण्यासाठी अगदी श्रीकृष्णाचा पांचजन्य फेकीत गेले तर पांचजन्य करीतच त्यांना परत यावं लागेल, हें काय सांगायला पाहिजे ? श्रुति नि श्रौत ( संस्कृति ) त्या काळच्या जगांत त्यांच्या शत्रूशीं लढतांना दिग्विजय गाजवूं शकली म्हणून आजच्या विज्ञानयुगांतहि तसा टिकाव धरूं शकतील ही आशा व्यर्थ आहे. महाभारतांतील गांडीव धनुष्य भंगलं ! आता मशिनगन्सशीं गांठ आहे. जर हें सांगितल्यानं स्वतःच्या प्रौढीच्या पोकळ वल्गना करीत राहणाऱ्या आमच्या ' बाबा वाक्य प्रमाणं ' प्रवृत्तीचं अवसान खचलं, तेजोभंग झाला तर त्यांतच राष्ट्राचं हित आहे. "

उपमा, उत्प्रेक्षा असल्या अलंकारांचा साज व्याख्यानावर चढविण्याची सावरकरांना विशेष आवड नाही. तात्यासाहेब केळकरांना उपमेवाचून चैन पडत नसे. प्रतिपादनाचा महत्त्वाचा मुद्दा श्रोत्यांच्या गळीं पूर्णतः उतर-

विण्याचं एक साधन म्हणजे उपमा असंच ते समजत असत. शिवरामपंत परांजपे शब्दालंकार, अर्थालंकार यांचे भोक्ते होते. सावरकर मोठ्या योग्यतेचे कवि असूनहि त्यांच्या वक्तृत्वांत अलंकाराचा अभाव असावा ही आश्चर्याची गोष्ट म्हणावी लागेल. परंतु ती खरी आहे. टिळकांच्या व्याख्यानांत छोटीं छोटीं कातीव, ठाशीव वाक्यं वैपुल्यानं असायचीं. सावरकरांच्या तोंडून अशीं वाक्यं फार क्वचित् बाहेर पडतात. " कॉंग्रेसचं धोरण असंच चालू राहिलं तर हिंदूंची आणि मुसलमानांची एकी होईल, पण ती कशी होईल ? तर गाय वाघाच्या पोटांत गडप होऊन ! वाघोबाचं उदर आणि गाईचं शरीर एकरूप होऊन– " अशी प्रतिपादनावर अखेर 'खिळा मारणारी' एखादीच उपमा त्यांच्या व्याख्यानांत चमकून जाते. " संगतींत वागतांना एखाद्या संशयास्पद मित्रापेक्षा उघड शत्रु अधिक पुरवितो, " " या जगांत जो रेटेल तोच टिकेल " अशा प्रकारचीं सुभाषितासारखीं अणकुचीदार छोटीं वाक्यं ते सहज बोलून जातात. परंतु हेंसुद्धां क्वचित् !

त्यांच्या ठिकाणच्या कवित्वाचा विलास लखलखूं लागतो तो वेगळ्या प्रकारें, आणि वेगळ्या निमित्तानं. आपल्या स्वदेशप्रेमाचं विवरण करतांना ते म्हणतील, " आमच्या देशांतील हिमालय, गंगा, यमुना, मथुरा वगैरे पर्वत, नद्या व शहरं हीं जगांतील इतर नद्या, पर्वत व शहरांपेक्षा आम्हांला प्रिय वाटतात, याचं कारण हें, की हा हिमालय, ही गंगा, ही यमुना यांच्या आश्रयानं माझ्या अभिमानाचं स्थान असलेली माझी संस्कृति जन्मली, नांदली व विकसली. मथुरेच्या वाळवंटाहून सुंदर वाळवंटं जगांत पुष्कळ असतील, परंतु मथुरेचंच वाळवंट मला विशेष प्रिय कां ? तर तेथे कृष्णाची बासरी वाजली म्हणून. माझ्या पूर्वजांची स्मृति या वस्तूंशीं निगडित झालेली आहे. माझं वेदवाङ्मय येथे जन्म घेतं झालं. माझे वाडवडील येथे जन्मले व मेले. ऋषींच्या पदरवानं ही भूमि पुनीत झालेली आहे. तिच्याशीं माझ्या संस्कृतीचा भूत तसाच भविष्यकालहि निगडित झाला आहे. हेंच तिजसंबंधीच्या माझ्या प्रेमाचं कारण होय ! हें तिचं वैशिष्ट्य माझ्या प्रेमाचं केंद्र होय ! "

१८५७ च्या स्वातंत्र्य-युद्धांतील घटनांचं वर्णन करतांना त्यांच्या काव्य-शक्तीला असाच पूर लोटेल. ते म्हणतील, " क्रांतिकारकांची लाट जोरानं पसरत चालली. उद्या चंबूगवाळं आटपलं पाहिजे असं इंग्रज बोलूं लागले.

वारुळांतून भराभर मुंग्या निघाव्या त्याप्रमाणे ठिकठिकाणाहून स्वातंत्र्ययोद्धे निघाले. तात्या टोपे हा तर जणुं मातींतूनच सैन्य निर्माण करी. तो जिकडे जाई तेथून दहा दहा हजार सैन्य उभं करी, आणि तुरुंगांमागून तुरुंग मोकळे होत. इंग्रजांना कापीत, रक्ताचे पाट वाहवीत, हे स्वातंत्र्ययोद्धे विजयाच्या मार्गानं लखनौ, दिल्ली, आग्रा वगैरे गावोगावीं उत्साहानं चालले... वचन-भंग करून बनारसला हिंदी लोकांची कत्तल इंग्रजानं केली नि ब्राह्मणांना जिभेनं जमिनीवरील रक्त चाटायला लावलं हें कळतांच गंगेच्या अर्ध्या पात्रांत नावेंत बसून जाणाऱ्या इंग्रजांची एकसहा कत्तल करण्याचा हुकूम तात्या टोपे यानं घाटावर बसून शंख फुंकून दिला . . . त्यानं सतत दोन वर्षं लढा चालविला होता. अखेर दगाबाजीनं तो पकडला गेला, आणि इंग्रज सरकारनं त्याला फाशी दिलं. तात्या टोपे म्हणजे खरोखर पराभूत शिवाजीच ! शिवाजीमहाराजांचे प्रयत्न यशस्वी झाले. तात्या टोपेना यश मिळालं नाही. परंतु सेनापतित्वांत दोघेहि सारखेच ! ”

आणि उतास जाणाऱ्या काव्यमय शैलींत या गोष्टी सावरकर सांगतील त्या केवळ इतिहासाचं दर्शन घडविण्यासाठी नव्हे. या घटना सांगून श्रोत्यांची अंतःकरणं ते थरारून सोडतील, आणि मग म्हणतील, “ आजहि निराळ्या रीतीनं आपल्याला स्वातंत्र्ययुद्ध खेळायचं आहे. लाक्षणिक अर्थानं कानपूर गाजवायचं आहे. युद्धांतून पळून आलेल्या सैनिकांचा नाक्यानाक्यावर धिक्कार करून कानपूर येथें वेश्यांनीसुद्धां भाग घेतला. एकटे हिंदूहि स्वराज्य मिळवितील ही समर्थ भावना उत्पन्न करा, म्हणजे मुसलमानांचं ऐक्य घडण्यासाठी गांधींना जीनांची मनधरणी नि पायधरणी करावी लागणार नाही, तर बॅ. जीना दातीं तृण धरून गांधींकडे चालत येतील. हिंदूंचा भूतकाल स्फूर्तिदायक आहे ! आपल्या राष्ट्राचं भवितव्य उज्ज्वल आहे ! ”

१९३९ सालीं पुण्यास टिळक स्मारक मंदिरांत ‘ गांधीवाद, बाबूवाद व भाईवाद ’ असा विषय घेऊन सावरकर बोलले तेव्हाच्या व्याख्यानाची अखेरी तर श्रोत्यांचं अंतःकरण हेलावून सोडणाऱ्या काव्याच्या भरारीचा उत्कृष्ट नमुना होता. सावरकर म्हणाले,

“ गटे कवीच्या काळीं प्रशियाचे तुकडे तुकडे होऊन प्रशियाच्या राज-वाड्यांत गादीवर नेपोलियन बसला होता. तेव्हा गटेनं कविता केली, की या

सिंहासनावर माझा राजा परत बसलेला पाहीपर्यंत व हा परका राजा जाई-पर्यंत मी असाच भीक मागत हिंडेन !

" गटेची ती वल्गना–आज चार पाच पिढ्यांनंतर सत्य ठरली आहे ! आज हिटलरच्या नेतृत्वाखाली सारं जर्मन राष्ट्र, सारे जर्मन लोक एका निशाणा-खाली एकत्र झालेले आहेत. वटवृक्षाचं बीज मोहरीहूनहि लहान असतं. पण त्या बीजांत जी स्फूर्ति असते–जी वल्गना असते–ती वाढता वाढता तिचा प्रचंड वटवृक्ष बनून त्याखाली गाईचीं खिल्लारं विसावा घेतात, उन्हानं श्रांत झालेल्यांना तो वटवृक्ष सावली देतो !

" मलाहि एक वल्गना करूं द्या !

" माझं गाणं मला गाऊं द्या !

" या जगांत आपणाला जर हिंदुत्वाचं मानाचं राष्ट्र म्हणून जगायचं असेल तर तसा आपला अधिकार आहे. आणि तें राष्ट्र हिंदु ध्वजाखालीच स्थापन झालं पाहिजे.

" या नाही तर पुढील पिढींत ही वल्गना खरी ठरेल !

" माझी ही वल्गना खोटी ठरली तर वेडा ठरेन मी ! माझी ही वल्गना खरी ठरली तर ' प्रॉफेट ' ठरेन मी !

" माझा हा वारसा मी तुम्हांला देत आहे !


गांधी, टिळक, नेहरू, केळकर, शिवरामपंत परांजपे त्यांच्या वक्तृत्वाहून सावरकरांच्या वक्तृत्वाची तऱ्हा सर्वस्वी भिन्न म्हणावी लागेल. केळकरांचं व्याख्यान म्हणजे सुंदर सुंदर विलोभनीय अलंकारांनी भरलेलं सराफी दुकाना-सारखं असे. टिळकांचं व्याख्यान ऐकतांना भास होत असे, की जिथे मोठा भाता चालला आहे, भट्टी धगधगते आहे, तापून लालभडक झालेल्या लोखंडा-वर घणाचे घावामागून घाव बसताहेत, लाल लाल ठिणग्या उडताहेत, अशा लोहाराच्या कारखान्यांत आपण उभे आहोंत. सावरकरांचं व्याख्यान म्हणजे दोन्ही तीरांवरील कित्येक मैलांचा प्रदेश जलमय करून सोडणारं, तांडव करीत खळखळत, गरगरत वेगानं पुढे जाणारं पुराचं लाल पाणीच ! किंवा वावटळीमागून वावटळी उठवीत घोंगावत वाहणारा झंझावातच ! किंवा रानामागून रान पेटतीत पसरणारा वणवाच !

शिवरामपंत परांजपे आणि सावरकर यांच्या वक्तृत्वांत साम्य होतं अशी

सामान्य सजजूत आहे ती मला मुळीच पटत नाही. परांजप्यांची व्याख्यान-शैली उच्च कोटींतली खरीच. ती साधूं म्हणता कुणाला साधणार नाही हेंहि खरंच. तथापि, अंतिम परिणामाच्या दृष्टीनं त्या शैलीची किंमत मोठी नव्हती. सरकारला किंवा नेमस्तांना हास्यास्पद करून सोडलं म्हणजे संपलं अशा वृत्तीनं परांजपे बोलत. शिवाय श्रोत्यांच्या चित्तांत क्षोभ उत्पन्न केल्यानंतर नामानिराळं आणि अलग राहण्याची परांजप्यांची वृत्ति होती. याउलट सावरकरांची शैली अशी, की केवळ शत्रूला हास्यास्पद ठरवून तिचं समाधान होत नाही, तर श्रोते क्रुद्ध व्हावेत, चेवानं उठावेत हें तिचं लक्ष्य असतं. आणि सावरकर अलग राहत नाहीत तर वक्तृत्वानं निर्माण केलेल्या लोकक्षोभाच्या एकेका लाटेवर स्वतः आरूढ होतात, आणि पुढची लाट निर्माण करतात.

परांजप्याचं वक्तृत्व रंगलं की भलतंचं रंगत असे, पण तें हमखास रंगत नसे. उलट, सावरकरांच्या वक्तृत्वाला रंग भरला नाही असं कधी होत नाही. शिवरामपंतांच्या वक्तृत्वाला विशिष्ट अनुकूल वातावरणाची गरज असे व त्यामुळं त्यांच्या वक्तृत्वाचा रंग परावलंबी असे. सावरकर अनुकूल वातावरण स्वतःच उत्पन्न करतात आणि त्यामुळे त्यांच्या व्याख्यानाचा रंग स्वयंभू असतो. शिवरामपंतांचं वक्तृत्व कितीदा तरी श्रोत्यांच्या डोक्यावरून जात असे. सावरकर नेम धरतात तो श्रोत्यांच्या डोक्यापेक्षा अंतःकरणावर, आणि लक्ष्याचा वेध घेण्यासारखेच वाग्बाण भात्यांतून काढून धनुष्याच्या प्रत्यंचेवर ते चढवितात. कांही झालं तरी परांजप्यांचं व्याख्यान म्हणजे काव्य-शास्त्र-विनोदाची बहारदार मैफल असे. उलट सावरकरांचं व्यासपीठ म्हणजे बोलून चालून तुंबळ संग्रामाचं रणमैदान वाटतं. श्रीयुत शि. ल. करंदीकर यांच्या सुंदर 'सावरकर चरित्रा'ला प्रस्तावना लिहितांना तात्यासाहेब केळकरांनी लिहिलं आहे, "सावरकरांच्या रथाच्या निशाणावर 'या आणि पहा!' हीं अक्षरं नसून 'येतों आणि दाखवितोंच!' अशीं अक्षरं असावयाचीं!"

★ ★ ★



# १५ : महात्मा गांधी

पुणें शहराच्या बुधवार चौकापासून उत्तरेच्या दिशेला शनवारवाड्याकडे जो रस्ता जातो त्या रस्त्यावर ' वसंत टॉकीज ' नांवाचं एक चित्रपटगृह आहे. हें चित्रपटगृह म्हणजे ' किर्लोस्कर संगीत नाटक मंडळी 'नं बांधलेलं मूळचं नाट्यमंदिर. पूर्वीच्याकाळांत त्याचं नांव होतं ' किर्लोस्कर थिएटर. ' १९१५ सालीं एके दिवशीं संध्याकाळीं या किर्लोस्कर थिएटरकडे लोकांच्या झुंडीच्या झुंडी निघाल्या होत्या. हां हां म्हणता थिएटरचे तिन्ही मजले माणसांनी फुलून गेले. रंगभूमीवर पुण्यांतील सर्व प्रमुख पुढारी दिसूं लागले. योग्य वेळीं सभा सुरू झाली. मुख्य भाषण करणारी व्यक्ति उभी राहिली. ती कृश असल्यामुळे कांहींशी उंच भासत होती. स्वदेशी कापडाचा अंगरखा, उपरणं आणि डोक्याला काठेवाडी पद्धतीनं बांधलेला शुभ्र रुमाल असा तिचा वेष होता. वर्ण काळासावळा होता. काठेवाडी रुमालानं कपाळाची डावी बाजू झाकलेली होती. झुपकेदार नव्हे, परंतु जाड काळ्या मिशांची कमान ओठावर होती. चर्या तेजःपुंज नव्हती. परंतु डोळ्यांचा मोठेपणा नजरेंत भरण्यासारखा होता. अशा त्या व्यक्तीच्या दर्शनानं सभेवर फारशी कांही छाप पडली नाही; परंतु शांत,

निश्चयी, गंभीर आवाजांत त्या व्यक्तीचं भाषण सुरू झालं, आणि तें कानीं पडूं लागल्याबरोबर श्रोत्यांची खात्री पटली, की जें वक्तृत्व आपण ऐकत आहोंत तें फार उच्च कोटींतलं आहे.

त्या व्यक्तीचं नांव मोहनदास करमचंद गांधी. मला वाटतं, गांधींचं पुण्यांतलं तें पहिलंच जाहीर व्याख्यान होतं. निदान मी स्वतः गांधींचं भाषण त्या दिवशीं प्रथमच ऐकत होतों.

दक्षिण आफ्रिकेंतील सत्याग्रहाचा लढा बऱ्याच यशस्वीपणानं संपवून गांधी हिंदुस्थानांत परत आले होते. दक्षिण आफ्रिकेंतील हिंदी लोकांच्या गाऱ्हाण्यांबद्दल हिंदुस्थानांतील लोकमत जागृत करण्यासाठी प्रमुख शहरीं व्याख्यान देत हिंडत होते. असहकारितेच्या चळवळीचा काळ दूर होता. 'महात्मा' ही उपाधि गांधींच्या नांवामागं अद्यापि लागलेली नव्हती. किंबहुना गांधीजी पुढे काय करणार त्याची लोकांना कल्पना नव्हती. नामदार गोपाळ कृष्ण गोखले यांनी त्यांना सल्ला दिला होता, की एक वर्षपर्यंत डोळे उघडे पण तोंड बंद ठेवून देशभर हिंडा, परिस्थिति नीट बघा, आणि मग आपल्या कार्याची दिशा ठरवा. गांधी गोखल्यांना गुरुस्थानीं मानीत असत. गुरूच्या उपदेशाप्रमाणे ते वागत होते. कोणत्याच राजकीय पक्षांत ते सामील झाले नव्हते. गोखल्यांच्या भारत सेवक समाजांत दाखल होण्याची त्यांची इच्छा होती. गांधी मिळाले तर गोखल्यांना हवेच होते. परंतु त्याबद्दलदेखील सबुरीचाच सल्ला त्यांनी गांधींना दिला होता. दक्षिण आफ्रिकेच्या प्रश्नावर मात्र शहरोशहरीं गांधी व्याख्यानं देत होते, आणि तिकडच्या चळवळीच्या मदतीसाठी फंड गोळा करीत होते. किर्लोस्कर थिएटरमध्ये त्यांचं इंग्रजी व्याख्यान झालं तें यासाठीच.

हातवारे मुळीसुद्धा न करता अगदी निश्चल उभं राहून तास दीड तास बोलणारा गांधींसारखा दुसरा वक्ता मी पूर्वी ऐकला नव्हता, आणि नंतरहि ऐकला नाहीं. रहिमतखाँ नांवाचे जे अत्यंत थोर गायक होऊन गेले त्यांची गोष्ट अशी होती, की गातांना त्यांचे हातवारे बिलकुल होत नसत. आदळ-आपट नाहीं, मानेचे हिसडे नाहीत, मुठी वळणं नाही, पंजे पसरणं नाही, इतकंच काय, चेहऱ्यावरदेखील कष्ट पडल्यासारखा भाव कधी दिसायचा नाही—अशा पद्धतीनं त्यांचं अपूर्व रंगतीचं गायन तीन तीन चार चार घंटे

चालू राह्यचं! खूप लांब पल्लेदार तान घेतल्यानंतर नाट्यपूर्ण अवचितपणानं समेवर येतांना एखादे वेळी डावी मांडी काय थोडीशी हलेल तेवढीच! तेवढा झटका वर्ज्य केला तर इतक्या निश्चल बैठकीनं आणि सहजपणानं रहिमतखाँ गायचे, की मैफलींत कोण गात आहे तेंसुद्धा चटकन् कळूं नये. गांधींचं त्या दिवशींचं भाषण ऐकतांना मला रहिमतखाँची सारखी आठवण होत होती. तोच निश्चलपणा! तीच शांत, निर्विकार मुद्रा! आणि तोच अखंड प्रवाह! संगीताचा नव्हे, परंतु संगीतासारखाच परिणामकारक, सुंदर निर्मळ इंग्रजी गद्याचा प्रवाह!

शिवरामपंत परांजपेदेखील हातवारे फार माफक करीत असत. त्यांचा सारा भर वाणीच्या स्वच्छ धारदारपणावर असे. परंतु नाट्याची जाणीव त्यांना फार होती. चेहऱ्यावरचे भाव, भाषणाचा ठसकेदारपणा, आणि आवाजाचा चढउतार हे कसबी नटाचे प्रमुख गुण ते प्रयत्नानं वापरीत असत. गांधींजींच्या ठिकाणीं या गुणांचा सर्वस्वीं अभाव होता. इंग्रजी शब्दांचे त्यांचे उच्चार कानांना सुखकारक व्हावे असे होते, परंतु त्यांतहि अस्सल इंग्रजी ऐट नव्हती. वाक्यरचनेंत शब्दालंकार, अर्थालंकार अशा प्रकारची कोणतीहि खटपट नव्हती. सारीं वाक्यं साधीं, सरळ, आणि बहुधा लहान. मात्र व्याकरणाची शुद्धता कमालीची, आणि वाक्यामागोमाग वाक्यांचा ओघ असा, की त्यांतूनच एक विशिष्ट परिणामकारकता उत्पन्न व्हावी ... सारांश, गांधीजींच्या वक्तृत्वांतले गुण इतर मोठमोठ्या वक्त्यांच्या गुणांहून भिन्न होते. ही भिन्नता एकाच वाक्यांत सांगायची तर असं म्हणता येईल, की व्याख्यान रंगविण्याची कोणत्याहि प्रकारची हेतुपूर्वक खटपट गांधी करीत नसत! आणि त्यामुळेच त्यांचं व्याख्यान रंगत असे! एका इंग्रजी लेखकानं लिहिलं आहे, की "Mr. Gandhi makes no effort to make his speech effective, and therefore, his speech is always effective!"

गांधींच्या त्या दिवशींच्या त्या इंग्रजी भाषणाचा माझ्या मनावर इतका परिणाम झाला, की दक्षिण आफ्रिका फंड गोळा करण्यासाठी थिएटरवर स्वयंसेवक पेट्या फिरवीत होते त्यांपैकी एकाच्या पेटींत खिशांतले सर्व पैसे मीं टाकले. घरून निघतांना पैसे घेतले होते ते अशासाठी, की बालगंधर्वांच्या एका नाटकाच्या पांच रुपयांच्या खुर्चीचं तिकीट व्याख्यान संपल्यानंतर मी

काढणार होतों. माझ्याप्रमाणेंच इतर शेकडो श्रोत्यांवर गांधींच्या त्या व्याख्यानाचा विलक्षण परिणाम झाला होता. मी घरीं परत आलों तो गांधीजींच्या तोंडून ऐकलेलं दक्षिण आफ्रिकेंतलं राजकारण मनाशीं घोळीत; परंतु त्याहिपेक्षां अधिक इंग्रजी वक्तृत्वाचा एक नवीनच सुंदर नमुना ऐकल्याचा आनंद पुनःपुन्हा मनाशीं आठवीत !

नामदार गोखल्यांच्या सल्ल्याप्रमाणे गांधीजींनी देशांत जों जों संचार केला तों तों त्यांचं मन अत्यंत अस्वस्थ झालं.

परकीय राजसत्तेचे अनाचार तर त्यांना दिसलेच, परंतु स्वकीयांच्या नानाविध दुर्गुणांचंहि दर्शन त्यांना झालं. लोकांना हक्कांची जाणीव नव्हती, गुलामगिरीची चीड नव्हती, देशाच्या दारिद्र्याची फिकीर नव्हती, अस्वच्छतेची खंत नव्हती, शारीरिक आरोग्य आणि मानसिक तेजस्विता यांची किंमत कुणाला कळत नव्हती. अशा निद्रिस्त देशाचा उद्धार करण्यासाठी भयंकर स्पष्टपणानं कुणी तरी बोलायला हवं, असं त्यांना वाटूं लागलं. मनांतली खळबळ उघड करण्याची अधीरता त्यांना वाटूं लागली. प्रसंगाची वाट ते बघूं लागले, आणि तो मिळाल्याबरोबर त्यांनी जें व्याख्यान दिलं तें त्यांच्या भाषणांतील एक चिरस्मरणीय भाषण म्हणावं लागेल. या भाषणाच्या वेळेसहि गांधींचा राजकीय अवतार झालेला नव्हता. परंतु तें भाषण ज्यांनी ऐकलं, आणि त्या खळबळजनक भाषणाचे वृत्तान्त देशांतल्या एकूण एक वृत्तपत्रांत फडकलेले ज्यांनी वाचले त्यांची खात्री पटली, की लोकजागृति घडवून आणणारी, सरकारला खडबडून जागं व्हायला लावणारी एक नवीन नेत्रदीपक शक्ति उदयाचलावर आलेली आहे, आणि या शक्तीचा संचार वाढत गेल्याखेरीज राहणार नाही.

पंडित मदनमोहन मालवीय यांनी बड्या बड्या राजेमहाराजांकडून आणि धनिकांकडून लक्ष दशलक्षांच्या प्रमाणांत मोठमोठ्या देणग्या मिळवून बनारस हिंदु युनिव्हर्सिटीची स्थापना केली, आणि १९१६ सालीं फेब्रुवारीच्या ४ तारखेस विद्यापीठाचा कोनशिलासमारंभ घडवून आणला. मालवीयजींनी गांधींना प्रेमानं आमंत्रण दिलं, आणि भाषण करण्याचीहि त्यांना विनंती केली. राजेमहाराजे जडजवाहर घालून सभेंत बसले होते. बडे बडे सरकारी अंमलदार हजर होते. डॉ. ॲनी बेझंट अध्यक्षस्थानीं

होत्या. नित्यक्रमाप्रमाणे समारंभ साजरा करणारीं भाषणं झालीं. परस्पर-प्रशंसेचे पूर वाहूं लागले. गांधींची भाषण करण्याची पाळी आली तेव्हा ते उभे राहिले. सर्वांची कल्पना साहजिक अशी, की प्रशंसेच्या वाहत्या गंगेंत गांधी हात धुऊन घेतील. परंतु गांधींनी भाषणाच्या रूपानं समारंभावर बाँबच टाकला ! अगदी प्रारंभींच अशा समारंभांतलीं भाषणं इंग्रजींतून व्हावींत ही मोठी शरमेची गोष्ट आहे असं त्यांनी ठणकावून सांगितलं. देशी विद्यापीठांतलं सर्व शिक्षण हिंदीच्या माध्यमानं कां होऊं नये असा सवाल केला. आपले विचार व्यक्त करायला आपली राष्ट्रभाषा असमर्थ आहे असं वाटत असेल तर राष्ट्र या नात्यानं सरळ मरण पत्करलेलं काय वाईट अशी निर्भत्सना केली. आणि आपल्या स्पष्टोक्तीचा असा खुलासा केला, की गोड गोड बोलण्यासाठी मी या ठिकाणीं आलों नाही. माझ्या मनांत जें कांहीं उकळत आहे तें मला सांगायचं आहे. मी भाषण करतो आहे असं समजूच नका. मीं प्रगट चिंतन करीत आहे. आणि अशा प्रसंगीं अशा सभेपुढे या गोष्टी बोलायच्या नाहीत तर कुठे बोलायच्या ?

सभास्थानांतील बडीं बडीं धेंडं अस्वस्थ झालीं. राजनिष्ठांना वाटलं, आतां हा गृहस्थ सरकारविरुद्ध काय काय बोलतो कुणास ठाऊक ? डॉ. बेझंट यांनीं गांधीजींना अध्यक्ष या नात्यानं पुनःपुन्हा इषारा दिला, की प्रसंग ओळखून बोला. गांधींनी प्रत्येक वेळेस बाईंना बजावलं, कीं प्रसंग ओळखलाय, आणि म्हणूनच बोलतों आहे. सरकारला, राजेरजवाड्यांना चौफेर कानपिचक्या देणारं आपलं विलक्षण स्पष्टोक्तिपूर्ण भाषण गांधी रेटीतच राहिले. गांधींच्या वक्तृत्वांतला सगळ्यांत मोठा गुण म्हणजे निर्भयपणा, स्पष्टवक्तेपणा, आणि जें ध्येय नजरेपुढें ठेवलं त्या-बद्दलची जळजळीत कळकळ. हा त्यांच्या वक्तृत्वाचा गुण बनारस येथील त्या भाषणांत अगदी उफाळून वर आला. ते म्हणाले,

" काल संध्याकाळीं मी काशीविश्वेश्वराच्या दर्शनाला गेलों होतों. तेथील घाण आणि अस्वच्छता बघून मला घृणा वाटली. साऱ्या जगांत प्रसिद्ध असलेल्या आपल्या या हिंदु देवालयांतील घाण म्हणजे आपल्या समाजाच्या आणि राष्ट्राच्या अंतरंगांतील गलिच्छपणाचं प्रतीकच म्हणावं लागेल. आपलीं पवित्र मंदिरं जर आपल्याला आरशासारखीं स्वच्छ ठेवतां

येत नाहीत तर स्वराज्याच्या वल्गना करण्याचा आपल्याला काय अधिकार आहे ? कुणाची अशी का कल्पना आहे, की परकी राज्यामुळे आपल्या देवालयांची ही दुर्दशा आहे, आणि परकी सत्ता नाहीशी झाल्याबरोबर हीं देवालयं स्वच्छ होणार आहेत ? . . . देशांतलं दारिद्र्य पाहून माझं अंतःकरण नुसतं व्यथितच होतं, परंतु ऐदी, आळशी, नालायकांच्या संपत्तीचं प्रदर्शन पाहिलं, की माझ्या अंतःकरणाच्या चिंध्या चिंध्या होतात. या सभेंत माझ्यासमोर हे राजेमहाराजे, संस्थानिक बसलेले आहेत. त्यांची उंची उंची वस्त्रं, त्यांच्या कमरेला केवळ शोभेसाठी लटकावलेल्या तरवारी, केवळ स्त्रियांनाच शोभतील असे हिऱ्यामोत्यांचे अलकार, कंठे, पगड्यांवरचे गोंडे बघितले, की माझं मन कासावीस होतं. हीं काय यांच्या राज्याधिकाराचीं चिन्हं आहेत ? हीं गुलामीचीं चिन्हं आहेत. या चिन्हांची शरम वाटली पाहिजे. कोट्यवधि कंगाल हिंदी लोकांच्या स्थितीची मला आठवण होते, आणि या नटलेल्या, थटलेल्या राजेरजवाड्यांना सांगावंसं वाटतं, बाबांनो, तुमच्या अंगावरचं हें जडजवाहर खाली उतरवून ठेवा. जोंपर्यंत तुमच्या देशबांधवांसाठी ते काढून ठेवण्यास तुम्ही तयार होणार नाही तोंपर्यंत देशाचा तरणोपाय नाही. एखादा राजवाडा बांधला जात असल्याचं जेव्हा मी ऐकतों तेव्हा संताप आणि दुःख यांनी माझा ऊर भरून येतो, आणि माझ्या तोंडावाटे असे उद्‌गार बाहेर निघतात, की अरेरे ! हा सारा पैसा शेतकऱ्यांकडून आलेला आहे ! . . . अशा नादान लोकांवर राज्य करणं ब्रिटिशांना सोप्यांतील सोपी गोष्ट वाटत असेल तर आश्चर्य नाही. उलट आश्चर्य हें, की सरकार लोकांना भितंय . . . या सभेंत उपस्थित असलेले व्हाइसरॉय लॉर्ड हार्डिंज बॉंब हल्ल्याच्या एका अपघातांतून नुकतेच बचावले. इथल्या रस्त्यावरून हे व्हाइसरॉय जात असतांना जागोजागी पोलिसांचा आणि डिटेक्टिव्हांचा केवढा बंदोबस्त आणि सुळसुळाट ! भय आणि अविश्वास यांच्या या विचित्र प्रदर्शनाला म्हणावं तरी काय ? अशा बंदोबस्तांत लाटसाहेबांनी संचार करणं म्हणजे जिवंत मरण आहे, आणि असं जिवंत मरण भोगण्यापेक्षा लॉर्ड हार्डिंज यांनी खरोखरच मेलेलं अधिक श्रेयस्कर नव्हे काय ? ”

महात्मा गांधींनी ब्रिटिश राज्यकर्त्यांना उद्देशून ‘ चले जाव ! ’ ची घोषणा केली ती पुढे १९४२ सालीं. परंतु त्याच्या आधी सव्वीस वर्षांपूर्वीं त्यांनी

बनारस हिंदु युनिव्हर्सिटींत केलेल्या या भाषणांत 'चले जाव !' चा विचार त्यांनी स्पष्ट बोलून दाखविला होता. ते म्हणाले, "इंग्लिश लोक हिंदुस्थान सोडून गेल्याशिवाय या देशाचा उद्धार व्हायचा नाही. त्यांना घालवून दिलच पाहिजे अशी माझी जर खात्री झाली तर 'तुम्ही चालते व्हा !' असं त्यांना उघडपणानं बजावण्यास मी मागंपुढें पाहणार नाही, आणि या माझ्या मताप्रीत्यर्थ मरण्यासदेखील मी सज्ज होईन. बॉंबगोळे फेकणाऱ्या अराजकांचं म्हणणं असं आहे की—"

अध्यक्ष बेझंटबाई यांना गांधींचं तें वक्तृत्व ऐकवेना. त्यांनी त्यांना अडथळा करून म्हटलं, "मेहरबानी करून पुरें करा आता !" पण गांधी म्हणाले, "अध्यक्षांच्या परवानगीनं मी आपल्याला असं सांगतों, की सरकार आणि जनता यांमध्ये उभयपक्षीं जें संशयपूर्ण वातावरण आहे त्यांतून देशाला मुक्त करण्याची माझी इच्छा आहे !"

उंच व्यासपीठावरील सारे शिष्ट अस्वस्थ झाले. राजेमहाराजे गर्भगळित झाले. भाडोत्री विद्वान् लटलटा कापूं लागले. अध्यक्षांसकट सारीं बडीं बडीं घेंडं चक् चक् करीत निघून गेलीं. सन्माननीय पाहुण्यांनी काढता पाय घेतला. सर्वसामान्य श्रोते टाळ्या पिटीत होते. परंतु अध्यक्षच नाहीसे झाल्यामुळे सभा मोडली. गांधींचं तें भाषण अपूर्णच राहिलं . . .

परंतु त्या प्रसंगींच्या अपूर्ण वक्तृत्वानं शेकडो पूर्ण भाषणांचं काम गांधींनी साधलं होतं. लोकांची खात्री पटली होती, की गांधी म्हणजे साधा सामान्य पोषाखी वक्ता नव्हे ! वरून कितीहि शांत, स्थिर भासला तरी तो एक निद्रिस्त ज्वालामुखी आहे !

त्याच्या गर्भात कोटि कोटि लोकांना चेतविणारा तप्त रस आहे ! गांधींच्या वक्तृत्वशैलीचं वर्णन करतांना भाषेची ठेवण, उच्चारांची तऱ्हा, आवाजांतलं आकर्षण इत्यादि गोष्टी अगदी गौण म्हणून सोडून द्याव्या लागतात. त्यांच्या वक्तृत्वाचा खरा गाभा म्हणजे त्यांच्या विचारांची तेजस्वी निर्भयता, स्वमताबद्दलची अपार खात्री, आणि लोकांच्या अंतःकरणांतला सारा भेकडपणा जाळून भस्म करणारा स्फूर्तीचा अंगार ! हेच गुण टिळकांच्याहि वक्तृत्वांत होते. परंतु गांधींच्या वक्तृत्वांत या गुणांचा अधिक प्रकर्ष होता . . . यामुळेच की काय कुणास ठाऊक, कित्येक प्रसंगीं आपल्या वक्तृत्वांत गांधी टीकेची

धार ज्यांवर चालवीत तीं माणसंदेखील व्याख्यानाच्या शेवटी गांधींचं खुल्या दिलानं अभिनंदन करीत.

चंपारण्यांतली चळवळ म्हणजे गांधींनी हिंदुस्थानांत आल्यानंतर यशस्वी करून दाखविलेलं पहिलं मोठं कार्य. आसामांतल्या मळेवाल्यांचीं गाऱ्हाणीं सत्याग्रहाच्या चळवळीनं दूर करण्याचा यशस्वी प्रयोग त्यांनी करून दाखविला. सत्याग्रहाच्या या फलश्रुतीनंतर गोऱ्या मळेवाल्यांच्या संघाच्या गोऱ्या अध्यक्षानंच विनंती केल्यावरून हिंदी मजुरांच्या एका विराट सभेंत गांधींनी जें भाषण केलं त्याचं वर्णन एका लेखकानं इंग्रजींत केलेलं आहे. तो लेखक लिहितो, " गांधींचं तें एक सभेंतलं भाषण होतं, की दिव्य शक्तीनं स्फुरणारा दैवी उद्‌गार होता तें मला सांगता येत नाही. त्यांची भाषा अगदी साधी होती. अलंकारांचा गंधहि नव्हता, परंतु त्यांचा शब्द थेट अंतःकरणापासून निघत होता, आणि म्हणूनच श्रोत्यांच्या अंतःकरणाला भिडत होता. भाषण करतांना गांधी डोळ्यांची, हातांची कसलीच हालचाल करीत नाहीत. भाषणाच्या वेळी त्यांचं चित्त शांत, स्थिर आणि एकाग्र झालेलं असतं. युरोपियन मळेवाल्यांवर गांधींनी आपल्या भाषणांत केली तितकी जळजळीत, निर्भीड पण माधुर्यपूर्ण टीका मी कधी ऐकली नव्हती. आश्चर्य असं, की ज्यांच्यावर टीकेचा भडिमार गांधींनी केला ते गोरे मळेवालेसुद्धा त्यांच्या भाषणानं मोहून गेले. गांधींचं तें भाषण खोडून काढणं तर सोडाच, उलट एकेक मळेवाला उठून बोलूं लागला तो गांधींच्या सत्याची आणि निर्भयतेची प्रसंशा करण्यासाठीच ! . . . "

चंपारण्यांतील यशस्वी सत्याग्रहानंतर अवघ्या तीन वर्षांच्या काळांत गांधींचं कार्य आणि लोकप्रियता भलत्याच वेगानं वाढली.

जे गांधी १९१५ सालाच्या अगोदर भारतांतल्या लोकांना फक्त ऐकून माहीत होते, ते गांधी १९२० सालांत तेहतीस कोट भारतीयांच्या अंतःकरणाचे स्वामी होऊन बसले होते. त्यांच्या शब्दांची शक्ति देशव्यापी झाली होती. ' महात्मा ' ही पदवी त्यांना मिळाली होती. असहकारितेचा नवाच स्वराज्याचा मार्ग ते भारतीय जनतेला दाखवीत होते. कॉंग्रेसचं जादा अधिवेशन कलकत्त्याला १९२० च्या सप्टेंबरमध्ये भरलं तें असहकारितेचा ठराव पास करून घेण्यासाठीच. हा ठराव मांडण्यासाठी गांधींनी केलेल्या

भाषणांत त्यांच्या वक्तृत्वाचे सारे गुण प्रगट झाले. लोकमान्य टिळक तर स्वर्गवासी झाले होते. पण लाला लजपतराय, चित्तरंजन दास, बिपिनचंद्र पाल अशा मोठमोठ्या पुढाऱ्यांनी गांधींच्या असहकारितेच्या कार्यक्रमाला कसून विरोध दर्शविला होता. चित्तरंजन दास तर गांधींचा ठराव हाणून पाडण्यासाठी बंगाली प्रतिनिधींचा एक जथा घेऊन आले होते. परंतु गांधींच्या भाषणाचा परिणाम जादूची एखादी कांडी फिरावी तसा झाला. ठराव तर प्रचंड बहुमतानं पास झालाच, परंतु लजपतराय आणि चित्तरंजन दास यांच्यासारख्या विरोधकांनी आपला विरोध संपूर्णतः मागे घेतला, आणि ते गांधींचे कट्टर अनुयायी बनले.

कलकत्त्याच्या कॉंग्रेसमधलं गांधीजींचं तें भाषण मला अजूनहि आठवतं. त्या भाषणात नाटकी आवेश नव्हता, श्रोत्यांच्या मनोविकारांना आवाहन नव्हतं, कविकल्पनांचा फुलोरा नव्हता, वक्तृत्व सजविण्याची कोणतीहि कृत्रिम खटपट नव्हती. नेहमीच्या सवयीप्रमाणे शांत, स्थिर, गंभीर, निश्चयी आवाजांत गांधी बोलत होते. देशापुढे एकच प्रश्न होता—गांधींच्या मागोमाग जायचं की नाही? असहकारितेचं खडतर व्रत पत्करायचं की नाही? अपार त्यागाची आणि हालअपेष्टांची वाट धरायची की नाही? गांधींवर विश्वास टाकायचा की नाही? कॉंग्रेसचा कौल गांधींच्या बाजूनं पडतो की विरुद्ध पडतो तें सांगता येत नव्हतं. एका भाषणावर देशाचं भवितव्य अवलंबून होतं. अशा परिस्थितींत गांधींनी तें भाषण केलं. त्या भाषणानं त्यांनी कॉंग्रेसचं अधिवेशन जिंकलं तें खरोखर वक्तृत्वांतल्या एकाच गुणावर. त्यांचा प्रत्यक्ष शब्द थेट अंतःकरणापासून निघत होता, आणि त्यामुळे अथांग गर्दीतल्या प्रत्येक व्यक्तीच्या अंतःकरणाला जाऊन भिडत होता. त्यांच्या भाषणांतील प्रारंभींचीं वाक्यं माझ्या कानांत अजून घुमतात.

" असहकारितेचा हा ठराव या प्रचंड सभेपुढे मांडण्याचा जो मान माझ्याकडे आला आहे त्यांतून उत्पन्न होणाऱ्या घोर जबाबदारीची मला जाणीव आहे. मला अशीहि जाणीव आहे, की हा ठराव पास झाल्यास माझ्या आणि तुमच्याहि वाट्याला संकटं आणि हालअपेष्टा येणार आहेत. मी हेंहि जाणून आहे, की माझ्या या ठरावामुळे स्वराज्यासाठी झालेल्या

आजपर्यंतच्या प्रयत्नांत विलक्षण क्रांति होणार आहे. मला हेंहि ठाऊक आहे, की आजपर्यंत स्वराज्याप्रीत्यर्थ ज्यांनी माझ्यापेक्षाहि अधिक त्याग आणि प्रयत्न केले अशा थोर थोर व्यक्ती माझ्याविरुद्ध ठाकलेल्या आहेत. हें सर्व माहीत असूनहि माझा ठराव आपण पास करावा अशी विनंती करण्यासाठीं मीं उभा राहत आहे तो केवळ कर्तव्यबुद्धीनं, आणि माझं कर्तव्य करण्यांत मी कसूर केली तर परमेश्वराला तें मंजूर होणार नाही अशा भयान ! "

केवढी नम्रता आणि केवढं सामर्थ्य होतं भाषणाच्या सुरुवातीच्याच या वाक्यांत !

आणि या प्रारंभाला साजेशीच गांधींच्या त्या भाषणाची अखेरी होती !

" पुन्हा एकवार आपणांस मी विनवितों, की माझ्याविषयींचे व्यक्ति-विषयक विचार आपण मनांत ठेवूं नका. आजपर्यंत जी कांही देशसेवा माझ्या हातून घडली असेल तीदेखील लक्षांत घेऊं नका. दोन गोष्टी मात्र हिशेबांत घ्या. एक अशी, की जो कार्यक्रम मी आपणांपुढे ठेवीत आहें त्याचा मी दीर्घकाळ रात्रंदिवस विचार केलेला आहे ; आणि दुसरी अशी, की हा कार्यक्रम यशस्वी करून देशाला स्वातंत्र्य मिळवून देण्याच्या कामीं प्राण खर्च करण्यास मीं सिद्ध आहें.,,

सभेला नम्रतापूर्वक अभिवादन करून गांधींनी भाषण संपविलं त्याबरोबर टाळ्यांचा जो प्रचंड गजर झाला, त्याचे ध्वनी भारताच्या कानाकोपऱ्यांतच नव्हे तर सातासमुद्रांपलीकडे लंडन शहरींदेखील ऐकूं गेले असतील खचित ! गांधींच्या त्या एका वक्तृत्वपूर्ण भाषणानं पुढच्या कित्येक वर्षांतलं राष्ट्रीय चळवळीचं भवितव्य ठरलं !

गांधींच्या वक्तृत्वाबद्दल लिहितांना त्यांच्या सुप्रसिद्ध प्रार्थनांचा उल्लेख अटळ आहे. ज्या गांधींना सदरा, अंगरखा आणि काठेवाडी पागोटं अशा वेषांत मीं १९१५ सालीं पाहिलं ते गांधी नंतर कित्येक वर्षांनी प्रार्थनेच्या सभेंत माझ्या दृष्टीस पडले ते व्यासपीठावर उघड्या अंगानं बसलेले ! त्यांचा वर्ण आता काळा भासला नाही. गव्हासारखा तांबूस भासला. दंड, खांदे, छाती हा शरीराचा भाग मोठा मोहक भासला. माझ्या मनांत आलं, चार सहा हजार लोकांच्या सभेंत मध्यभागीं व्यासपीठावर मांडी घालून, डोळे मिटून घेऊन मनांतल्या मनांत परमेश्वराचं चिंतन करायचं म्हणजेदेखील सामान्य

माणसाला दु:साध्य गोष्ट म्हणावी लागेल ... प्रार्थनेनंतर गांधीजी भाषण करीत असत. तें छोटंसंच असे, परंतु विलक्षण परिणामकारक असे. राऊंड टेबल कॉन्फरन्ससाठी १९३१ सालीं गांधी इंग्लंडला गेले तेव्हा त्यांच्या तेथील वास्तव्यांत एकदा केंब्रिज आणि ऑक्सफर्ड या विश्वविद्यालयांतील विद्यार्थ्यांच्या आमंत्रणावरून त्यांनी त्यांच्या क्लबांत जाऊन सायंकाळची प्रार्थना केली. प्रार्थनेनंतरच्या छोट्याशा भाषणांत जालियनवाला बागेंतील ब्रिटिश अत्याचारांचं वर्णन करून गांधी म्हणाले, " या अमानुष पापाचं प्रायश्चित्त इंग्लिश लोक कोणत्या प्रकारें घेणार आहेत ? " गांधींचा हा सवाल इतका प्रक्षोभक होता, की प्रार्थनेनंतर मिसेस् लिंड्से नांवाच्या एक इंग्रज बाई गांधींजवळ आल्या आणि म्हणाल्या, " मिस्टर गांधी, आम्ही पन्नास वेळां आमच्या पोटावर सरपटत चाललों तर तुमच्या मतें जालियनवाला बागेंतल्या पापाचं प्रायश्चित्त घेतल्यासारखं होईल काय ? आम्ही तसं करण्यास तयार आहोंत ! "

गांधींचीं भाषणं आणि त्यांची प्रार्थना या दोहोंतहि एकच अभिन्न शक्ति होती. कृतनिश्चय ! धैर्य ! सत्कार्याची प्रतीज्ञा ! फक्त ईश्वराचंच भय ! त्यांचं एकेक भाषण म्हणजे बोलकी प्रार्थना होती ! आणि त्यांची प्रार्थना म्हणजे विलक्षण परिणामकारक मूक वक्तृत्व होतं ! "

* * *



# १६ : लोकमान्य टिळक

लोकमान्य टिळकांच्या एकंदर चरित्राचे चार भाग कल्पिले तर असं म्हणतां येईल, की त्या चरित्राचा एक भाग गेला अध्यापनांत, एक गेला ' केसरी 'चे अग्रलेख लिहिण्यांत, आणखी एक गेला बंदिवासांत व चिंतनांत आणि ' गीतारहस्य ' लेखनांत, आणि उरलेला चवथा गेला व्याख्यानं देण्यांत !

खाडिलकर, केळकर, शिवरामपंत परांजपे अशा मंडळींनी लेखन केलं, आणि वक्तृत्वहि गाजविलं ! परंतु त्यांच्या लेखांइतकं महत्त्व त्यांच्या व्याख्यानांनाहि होतं असं म्हणतां येणार नाही. टिळकांच्या बाबतींत मात्र असं म्हणावंच लागेल, की त्यांनीं आपल्या अग्रलेखांनी जितकी लोकजागृति केली तितकीच किंवा त्याहूनहि अधिक व्याख्यानांनी केली. लोकजागृति हेंच टिळकांच्या जीविताचं ध्येय होतं. ज्या चिरोलसाहेबानं टिळकांशीं जन्मभर वैर केलं, आणि ज्याच्याशीं झुंज देण्यांत टिळकांना काळ आणि पैसा दोन्ही मोठ्या प्रमाणांत खर्ची टाकावे लागले, त्या चिरोलनं ' हिंदी असंतोषाचे जनक ' अशी पदवी त्यांना बहाल केली होती. दुसऱ्या एका इंग्रज लेखकानं टिळकांचं वर्णन ' A life of campaigning terrorism to which

we know no parallel in constitutional history' अशा शब्दांत केलं आहे. म्हणजे त्याचा अभिप्राय असा आहे, की सरकारच्या मनांत अखंड दहशत निर्माण करण्याची जी मोहीम टिळकांनी जन्मभर काढली होती तिला इतिहासांत दुसरी तोड नव्हती ! चिरोलसाहेबानं किंवा या दुसऱ्या इंग्रज लेखकानं टिळकांचं वर्णन केलं तें दूषण देण्याच्या हेतूनं. परंतु युद्धांत शत्रूनं केलेल्या घावांच्या ज्या खुणा झुंजार वीरांच्या अंगावर उठतात त्या त्याला अलंकारासारख्या शोभतात, या न्यायानं चिरोल-सारख्या शत्रूंनी दिलेलं दूषण म्हणजे स्वतः टिळकांना आणि त्यांच्या भक्तांना भूषणच वाटण्यासारखं होतं. टिळकांनी सरकारच्या मनांत सतत दह-शत उत्पन्न केली, सरकारला भंडावून सोडलं, नकोत हे टिळक असं वाटायला लावलं, अशी सरकारनं किंवा सरकारच्या पक्षपात्यांनी दिलेली कबुली म्हणजे टिळकांच्या जीवितकार्याची एक प्रकारची भरपावतीच होती !

टिळकांनी सरकारच्या मनांत दहशत उत्पन्न केली ती दोन साधनांनी ! लेखणी आणि वाणी ! यांपैकी कोणत्या हत्यारानं सरकारला अधिक जखमा होण्यासारख्या होत्या तें ठरविणं कठिण आहे. दोन्ही हत्यारं अलौकिक निर्भयतेचं पाणी देऊन पाजळलेलीं आणि विलक्षण धारदार होतीं ! दोन्ही अशीं होतीं, की शत्रूच्या अंगाला निसटता का होईना स्पर्श होण्याचा अवकाश, तावडतोब रक्त निघालंच पाहिजे. सरकारनं टिळकांवर वेळोवेळीं जे खटले भरले ते त्यांच्या व्याख्यानांचं निमित्त करून नव्हे, तर 'केसरीं'तल्या लेखांचं निमित्त करून. परंतु सरकारनं मनांत आललं असतं, तर टिळकांच्या व्याख्यानांसाठीहि त्यांना अटक करून खटला भरता आला असता. टिळकांच्या अग्रलेखांत जो तेजोगुण होता तोच त्यांच्या वक्तृत्वांतहि होता !

टिळकांनी सरकारला सतत जहाल टीकेच्या धारेवर धरलं होतं म्हणून ते सरकारला नकोसे झाले होते हें सत्य असलं तरी पूर्ण सत्य नव्हे ! सर-कारच्या मनांत टिळकांविषयीं दहशत निर्माण झाली होती ती केवळ ते सर-कारचे वाभाडे काढीत असत येवढ्याच कारणानं नव्हे. जहाल राष्ट्रीय चळ-वळीच्या ऐन धामधुमीच्या काळांत सरकारवर तोंडसुख घेणारीं इतर पुष्कळ माणसं होतीं. परंतु त्यांपैकीं कुणाचीच नव्हे इतकी टिळकांची धास्ती सरकारनं घेतली होती. याचं खरं कारण टिळकांच्या लेखणींत आणि वाणींत

असा कांही विलक्षण गुण होता, की त्यांच्या एकेका अक्षराबरोबर सामान्य जनतेपैकी शेकडो माणसं चेवानं उठावींत ! पुराणांतरीच्या कुणा वीराची अशी गोष्ट होती, की भूमीवर सांडलेल्या त्याच्या रक्ताच्या एकेका थेंबागणिक योद्धा निर्माण होत असे. टिळकांच्या शब्दांतहि अशीच शक्ति होती. वक्तृत्व-कलेचीं इतर कोणतींहि लक्षणं असलीं तरी सर्वांत मोठं लक्षणं एकचं, की वक्त्यानं उच्चारलेला प्रत्येक शब्द श्रोत्यांच्या अंतःकरणाला जाऊन भिडला पाहिजे. हें लक्षण ध्यानांत ठेवून बोलायचं झालं तर टिळकांचं वक्तृत्व फार उच्च कोटींतल होतं.

टिळकांनी लेखनकलेचा जसा अभ्यास कधी केला नाही तसाच वक्तृत्व-कलेचाहि केला नाही. किंबहुना कलेच्या दृष्टीनं त्यांनी लेखनाकडेहि पाहिलं नाही, किंवा वक्तृत्वाकडेहि लक्ष दिलं नाही. ‘ जागे व्हा ! उठा ! कामाला लागा ! ’ असं आपल्या देशबांधवांना आपल्याला सांगायचं आहे येवढंच त्यांना माहीत होतं. हें सांगण्यासाठी लेखणी आणि वाणी या दोन साधनांचा उपयोग आपल्याला करता येईल येवढंच त्यांना समजत होतं. खरं पाहता त्यांना लेखनाचाहि कंटाळा होता, व्याख्यानाचाहि कंटाळाच होता. इतकंच काय, ते कितीदा तरी असं म्हणत, की ‘ राजकीय चळवळ करणं ही माझी खरी जन्मसिद्ध हौस नाही. ’ ‘ मनुष्यजातीच्या ज्ञानांत भर घालण्यासाठी कांही करावं ’ अशी त्यांची खरी आंतरिक ओढ होती. ते राजकारणी पुढारी झाले ते संकल्पानं नव्हे, तर योगायोगानं. परंतु ‘ केसरी ’चं संपादकत्व एकदा पतकरल्यावर आणि लोकांचं पुढारीपण आपल्याला करावं लागणार हें ओळखल्यावर मात्र त्यांनी वक्तृत्वांत कसूर केली नाही. लोकजागृति आणि लोकसंग्रह हीं दोनच उद्दिष्टं त्यांनी आपल्या नजरेपुढे ठेवलीं, आणि सतत चाळीस वर्षांच्या नेतेपणाच्या कारकीर्दीत एकामागून एक हातीं घेतलेली चळवळ अगदी नमुनेदार करून दाखविली. सरकाराविरुद्ध लोकांचा असंतोष निर्माण करून त्या असंतोषाला भरघोस चळवळीचं स्वरूप देण्यासाठी जो जो प्रश्न त्यांनीं हातीं घेतला त्या त्या प्रश्नावर त्यांच्या अग्रलेखांचा आणि व्याख्यानांचा तोफखाना गर्जत राहिला. प्रत्येक चळवळीच्या वेळेस त्यांचे अग्रलेख अधिक प्रभावी ठरले की त्यांचीं व्याख्यानं अधिक प्रभावीं ठरलीं या प्रश्नाचं उत्तर ठरविणं कठिण आहे. एकच अविवाद्य विधान करतां येईल

तें असं, की त्यांच्या लेखनाची जी शैली होती तीच त्यांच्या वक्तृत्वाचीहि होती. त्या दोहोंत ज्या गुणांमुळे अपूर्व सामर्थ्य आलं होतं ते गुणहि समान होते. निर्भयता आणि निश्चय हे ते दोन गुण !

टिळकांच्या चरित्रांतले सर्वांत अधिक दोन नाट्यपूर्ण प्रसंग कोणते या प्रश्नाचं उत्तर शोधूं लागल्यास या दोन्ही प्रसंगीं वक्त्याच्याच भूमिकेंत त्यांची मूर्ति डोळ्यांपुढे उभी राहते. तारीख २६ डिसेंबर १९०७ रोजीं सुरत येथे कॉंग्रेसचं अधिवेशन सुरू झालं, आणि लगेच मोडलं त्यावेळचा प्रसंग ! आणि १९०८ सालीं जुलै महिन्याच्या २२ तारखेस रात्रीं मुंबईच्या हायकोर्टात न्यायमूर्ति दावर यानं टिळकांना सहा वर्षांच्या काळ्या पाण्याची शिक्षा सांगितली त्या वेळचा प्रसंग ! या दोन प्रसंगांनी टिळकांचा थोरपणा आणि त्यांची लोकप्रियता एकदम उंचावली हें जसं खरं, त्याचप्रमाणे हे दोन्ही प्रसंग अत्यंत नाट्यपूर्ण होते, आणि टिळकांच्या तोंडून बाहेर पडलेल्या प्रत्येक वेळच्या उद्गारांत निर्भयता आणि निश्चय या त्यांच्या वक्तृत्वगुणांचं तेज फाकलं होतं हेंहि खरं ! पहिल्या प्रसंगांत टिळक व्यासपीठावर उभे होते. दुसऱ्या प्रसंगीं ते आरोपीच्या पिंजऱ्यांत उभे होते. परंतु दोन्ही वेळां एकप्रकारे वक्त्याचीच भूमिका त्यांनी पार पाडली. दोन्ही प्रसंगींच्या त्यांच्या उद्गारांकडे कोट्यवधि लोकांचे कान लागले होते. दोन्ही प्रसंगींच्या त्यांच्या उद्गारांना अमरत्व प्राप्त झालेलं आहे. या दोन्हींपैकी प्रत्येक प्रसंगीं टिळकांच्या तोंडून चार सहा वाक्यंच बाहेर पडलीं ; परंतु त्या वाक्यांना कित्येक प्रदीर्घ व्याख्यानांना नसेल येवढं मोल होतं. निर्भयता आणि निश्चय हे दोन्ही गुण त्यांत ठासून भरलेले होते.

सुरतेच्या कॉंग्रेसच्या आदल्या वर्षीं कॉंग्रेसचं अधिवेशन दादाभाई नौरोजी यांच्या अध्यक्षतेखाली कलकत्त्यास झालं होतं ; आणि अर्ज-विनंत्यांचं मवाळ राजकारण आता बस्स झालं असं तर दादाभाईंनी ठणठणीत शब्दांत सांगितलंच, पण शिवाय राष्ट्रीय शिक्षण, स्वदेशी आणि बहिष्कार यांबद्दलचे स्पष्ट ठरावहि पास झाले. आपल्या हातून निसटूं पाहणारीं कॉंग्रेसचीं सूत्रं पुन्हा हातीं आणण्याचे डाव खेळण्यासाठीच नेमस्त पुढाऱ्यांनी नंतरचं अधिवेशन सुरतेला भरविलं, आणि राशबिहारी घोष यांची अध्यक्षपदावर योजना केली. नेमस्तांचा हा डाव उधळण्यासाठी अध्यक्षाच्या सूचनेलाच दुरुस्ती सुचविण्याचं, आणि तीदेखील स्वतःच सुचविण्याचं टिळकांनी ठरविलं.

अधिवेशन सुरू झालं. राशबिहारी घोष यांचं नांव अध्यक्षपदासाठी सुचविलं गेलं. सुरेंद्रनाथ ब्रानर्जी यांचं अनुमोदनाचं भाषण संपलं. राशबिहारी घोष अध्यक्ष म्हणून खुर्चीवर येऊन बसणार तोंच टिळक आपल्या खुर्चीवरून उठले व व्यासपीठाकडे जाऊं लागले. एका स्वयंसेवकानं त्यांना रोखलं, पण त्याला सहज बाजूला सारून टिळक पायऱ्या चढून वर गेले, व सभेकडे तोंड करून त्यांनी बोलण्यास प्रारंभ केला. राशबिहारी घोष त्यांना म्हणाले, " माझ्या निवडणुकीचा ठराव मंजूर झाला आहे ! मी अध्यक्ष आहे ! ! " त्यांनी खिशांतलं छापील भाषण वाचण्यासाठी बाहेर काढलं. पण त्यांना अडवून टिळक म्हणाले, " तुमची निवडणूक अद्यापि झालेली नाही. त्या सूचनेला उपसूचना आणण्याकरिताच मी उभा आहे ! "

व्यासपीठावर हा प्रकार झाल्याबरोबर मंडपांत उलटसुलट आरोळ्यांचा गलबला झाला. टिळकांचं नांव घेऊन गुजराथींतून दिलेल्या शिव्या ऐकूं आल्या. कुणी ओरडले, " टिळक, तुम्ही व्यासपीठावरून खालीं उतरा ! " टिळकांनीं ओरडून उत्तर दिलं, " छाती असेल तर मला उचलून खाली ठेवा !" टिळकांवर हात टाकण्यासाठी कांही मंडळी पुढे सरसावली. उलट टिळकांची मित्रमंडळी पुढे बसली होती तीहि उठून धावली. एक जोडा भिराभिरत येऊन व्यासपीठावर पडला. व्यासपीठाच्या पायऱ्यांजवळ आणि मंडपांत मारामारी सुरू झाली. खुर्च्या फेकण्यांत आल्या. काठ्या चालविण्यांत आल्या. नेमस्त पक्षाची सारी बडी बडी मंडळी मागच्या दारानं पळून गेली ! नेमस्तांचा डाव फसला ! सुरतेची कॉंग्रेस मोडली !

" तुमची निवडणूक अद्यापि झालेली नाही ! त्या सूचनेला उपसूचना आणण्याकरिताच मी उभा आहें ! " येवढीं दोनच वाक्यं टिळकांच्या तोंडून बाहेर पडलीं होतीं. पण त्या दोनच वाक्यांनी उत्पन्न केलेल्या स्फोटक कल्लोळांत नेमस्त राजकारणाची कायमची आहुति पडली होती, आणि टिळकांच्या अखिल भारतीय पुढारीपणाचा व नंतर सतत तेरा वर्षं त्यांनी जें जहाल राजकारण केलं त्याचा जन्म झाला होता. प्रतिपक्षाच्या मनांत दहशत उत्पन्न करणारे व्यासपीठावरचे टिळक कसे होते, त्याचं चित्र काढावंसं एखाद्या चित्रकाराला वाटलं तर त्यानं ज्याची आधी निवड करावी असाच हा प्रसंग नव्हता काय ?

या प्रसंगाचं एक अति सुंदर शब्दचित्र एका निष्णात लेखकानं काढलेलं आहे. सुरत येथील कॉंग्रेसच्या सुमारास इंग्लंडमधल्या कित्येक प्रमुख वृत्तपत्रांनी आपले खास बातमीदार हिंदुस्थानांत पाठविले होते. हिंदुस्थानांतील परिस्थिति आणि प्रमुख राजकीय पुढाऱ्यांचे विचार प्रत्यक्ष अवलोकन करून व मुलाखती घेऊन समजून घेण्याची व त्याबद्दलचे अहवाल आपापल्या पत्राकडे धाडण्याची कामगिरी या बातमीदारांवर संपादकांनी सोपविलेली होती. या मंडळींत सर्वांत हुशार, चौकस आणि लेखनकुशल असा जो तरुण गृहस्थ होता त्याचं नांव हेन्री नेव्हिन्सन्. सुरतेची कॉंग्रेस मोडली त्या प्रसंगीं तो समक्ष हजर होता, आणि त्यानं केलेलं त्या प्रसंगाचं समग्र वर्णन अत्यंत वाचनीय आहे. परंतु या उत्कृष्ट वर्णनांतील टिळकांबद्दलचा तेवढा भाग पुढे देतों—

"आभाळांत काळे ढग येऊन वीज कडाडावी त्याप्रमाणे टिळक आपल्या जागेवरून उठले, पायऱ्या चढून थेट व्यासपीठावर चढले, अध्यक्षांच्या खुर्चीपुढे उभे राहिले, आणि बोलूं लागले. ते तक्रार करीत होते, निषेध करीत होते, हरकत सांगत होते. पण हें सर्व काम त्यांच्या शांत आणि निश्चयी स्वभावाप्रमाणे चालू होतं. त्यांचा तो आवाज ऐकून वाटे, की हा मनुष्य भवितव्यतेलाहि तुच्छ मानीत आहे. मालवीय त्यांना म्हणाले, 'तुम्हांला दुरुस्तीची सूचना आणतां येत नाही.' टिळकांनी त्यांना खडसावलं, 'तुम्ही कोण ? तुम्ही कांही अध्यक्ष नाही.' राशबिहारी घोष म्हणाले, 'मीहि तुम्हांला तेंच सांगतों, मी अध्यक्ष आहे.' टिळकांनी खणखणीत उत्तर दिलं, 'तुम्ही पण अध्यक्ष नाही. तुमची निवडणूक मुळी झालेलीच नाही. मी प्रतिनिधींना उद्देशून बोलत आहें !' यापुढचं भाषण आरडाओरडींत कुणाला ऐकूंच आलं नाही. टिळक छातीवर आडवे हात ठेवून आपल्या जागीं उभे होते. दोन्ही बाजूंना नेमस्त पक्षांतले तरुण लोक खडे झाले, आणि थांबा, याचा सूड काढू असं म्हटल्याप्रमाणे हातवारे करूं लागले. त्यांच्या मुठी वळलेल्या होत्या. आणि तोंड वर करून ते किंकाळत होते. टिळकांना खाली ओढा, ढकलून द्या असंहि कुणी ओरडत होते. सभास्थानांतील सबंद श्रोतृवृन्द भरतीच्या समुद्राप्रमाणे गर्जत होता. इतक्यांत हवेंत एक जोडा उडाला, आणि तो सुरेंद्रबाबूंच्या गालाला चाटून पडला.

पांढऱ्या फेट्याचे लोक एखाद्या लाटेप्रमाणे एकामागून एक प्लॅटफॉर्मवर चढले. ते लांब काठ्या परजीत होते. तोंडांनी रागाचे फूत्कार सोडीत होते. मोठीच भाऊगर्दी माजली. शत्रु, मित्र ओळखता येईना. टिळकांचे कांही हितचिंतक त्यांचा बचाव करण्याकरिता त्यांच्याजवळ जाऊन हात पसरून उभे राहिले. परंतु टिळकांना कुणाच्या संरक्षणाची गरज किंवा पर्वा नव्हती! त्यांचे ते छातीवर दुमडलेले हात आणि निर्भय उग्र मुद्रा पाहणाराला वाटावं, की हा मनुष्य साऱ्या विरोधाला आव्हान देऊन म्हणतो आहे 'या! कुणाला माझं डोकं बिकं मारायचं असेल तर मारा पाहू! कुणी काय वाटेल तें केलं, वाटेल तें दिलं, कुणी स्वर्ग, कुणी नरक पुढे आणून उभा केला तरी माझं पाऊल रेसभर हालणार नाही!' "

टिळकांच्या आयुष्यांतील हा विलक्षण नाट्यपूर्ण प्रसंग एखाद्या चित्रकारानं जसाच्या तसा रंगविला तर त्या चित्राकडे बोट दाखवून मी म्हणेन, की टिळकांच्या वक्तृत्वाचा नमुना तुम्हांला बघायचा आहे? बघा हें चित्र!

आणखी एक चित्र काढण्यासारखं आहे तें १९०८ सालीं टिळकांना सहा वर्षांची शिक्षा जस्टिस दावरनं सांगितली त्या प्रसंगाचं. टिळकांवरचा हा राजद्रोहाचा खटला दीर्घकाल चालू होता. सरकारी साक्षीदारांची उलट तपासणी टिळकांनी केली, ती दीड दिवस चालू होती. टिळकांनी आपल्या बचावाचं जें भाषण केलं तें पांच दिवस चाललं होतं. अखेर निकालाच्या वेळेस रात्र झाली होती. कोर्टाबाहेर अंधार पसरला होता. प्रत्यक्ष कोर्टांतहि उजेड कांहीसा अपुराच होता. टिळक पक्कं ओळखून होते, की आपल्याला जबर शिक्षा होणार आहे, आणि आपली रवानगी करण्यासाठी कोर्टाबाहेर पोलीस व्हॅन सज्ज असून सारी तयारी कडेकोट सिद्ध आहे. अशा परिस्थितींत जस्टिस दावर त्यांना विचारीत होता, "तुम्हांला अखेरचं कांही सांगायचं आहे का?" तें ऐकून टिळक म्हणाले, "मला सांगायचं असं फारच थोडं आहे. ज्यूरीनं मला दोषी ठरविलं तर खुशाल ठरवूं दे, पण मी गुन्हेगार नाही. लौकिक गोष्टींचं नियंत्रण करणारी या न्यायासनाहूनहि वरिष्ठ अशी एक शक्ति आहे. कदाचित् ईश्वराची इच्छाच अशी असेल, की मला शिक्षा व्हावी आणि ती शिक्षा भोगल्याच्या कारणानं मी अंगिकारिलेल्या कार्याला ऊर्जित दशा यावी!"

टिळकांच्या या तेजस्वी उद्‌गारांचं मोल कित्येक प्रदीर्घ व्याख्यानांच्या

मोलापेक्षा अधिक खचितच होतं. आरोपीच्या पिंजऱ्यांतून टिळकांनी तोंडावाटे काढलेले हे अविस्मरणीय शब्द आता मुंबईच्या न्यायमंदिरांत संगमरवरांत कायमचे कोरले जाऊन सन्मानाच्या जागीं बसविण्यांत आले आहेत, यांत टिळकांच्या वक्तृत्वगुणाचा योग्य गौरव झाला असं म्हणता येईल !

विस्तीर्ण सागर आणि सागरांतील पाण्याचा एक बिंदु यांत गुणांच्या दृष्टीनं फरक नाही. सागराच्या पाण्याचे सर्व गुणधर्म बिंदूंतहि असतातच. टिळकांचीं मोठमोठीं व्याख्यानं आणि ज्या प्रसंगांचं वर्णन आता मी केलं त्या प्रसंगी त्यांच्या तोंडून बाहेर पडलेलीं दोन चारच वाक्यं यांत गुणांच्या दृष्टीनं भेद नव्हता. देशहिताची कळकळ, लोकजागृतीची तीव्र तळमळ, निर्भयता आणि निश्चय या गुणांनी या दोन्ही प्रसंगींचे टिळकांचे उद्‌गार ओतप्रोत भरलेले होते. मीं स्वतः त्यांचीं जीं भाषणं ऐकलीं त्यांचं, आणि त्या व्याख्यानांच्या प्रसंगीं टिळक मला कसे दिसले त्याचं आता मी वर्णन करणार आहें, तेंसुद्धा या चार गुणांनी अलंकृत झालेल्या त्यांच्या अपूर्व वक्तृत्वशैलीची कल्पना देण्यासाठीच !

‘ स्वराज्य हा माझा जन्मसिद्ध हक्क आहे, आणि तो मी मिळवीनच ! ’ हा तेजस्वी मंत्र चाळीस कोट भारतीयांच्या अंतःकरणांत ठसविण्यासाठी आपला जन्म आहे हें टिळकांनी ओळखलं होतं. त्यांची लेखनशैली आणि वक्तृत्वशैली या मंत्राच्या उपदेशाला साजेशी होती. ज्यांना हा मंत्र शिकवायचा, तीं माणसं बहुतांशीं निरक्षर, अज्ञ आणि भित्रीं आहेत, हें टिळकांना माहीत होतं, आणि म्हणून त्यांच्या लेखणीचा आणि वाणीचाहि कटाक्ष मुख्य दोन गोष्टींवर होता. एक गोष्ट अशी, की जें सांगायचं तें अगदी साध्या सुबोध परंतु परिणामकारक शब्दांत सांगायचं ; आणि दुसरी गोष्ट ही, की लोकांच्या मनांतलं भय नाहीसं करून, कर्तव्याचा मार्ग स्पष्टपणे दाखवून ते निर्भयपणानं कार्याला लागतील अशी चेतना त्यांना द्यायची. सरकारच्या चुका दाखवून, या चुका दुरुस्त करा, नाही तर जनतेचा असंतोष भडकेल असा इषारा सरकारला द्यायचा, अन्याय सहन करीत तुम्ही झोपा किती दिवस काढणार, निश्चयानं कार्याला लागलांत तर स्वराज्य मिळविणं अवघड नाही असं लोकांना सांगायचं, नेमस्तांच्या राजकारणाकडे लोकांनी ढुंकूनदेखील बघूं नये म्हणून त्याचा कुचकामीपणा लोकांना पटवायचा, स्वराज्याचा मार्ग

देण्यासाठी उजव्या हाताची वळलेली मूठ ते आपटीत. हातवारे सहसा होत नसत, आणि झाले तरी ते सौम्यच असत. त्यांचा आवाज खणखणीत होता, परंतु मोठा नव्हता. तथापि वक्तृत्वांतला आशय आणि अकृत्रिम आवेश इतका विलक्षण परिणामकारक असे, की त्यांच्या व्याख्यानाला सिंहगर्जनेची उपमा साजण्यासारखी असे. पायांत जोडा, धोतर, अंगांत अंगरखा, खांद्यावर उपरणं, डोक्याला पुणेरी लाल पगडी अशा पोशाखांतल्या, तेजदार पिंगट डोळ्यांच्या भेदक नजरेमुळे आणि मोठाल्या मिशांमुळे उग्र भासणाऱ्या, मध्यम उंचीच्या, सुदृढ बांध्याच्या, छाती पुढे काढून ताठ उभ्या राहिलेल्या टिळकांच्या मूर्तीकडे पाहताच खात्री पटे, की या ठिकाणीं निश्चय आहे ! निर्भयता आहे ! दिव्यत्वाचा, भव्यत्वाचा साक्षात्कार आहे !

* * *

REFBK-0010858

ग्रंथालय, ...
अनुक्रम २७०८२ दि: ११९२४
क्रमांक ९२३५ नों: दि: २५८८०